# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. २०/११/२००९**

आज शुक्रवार दि. २०/११/२००९ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. १०/११/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| २) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सभापती, स्थायी समिती |
| ३) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ४) | जंगम लक्ष्मण गणपत | विरोधी पक्षनेता |
| ५) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ६) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ७) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ८) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ९) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १३) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १४) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १९) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २०) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २१) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २२) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २३) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २४) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २५) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २६) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २७) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| २८) | पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| २९) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३०) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३१) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३२) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३३) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३४) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३५) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३६) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३७) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३८) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३९) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ४०) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४१) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |
| ४३) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ४४) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४५) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४६) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४७) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४८) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४९) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५०) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५१) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५२) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ५३) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५४) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५६) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५७) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५८) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५९) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६०) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६१) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६२) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६३) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६४) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६५) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६६) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६७) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६८) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६९) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७०) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७१) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७२) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७३) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| ३) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ४) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ५) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |

**<u>रजेचा अर्ज – निरंक</u>**

**प्रफुल्ल पाटील :-**

आजच्या सभेला महापौर साहेब उपस्थित नसल्यामुळे पिठसीन अधिकारी म्हणून उपमहापौरांना बसवावे.

(राष्ट्रीय गीत वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.)

**नगरसचिव :-**

पिठासीन अधिकरी ह्यांच्या परवानगीने, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. २०/११/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०४, दि. १०/११/२००९ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**अरुण कदम :-**

पिठासीन अधिकारी ह्यांच्या परवानगीने बोलत आहे. महाराष्ट्र टाईम्समध्ये अशी बातमी आली होती की, मिरा भाईंदरच्या महापौरांवर पोलिस कारवाई व्हावी, निधीच्या गैरव्यवहाराबाबत. तर ह्या बातमीच्या पिठासीन अधिकारी ह्यांनी खुलासा करावा.

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

सदरचा खुलासा करावा.

**भगवती शर्मा :-**

पिठासीन अधिकारी के परवानगीनसे बोलना चाहता हू की, मा. नगरसेवक अरुणजी कदमने जो विषय लाया है। यह बहुत ही अच्छा विषय है। मै चाहता हू की, यह सभा कामकाज नियम प्रकरण २ के के तहत विषय को लाकर इसमे चर्चा की जाए।

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

ह्याच्यावर चर्चा करावी.

**सुनिता भोईर :-**

पिठासीन अधिकारी ह्यांच्या परवानगीने बोलते, मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात होत असून काहृ परिसरात ग्रामपंचायत पासून अरुंद असलेल्या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होत असून पादचारी शाळेकरी विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो. पादचारी व शाळकरी विद्यार्थ्यांना त्रास होउ नये म्हणून मा. महासभेत ब-याचवेळा ना फेरिवाला क्षेत्रात फेरीवाल्यांना बसवण्यास मनाई करण्याबाबत ठराव झाले. त्यावर मा. आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक साहेब यांनी भाईंदर (पूर्व) भागातील मुख्य रस्त्यावर ना फेरीवाला क्षेत्रात बसणा-या सर्व फरीवाल्यांवर कठोर कारवाई करुन पादचारी व शाळेय विद्यार्थ्यांना सहकार्य केले. त्याबद्दळ मा. आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेब यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन!

कृपया त्यानी अशीच कारवाई करुन नागरीकांना सुखसोयी उपलब्ध करुन द्याव्या हिच सदिच्छा! पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन।

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**अभिनंदन ठराव क्र. २७ :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात होत असून काहृ परिसरात ग्रामपंचायत पासून अरुंद असलेल्या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होत असून पादचारी शाळेकरी विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो. पादचारी व शाळकरी विद्यार्थ्यांना त्रास होउ नये म्हणून मा. महासभेत ब-याचवेळा ना फेरिवाला क्षेत्रात फेरीवाल्यांना बसवण्यास मनाई करण्याबाबत ठराव झाले. त्यावर मा. आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक साहेब यांनी भाईंदर (पूर्व) भागातील मुख्य रस्त्यावर ना फेरीवाला क्षेत्रात बसणा-या सर्व फरीवाल्यांवर कठोर कारवाई करुन पादचारी व शाळेय विद्यार्थ्यांना सहकार्य केले. त्याबद्दळ मा. आयुक्त शिवमुर्ती नाईक साहेब यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन!

कृपया त्यानी अशीच कारवाई करुन नागरीकांना सुखसोयी उपलब्ध करुन द्याव्या हिच सदिच्छा! पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन।

**सुचक :- श्रीम. सुनिता भोईर** **अनुमोदक :- श्री. प्रेमनाथ गजानन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आंतरराष्ट्रीय एक दिवसीय क्रिकेट सामन्यात श्री. सचिन तेंडूलकर यांनी १७,००० धावांचा विक्रम आणि सलग २० वर्षे खेळून मुंबई, महाराष्ट्र आणि भारत देशाचे नाव उज्वल केले. आपल्या अप्रतिम खेळाने कोट्यावधी भारतीयांना तसेच क्रिकेट खेळणा-या देशातील नागरीकांना मनसोक्त आनंद दिला. श्री. सचिन तेंडूलकर यांनी क्रिकेटमध्ये मिळवलेले यश त्यांच्या या खेळाप्रती असलेली निष्ठा, कठोर परिश्रम आणि

देशाप्रती असलेली उत्कट भावना यांचे प्रतिक आहे. त्यांच्या या खेळामुळे मुंबई, महाराष्ट्र आणि भारताच्या नावलौकीकतेत खुप भर पडली आहे. अशा या मुंबई व महाराष्ट्राच्या या लाडक्या सुपुत्राने क्रिकेटमध्ये बजावलेली कामगीरी अतुलनीय अशी असून त्यांनी क्रिकेट विश्वात ध्रुव ताऱ्यासारखे अढळ स्थान प्राप्त केले त्याबद्दल त्यांचे मिरा भाईंदर शहरातील नागरीक व सर्व सन्मा. नगरसेवकांतर्फे हार्दिक अभिनंदनाचा ठराव मांडीत आहे.

**प्रविण पाटील :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**अभिनंदन ठराव क्र. २८ :-**

आंतरराष्ट्रीय एक दिवसीय क्रिकेट सामन्यात श्री. सचिन तेंडूलकर यांनी १७,००० धावांचा विक्रम आणि सलग २० वर्षे खेळून मुंबई, महाराष्ट्र आणि भारत देशाचे नाव उज्वल केले. आपल्या अप्रतिम खेळाने कोट्यावधी भारतीयांना तसेच क्रिकेट खेळणाऱ्या देशातील नागरीकांना मनसोक्त आनंद दिला. श्री. सचिन तेंडूलकर यांनी क्रिकेटमध्ये मिळवलेले यश त्यांच्या या खेळाप्रती असलेली निष्ठा, कठोर परिश्रम आणि देशाप्रती असलेली उत्कट भावना यांचे प्रतिक आहे. त्यांच्या या खेळामुळे मुंबई, महाराष्ट्र आणि भारताच्या नावलौकीकतेत खुप भर पडली आहे. अशा या मुंबई व महाराष्ट्राच्या या लाडक्या सुपुत्राने क्रिकेटमध्ये बजावलेली कामगीरी अतुलनीय अशी असून त्यांनी क्रिकेट विश्वात ध्रुव ताऱ्यासारखे अढळ स्थान प्राप्त केले त्याबद्दल त्यांचे मिरा भाईंदर शहरातील नागरीक व सर्व सन्मा. नगरसेवकांतर्फे हार्दिक अभिनंदनाचा ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रविण पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**पिठासिन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

वर्ल्ड बँक इंन्स्टीट्युटची मान्यता असलेल्या यशोदा (पूणे) व मुंबई विद्यापिठ यांच्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या ॲडवान्स पोष्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन अर्बन मॅनेजमेंट या प्रतिष्ठेच्या परिक्षेत आपले उपायुक्त (मुख्यालय) मा. श्री. सुधीर राउत यांनी महाराष्ट्र राज्याच्या गुणवत्ता यादीत प्रथम व राष्ट्रीय गुणवत्ता यादीत तृतीय स्थान पटकावले असून नागरी व्यवस्थापन, नगररचना व नागरी पर्यावरण व विषयांमध्ये विद्यापिठात सर्वप्रथम येण्याचा मान मिळविल्या बद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन तसेच मा. उपायुक्त, श्री. संभाजी पानपट्टे यांनी गुणवत्ता यादीत पाचवे स्थान पटकावले बद्दल त्यांचे ही अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**प्रविण पाटील :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**अभिनंदन ठराव क्र. २९ :-**

वर्ल्ड बँक इंन्स्टीट्युटची मान्यता असलेल्या यशोदा (पूणे) व मुंबई विद्यापिठ यांच्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या ॲडवान्स पोष्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन अर्बन मॅनेजमेंट या प्रतिष्ठेच्या परिक्षेत आपले उपायुक्त (मुख्यालय) मा. श्री. सुधीर राउत यांनी महाराष्ट्र राज्याच्या गुणवत्ता यादीत प्रथम व राष्ट्रीय गुणवत्ता यादीत तृतीय स्थान पटकावले असून नागरी व्यवस्थापन, नगररचना व नागरी पर्यावरण व विषयांमध्ये विद्यापिठात सर्वप्रथम येण्याचा मान मिळविल्या बद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन तसेच मा. उपायुक्त, श्री. संभाजी पानपट्टे यांनी गुणवत्ता यादीत पाचवे स्थान पटकावले बद्दल त्यांचे ही अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रविण पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**पिठासिन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे.

**अरुण कदम :-**

साहेब, आमच्या या विषयाचे काय झाले?

**नगरसचिव :-**

विषय नंतर घेतला जाईल.

**अरुण कदम :-**

हा विषय केव्हा घेणार आहे. आत्ताच घ्या. सुरुवातीला आयत्या वेळेला विषयामध्ये विषय घ्या.

**नगरसचिव :-**

पहिले प्रश्नोत्तर, लक्षवेधी त्याच्यानंतर.

**अरुण कदम :-**

ठिक आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्याचा प्रस्ताव ताबडतोब तयार करायला लागेल आणि तो प्रस्ताव मांडण्याची परवानगी घ्यावी लागेल.

**नगरसचिव :-**

श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल ह्यांचा प्रश्न आहे. प्रश्न क्र. २०.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझा जो पहिला प्रश्न आहे त्या प्रश्नाचे पहिले उत्तर दिलेले आहे असे टाटा कंपनी किंवा अन्य कुठल्याही खाजगी कंपनीला या भाईंदर शहरामध्ये रस्ते खोदाई किंवा काही परवानगी घ्यायला महासभेची किंवा स्थायी समितीच्या मंजूरीची गरज नाही. हे कुठल्या नियमाखाली आहे. संपूर्ण असे मिरा भाईंदरमध्ये एका खाजगी कंपनीला आपण काहीतरी परवानगी देतोय. ती परवानगी देताना महापालिकेला काय तोटा, काय नुकसान किंवा काय त्या शहराची दशा होणार आहे ह्याबाबतचा धोरणात्मक विषय आहे. तर ह्यांनी महासभेला किंवा स्थायी समितीची मंजूरी न घेता आयुक्त साहेब, देवू शकतात तर कुठल्या नियमाखाली ह्याचा नियम सांगितला तर बरे होईल.

**दिपक खांबित :-**

ह्याबाबत शासनाचा निर्णय आहे, १ एप्रिल २००६ चा. नेटवर्क टाकणा-या अभिकरांना संस्थांना मार्गाचा हक्क देण्याचा शासनाचे धोरण अशाप्रकारे नगरपालिका / महानगरपालिका अशाप्रकारे केवळ टाकण्याचे अधिकार आहेत आणि प्लस परवाने देण्याचे अधिकार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो आदेश पूर्णपणे वाचून दाखवा.

**दिपक खांबित :-**

आणि प्लस आपले जे आता सुधारीत डी.सी. रुल मंजुर झाले त्याच्यामध्येसुध्दा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पहिला जो आदेश आलेला आहे १ एप्रिल २००६ ला त्याचे वाचन करुन दाखवा.

**दिपक खांबित :-**

त्याच्यामधला मी कलम ७ वाचतो. ग्रामीण नगरपरिषद व महानगरपालिका क्षेत्रात नेटवर्क उभरण्याबाबत परवानगी देणारी सक्षम प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील. ह्याच्यामध्ये आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत. आपल्याला जी.आर. ची कॉपी देवू का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सक्षम अधिकारी कोण?

**दिपक खांबित :-**

महानगरपालिकेचे कमिशनर.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पिठासीन अध्यक्ष साहेब, सभागृहाची वेळ जावू नये म्हणून. नंतर घेतले तर काही हरकत नाही. कागद सापडत नसेल पुढच्या वेळेस.

**प्रकाश दुबोले :-**

पिठासीन अधिकारी साहेब, ह्याठिकाणी प्रश्न चर्चेला आला आणि आपल्याकडे तुम्ही लेखी उत्तर दिलेले आहे. लेखी उत्तर सापडत नाही हे योग्य नाही.

**मा. आयुक्त :-**

उत्तराचे नाही.

**प्रकाश दुबोले :-**

मग तुम्ही कशाच्या आधारावर उत्तर दिले?

**मा. आयुक्त :-**

जी.आर. ची कॉपी पाहिजे.

**प्रकाश दुबोले :-**

जी.आर. ची कॉपी मागितली नाही. तुम्ही ते उत्तर कशाच्या आधारावर दिले ते त्यांनी मागितले.

**दिपक खांबित :-**

तोच जी.आर. दिला आहे. १ एप्रिल २००६ चा.

**प्रकाश दुबोले :-**

मग तुमच्याकडे तो जी.आर. नाही का? प्रश्न लागलेला आहे आणि त्याचे उत्तर तुमच्याकडे नाही असे तुम्ही कसे सांगता?

**दिपक खांबित :-**

क्रमांक ७ मध्ये आहे असे मी बोललो आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मग तुम्ही त्यांना का वाचून दाखवित नाही? प्रश्न राखून का ठेवता?

**दिपक खांबित :-**

प्लानिंग ॲथोरिटी जी आहे कॉर्पोरेशनमुळे त्यांना अधिकार आहे.

**प्रकाश दुबोले :-**

तुमच्याकडे जी.आर. आहे तर तो तुम्ही वाचून दाखवा.

**दिपक खांबित :-**

वाचून दाखवलेले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

तुम्ही ४ ओळी वाचल्यात आणि पेपर शोधत राहिले त्यामध्ये १० मिनिटे गेली. सभागृहाची दिशाभूल करण्याचे प्रशासनाने कामकाज चालू आहे का?

**दिपक खांबित :-**

दिशाभूल करण्याचा प्रश्नच नाही.

**प्रकाश दुबोले :-**

मग पहिला प्रश्न असताना तुमच्याकडे जी.आर. सापडत नाही.

**दिपक खांबित :-**

आपण जेव्हा डी.सी. रुल मंजूर केले सुधारीत त्याच्यामध्ये क्लिअरकट कमिशनरला पॉवर दिलेली आहे.

**प्रकाश दुबोले :-**

काय पॉवर दिलेली आहे? पॉवर दिलेली आहे एक माणूसकी म्हणून या शहरामध्ये १६ कि.मी. रस्ता खोदला जातो आणि त्याबद्दल तुम्हांला स्थायी समिती आणि महासभेला विचारावेसे वाटत नाही? बाकीच्या गोष्टीला तुम्ही कार्योत्तर मंजूरी घेता. भले तुम्हांला परवानगी देण्याचे अधिकार असतील तर १६ कि.मी. शहरातला रस्ता खोदला जातो. त्यासाठी तुम्हांला स्थायी समिती किंवा महासभेला विचारावेसे वाटत नाही का? माहितीसाठी तरी तुम्ही विषय ठेवायला पाहिजे. तुम्हाला सर्व गोष्टीची पॉवर दिली आहे म्हणून तुम्ही काहीही करणार का?

**दिपक खांबित :-**

डी.सी. रुलमध्ये जे आहे ते तुम्हांला वाचून दाखवितो.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, परंतु, सभागृहाला माहिती पाहिजे की नाही? या शहरामध्ये काय चालले आहे हे कशाची खुदाई आहे?

**दिपक खांबित :-**

ते कमिशनरला पॉवर आहेत.

**प्रकाश दुबोले :-**

पॉवर असली तर ते सभागृहासमोर स्थायी सामिती समोर ठेवायला नको का? बाकीच्या गोष्टी विसरता का? ते तुम्ही नंतर ठेवता.

**दिपक खांबित :-**

साहेब, ठेवायची आवश्यकता नाही.

**प्रकाश दुबोले :-**

आणि बाकीच्या गोष्टी तुम्ही कशा ठेवता?

**दिपक खांबित :-**

५८ (जी) नुसार लेईंग ऑप्टीकल फायबर केबल, लेईंग ऑफ ऑप्टीकल फायबर अंडर साउंड बाय दी कंपनी ॲथोराईज बाय दि स्टेट गर्व्हरमेंट शाल बी परमिटेड ऑन दि लॅन्ड फॉलींग अन्डर दि ज्युडीडेशन ऑफ दि गर्व्हामेंट ऑफ महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑर ॲनी आद ॲथोरिटी ऑर ओनर. फॉर अ पिरियड ऑफ ॲथोरिटी ऑर लायसन्स बेसीस सब्जेक्ट टू कंडीशन प्रिस्टेड बाय दि स्टेट गर्व्हरमेंट ॲन्ड सब्जेक्ट टू फर्दर स्पेशल कंडीशन ऑफ दि म्युनिसिपल कमिशनर. ह्या कलमानुसार पूर्ण अधिकार आहेत. हे आत आपले डी.सी. रुल आहेत.

**अरुण कदम :-**

साहेब या प्रकरणामध्ये आपण टाटा कंपनीकडून पैसे वसुल केले आहेत का?

**दिपक खांबित :-**

होय.

**अरुण कदम :-**

हा निधीचा प्रश्न असल्यामुळे हा प्रश्न स्थायी समिती समोर आला होता का?

**दिपक खांबित :-**

घ्यायची आवश्यकता नाही. कमिशनरलाच पॉवर आहे. जो दुरुस्ती खर्च होतो तेवढा आपण त्यांच्याकडून एकूण १ कोटी ३१ लाख ८६ हजार रु. वसुल केलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आयुक्त साहेब, दिपक खांबित साहेब, मिरा भाईंदर महानगरपालिका काय चार्ज करते आणि मुंबई महानगरपालिका काय चार्ज करते? ह्याच्यामध्ये डिफरन्स आहे का?

**दिपक खांबित :-**

सेम रेट आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपली चुकीची माहिती आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका ही मुंबई महानगरपालिकेपेक्षा कमी चार्ज करते. चार पटीने कमी चार्ज करते. तुम्ही मागवून घ्या आणि तुम्ही आपले नुकसान करत आहात.

**दिपक खांबित :-**

आपण दिड वर्षापूर्वी हे रनिंग मीटरवर करुन घेतले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माझ्या माहितीप्रमाणे मुंबई महानगरपालिकेचा रेट जास्त आणि आपल्या मिरा भाईंदरचा रेट कमी आहे.

**दिपक खांबित :-**

आपला जो डी.सी.आर. असतो त्याचा रेटवर चालते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मुंबई महानगरपालिकेचा पण डी.सी.आर. रेट आहे.

**दिपक खांबित :-**

आपल्यापेक्षा २५ टक्के जास्त आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नाही. आयुक्त साहेब, आपण कृपया माहिती घ्या.

**दिपक खांबित :-**

साहेब, आपल्याला डी.सी. रुलची कॉपी देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मला कॉपी द्या. फक्त एक प्रश्न असा आहे की, या महासभेमध्ये विषय निघाला होता की, आपण खड्डे खोदाईचे पैसे घेतो जागेचे घेत नाही का?

**दिपक खांबित :-**

जागेचे घेत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

घेतले पाहिजे की नाही?

**दिपक खांबित :-**

फक्त फायबर ऑप्टीकचे भाडे घेतो. बाकीचे जनरल घेत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता माझ्या जागेवर कोणी भाडोत्री आला तर भाडे घेणार ना? जागा वापरायला दिली याकरीता. म्हणून जागेचे भाडे हे तर झाले आपले एन.ओ.सी. परवानगी फी तर आपण सामान्य नागरीकांकडून ही घेतोय. हे काही नवल नाही.

**दिपक खांबित :-**

फक्त फायबर ऑप्टीकमध्ये लायनन्स फी घ्यावे असे जी.आर. मध्ये आहे बाकीच्याचे नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, दोन्ही जी.आर. आपण मला द्या.

**दिपक खांबित :-**

देतो आणि आपल्याप्रमाणे आपण तशी मागणी करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही मला दोन्ही जी.आर. द्यायचे. जर मला योग्य वाटले तर अन्यथा पिठासीन अध्यक्ष साहेब, ह्या विषयावर पुन्हा मला महासभेत बोलण्याची संधी द्या.

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

या विषयाची पूर्ण माहिती पुढच्या सभेला द्यावी

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, परत पुढचे प्रश्न कधी घेणार? हे तुम्ही राखून ठेवणार तर पुढचे प्रश्न होणार कधी? आता तुमच्याकडे उत्तर आहे सर्व आहे. जी.आर. ची झेरॉक्स द्या. कशाला राखून ठेवता.

**दिपक खांबित :-**

देतोय.

**नगरसचिव :-**

श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली ह्यांचा प्रश्न आहे. त्या गैरहजर आहेत.

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

पुढचा प्रश्न घ्या.

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. २२ श्रीम. स्नेहा शैलेश पांडे.

**स्नेहा पांडे :-**

टेंडर निकालनेकी क्या प्रक्रिया है? उत्तर तो देते है लेकिन टेंडर निकालनेकी प्रक्रिया क्या है? वह मुझे जानना है। आर्थिक मान्यता मिलने के बाद टेंडर निकालते है। लेकिन उसका क्या प्रोसीजर है? कितने दिन पहले न्युज पेपर मे आता है? कौन कौन से पेपर मे आता है? ऐसा हिंदी, इग्लीश, मराठी तिन्हो पेपर मे जाहिरात निकालते है क्या नही वह मुझे समजना है?

**मा. आयुक्त :-**

ॲडमिनेस्ट्रेटीव्ह अप्रुव्ह मिलने के बाद ७ दिन डिस्टन्स रखके यह स्टेट गर्व्हरमेंट के पेपर, स्टेट लेव्हल के पेपर और लोकल पेपर ऐसे दो पेपर मे जाहिरात देते है।

**स्नेहा पांडे :-**

हमेशा दो पेपर फिक्स है या किसी भी पेपर मे आते है।

**मा. आयुक्त :-**

पेपरवालो का रोटेशन रखते है। पेपर की लिस्ट रहती है और रोटेशन के मुताबिक हम देते है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेब, पेपरचे रोटेशन पण कधी कधी आपल्या लेखापालने, ऑडीटरने आक्षेप घेतला आहे की, ही जाहिरात व्यवस्थित आलेली नाही आणि त्यामुळे महापालिकेचे नुकसान झालेले आहे. आपल्याला कळविलेले आहे की, हा टेंडर रद्द करा. तेव्हा आपण त्यांचा आदेश पाळणार का नाही?

**मा. आयुक्त :-**

त्यांच्याच शिफारशींवर स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे आणि त्यामध्ये नवभारत टाईम्स आणि एक स्थानिक पेपर असे दोन पेपरमध्ये प्रसिध्दीकरण झालेले आहे. त्यांचा समज असा होता की, फक्त स्थानिक पेपरला प्रसिध्दीकरण व्हावे. नवभारत टाईम्स हा स्टेट लेव्हलचा पेपर आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कुठलीही बात जेव्हा लेखापालने आपल्याला लेखी पत्राने कळविलेली आहे. त्यावेळी त्या लेखापालचा आदेश आपण पाळणार का नाही? मला फक्त आले आहे की नाही त्याचा गैरसमज झाला आहे तो नंतरचा विषय आहे. फक्त त्याने जेव्हा आपल्याला पत्र पाठवून सांगितलेले आहे, त्यामध्ये महापालिकेचे नुकसान झालेले आहे. ही निविदा आपण तोपर्यंत रद्द करावी. टेंडर प्रोसीजर बरोबर झालेले नाही. तेव्हा आपण त्याला काय ॲक्शन घेणार?

**मा. आयुक्त :-**

एकदा स्थायी समितीचा ठराव झाला. ॲग्रीमेंट झाले तर रद्द करण्याची प्रोसीजर असते. त्या प्रोसीजर फॅलो करायला लागतात. त्यांना त्याप्रमाणे कळविलेले आहे की, एकदा टेंडर मंजूर झाल्यानंतर, ॲग्रीमेंट झाले तर रद्द करता येणार नाही. तर त्याचा खुलासा करुन कळविले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्यापूर्वी अशी निविदा निघालेली आहे की, ज्या निविदांमध्ये, जे वर्तमानपत्र या भाईंदर शहरामध्ये येत नाही एक प्रत येत नाही. ठाणे जिल्ह्यामध्ये कुठेतरी ते पत्र निघते त्या वर्तमानपत्रामध्ये येत`हे एक वेळा नाही तर तीन वेळा ही गोष्ट आपल्या नजरेस आणून दिलेली आहे. पण प्रत्येकवेळी महापालिका दुर्लक्षित करत आहे. आता तुम्ही सांगता की, मी कळविलेली आहे. ही गोष्ट तुम्ही कधी कळविली? म्हणजे एकदा लेखापालने आपल्याला उत्तर दिलेले आहे की, ह्या टेंडर प्रोसीजरमध्ये सर्व चुकीचे झालेले आहे. महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. शहराचे नुकसान होणार आहे. त्यानंतर तुम्ही कोणाची वाट बघणार?

**मा. आयुक्त :-**

मुळात टेंडर प्रक्रिया सुरु त्या विभागामार्फत टेंडर प्रक्रिया केली जाते. त्या विभागाकडून खाते प्रमुखांकडून ऑडीटरकडे जाते. ऑडीटर नंतर आमच्याकडे येते आणि मग स्थायी समितीपुढे जाते. ज्या ऑडीटरने शिफारस केली मंजूरीसाठी त्या ऑडीटरचा टेंडर मंजूर, ॲग्रीमेंट होण्यापूर्वी लक्षात यायला पाहिजे होते की, जर तुम्ही असे कळवित असाल तर ते कशा पध्दतीने टेंडर रद्द करायचे आहे. रद्द करण्याची नियमामध्ये तरतुद नाही. कोणत्या प्रकारे रद्द करायचे किंवा काय नुकसान झालेले आहे? याची सविस्तर माहिती मागवलेली आहे. ती माहिती आल्यानंतर मी निर्णय घेईन आणि ॲग्रीमेंट झालेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझा फक्त एवढ्यालाच आक्षेप आहे की, आता तुम्ही सांगितले की, लेखापालने म्हणजे स्थायी समितीच्या ठरावाला आर्थिक प्रशासकीय मंजूरी देता. ॲग्रीमेंट झाल्यानंतर जर त्यांच्या लक्षात आले नाही तर कोण जबाबदार आहे?

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

हा प्रश्न कोणी विचारला आहे? सन्मा. सदस्या स्नेहा पांडे ह्यांनी विचारला आहे की आपण?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी भारतीय जनता पक्षाचा गटनेता म्हणून.....

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

यह प्रश्न किसने दिया है?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

श्रीम. स्नेहा पांडे इन्होने दिया है।

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

आपने परमिशन लिया क्या? आपको इन्होने इजाजत दी है क्या?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उन्होने इजाजत नही दी है और मेरे प्रश्न पर उन्होने दुसरे लोगोंने विषय लिया। तब आपने कुछ बोला नही। जेव्हा माझा प्रश्न होता आणि लोकांनी विचारले तेव्हा तुम्ही आक्षेप घेतला नाही. आता तुम्ही आक्षेप घेता. आयुक्त साहेब, मला तुम्ही फक्त एवढे सांगा ही जी टेंडरची प्रक्रिया आहे त्या प्रक्रियेमध्ये दोषी व्यक्ती आपल्याला ऑडीटरने कळविलेले आहे की हे चुकीचे झालेले आहे. आपण तरी त्याच्यावर काय ॲक्शन घेणार का नाही? एकतर लेखापालवर घ्या किंवा संबंधीत खात्यावर असे तुम्ही कोणावर ॲक्शन घेणार?

**मा. आयुक्त :-**

त्यांचा परत माझ्याकडे अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाही करणार. त्यांना आम्ही कळविलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कधी कळविलेले आहे? तारीख सांगा.

**मा. आयुक्त :-**

कळविलेले आहे. त्यांच्या त्रुटीचे उत्तर मी त्यांना दिलेले आहे. त्या उत्तराचा ते काय अहवाल देतात ते त्यावर अवलंबून राहिल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पिठासीन अधिकारी साहेब, आपले जेव्हा टेंडर निघते. स्थायी समितीला सभा होते, मंगळवारी, बुधवारी, गुरुवारी टेंडर निघून जातात आणि त्या टेंडरला प्रत लावण्याची जबाबदारी इथे समोर आपली आहे. पण आपण कधीही कोणतीही टेंडर नोटीस, कुठलीही टेंडर नोटीस आजपर्यंत जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या बोर्डवर लावलेली नाही. याची आम्ही लेखी तक्रार केलेली आहे त्यावर तुम्ही काय कार्यवाही करणार?

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक पेपर, नोटीस बोर्डावर टेंडर नोटीस लावली जाते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, मी तुम्हांला पत्र दिलेले आहे. एक टेंडर निघाले होते. त्याची प्रत तुमच्या जनसंपर्क अधिकाऱ्याकडे पण नव्हती. त्यांच्याकडे पण नव्हती आणि टेंडर निघाले होते.

**मा. आयुक्त :-**

मुळात जनसंपर्क अधिकारीच टेंडर पब्लिश करायला त्यांच्याकडे पाठविले जाते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांना पण माहित नव्हते हेच तर नवल आहे. ते लावणार कुठून त्यांनाच माहित नाही. कधी टेंडर निघाले, काय निघाले? तो अख्खा पेपर शोधतो. जेव्हा त्याला पेपर मिळत नाही तेव्हा तो कुठून तरी शोधून आणतोय.

**मा. आयुक्त :-**

नोटीस बोर्डावर प्रत्येक नोटीस लावलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, खात्रीने आताही सांगतो. आज ही तुम्ही गेल्यावर बोर्डावर कुठलीही नोटीस नाही. आपला बोर्ड बघितला का, किती बाय कितीचा आहे आणि त्याच्यामध्ये किती पेपर लागू शकतात?

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक वेळी नवीन नोटीस लागताना मुदतबाह्य झालेले काढून घ्यायचे असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एकाच वेळी बोर्डावर चार नोटीस असतात. एक दुसऱ्याला चिटकवलेले असतात.

**मा. आयुक्त :-**

मुदत संपलेली काढायची असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मुदत तर सात दिवसाची असते. ज्यावर नोटीस लागते. तो बोर्ड दोन बाय दोनचा. त्याच्यामध्ये कुठलीही निविदा लागू शकत नाही. एकावर एक, एकावर एक चिटकवले जातात.

**मा. आयुक्त :-**

बांधकाम विभागाने नोटीस बोर्ड मोठा करावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, असा निर्णय महापालिकेत पुष्कळ झालेले आहे. प्रोसीडींगच्या वेळी आम्ही येतो तुमचा फक्त आदेशच नाही. आजपर्यंत निर्णय या महासभेमध्ये कुठला आदेश झालेला आहे?

**स्नेहा पांडे :-**

इस आदेश का पालन कब तक हो जाएगा?

**मा. आयुक्त :-**

आतापर्यंत कुठले कुठले आश्वासन झाले आहेत त्याची यादी काही माझ्याकडे नाही पण ह्याचे आम्ही ८ दिवसात नोटीस बोर्ड मोठे करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि ते पर्टीक्युलर त्या टेंडर नोटीसच्या जाहिरातीसाठी असले पाहिजे. दुसरी त्याच्यात कुठलीही नोटीस लागता कामा नये.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**स्नेहा पांडे :-**

साहब, लास्ट प्रश्न ऐसा है की, निविदा नोटीस महानगरपालिकेच्या प्रदर्शनी भागात न लावल्यास कोणत्या नियमाखाली, कोणत्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करता येईल? इस प्रश्न का उत्तरं दिया गया है, निविदा सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येते तसेच नोटीस बोर्डावर प्रसिध्द केले जाते. प्रश्न क्या है? और उत्तर क्या दिया गया है?

**मा. आयुक्त :-**

जो महानगरपालिकेचे नोटीस बोर्ड आहे त्या नोटीस बोर्डावर लावलेले आहे त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उद्‌भवत नाही. आम्ही सांगतो आपण प्रत्येक गोष्टीत असे कसे सांगता? उद्‌भवताना दिसायला या शहरामध्ये चांगले अधिकारी आहेत.

**मा. आयुक्त :-**

लावले नाही तर कार्यवाही करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कुठल्या नियमाखाली आहे? आम्ही तुम्हांला नियमामध्ये देवू. यानंतर तुम्हांला नियमामध्ये देतो. तुम्हांला पुरावा नियमासकट देतो.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेचे कोणतेही काम कोणत्याही अधिकाऱ्याने केले नाही तर ५६ खालीच कार्यवाही असते.

**स्नेहा पांडे :-**

लेकिन उत्तर कौन दे रहा है, उसको सोच समझकर उत्तर तो देना चाहिए। प्रश्न क्या है और उत्तर क्या दिया जा रहा है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यात लिहा ५६ खाली.

**मा. आयुक्त :-**

प्रोसीडींगमध्ये येतच आहे की, ५६ खाली कार्यवाही केली जाते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, काही गोष्टी तुम्ही सांगता म्हणजे विचारतो काय आणि सांगतो काय? दुखते पोटात. उत्तर देताना तुम्ही विचार करा की, काय उत्तर देता?

**मा. आयुक्त :-**

सन २००८ मधला प्रश्न आहे.

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

उत्तर देताना हे पहिल्यांदा नाही तर तिसऱ्यांदा झालेले आहे.

**स्नेहा पांडे :-**

प्रश्न के उत्तर बदलते क्या? ईअर बदलने से?

**मा. आयुक्त :-**

ज्या अधिकाऱ्याने नोटीस बोर्डावर पेपर लावले नाही त्याची ५६ खाली कार्यवाही करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे अधिकारी का उत्तर देत नाही?

**मा. आयुक्त :-**

लावलेले आहे. नोटीस नाही लावली तर कार्यवाही करायची.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहेब, आप अधिकारी को बचानेकी कोशीश मत किजीए। प्रश्न क्या है, उसका जवाब क्या दिया गया है? अधिकारी क्या करते है? किस तरह से उत्तर देते है? २००८ का प्रश्न है तो उसका उत्तर अलग हो जाएगा क्या? चार साल बाद भी प्रश्न के उत्तर वही रहते है और चार साल पहले के है तो उत्तर तो वही रहेगा। क्या प्रश्न पुछा गया और क्या उत्तर दे रहे है?

**नगरसचिव :-**

आजच्या मा. महासभेकरीता तीन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल ह्यांची आहे. (२) श्री. ध्रुवकिशोर पाटील (३) श्री. अनंत पाटील ह्यांची आहे. आपल्या नियमानुसार एक लक्षवेधी घ्यायची अशी सभा कामकाजामध्ये तरतुद आहे. आलेल्या तिन्ही लक्षवेधी वाचून महापौरांस सुपूर्द करतोय. सन्मा सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांच्या लक्षवेधीचे वाचन करीत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका लेखापरिक्षण अहवाल २००६-०७, २००७-०८, २००८-०९ मध्ये महानगरपालिकेच्या अनेक विभागांवर ठेवलेला आक्षेप व त्यामुळे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे महानगरपालिकेने प्रत्येक वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल स्थायी समितीपुढे सादर करणे व अहवालामध्ये ठेवलेल्या आरोप पत्राचे निराकरण करुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दखल घेणे बाबतचा नियम आहे. यापूर्वी दि. ०१/०७/२००९ च्या मा. महासभेत लक्षवेधीच्या माध्यमाने अहवाल सादर केला नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवहाराबद्दल नगरसेवकांना माहिती मिळत नसल्याने सदर अहवाल त्वरीत मिळावा व इतर विस्तृत चर्चा व्हावी यासाठी निवेदन केले होते. त्यानुसार महानगरपालिकेने तीन वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल दिले. वरील अहवालामध्ये अनेक दोष वेगवेगळ्या खात्यावर ठेवण्यात आलेले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे असे दिसून येते. उदा. अतिक्रमण विभागाद्वारे जप्ती व दंड रजिस्टर न ठेवणे, वाहन विभागातर्फे वाहने निर्लेखित करणे पूर्वी शासन नियमाप्रमाणे कार्यवाही न होणे, नगररचना विभागातर्फे विकास आकार कमी प्रमाणात वसूली झाल्याने आस्थापना विभागातर्फे कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तीकांची नोंद सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेतली नाही, लेखा विभागातर्फे ताळमेळ पत्र तयान न करणे, आरोग्य विभागातर्फे चूकीचे परवाना पत्र नमुना छपाई करुन परवाने नियमीत केले आहेत. अशा अनेक त्रुटी संबंधीत अहवालात दिले आहेत. याची महासभेत चर्चा होणे गरजेचे आहे.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदक :- श्री. रामनारायण दुबे**

दुसरी लक्षवेधी सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांची आहे ती मी वाचत आहे.

उत्तन येथील घनकचरा प्रकल्पामुळे होणाऱ्या दुर्गंधीने नागरीक हैरान झाले त्यामुळे त्यांनी आंदोलन करुन प्रकल्प बंद केला. महानगरपालिकेत डंम्पींगची जागा उपलब्ध नसल्याने कचरा उचलला जात नाही. कचऱ्याचे ढीग जागोजागी लागले आहेत. शहराच्या मुख्य रत्यांवर, चौकांमध्ये कचरा गोळा करुन ठेवल्यामुळे

मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली त्याचे रुपांतर रोगराईत झाले अनेक नागरीक आजारी पडले आहेत. कचऱ्यांच्या ढीगाऱ्यांमुळे रस्त्यांवरील ये जा करणाऱ्या नागरीकांनाही नाक बंद करुन जावे लागते. रहदारीस अडथळा निर्माण होउन ट्राफीक जाम होते. प्रदुषण वाढते, डिजेल पेट्रोलचे कंन्झमशन वाढून नॅशनल लॉस ही होतो. कचऱ्याच्या ढीगांना आग लावण्यात येते त्यामुळे प्रदुषण होउन मोठी आगही लागण्याचे प्रकार शहरात झालेले आहेत. या सर्व बाबींमुळे नागरीक त्रस्त झालेले आहेत व कोणत्याही क्षणी आंदोलन होण्याची शक्यता आहे. शहरात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होउन जनजीवन विस्कळीत होईल. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होईल. कृपया आपण सर्व सन्मा. सदस्यांनी गांभीर्याने विचार करुन निर्णय घ्यावा ही विनंती.

तिसरी लक्षवेधी सन्मा. सदस्य श्री. अनंत रामचंद्र पाटील यांची आहे. त्याचे मी वाचन करीत आहे.

आपणास निर्दशनास आणू इच्छितो की, मिरा भाईंदर शहरामध्ये सध्या रोगराई पसरत चालली असून संपूर्ण शहरात मलेरीया, टायफाईड, डेंग्यु तापाची साथ सुरु आहे. शहरातील कचरा उचलत नसल्याने जनतेचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. तसेच अवेळी पावसामुळे साचलेल्या कचऱ्याच्या ढीगाऱ्यातून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत आहे. तरीही प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही. यास सर्वस्वी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन जबाबदार आहे. तरी ह्या बाबत महासभेत चर्चा करावी ही विनंती.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील ह्यांची लक्षवेधी स्विकारण्यात येत आहे.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील ह्यांची लक्षवेधी मा. महापौरांनी स्विकारलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पिठासीन अधिकारी साहेब, उत्तन येथील नागरीकांना घनकचरा प्रकल्पामुळे दुर्गंधी येत होती. नागरीक त्रस्त झाले. त्यांनी अनेक छोटी मोठी आंदोलने केली आणि शेवटी ते लोक वैतागले आणि रस्त्यावर आले. लहान मुलं, बायका, माणसं सगळी रस्त्यावर आली आणि त्या लोकांनी हा प्रकल्प बंद केला. महानगरपालिकेने काहीच कार्यवाही केली नाही आणि रिट पिटीशन फाईल केले. ते जिंकले परत स्वस्थ बसले. त्याच्यानंतर मिरा भाईंदरच्या संपूर्ण परिसरामध्ये कचरा साचलेला आहे. रस्त्यामध्ये, चौंकामध्ये, बिल्डींगचे सगळे डब्बे भरुन पूर्ण पॅक झालेले आहेत. नंतर अचानकपणे कोणी आंदोलन केले परत महानगरपालिकेने कार्यवाही केली आणि कचरा उचलला. परत टाकला. परत बंद केले, परत उचलतात, परत टाकतात. प्रत्येकाची आंदोलन करण्याची ट्रीक वेगवेगळी असते. लक्षवेधी मांडून आम्ही लोकांचे लक्ष वेधतो. ह्या कचऱ्यामुळे शहरामध्ये रोगराई पसरलेली आहे. आज लहान पोरं, माणसं सगळे आजारी पडले आहेत. तुम्ही आज प्रत्येक डॉक्टरकडे जा. मलेरीया, ताप असे आजार पसरलेले आहेत. उलट्या, जुलाब हे सगळे प्रकार सुरु आहेत. रोगराई पसरुन नाही तर प्रदुषण पण वाढते. आज रत्या रस्त्यामध्ये कचरा पडल्यामुळे आपल्या संपूर्ण शहराचे संपूर्ण शहराचे चित्र ओंगळ झालेले आहे. लोक बाहेरुन येतात. अरे, तुम्हांरा काशिमिरा रोड क्या मस्त हो गया है। आम्ही श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांची आठवण करुन देतो हे काम ह्यांनी केले. डॅशिंग शिवमुर्ती नाईक साहेब, चीफ ऑफीसर ते कमिशनर असा तुमचा प्रवास आहे. म्हणजे तुमची ख्याती इचलकरंजी महाराष्ट्रामध्ये आहे. आज मिरा भाईंदरमध्ये पण आहे. पण या प्रश्नामुळे आपण जरा थंड झालात आणि आमचे महापौर, प्रथम नागरीक त्यांनी आपल्याला आज पत्र दिले की, मी महासभेत आणि महानगरपालिकेत पाउल ठेवणार नाही त्यांना फार लवकर जाग आली हा प्रश्न दोन महिन्यापासून सुरु आहे आणि त्यांनी आज पत्र दिले. त्यांचे काम होते. हे प्रश्न सॉल्व्ह करण्याचे. परंतु, त्यांनी काय सांगितले की, मी महानगरपालिकेमध्ये येणार नाही. साहेब तर त्यांनी कायमचा राजीनामा द्यावा. आमची अशी मागणी आहे की, हा महापौर फेल झाला त्याने ताबडतोब राजीनामा द्यायला पाहिजे. आज आपण गेले दोन महिने झाले, मिरा भाईंदरच्या जनेतेची छळवणूक होत आहे. आपण काही करत नाही असा माझा स्पष्ट आरोप आहे. प्रशासन तुमच्या हिशोबाने काम करत आहे. कधी कचरा उचलतो, कधी टाकतो परत शहर क्लिन करतात आणि परत चार-आठ दिवसांनी बंद करतात. आयुक्त साहेब, ठेकेदाराने तुम्ही समजा आज संपूर्ण शहरामध्ये आंदोलन झालेले आहे तर ठेकेदारावर तुम्ही कार्यवाही केली. आज ठेकेदाराने स्प्रे केले असते, केमिकल मारले असते तर ही दुर्गंधी आली नसती आणि उत्तनच्या जनतेला त्रास झाला नसता. परंतु, आज त्याच्यामुळेच संपूर्ण शहर वेठीस धरलेले आहे तर त्या ठेकेदारावर कार्यवाही होणे गरजेचे होते. पण ते अजून पर्यंत झाले नाही. त्याच्यानंतरसुध्दा ज्या लोकांनी आंदोलने केली आणि जे लोक आंदोलन करण्याच्या तयारीमध्ये आहे तर साहेब, तुमची भूमिका कमिशनर म्हणून महत्वाची होती. त्या लोकांना बोलावून समजावले पाहिजे होते. परंतु ते आजतागायत झालेले नाही. ते झाले नाही का काय त्याचा खुलासा करा. तुम्ही हाय कोर्टामध्ये रिट पिटीशन टाकली होती. आमच्या माहितीप्रमाणे ते तुम्ही जिंकलेले आहे. मग तुम्ही अजूनपर्यंत का करत नाही? या सर्व बाबींचा खुलासा तुम्ही केला पाहिजे. अशी माझी तुम्हाला विनंती आहे आणि सर्व सदस्यांना माझी नम्र विनंती आहे की, ह्या प्रश्नाचे उत्तर आजच्या महासभेमध्ये निघाले पाहिजे. अन्यथा संपूर्ण शहर हे कचरामय होईल आणि लोक रस्त्यावर येतील आणि आपल्याला लोकांनी निवडून दिलेले आहे. तर आपलेही काही तरी दायीत्व आहे आणि या शहरामध्ये पाण्याबद्दल २-३ आंदोलने झाली होती. आपल्या सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान ही

झाले होते. ट्रेन बंद झाल्या होत्या. संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले होते. हे रिपीट होउ नये, मालमत्तेची हानी होउ नये, लोकांचे नुकसान होउ नये म्हणून माझी आपल्याला विनंती आह`की आणि सर्व सदस्यांना विनंती आहे की हा प्रश्न ताबडतोब निकाली काढावा.

**हेलन गोविंद :-**

आयुक्त साहेबांच्या परवानगीने बोलते की, सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील जे बोलले त्या मताशी मी सहमत आहे की, अगोदर जर तुम्ही उत्तनमध्ये लक्ष घातले असते व दुर्गंधी आली नसती तर लोकांनी आंदोलन केले नसते. जवळ जवळ २-३ वर्षे झाली. लोक जोपर्यंत वास येत नव्हता तोपर्यंत शांत बसलेले. आमच्या फादरांच्या थ्रुसुध्दा कॉन्ट्रॅक्ट झालेले. फादर येउन इथे प्रत्यक्ष भेटले. अधिका-यांची इथे चुकी असल्यामुळे आणि अधिका-यांना मी सतत येउन बोलत होते की, वास येतोय. तुम्ही तिथे जावून तिथे प्रत्यक्ष पाहणी करा. परंतु, तुम्हांला इथे कुठे तरी खोटा रिपोर्ट मिळत होता आणि आज मी संपूर्ण सभागृहाच्यावतीने बोलत आहे की, खरं तर तुम्ही कोणाची बाजू घेत नाही. तुम्हाला सत्य काय ते कळत आणि तुम्ही कोणाला घाबरत नाही हे सुध्दा मला माहित आहे. तुम्ही नसताना, आता सहा महिने झाले आहे. तुम्ही अगोदर आला असता तर कदाचित ही परिस्थिती आली नसती. आयुक्त साहेब, आज आमची लोक आंदोलन करीत आहेत. तर ते काही वेडे झालेले नाहीत. खरोखरच त्याचें संपूर्ण शेताचे नुकसान झालेले आहे आणि वास येत होता. येथून प्रत्यक्ष ट्रकमधून खाली गुरांची आतडी नेत होते आणि एवढा वास येत होता तुम्ही जावून गाड्या खुले करा. कारण आम्ही बसूमधून येतो तर आम्हांला वास येतो, हे फॅक्ट आहे. म्हणूनच तिथे लोक आंदोलनासाठी बसले. लोक आंदोलन करण्यासाठी काही वेडी झालेली नाही म्हणून तुम्ही त्याविषयी चांगला विचार करा आणि चांगला निर्णय द्या.

**परशुराम पाटील :-**

पिठासीन अधिकारी साहेब, सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी आपल्याला जे निवेदन दिलेले आहे, डम्पींग ग्राउंड विषयी त्याच्यावर आपल्याला दोन शब्द सांगतो. ज्यावेळेला श्री. शिंदे साहेब आयुक्त असताना त्यावेळी मी हा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित केला होता की, हे जे तुम्ही डम्पींग ग्राउंड करता हे चारही बाजूने संपूर्ण परिसरामध्ये गाव आहे आणि आम्ही जेव्हा चंदीगडला गेलो होतो ते डम्पींग ग्राउंड आम्ही पाहिले होते. तेव्हाचे नगरसेवक आता आहेत व महापौर मायरा मेन्डोन्सा मॅडम होत्या. त्यांना सुध्दा माहित होते की, कितीही शुध्दीकरण केले तरी तिथे वास येत होता. तर आता इथे वास येताना जेव्हा त्यावेळी तुमची जागा मंजूर झाली तेव्हा श्री. शिंदे आयुक्त साहेब असताना व मी विरोधी पक्षनेता होतो. तेव्हा मी सांगितले होते की, पाटील साहेब आपल्याला एवढी जागा द्यायची आहे तेव्हा मी त्यांना सांगितले, तुम्ही मला सांगता हे बरोबर आहे. पण हे योग्य नाही. त्यांना मी नमुद करुन दिली होती. सांगितले होते की, सर्व्हे नं. २०९ मध्ये भाईंदर ईस्ट चौपाटी ते घोडबंदर पर्यंत ८० एकर जागा त्याच्यामध्ये तुम्ही हा प्रकल्प का करत नाहीत. आता जे आंदोलन झाले ते उगाच आंदोलन केले नाही. गाडगेबाबा अभियान म्हणजे आरोग्याच्यादृष्टीने जी काही साफसफाई चालते आणि त्यापध्दतीने तुम्ही ही दुर्गंधी येते. गाडगेबाबा अभियान याचा तुम्ही घनकचरा हे सगळे काढयाचा काय प्रश्न आहे आणि त्यापध्दतीने आंदोलन हे त्यांच्या आरोग्यासाठी केले आहे. आणि त्या पध्दतीने फादर लोक परमेश्वरला अर्पण झालेले आणि त्यांना सुध्दा तुम्ही लाठीमार मारण्याचा आणि लोकांना मारण्याचा, लहान मुलांना लाठीचार्ज करण्याचा तुम्ही पोलिसांना आदेश देता हा कोणता न्याय आहे? त्यांनी चोरी केली होती? त्यांनी काय केले होते हे तुम्ही मला सांगा. त्यांनी आरोग्यासाठी आंदोलन केले. त्यांना तुम्ही लॉकअपमध्ये ठेवले व त्यांना आता तारखेला जावे लागते. हे कितपर्यंत योग्य आहे? तुम्ही ह्याच्यावर विचार करा आाि हे जे डम्पींग ग्राउंड आहे ते कुठे तरी आणा. लोकमतला आलेले आहे की, घोडबंदर इथे आपला हा प्रकल्प हटविण्यात येणार आहे. पण त्याच्यामध्ये सर्व्हे नंबर दिलेला नाही. कोणाच्या जागेमध्ये तुम्ही हलवणार? घोडबंदर ते चेना या परिसरामध्ये तो सर्व्हे नंबर तरी माहित आहे का? या सभागृहामध्ये समजा मी सांगु शकतो की, कुठले कुठले सर्व्हे नंबर आहेत. तुम्ही त्या विषयी विचार करा. घोडबंदर येथे सर्व्हे नंबर २,३,५,६ आहे. ठाणा रोड आहे, अहमदाबाद रोड आहे. तिथे तुम्ही नेउन ठेवणार? तिथे पण हेच होणार. तिथे आदिवासींच्यावतीने दोन आमदार आहेत. श्री. विवेक पंडित व श्री. प्रताप सरनाईक आहेत आणि तिथे जर का आंदोलन झाले तर चालेल का? मग ह्याच्यासाठी तुम्ही कुठेतरी प्रश्न उपस्थित करा आणि हे हलवून टाका. आमच्या स्थानिक बांधवांना, आमचे स्थानिक ख्रिस्ताव लोक आहेत. त्यांची समस्या तुम्ही दुर करा अशी आपल्याला विनंती करतोय.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. सदस्य, आपल्या वक्तव्याचे मी अभिनंदन करते. कारण फादर, सिस्टर हे पाहूणे म्हणून येतात. पाच तीन वर्षासाठी गावामध्ये येतात आणि त्यांनी ज्या लोकांसाठी मारहाण सहन केली. त्यांना देवाचा आशिर्वाद असल्यामुळे असे कोणी करु शकत नाही. मी तुमच्यासाठी खरोखरच प्रार्थना करेन की, परमेश्वराचे कुठेतरी तुम्हांला पाठीशी आहे आणि देवाचा आत्मा तुमच्यामध्ये कुठेतरी वास करत आहे. म्हणून खरोखरच मी तुमचे देवा आभार मानते आणि देवाला धन्यवाद देते की, तुमच्या मुखामध्ये हे शब्द घातले आणि तुम्हांला धन्यवाद देते.

**अनंत पाटील :-**

आयुक्त साहेब, आता हा जो काही प्रश्न उपस्थित झालेला आहे आणि ह्या प्रश्नासाठी संपूर्ण भाईंदर शहर तसे पाहिले तर कच-याच्या वेठीस पडलेले आहे आणि ह्या शहरामध्ये गेल्या तीन महिन्यापासून सातत्याने कच-याचा ढीग साचून नागरीकांना आक्षरशः नाकावर रुमाल ठेवून चालावे लागते. ही एक दुर्देवाची गोष्ट आहे आणि ही घटना घडत असताना सुध्दा आम्हीच ज्यावेळेला आंदोलनात्मक पवित्रा घेतो त्याच्या पाठीमागची भूमिका सुध्दा तिच आहे. हा कचरा उचलणे हे आवश्यक असते. ते प्रशासनाला जाणीव देण्यासाठी. प्रशासनाने त्या जाणीवेचे लक्ष ठेवून आता ह्या प्रत्येक दवाखान्यामध्ये डेंग्यु, ताप, टायफाईड, मलेरिया असे रोग निर्माण झालेले आहे. पूर्वी ह्या रोगांना निमंत्रण नगरपालिकेने अक्षरशः धुडकावून लावले होते. परंतु, ही परिस्थिती निर्माण होण्यासाठी प्रशासनाने केलेला हा निष्काळजीपणा आहे का? हा एक प्रश्न आहे. आतापर्यंत आपण हा जो प्रकल्प चालू केला. ह्या प्रकल्पामध्ये ज्या काही त्रुटी राहिल्या असतील त्या त्रुटी दूर करण्यासाठी सुध्दा आपण प्रयत्न केलेले होते. हे वारंवार तुम्ही आम्हांला सांगितलेले आहे आणि आता काल आम्ही आल्यानंतर श्री. राउत साहेबांनी म्हंटल्याप्रमाणे मंत्रालयात आज दुपारी मिटींग होईल आणि त्याच्यानंतर हा प्रकल्प चालू होईल की काय? ह्याच्या संदर्भामध्ये ते खुलासा करणार होते. श्री. राउत साहेब आपण त्या मिटींग विषयी खुलासा करा.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

पिठासीन अधिकारी साहब और आयुक्त साहब, मे यहा मा. महासभा के ध्यान मे लाना चाहता जू की, या जो डम्पींग का मामला है वह पुरा का पुरा मिनिस्टरी ऑफ एनबॉयमेंट फॉरेस्ट ॲक्ट २००० के अधीन सारा डिपार्टमेंट उसमे काम करता है। इनके शेड्युल ४ के अंदर पॅरेग्राफ सेकेंड तीन नंबर के अंदर यह लिखा गया है। क्ष्द ड़ठ्ठथ्रङ्ख दृढ ड्डद्वङ्खठ्ठत्त ड्डदृध्र्द दृद्ध थ्र्ठ्ठत्दठ्ठत्दड़ङ्ख दृढ द्रथ्ठ्ठद ध्ड्ढथ्रद्यङ्ख त्द थ्ठ्ठत्त्ङ्ख ध्न्ङ्खथ्ढत्थ्रण ध्न्द्यदृद्र ठ्ठद ङ्खथ्र्थ्र्ङ्खदद्यध्र ध्र्थ्थ ध्र्दृद्धत्त दृद्वद्य ढदृद्ध ड्डत्ध्ङ्खद्वध्नत्दृद दृढ ध्ड्ढथ्रद्यङ्ख द्यदृ द्यण्ङ्ख थ्ठ्ठदङ्कढत्थ्थ ध्नत्ङ्खङ्खध्र. मतलब की यह लिखा गया है। अभी तो चुकी बदबू आती है इसलिए प्लांट को रोका गया है। लेकीन यह म्युनिसीपाल्टी की जिम्मेदारी है। बायचान्स मशिनरी ठप्प हो जाए या किसी कारण से प्लांट ठप्प हो जाए। तब भी म्युनिसीपाल्टी के पास मे ऑल्टरनेटीव्ह इसका प्लांट होना चाहिए यह शेड्युल-४, २००० बोलता है। आज १० साल हो गए है। आपके पास यह रुल आया हुआ, १० साल के अंदर आपके पास कोई लॅन्डफिल साईड और कोई ऑल्टरनेटीव्ह अरेंजमेंट नही किया हुआ है। और इम्प्लीमेन्टेशन शेड्युल वन मे लिखा गया है। आपका इम्प्लीमेन्टेशन शेड्युल जो फर्स्ट है उसमे लिखा गया है की, आपको फॅसेलिटी क्रिएट प्रोसेस ऑफ ॲज इट इज नॉट फॅसेलिटी ॲज इट इज यह वर्ड उसके अंदर युझ किया है। आपने २००० के अंदर एक प्लांट बनाया और उसके आगे छोड दिया यह अपने अधिकारीयोको अभी तक विझन नही आया है। अगर यह प्लांट बंद हो गया तो शेड्युल ४ को सेकेंड पॅरेग्राफ ३ प्वॉईंट मे कैसे कनव्हर्ट करेंगे। मै इसकी पुरी अधिकारीयोंकी धरसट करता हू की, आयुक्त से लेकर उपायुक्त से लेकर अधिकारीयोकी उनमे इतनी विझन नही है की इतनी शहर की आबादी बढ रही है की, कभी यह प्लांट बंद किया गया और रुल शेड्युल ४ का सेकेंड का थर्ड का उल्लंघन कर रहे है। अधिकारी गॅजेट मे नोटीफाय हुआ है, उसका पालन नही कर रहे है। यह नोट किया जाए और मै उनसे जवाब मांगता हू, मेरा काम पुरा नही है। बादमे ऐसा उन्होने क्यों नही किया। दुसरी बात, आपका यह शेड्युल वन का सेकेंउ रुल ऐसा बोलता है की, आपको हर ६ महिने से पुरे मिरा भाईंदर परिसर के अंदर किस तरह से आप मॉनेटींग कर रहे है। मॉनेटरींग की रिपोर्ट आपको सिक्स मन्थली देनी चाहिए। यह जो मॉनेटेरींग रिपोर्ट है, यह सिक्स मन्थली है या नही? है तो उसका, चुकी आयुक्त साहब आए हुए है। पहले वापस रिपीट करता हू। अभी वह मॉनेटरींग रिपोर्ट देने का सिस्टम क्या ॲडॉप्ट किया गया है? यह आपने क्लिअर नही किया है। अगर एक अधिकारी मानेटरींग रिपोर्ट दे देगा तो जो प्रोसेसींग युनिट चलता है वह अपने मन से कुछ भी करेगा उसका इनवटेड आउट नंबर, मेरा सेकेंड डिमांड है वह आप नोट किजीए। ६ महिने के १० साल तक इनवटेड आउटवर्ड नंबर रिपोर्ट चाहिए। आरोग्य डिपार्टमेंटने आयुक्त या उपायुक्त को क्या प्रोसेस फॉरवर्ड किया है? या सिर्फ अपने मनमर्जी से मौखीक से मौखीक रुप से किया इसका मुझे जवाब चाहिए की ६ महिने की मॉनेंटरींग रिपोर्ट वरबल है या रिटर्न है? इसका मुझे जवाब चाहिए। तिसरा मुद्दा, लॅन्डफिल साईड्स कहॉ पर बनाई गयी है? साहब, चुकी यह काम नही किए गए है इसलिए ऐसा हो रहा है। अगर लॅन्डफिल साईड्स बनी होती थी, यह लॅन्डफिल साईड्स क्या है? मै चाहुंगा अधिकारी साहब, की मै बताता हू, लॅन्डफिल साईड्स जो है वह एक तरीके से ऑलटरनेटीव्ह ॲरेंजमेंट है और उनका जो शेड्युल फर्स्ट है उसमे बताया गया है की, आपको हर साल लॅन्डफिल साईड्स डेव्हलप करनी है। २००३ तक लॅन्डफिल साईड्स का काम करना था लेकीन २०१० होने के लिए आया। अभी तक लॅन्डफिल साईड्स नही बनाई गयी है। यह पुरी की पुरी शासकीय फेल्युअर है। मै यह पुछ रहा हू मुझे यह बताईए की, अब तक आपने लॅन्डफिल साईड्स डेव्हलप की है तो कितनी लॅन्डफिल साईड्स डेव्हलप की है? फ्युचर लॅन्डफिल साईड्स डेव्हलप करने का काम शेड्युल फर्स्ट का चौथा प्वॉईंट है की, आपको फ्युचर लॅन्डफिल साईड्स भी देखनी चाहिए। वह अभी तक हुई या नही हुई है? इसके बाद कचरे के डम्पींग की बात बोल रहा हू। अभी तक शहर मे जहॉ भी कचरा इकट्ठा होता है। नीचे रोड पर लिटरींग होता है उसके उपर गाय, म्हैंस, भेडा, कुत्ता कोई भी आकर बैठता है। जब भी नगरसेवक शिकायत करते है, आरोग्य डिपार्टमेंट से शिकायत मिलती है की, आप उनको बोलीए। श्री. पानपट्टे साहब को जब भी मिलते या कोई भी जब की इस रुल से लिखा हुआ

है की, आरोग्य विभाग की जिम्मेदारी है की, कलेक्शन साईड्स के आसपास या सिटी मे कहीपर भी डिस्ट्री एनिमल नही हो और वह वापस स्टेट झोन के हिसाब से इन्फॉरमेशन ले और आरोग्य विभाग की जिम्मेदारी बनती है। नगरसेवकोको इधर से उधर ऐसा बोलनेका नही है, क्या इनके पास एक भी लेटर है जिसमे इन्होने १० साल के अंदर बोला हो, डिपार्टमेंटसे डिपार्टमेंट लेटर अगर है तो प्रोड्युस करो की आपने जिम्मेदारी ली की आपने लिखा कंट्रोल डिपार्टमेंट को, यहा पर से म्हैसे, गाय, कुत्ते घुमते है। मतलब आपने एक बार भी नही निकाला। मुझे एक भी इनवर्ड, आउटवर्ड लेटर दिखा दिजीए। जिसमे आपने यह बोला हो, डिपार्टमेंटल काम किया हो की आपको यह एनिमल हटाने है। यह आपकी जिम्मेदारी थी आपने कभी घ्यान नही दिया, आरोग्य विभागने। अगर आपको जानकारी नही हो तो मै बोलता हू यह शेड्युल फर्स्ट पत्र सेकेंड का फर्स्ट पॅरेग्राफ का थर्ड प्वॉईंट है की, आपको अपना स्टे एनिमल से बचानेका है और यह काम आरोग्य डिपार्टमेंट का है। शेड्युल सेकेंड का फर्स्ट पॅरेग्राफ का सेकेंड प्वॉईंट है, उसमे लिखा हुआ है की, जो भी आपका डिस्पोजेबल सिस्टीम है उसमे आपको पब्लिक को नोटीफाय करना चाहिए। आज तक १० साल मे एकबार भी आपने पब्लिक नोटीफाय किया है? एकबार भी नोटीफिकेशन निकाला है की हमलोग कैसे सिस्टीम करते है। पब्लिक को ट्रस्ट मे लेने का, कभी नही किया गया है। इसके बाद आपका शेड्युल सेकेंड प्वॉईंट के अंदर इतना बडा फंड दिया हुआ है वह फंड मुझे तो लगता है की, खा गया है अभी तक। आपको कमिटी एज्युकेशन के लिए, १० साल के अंदर आज तक २००० रुल बनाया है। आज तक पब्लिक को सिवीक साईन देने के लिए रूल बनाया है की, आप कमिटी एज्युकेशन करेंगे। हर चार महिने के अंदर उसका रिपोर्ट सबमिट करेंगे। आपने कौनसे एनजीओ से, कौनसे सोसायटीसे, कौनसे नॉनगर्व्हरमेंट ऑरजनायझेशन से बातचीत किया है उसका रेकॉर्ड दिजीए। आपने १० साल मे क्या किया? नही किया मतलब की, पुरे का पुरा गंदगी के लिए प्रशासन जिम्मेदार है। मैं वापस मांग रहा हू, १० साल के अंदर अंदर कितने गॅझेट निकाले, नोटीफाय किए और कितने चार महिनेकी रिपोर्ट आपने सोसायटी मिटींग की, कितना पब्लिक पाटीसिर्फेशन किया? कितना कम्युटी पार्टीसिफेशन किया इन सबकी मुझे डिटेल रिपोर्ट महासभा मे चाहिए। अगर खर्चा किया है तो उसकी ऑडीट रिपोर्ट भी चाहिए। अगर खर्चा नही किया है तो, सीधे ना आ जाएगा। इसके बादमे सबसे इम्पॉरन्ट पॉईंट आता है। जो फेल्युअर का बहुत बडा कारण है डम्पींग ग्राऊंड का, अभी मैं आपके प्वाईंटपर आता हु, डम्पींग ग्राऊंड के उपर बदबू आने का समसे बडा कारण है सॅग्रीफिकेशन नही करनेका। उसको उन्होंने कॉन्ट्रॅक्ट मे लिखा है, इनिशियल स्टेज के अंदर, हम आपको सॅग्रीगेटेड मेटल देंगे। यह इनका कॉन्ट्रक्ट है। यह कॉन्ट्रक्ट मे थर्ड प्वाईंट मे लिखा हुआ है की, इनिशियल स्टेजेस के अंदर आपको अब बायोटेकिबल अब अलग सॅग्रीग्रेशन अलग और मिस प्रोडक्ट अलग देंगे। यह आपके कॉन्ट्रक्ट मे लिखा हुआ है। यब बराबर है? यस ऑर नो? सर से बात करो। यह लिखा हुआ है, मैं बोलता हू। आप नोट कर लिजिए। लेकिन अभी तक सॅग्रीगेशन के नाम पर जरा भी कार्यवाही नही की गयी है। हिसाब से कमिटी बिल हाऊस टू हाऊस कलेक्शन करके उसको अलग, तीन कचरे के डब्बो मे, तीन तरह के डब्बे सोसायटीवालो को चाहिए। आप के गज के हिसाब से। ग्रीन, व्हाईट ॲन्ड ब्लॅक, ग्रीन के अंदर बायोटेकिबल होना चाहिए। व्हाईट के अंदर रिसायकलबिन होना चाहिए। और ब्लॅक के अंदर मिस होना चाहिए। इससे फायदा क्या है, नंबर १) बायोटेकिबल होने से उसका जो वॉल्युम होता है। अभी तक आपका सॅग्रीगेशन नही होता है। १० साल के अंदर १० साल का नोटीस आया हुआ है। अभी तक सॅग्रीगेशन मे काम नही किया गया है। उसका घाटा कितना उठाना पडता हू वह मैं आपको बताता हू। ४५० प्रति टन कचरा बेचने है। जिसका की वह रूपया, अपनेको चार्ज करते है। जब की यह कचरा अगर बायोटेकिबल होता था, तो कम होता था। रिसायकल होता था। उससे महानगरपालिका की रेन्हेन्यु बढती है। प्लास्टिक है, कम्प्युटर पार्ट है, जितने भी है। आज कल बडी बडी एजन्सी है जो आपको पैसा देती है और महानगरपालिका मे आने के लिए पैसे देकर वह पार्ट लेकर जाती है। आपका उतना कचरा कम होता था। और उधर चुकि आप सब कचरा मिक्स करके भेजते है। मिक्स करनेसे वह उनको रिसायकल मे भेज नही सकते। पाच पाच जिम्मा बढ जाता है और जब तक अलग करते है तब तक बदबू फैलती है। सबसे बडा कारण आपने अपने लेबल पर सॅग्रीगेशन नही किया। सॅग्रीगेशन करनेके लिए आपने अब तक कोई फंड नही किया। लिटरिंग के बारे मे ...

**जुबेर इनामदार :-**

सभागृह नेते साहेब, बाकीच्या लोकांना बोलायचे आहे. हा प्रशासनाचा भाग येतो.

**मधुसूदन पुरोहित :-**

मा. महापौरजी, मला वाटते हे सर्व विषय जे सांगत आहे ते पेपरावर लिहिलेले आहे. तुम्हांला माहिती नसेल तर कृपा करून तुम्ही घ्या. आता, हे सांगा कचऱ्याचे काय करायचे. हे बोलणं वगैरे सोडा. मागील एक दिड महिने झाले. लोक आपल्याला धरून मारतील. रोजची नाटक आहे. रोज आम्ही विचारतो. आता ह्याच्यावर तोडगा काय ते सांगा.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, यह प्वॉईंट इन्होंने बोला है की, इस कचरेके विषय मे सोचना चाहिए। यह प्रकल्प बंद क्यो हुआ? लोगोंको त्रास हुआ। यह कारण है। जिनके कारण त्रास हुआ उनके कारण से हो रहा है। यह जो प्वॉईंट बोल रहे है उसके उपर ध्यान दिया जाए।

**प्रेमनाथ पाटील :-**

आयुक्त साहेब, मिरा भाईदंर शहरामध्ये एवढे कचऱ्याचे ढीग पडलेले अहोत. आरोग्य विभागाला मला विचारायचे आहे की, आपल्याकडे त्या कचऱ्यावर टाकायला पावडर आहे का?

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहेब, अढाई महिने से पुरा मिरा भाईंदर मे कचरेका ढेर पडा हुआ है। लोगों को तरह तरह की बिमारीया हो रही है। डेंग्यू और मलेरिया हो रहे है। फिर भी मिरा भाईंदर महानगरपालिकाने महापौर सहाय्यता निधी रखी हुई थी।लोगों को मदत के लिए। डेंग्यू पेशंट को महापौर सहाय्यता निधी से मदत दी जाती थी। वह फाईल आजकल स्टॉप कर दी गई है। क्यो? रिझन पुछने पर पता चलता है की, ऐसी रिपोर्ट बाहर गई है की, मिरा भाईंदर शहर डेंग्यू मुक्त है। जो डेंग्यू के पेशंट है तो क्या लॅबोरेटरी झुठ है? या आपकी रिपोर्ट उपर गलत है? अगर आपकी रिपोर्ट गलत गई है तो उससे मिरा भाईंदर के नागरिकोका क्या लेना देना है? उनका क्यो नुकसान किया जा रहा है, गलत रिपोर्ट भेजकर।

**अरूण कदम :-**

त्यांनी जो विषय मांडला आहे तर मागच्या दोन वर्षामध्ये महापौरांनी त्यांच्या निधीतून दिलेल्या प्रत्येक मदतीचा आम्हांला सभागृहाला वैयक्तिक माहिती पाहिजे. त्यांनी कोणाकोणाला मदत केली आहे आणि का केली आहे?

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी ) :-**

सगळ्यांना माहिती मिळेल. एकेकट्याने बोला. म्हणजे आपआपले विषय चांगल्या तऱ्हेने तुम्हांला मांडता येतील.

**स्नेहा पांडे :-**

अढाई महिने से भाईंदर मे कचरा फैला हुआ है। इसके लिए प्रशासनाने अभी तक क्या कदम उठाए है? अगर वहापर आंदोलन हो रहा हैं। वह कचरा नही डालने दे रहे है। पुरे शहर मे ऐसे ही कचरा फैला रहेगा। उसके लिए प्रशासन को दुसरा कुछ रास्ता अपनाना चाहिए। प्रशासनने अभीतक अढाई महिने मे क्या किया है। ऐसे ही कचरा शहर मे पडा रहे या फिर ले जाकर उत्तन मे डाल दो । आंदोलन के बावजुद भी ऐसा प्रशासन का रवय्या रहा तो कैसे?

**मिलन पाटील :-**

पिठासीन अधिकारी साहेब, आता सन्मा. सदस्य डॉ. जैन यांनी जी गॅझेटची माहिती दिली आणि खरोखरच ती माहिती, माहितीप्रमाणे आपले ॲग्रीमेंट तसे त्या घनकचऱ्याचे झालेले आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी एकदा मुंबई सकाळमध्ये डिटेल माहिती दिली होती की, प्रकल्प कसा असायला पाहिजे? कसा असला पाहिजे आणि तो कसा राबविला पाहिजे. ह्याबाबतीत त्यांनी डिटेल माहिती दिली होती तिच गोष्ट आज डॉक्टरांनी दिली आहे. परंतु, डॉक्टर नवीन असल्यामुळे त्यांच्याकडे कोण लक्ष देत नाही. प्रशासनाची ही जिम्मेदारी आहे. प्रशासनाने ह्या कायद्याचे पालन करायला पाहिजे आणि कायद्याचे पालन न केल्याने त्याला अधिकारी लोक जबाबदार आहेत. कारण जे तीन डब्बे करायला पाहिजेत ते डब्बे केले नाहीत. आपण कचरा उचलायला जे ठेकेदार नेमतो त्यांनी खाचे करायला पाहिजेत. त्यांच्या गाडीला जसे डब्ब्यांचे कलर त्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या गाडीला खाचे ठेवायला पाहिजे. तुमच्या गाडीला एकतरी खाचा आहे का? दवाखान्याचे वेस्टेज त्याच्यामध्ये जाते. त्याच्यामध्ये भाजीपाल्याचा कचरा असतो तो त्याच्यामध्येच गोळा करून जातात. आणि जो रस्त्यावरचा असतो, माती, दगड, धोंडे असतात, प्लास्टिक असते ते सुद्धा त्यात हे काय करतात तर जो ठेकेदार सर्व कचरा एकत्र करून त्यांना नेऊन देतात. तो तिथे काय शॉटींग करत बसेल का? आणि हेच जर तुम्ही व्यवस्थित कायदेशीर केले तर, आपण त्याला पैसे देतो आणि तुमच्याकडे त्याचे ॲग्रीमेंट आहे. ह्यापध्दतीने तुम्ही कचरा उचलून दिला पाहिजे. कचरा उचलून नेला पाहिजे. त्याले पालन करण्याचे काम अधिकाऱ्यांचे आहे. अधिकारी लोक ए.सी.मध्ये बसतात आणि रस्त्यावर जात नाही. काय केले जाते ते त्यांचे काय बघतच नाही. हे अधिकारी लोक ए.सी.मध्ये बसण्यापेक्षा जागेवर जाऊन जर बघितले असते, ठेकेदाराला जर जबाबदार धरले, त्याला नोटीसा काढल्या असत्या. त्याचा ठेका कॅन्सल केला असता तर आज ही परिस्थिती आली नसती. डॉ. जैन सांगतात ते कायद्याचे बोलतात आणि खरोखर कायद्याप्रमाणे जर वागले असते तर ह्या प्रकल्पाला आज ह्या आंदोलनाची आवश्यकता झाली नसती आणि खरोखर तिथे वास, दुर्गंधी येते. त्या दुर्गंधीकरिता म्हणून प्रशासनच जबाबदार आहे. साहेब, तुम्हांला फक्त ६ महिने झालेले आहेत. त्याच्या अगोदरच्या आयुक्तांनी जर केले असते तर झाले असते.

**स्नेहा पांडे :-**

साहब, डेंग्यू के फाईल का प्रोसीजर क्यो रोका गया। है? मुझे उसका उत्तर चाहिए।

**मा. आयुक्त :-**

डेंग्यू के पेशंट को पैसा देना शुरू हो गया। सर्टिफिकेट ज्यादा आने लगे। पेशंट नही है और सर्टीफिकेट ज्यादा आने लगे। इसलिए बंद किया।

**स्नेहा पांडे :-**

पेशंट नही है तो सर्टीफिकेट कहा से आऐंगे? नगरपालिकामे जाकर इनक्वॉयरी करे।

**मा. आयुक्त :-**

पेशंट नही है फिर भी सर्टीफिकेट आने लगे इसलिए पेमेंन्ट करना बंद किया है।

**स्नेहा पांडे :-**

झुठा सर्टीफिकेट कहा से आया है? झुठा सर्टीफिकेट कौन बना रहा है इसकी नगरपालिका जाकर खुद इनक्वॉयरी करे। उसका निर्णय कौन करेगा?

**प्रशांत पालांडे :-**

उत्तनचा घनकचरा प्रकल्प व्यवस्थित चालत नाही. योग्यप्रकारे तो चालवला जात नाही म्हणून दुर्गंधी येते व लोक रस्त्यावर उतरली. ते ४ ते ५ हजार लोक असतील. पण आज प्रत्येक इमारतीच्या बाजूला कचऱ्याचा ढीग लागलेला आहे.

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी) :-**

कृपया, आपल्याला सांगतोय एका नगरसेवकाने त्याच विषयावर बोलल्यानंतर तुम्ही जरा वेगळा विषय घ्या.

**प्रशांत पालांडे :-**

वेगळा विषय आहे.

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी) :-**

वास येतोय आणि आम्हीही त्याच शहरामध्ये राहतोय. नवीन काहीतरी त्याच्यामध्ये सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

पिठासीन अधिकारी साहेब, आयुक्त साहेब, मला हेच विचारायचे आहे की, मिरा भाईंदर शहरामध्ये रस्त्यारस्त्यावर कचऱ्याचा ढिग पडलेला आहे. तर मला आरोग्य विभागाला एकच विचारायचे आहे की, आपल्याकडे त्यासाठी किटकनाशक पावडर आहे का?

**जयंत पाटील ( पिठासीन अधिकारी) :-**

पावडर संपलेली आहे. काल संध्याकाळी संपलेली आहे आणि आज येणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सात दिवस झाले? पावडर संपलेली आहे. ऑन दि वे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, विषय असा आहे की, हे शहर ज्याला आपल्याच काळामध्ये गाडगेबाबा स्वच्छता अभियानामध्ये पुरस्कार मिळालेला आहे. त्या शहराची अशी आजच्या तारखेत दुर्गता झालेली आहे. कचरा हा महत्वाचा विषय म्हणजे कुठलेही युद्ध करायचे असेल तर त्याला प्लान ए आणि प्लान बी लागतो. प्लान ए फेल झाला तर आपण प्लान बी ने काम करतो. येथे प्लान ए फेल झाला म्हणजे डायरेक्ट मृत्यु आपल्याकडे असणारा घनकचरा प्रकल्प प्रशासनाने स्पष्ट सांगावे की तो फेल झालेला आहे का? तो फेल झाला असेल तर आपल्याकडे पर्यायी व्यवस्था काय? ह्या शहराचे नागरिक...

**मा. आयुक्त :-**

फेल झालेले नाही.

**जुबेर इनामदार :-**

नाही ना, मग ते चालू का नाही होत?

**भगवती शर्मा :-**

तुम्ही सांगता फेल झालेले नाही. मग डॉक्टरने जे प्वॉईंट विचारले आहे त्याचे उत्तर का देत नाही?

**डॉ. राजेंद्र जैन :-**

यह रूल है की, अगर एक फेल हो जाए तो दुसरा चालू करना चाहिए।

**जुबेर इनामदार :-**

ते डॉक्टर आहेत म्हणून त्यांना आरोग्याची जास्त कडकड आहे. त्यांनी पोल्युशन कंट्रोल बोर्डची तुम्हांला पूर्णपणे माहिती दिली. प्रशासनाकडे ती माहिती असेल. त्याच्यावर कदाचित प्रशासन कामसुध्दा करत असेल. आजच्या आज ज्या त्रुट्या त्यांनी सांगितले आहे ते तुमच्याकडून पूर्ण होणार नाही. त्याला अवधी लागेल. सहा महिने वर्षभर लागेल. सध्याच्या परिस्थितीत या शहराचे नागरिक जे तुमचे करधारक आहेत आणि महापालिकेचे तुम्ही आयुक्त आहात. शहराला कचरामुक्त करणे हे तुमचेच काम आहे.

**मा. आयुक्त :-**

सगळ्यांचे.

**जुबेर इनामदार :-**

पुर्ण शहराचा प्रत्येक पक्षाने, कदाचित प्रत्येक नगरसेवकाने तुम्हांला आंदोलनाचे पत्र दिले आहे त्याची वाट बघत आहात का? शहराने शहर आंदोलन करावे. रस्त्यावर लोक आली पाहिजे. मारामाऱ्या झाल्या पाहिजेत. पोलिसांची लाठीचार्ज झाली पाहिजे. तुम्हांला न्यायालयाने परवानगी दिलेली आहे व तुम्हांला जे योग्य वाटेल ती कार्यवाही करा. तुमचे अधिकारी ती कार्यवाही का करत नाही? स्पष्ट उत्तर द्या. लोकप्रतिनिधी

आहेत. इथे बसलेला प्रत्येक व्यक्ती लोकप्रतिनिधी आहे. त्याला लोकांनी निवडून दिलेले अहे. ह्यांना लोकांना तोंड द्यावे लागतात.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आयुक्त साहब आपने बोला यह फेल्युअर तो नही पर ब्रेकडाऊन तो है। जो वह वहापर कचरा जाता है डम्पींग ग्राऊंड का ब्रेकअप तो हो गया उसका ब्रेकडाऊन तो हो गया। आपके रूल मे लिखा हुआ है। ब्रेकडाऊन और फेल्युअर उस कंडीशन तहत आपके पास ऑलटरनेटीव्ह होना चाहिए था। यह रूल २००० मे बोलता है। आज १० साल हो गए है। आपको यहापर आकर देड साल दो गया है, अब तक कार्यवाही क्यो नही हुई?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, कचऱ्याचा प्रश्न या शहरामध्ये सगळ्या वॉर्डमधून सारखा आहे. आज तसे बघायला गेले तर २५-३० हजार लोक तिथे आहेत आणि लाखो लोक इकडे आहेत. मी गेल्या ३ महिन्यापुर्वीची गोष्ट सांगतोय. उत्तन विभागाच्या काही संस्था उच्च न्यायालयामधील एका केसमध्ये त्याने ॲफीडेवीट फाईल सहभागी झाले त्या केसला मी स्वतः हजर होतो. त्यांची बाजू ऐकल्यानंतर सन्मा. चीफ जस्टीस साहेबांनी त्यांना विचारले की, तुमच्या विभागातला कचरा जर तुमच्या इथे नको आहे उत्तन विभागात तर हा प्रोजेक्ट बंद करून दुसरी जागा कुठे? हे तुम्ही सुचवा. ही जिम्मेगदारी संपूर्ण उत्तन विभागातल्या नागरिकांच्यावतीने ज्या संस्था आल्या होत्या त्यांच्यावर मा. जज साहेबांनी टाकली त्यानंतर टिल टुडे आता पर्यंत त्या विभागतल्या संस्थांनी अजूनपर्यंत दुसरी व्यवहारिक जागा आणि व्यवस्थित जागा कोणती हे नोंदवलेले नाही, सांगितलेले नाही, दाखवलेले नाही. ही न्यायालयीन बाब आहे. विधी अधिकारी आता उठून आपल्याला समजावून सांगतिल त्यापण कोर्टामध्ये हजर होत्या. विधी अधिकाऱ्याकडून ते क्लिअर करावे. म्हणजे एकीकडे कचरा थांबवायचा त्यानंतर हे नको तर दुसरे कुठे? ती जागा सुचवायची नाही. त्यामध्ये तीन महिने गेले, आपण सर्व नशिबवान आहात. आचार संहिता आहे त्यामुळे आपले तीन पाच महिने सर्व सुरळित गेले. या शहरामध्ये ३ मार्च १९९९, ४ मार्च १९९९ आणि ५ मार्च १९९९ हे तीन दिवस भाईंदर शहरामध्ये प्रचंड आंदोलन झालेली आहेत. हे सगळ्या लोकप्रतिनिधींना चांगला अनुभव आहे. माझी सभागृहाला अशी नम्र विनंती आहे की, अजून जनहित याचिका दाखल झाली आहे. काल त्याचे हेअरिंग होते व मी सुद्धा हायकोर्टामध्ये होतो. आपल्या राजकिय पक्षाने सर्व, या सभागृहात सर्व पक्षाचे लोक प्रतिनिधीत्व करतात. त्यांनी एकत्र मिळून जनहित याचिका का करू नये. ह्याचा काहीतरी एक कायदेशीर मार्गाने एक प्रकारचा तुकडा पाडा. सभागृहातील भांडणे आम्ही सहा महिने झाले बघतोय. अधिकारी हे करत नाही. नगरसेवक ते करत नाही. आपण सगळं करतोय पुढे काय? आज आमची सगळ्यात जास्त भाईंदर वेस्टला माझ्या वॉर्डमध्ये मच्छीमार्केट आहे. तीन ट्रक भरून मच्छीचा कचरा दररोज निघतो. ऊन पडल्यावर तीन तासात कुजण्याची प्रक्रिया सुरू होते. बारा दुकानं मटणाची आहेत. त्याचा कचरा निघतोय. आज आमच्या सारख्यांनी जायचे कुठे? आज तो जो कचरा आहे, घाणेरडा कचरा होतो. त्याचा तीन तासामध्ये कचऱ्याचे उपद्रव सुरू हाते. त्याचा स्मेल यायला लागतो. त्याच्यापासून निरनिराळ्या रोगाचा प्रार्दूभाव आहे. असा कचरा आम्ही एवढे दिवस कसे काय करत असू ह्याचा कोणी विचार केलेला आहे का? मच्छीमार्केट्स आहेत. तो कचरा लगेच गेला पाहिजे. प्लास्टिक, माती वगैरे हे आपण समजू शकतो. आठवडाभर त्याचा काही प्रार्दुभाव होत नाही. मच्छीच्या प्रार्दूभावाला तीन तासानंतर सुरूवात होते. आज जी जनहित याचिका झाली आहे. ती काय हेअरिंगला किंवा पुढच्या गुरूवारी एखाद वेळेस येणार आहे. या शहरामध्ये हे वाद कितपर्यंत चालणार? प्रशासनाला आपण दोष देतो पण जनता, तुम्ही नगरसेवक मी नगरसेवक हे आयुक्त ते अधिकारी असे सगळ्यांना एकत्ररित्या पकडते. कारण आपण सगळे ह्या महापालिकेचा एक पार्ट आहोत. आपण महापालिका चालवितो. ह्याचा सगळ्यांनी विचार केला पाहिजे. ह्याच्यावर तोडगा काढा. अन्यथा उत्तन विरूध्द शहर हा वाद पेटल्याशिवाय राहणार नाही. ह्याच्यामध्ये भल्या कुठल्या राजकिय पक्षाचा कुठलाही रोल असू दे. शेवटी नागरिकांना त्रास हा सहन करावा लागतोय. आजच्या तारखेला सर्व छोटी छोटी हॉस्पीटल बीएमसीला आता पाण्याची साथ सुरू झाली आहे. त्यांच्या टीम बीएमसी च्या एरियामध्ये फिरत आहे आणि त्याच्यात पाहणी करत आहेत. कोण कोण नागरिक काय काय ग्रस्त आहेत. आपल्याकडे तसा प्रकार काहीच नाही. एखादी साथ जास्त झाली आणि डेथला सुरूवात झाल्यावर आपण जागे होणार का? मी कोणाची बाजू घेत नाही आणि कोणाला विरोध करत नाही. पण सध्या परिस्थिती आहे, माझ्या सोसायटीच्या खाली सहा ड्रम भरले आहे. स्मशान भूमीच्या इथे ३० ट्रक भरून आज ५ दिवस झाले. ३० ट्रक स्मशान भूमीच्या इथे ३० ट्रक भरून आज ५ दिवस झाले. ३० ट्रक स्मशान भूमीच्या डम्पींग ग्राऊंडला आहे. लिचड गळतोय. त्या साईडने आपण सुभाषचंद्र बोस मैदानावर टर्न मारताना तुम्हांला गाडी घेऊन जाता येत नाही ही अवस्था आहे. ह्या सगळ्याचा आपण प्रॅक्टीकल असा काहीतरी विचार केला पाहिजे. आता त्यांनी जागा दाखववावी. जे कोर्टात गेले त्यांची लायबिलिटी आहे की, त्यांनी जागा दाखववावी की, ही जागा नको, ही जागा हवी. म्हणजे कुठेतरी काहीतरी कन्फ्युजन सुरू होईल. आपण कृपया या शहराच्या दृष्टीकोनातून निर्णय घ्या. जेणेकरून वाद वितंग, हाण्यामाऱ्या पुढचे होणारे लाठीचार्ज जन आंदोलन हे वाचतील. तुम्ही नगरसेवक आहात त्या ठिकाणचे नागरिक तुम्हांला सुद्धा येऊन हा प्रश्न विचारणार आहेत. मला सुद्धा विचारणार आहेत. आपण सगळेच भरडले जाणार आहोत. पाणी प्रश्नाच्या

वेळेला नागरिक नगरसेवकांना मारायला रस्त्यावर फिरत होते. ५०-५० च्या चाफ्यानी हे आम्ही बघितले आहे. ती परिस्थिती मेहेरबानी करून यापुढे आणू नये. अशी माहिती सभागृहातील सर्व सदस्यांना नम्र विनंती आहे. पुढचे येणारे जे पीआयएल आहे. त्याच्यात आपण नागरिकांची जनहित याचिकेमध्ये कोणीही इंटरफेअर करू शकते. आपली आपण भुमिका मांडली पाहिजे. आता मी नगरसेवक आहे. माझा कचरा कुठे जाणार. हा माझा प्रश्न आहे. आम्ही तयारी करूच पण बाकीच्यांनी पण केली पाहिजे. ७९ नगरसेवक प्लस ५ स्विकृत सगळयांनीच ह्याची तयारी केली पाहिजे. ह्याच्यामध्ये पक्षीय वाद मेहेरबानी करून आणू नका. हे संकट आपल्या शहरावर आलेले आहे. माझ्या सुचनेचा तुम्ही विचार करा आणि प्रशासनाने ह्याचा खुलासा करावा. तुम्हांला कोर्टाने ऑर्डर पण केली की, त्याठिकाणी कचरा टाकावा.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर साहेब, उत्तन आणि शहरात वाद होईल हा प्रश्न चुकीचा वाटला. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, क्लिअर आहेत. जसा सचिन तेंडूलकर आहे तसे ते आहेत. चांगल्या प्रकारची बॉलींग आणि बॅटींग कशी करायची हे त्यांना माहिती आहे. मला तसे बोलता येणार नाही आणि तसे दर्शविता येणार नाही. मी थोड्यातच सांगतो की, महापालिका आणि नगरपालिका ही नागरिकांच्या लोकांच्या सेवेसाठी, लोकांच्या आरोग्यासाठी कार्य करित असते. मला एवढी कल्पना आहे. आता म्हात्रे साहेबांनी इथे जो विषय मांडला की, नगरसेवकांनी सर्व राजकिय पक्षांनी आपण हा तोडगा काढला पाहिजे. आम्ही तोडगा काढण्याच्याच तयारीत आहोत. उत्तनला जजने काही डिसीजन दिले. जागा बघून द्यायला सांगितली म्हणजे कोणी ह्याच्यापुढे कोणत्याही गोष्टीला विरोध करायचा नाही. जो विरोध करेल त्याने हे प्रश्न सोडवून द्यावे हे असे चालत नाही. आपल्याला मान्यता दिलेली आहे. महापालिका, महासभेमध्ये आपण विचार मांडून आपण तो निर्णय घेऊ शकतो. कचऱ्याचा कुठे विल्हेवाट लावायचा आणि दुसरा प्रकल्प कुठे उभा करायचा? आम्ही सांगत नाही जर त्याची दुर्गंधी बंद करण्यामध्ये प्रशासन कामयाब होत असेल तर आम्ही डम्पींग ग्राऊंड बंद करण्याचा प्रश्नच येत नाही. दुर्गंधी येते ही वस्तुस्थिती आहे. तुम्ही आता कितीही सांगाल की, हवेमध्ये जंतु नाही. दुर्गंधी हानीकारक नाही. रोगराई पसरू शकत नाही. तो रिपोर्ट तुमचा काहीही असू शकेल. पण दुर्गंधी येते ही वस्तुस्थिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आम्ही ह्या अगोदर प्रत्येक प्रोजेक्टला भेट दिलेली आहे आणि आमच्याबरोबर आलेले सदस्य या सभागृहामध्ये हजर आहेत. दुर्गंधी जे तुम्ही बोलता तर ह्या प्रोजेक्टमुळे ह्या अगोदर ती प्रोजेक्ट आम्ही बघून आलो आहोत.

**बर्नट डिमेलो :-**

तुम्ही जे उत्तन विरूध्द शहर असा जो वाद केला.

**मिलन म्हात्रे :-**

नाही. आम्ही वाद केलेला नाही. करणाऱ्यांनी तो केलेला आहे तो वाद करून आता वर्ष झाले.

**हेलन गोविंद :-**

म्हात्रे साहेब, तुम्ही चुकीची माहिती दिली. आपण बोललात की, भाईंदर बाजारातून तीन ट्रक येतात मासळीची. तर मासळी विकायला मी स्वतः भाईंदरला जाते.

**मिलन म्हात्रे :-**

त्या पुस्तकात सगळं लिहिले आहे ते सगळं माहिती आहे

(सभागृहात गोंधळ )

**सिसिलिया बावीघर :-**

सभागृहामध्ये चुकीची माहिती देवू नका. खराब मासळी तीन दिवस भाईंदरला कोण घेऊन जात नाही. आम्ही जातो मासळी विकायला.

**हेलन गोविंद :-**

सभागृहामध्ये चुकीची माहिती अजिबात देवू नका. मासली विकायला. आमची लोक खराब मासली आणता? खोटी माहिती तुम्ही सभागृहामध्ये देवू नका.

**बर्नड डिमेलो :-**

आयुक्त साहेब, मला फक्त एवढेच बोलायचे आहे की, जर त्या प्रोजेक्टमध्ये घनकचरा प्रकल्पामध्ये दुर्गंधी यायची बंद होत असेल तर आम्ही त्या प्रकल्पाचा स्वागत करू.

**मिलन म्हात्रे :-**

कुजलेल्या मच्छीचे ट्रक चार चार दिवस, आठवडा आठवडा थांबल्यावर काय होणार? वास येणार नाहीतर सुगंध येणार का? माझ्या येथे दिवसभर मच्छी विकले जाते. आपण येऊन बघा. मच्छी आम्ही पण खातो. मच्छी सुकविणे ही प्रक्रिया निराळी असते आणि ओली मच्छी कुजवणारी प्रक्रिया निराळी असते.

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी) :-**

आपण तोडगा काढण्याचा प्रयत्न म्हणता आणि त्याच त्या विषयावर बोलू नका.

**बर्नड डिमेलो :-**

तोडगाच काढतोय मी.

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी) :-**

तोडगा काढायचा आहे त्या विषयावर सगळेच जण गंभीर आहेत. या शहरामध्ये आपण सगळेच राहतो. मी भाईंदर पूर्वेला राहतो आणि सगळीकडे परिस्थिती अतिशय वाईट आहे. त्याच्यावर तोडगा काढायचा आहे. हायकोर्टामध्ये केस गेलेली आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मी एवढेच सांगतोय, दुर्गंधीवर मात करा. जर दुर्गंधी आली नाही तर त्या प्रोजेक्टचा उत्तनचे सर्व रहिवासी स्वागत करतील.

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी) :-**

तुमचे मत या सभागृहाला मान्य आहे.

**बर्नड डिमेलो :-**

दुर्गंधी का येते, ह्याचा शोध लावून खत प्रकल्प आहे जे खत बनवतात त्याच्यामध्ये केमिकल टाकून त्याला नासवावे लागते. तशी कोणती विशिष्ट गोष्ट अमुक दिवस ठेवली पाहिजे जर ते खत होते. त्याचा तो फायद्याची गोष्ट, ते फायदे तुम्ही बघू नका. ॲग्रीमेंटमध्ये आता डॉक्टर ह्यांनी सांगितले आहे त्याप्रमाणे त्या ज्या गोष्टी आहेत ते आपल्याला हानीकारक आहेत त्या करू नयेत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

यह दुर्गंधी आती है या नही आती है इसके बारे मे बडा भ्रम था।

**मिलन म्हात्रे :-**

या सगळ्यामध्ये सदस्यांनी सहभाग घेऊन ते काम होईल कसे ते बघितले पाहिजे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अधिकारी साहब, मेरा सुझाव है की, छह नगरसेवकोकी एक कमिटी बनाई जाए जो हर महिने मे वहापर निश्चित करे की दुर्गंधी आती है या नही।

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी) :-**

आपला प्रस्ताव चांगला आहे.

**सिसिलिया बावीघर :-**

आयुक्त साहेब, आता सन्मा. मिलन म्हात्रे साहेबांनी सांगितले की, संस्थांना त्यांनी पर्यायी जागा सुचवायला सांगितली आहे. तर त्याचे काही लेखी त्यांच्याजवळ असेल तर त्यांनी आम्हांला तसे द्यावे.

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी) :-**

ठिक आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पहिले, सभागृहामध्ये सर्वांना विनंती करतो, आज हा सर्वांचा प्रश्न असताना आपण वैयक्तिक आपले एकमेकांविरूध्द कशाला भांडता? मी तुम्हांला हा प्रश्न का केला, आपण जर एकोप्याने एखादा निर्णय घेतला तर आपण त्या संकटावर मात करू शकतो. पण आता झाले काय? आजच्या स्थितीमध्ये पिठासीन अधिकारी साहेब, आयुक्तांनी दोन गोष्टी या ठिकाणी स्पष्ट कराव्यात की, प्रोजेक्ट बंद करावा ह्याच्यासाठी एक याचिका दाखल झाली. त्या याचिकेमध्ये कोर्टाने असा निर्णय दिला अंतरिम आदेश, फायनल नाही की, पोलिस फोर्स घेऊन कचरा टाकावा. प्रॅक्टीकली ते पॉसीबल झाले नाही पोलिसांना सुद्धा. तिथल्या लोकांचा तिथे विरोध आहे. कोर्टाने शासनाची एक कमिटी नेमून प्रत्यक्षात प्लांटवर काय चालले आहे त्याच्या संबंधी रिपोर्ट सादर करावा अशी कोर्टाने डायरेक्शन दिली. जी कमिटी नेमलेली, कोकण कमिशनर यांच्या अध्यक्षतेखाली त्या कमिटीने आंदोलन कर्त्यांशी चर्चा करावी त्याच्यावर तोडगा काढावा. आपण काय करतोय, तोडगा पण नाही काढत आणि बडगाच मारत चाललोय. म्हणजे जी प्रोसेस ऑलरेडी चालू झालेली आहे तोडण्याची त्या प्रोसेसच्या बद्दल पुढे काय झाले हे माहिती नाही ही देखील गोष्ट आहे. इलेक्शनच्या अगोदरची. पिठासीन अधिकारी साहेब, त्या मिटींगला मला काही गोष्टी सांगाव्या लागल्या, कोकण कमिश्नरांना की, ही अशी परिस्थीती नाही तर अशी परिस्थिती आहे आणि जेव्हा त्या कमिटीने त्या आंदोलनर्त्यांना विचारले की तुमचे प्रॉब्लेम काय आहे ते सांगा. त्यांचे म्हणणे एकच आहे की, त्याच्यात वास येतो. तर वासाचे परिमाण काय तर काहीच नाही. वास मोजण्याचे यंत्र अजून तरी जगामध्ये निघालेले नाही. म्हणजे त्यांनी सांगितले जास्त येतो तर तो आम्हांला कमी वाटतो. कारण एखाद्याला वास घेण्याची सवय नसेल तर त्याला तो वास जास्त येणारच. मासे न खाणारा माणूस जर उत्तनला गेला तर त्याला माश्यांचा पण वास येईल. मी कुणाच्याही बाजूने बोलत नाही व विरोधातही नाही. पण वस्तुस्थिती अशी आहे. प्रत्येकाच्या मनात असे आहे की हा प्लान नको. कुठे तरी दुसरीकडे जातो का बघूया. कचरा कुणाचाल नको असतो. पण त्याही पेक्षा कायद्याने आणि प्रॅक्टीकली आपण बरोबर केले आहे का हे पण बघणे गरजेचे आहे. आता पिठासीन अधिकारी साहेब, आत दुसरी एक जनहित याचिका दाखल झालेली आहे. तेव्हा पहिल्या याचिकेमध्ये असा निर्णय झाला त्याची माहिती त्यांना द्यावी. दुसरी जनहित याचिका त्याच विषयावर दाखल झालेली आहे. त्या संबंधी कोर्टाची आजची सगळ्या याचिकेची सद्यस्थिती काय आहे हे सांगावे. आयुक्तांकडे एक मिटींग लावून ती कमिटी

आंदोनकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या समोर बोलवणार आहेत आणि त्याच्यावर तोडगा काढणार आहेत. मग उद्या सभागृहाने जर असा निर्णय घेतला की, तो प्लांट बंद करा आणि मुख्यमंत्र्यांकडे कमिटी पोहचली आणि आंदोलनकत्यांनी सांगितले की ठिक आहे, मुख्यमंत्र्यांनी सांगितले की प्लांट चालू करा तिथे बंदूकधारी पोलीस उभे करा. मग तुमचा निर्णय जास्त महत्वाचा की, मुख्यमंत्र्यांचा निर्णय जास्त महत्वाचा आणि तो भाग आता माझ्या कोर्टात राहिलाच नाही. या सभागृहाच्या कोर्टात. या सभागृहाच्या भावना एवढ्या तीव्र होत्या की, ह्यापूर्वी महापौरांनी त्या सभा बोलवायला पाहिजे होत्या. आमच्या पक्षाच्या आदेशाने आम्ही पत्र दिले होते. पण त्यांना सुद्धा त्यांची काही पडलेली नाही की, तुम्ही चार स्थायी समितीचे, स्थायी समितीच्या सदस्यांची सही घेऊन प्रस्ताव या आजच्या सभेपुढे आलाअसता तर त्याच्यावर ठोस निर्णय घेता आला असता म्हणून य़ा ठिकाणी पहिल्यांदा, कसे आहे प्रत्येकवेळी नगरसेवक / नगरसेविका भांडतात. एखादा नगरसेवक भांडतोय ह्याचा अर्थ तो काही मुद्दामुन वैयक्तिक वैर आहे म्हणून भांडत नाही. पण त्यांना माहितीच नाही. आता हे सगळे भांडणा-यामधून किती लोकांना माहिती आहे की, शासनाच्या लेव्हलला या प्रोजेक्टच्या संदर्भात काय चाललेले आहे आण न्यायालयामध्ये कशाप्रकारे त्याची परिस्थिती आहे. उगाच येथे भांडायचे की, तुम्ही जागा द्या. आम्ही बघतोय. हे शहर वेगळे होईल आणि उत्तन वेगळे होईल. हा विषय नाही. आजच्या महासभेत जर ह्याच्यावर खरोखर तुम्हांला चांगली चर्चा घडवायची आहे आणि एखादी उपाययोजना न्यायप्रविष्ठ बाबी जरी असल्या असतील तरी ती आत्ताच्या आता आपण काढू शकतो पण तुम्ही ती माहिती तर द्या प्रशासनाने फक्त प्रशासनाने एवढीच वाट बघायची की, लोकांनी आंदोलन करावे आणि जे आंदोलन नगरसेवकांनी केले तर ते कृत्रिम होईल.

**प्रभात पाटील :-**

मला ही नेमकं ह्याच बाबतीत बोलायचे होते की, हा विषय लक्षवेधीचा मार्फत आला म्हणजे ही किती शर्मेची गोष्ट आहे की, कोणतरी लक्षवेधी आणतोय म्हणून हा विषय सभागृहात येतोय, इथे १७६० विषय आले. विषयपत्रिका वाचली तर असे वाटले की, प्रशासनाला आणि नगरसेवकांना ह्या शहराच्या हिताची किती पडलेली आहे. काय चांगले विषय आणले आहे, सबवेचे विषय आहेत. गोराई मनोरीच्या रस्त्याचे विषय आहे. घोडबंदर रोडचा विषय आहेय खुप चांगले डेव्हलपमेंटचे विषय आणले आहे. अगदी छान छान विषय विषय की शहराचा विकास ह्याच्यातून दिसतोय. शहरामध्ये घाण पडली आहे. त्याचा विषय प्रशासनाने का नाही, आणला. तो लक्षवेधीच्या माध्यमातून का आणावा लागला. तुम्हांला असे वाटले नाही का, आम्ही हा विषय सभागृहाला सांगतोय की, आमचे शासनाकडे काय चालले आहे. आमचे कोर्टात काय चाललयं ह्याची सभागृहाला माहिती द्यावी असे प्रशासनाला वाटले नाही? तुम्ही ही वाट बघताय का आम्ही रस्त्यावर उतरणार. आम्ही रस्त्यावर उतरणार नाही, रस्त्यावर तुम्ही उतरा. रस्त्यावर किती मोठे मोठे किडे वाहतात ते बघायला आणि त्याच्यावर टाकायला तुमच्याकडे पावडर नाही. तुम्हांला काही सांगताना वाटायला पाहिजे होते की, संध्याकाळी पावडर येणार आहे. मेलेल्याच्या तोंडात तुम्ही पाणी ओतणार आहात. तो विषय इथे का आला नाही आणि शर्मेची गोष्ट, दादा तुम्ही नवघर रोड वरून जात असाल तर बघा. तुम्ही तर स्टेशनला उतरलात तर स्टेशनवरून नवघर गावाकडे येताना डाव्या बाजूला कचरा दिसतो का, ते बघा. डाव्या बाजूचा कचका कुठे जातो आणि उजवी बाजू का भरलेली आहे? ते राजकारण अधिका-यांना कसे कळते? या प्रश्नाचे उत्तर तर तुम्हा ला द्यायचेच आहे की, डाव्या बाजूला कचरा का नाही आणि उजव्या बाजूला कचरा का आहे? डाव्या बाजूची लोकं तुमची कोण लागतात आणि उजव्या बाजूची लोकं तुमचा कर भरत नाही का?

**मधुसूदन पुरोहित :-**

आणि विचारल्यानंतर सांगात की, डाव्या बाजूला नगरसेवकाने तो फ्लॉट दिलेला आहे. ॲक्च्युअली महानगरपालिकेचा तो फ्लॉट आहे.

**प्रभात पाटील :-**

आणि ही गोष्ट मी आयुक्त साहेबांच्या निर्दशनास आणलेली. तुम्ही त्याच्यावर काय केले?

**मधुसूदन पुरोहित :-**

साहेब, खरोखर हे तुमचे अधिकारी निष्क्रिय आहेत. एखादा लहानसा कचरा ऑफीस बाहेर आहे. ते उचलायला सांगितले तर उचलत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांचा हा विषय बरोबर आहे. पण पुन्हा आता आपल्याला पुढे जो निर्णय घ्यायचा आहे त्या संदर्भात माहिती तर द्या.

**मधुसूदन पुरोहित :-**

पण साहेब, लेफ्ट हॅण्ड साईडचा कचरा उचलतात. राईट साईडचा कचरा का उचलत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

हा सगळ्यांचाच प्रश्न आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

सगळ्यांचा नाही. नवघर रोडचा हा विषय आता निघालेला आहे म्हणून मग लेफ्ट हॅन्ड साईडचा उचलता मग राईट हॅन्ड साईडचा पण उचला आणि त्याच क्षेत्रात टाका. त्याच्यात काय प्रॉब्लेम आहे?

**प्रफुल्ल पाटील :-**

एखादा राष्ट्रीय प्रश्न होतो तेव्हा राज्यस्तरीय प्रश्न निर्माण केले जातात असा तो विषय आहे. प्रकल्प बंद पडला आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

सर्वांच्या म्हणण्यामध्ये असे येते की, या सगळ्या गोष्टीला महापौर आणि प्रशासन जबाबदार. एका साईडने प्रशासनाची प्रशंसा होते. सत्तेचा तर सत्यानाश झालेला आहे. मला असे वाटते की, सगळ्या लोकांनी या ठिकाणी चर्चा केली. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी सांगितले आणि तुम्ही जे आपल्या अध्यक्षांच्या बाबतीत सांगितले, अध्यक्षांनी आणि आमच्या समवेत महापौरांना आणि कमिशनर साहेबांना दोघांनाही निवेदन दिले या ठिकाणी जे फक्त बाकीचे जोषामध्ये आणि जास्त ह्याच्यामध्ये बोलतात तेवढे बोललो नाही. कारण सर्वांनीच जर बोलत पाहिले तर कालवा होईल, म्हणून आता सविस्तर निवेदन आणि माहिती येणाऱ्या ह्याच्यावर काय उपाय, अपयाच्या संदर्भात सगळेच बोललो. उपाय नेमका काय करायचा तो सर्वांच्या वतीने कमिशनर साहेब आणि महापौर साहेब आपण निर्णय घ्यावा. सभागृहाला योग्य ती माहिती द्यावी. धन्यवाद.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या परवानगीने बोलते ज्यावेळी एखादा नगरसेवक नगरपालिकेमध्ये आला की पहिल्या माळ्यावर गेल्यानंतर कुठल्याही नगरसेवकाला विचारतात, काय साहेब कुठे गेला तर साईडवर गेला आहे. कुठली साईड. मला सांगावे श्री. कांबळे साहेब, श्री. संदिप शिंदे साहेब हे माझ्या वॉर्डामध्ये दोन वर्षातून एकदा तरी आले आहेत का? कुठल्या साईडवर जातात हे त्यांनी मला सांगावे. आज हा एवढा वास येतोय त्या जबाबदार तिच दोघं जण आहेत. फक्त खुर्ची गरम करतात. पगार घेतात, कमिशन खातात आणि एवढा बाजार झाला आहे या सभागृहामध्ये या मिरा भाईंदरमध्ये त्याला जबाबदार ही दोघजण आहेत. महापौर साहेब आणि आयुक्त साहेब माझी तुम्हांला एवढी विनंती आहे की, त्यांच्या दोघांचे चार्ज काढून श्री. खांबितला द्या. मिरा भाईंदरचा तुम्हांला अजिबात वास येणार नाही. हे धर्तीवर बोझा आहे आणि त्यांना नगरपालिकेने पोसायला घेतले आहे. या सभागृहामध्ये जर श्री. खांबीतला चार्ज दिला तर कधीही कचऱ्याचा विषय या सभागृहात येणार नाही.

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी) :-**

श्री. खांबित हे काय काय सांभाळणार?

**भगवती शर्मा :-**

जैसे की सन्मा. सदस्या प्रभात (ताई) पाटीलने भी बोला था की, यहविषय लाना चाहिए था और इस शहर का प्रथम नागरिक होने का नाते महापौर का यह फर्ज बनता था, आज सभा शुरू होने के पहिले यह पता चला की, उसी महापौरने इस कचरेके विषय मे एक पत्र देकर गए है की, जब तक इसका निपटारा नही होता है तब तक मै इस महापालिका मे पैर नही रखुंगॉ। इसी महापौरने दि. ९/९/२००८ को एक पत्र दिया था इसमे लिखा था महानगरपालिकेच्या घनकचरा प्रकल्प अद्याप पूर्णपणे कार्यान्वित का झाला नाही. आजुबाजूच्या परिसरात दुर्गंधी पसरत असल्याने स्थानिक नगरसेवक महासभेत तक्रारी करत आहेत. लास्टकी लाईन उन्होंने लिखा है की, उपरोक्त मुद्दावर कार्यवाही होणार नाही. तोपर्यंत मी महापालिका कार्यालयात प्रवेश करणार नाही. यह पत्र है ९/९/२००८ का और आज इस तरह से फिर दिया जा रहा है। कुल मिलाकर मेरे कहनेका तात्पर्य यह है की, जिस व्यक्ती के उपर जिम्मेदारी दी गई है आज वह पालन नही कर रहा है। इसलिए यह लक्षवेधी के माध्यम से यह प्रश्न आ रहा है। तो यह शहर के अंदर मे राजनिती सोची समझी तहतके अंदर किया जा रहा है। उसका एकमात्र जिम्मेदार व्यक्ती है प्रथम नागरिक ।

**अरूण कदम :-**

अशा महापौरांचा आम्ही निषेध करतोय आणि आपण अशा महापौरांना घरीच बसवा. अशी विनंती करतोय.

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी) :-**

महापौरांबद्दल एवढे तुम्ही गांर्भीय घेऊ नका.

**अरूण कदम :-**

त्यांनी विषय आणायला पाहिजे होता. दोन महिने झाले शहरामद्ये कचरा आहे.

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी) :-**

त्यांना या परिस्थिती बद्दल काय वाटत असते तर ते आज सभेमध्ये असते ना. त्यांना या विषयाचे गांभीर्य असते तर ते सभमध्ये असते.

**अरूण कदम :-**

असे पळकुटे महापौर आपल्याला नको आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, या सभागृहाने घनकचरा व्यवस्थापन २००० प्रमाणे प्रकल्प राबवावा म्हणून महासभेने ठराव केला त्याप्रमाणे २-४ प्लान बघून येऊन शासनाकडे लॅन्ड मागितली त्या पत्राप्रमाणे गर्व्हरमेंटने चार पाच ठिकाणी पहाणी करून उत्तन येथील जागा सिलेक्शन करून ती जागा दिली आणि शासनाचे प्रदूषण

बोर्ड आणि इतर परवानग्या सर्व तपासणी अंती प्लान तिथे उभे करावे म्हणून परवानगी दिली. त्याप्रमाणे सभागृहाने बीओटी तत्वावर देण्याचे महापालिकेला काही खर्च नको. या उद्देशाने त्या प्लानचे टेंडर काढून ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने दिलेले आहे. यामध्ये मे २००८ ला कारखाना सुरू झाला. डॉक्टर म्हणतात १० वर्षापासून सुरू झाला तर १० वर्षापासून सुरू झालेला नाही. सन २००८ ला प्लँट सुरू झाला. काम करायला. त्यानंतर डिसेंबरमध्ये तो बंद पडला आणि परत फेब्रुवारीला सुरू झाला. म्हणजे प्लॅट पहिल्या सहा महिन्यासाठी चालू राहिला नंतर बंद पडला आणि नंतर सहा महिने सुरू राहिला आणि या कालावधीमध्ये श्री. जाधव साहेबांच्या पिरियडमध्ये प्लॅटमधून वास येतोय अशी तक्रार त्यावेळेला होती. त्या तक्रारीचे दोन उद्देश होते की, एक ओपन मध्य कचरा पडतो आणि चिमणी बसवायची. त्या दोन त्रुटी दुर करण्यासाठी पहिल्यांदा मी साईटवर गेलो आणि ओपन मध्ये जो कचरा पडत होता तो कचरा आपण शेड बांधला आणि शेड बांधून बंदिस्तमध्ये कचरा टाळायला सुरूवात केली. फवारणीचे औषध फवारणी आणि पाणी फवारणीचे चारही बाजूने प्रेशर पंम्प बसविलेले आहेआणि फवारणी सुरू केली आणि जे छोटे नळकांडी होते ते ४५ मी. चे केले आणि स्वच्छता ठेवण्याविषयी दोन तीन वेळी भेटी दिल्या आणि ते करेक्शन झाल्यानंतर सुरू झाली. तरी देखिल आम्हांला आजपर्यंत महापालिकेला इथे वास येतोय आणि प्लँट बंद करणार आहोत म्हणून पत्र आजपर्यंत त्या आंदोलनकर्त्यांनी मला दिलेले नाही पहिले पत्र त्यांनी दि. १३/९/२००९ ला घनकचरा प्रकल्प बंद करतो असे पोलिस स्टेशनला पत्र आहे मला पत्र नाही. हा प्लँट महापालिकेचा आहे. महानगरपालिकेचा असल्यामुळे महापालिका बीओटी तत्वावर चालवत असल्यामुळे कुठल्याही आंदोलनकर्त्याला पहिले पत्र ज्यांच्या मालकीचे आहे. कारखाना, प्लॅट त्यांना पत्र देणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात पोलिस स्टेशनला दिले आणि आंदोलन सुरू करणार आहे. १३ तारखेपासून म्हणून सांगितले ्आणि आम्हांला पत्र पोलिस स्टेशनकडून मिळालेले १० तारखेला. दि. १०/०९/२००९ ला पत्र मिळाले. त्या पत्रावर आम्हांला पत्र दिले नाही तर काय बिघडत नाही म्हणून आम्ही जे आंदोलनकर्ते आहेत त्यांना ११ तारखेला बोलावले. चर्चेसाठी तुमच्या काही त्रुटी असतील त्या चर्चेसाठी तुम्ही या. त्यादिवशी काही ते चर्चेसाठी सुद्धा आले नाही. नंतर आम्ही स्वतःहून चर्चचे फादर, श्री. कोळसे पाटील यांना कमीत कमी १० वेळा फोन ही केले. चर्चेला या म्हणून सांगितले ते चर्चेलाही आले नाही. त्यांच्या चर्च मध्ये जावून आम्ही चर्चा केली ते मिटींग घेऊन निर्णय घेऊ यावरच ठेवले. नंतर आंदोलन सुरू झाले. आंदोलन सुरू झाल्यानंतर नियमाप्रमाणे पोलिस स्टेशनला आम्ही पत्र दिले की, आम्हांला बंदोबस्त द्या आम्ही कचरा पाठवणार आहोत. तरी बंदोबस्त मिळाला नाही. दुसरे पत्र दिले तरी बंदोबस्त मिळाला नाही. यामध्ये वसई विरार हरितक्रांती ही पीआयएल दाखल केला होता की, ह्या ठाणे जिल्ह्यातील ज्या महापालिका आहेत त्या महापालिकेचे घनकचरा व्यवस्थापनाप्रमाणे सगळे खाडीत टाकतात आणि पर्यावरणाला बिघाड होतो. अशात-हेने आपल्यावर ठाणे जिल्ह्यामधल्या स्थानिक प्राधिकरणावर त्यांनी पीआयएल मध्ये आम्ही सुप्रीम कोर्टाच्या मार्गदर्शानाखाली प्लॅट उभे केलेले आहे. परंतु, ही लोक वास येतोय हा निमित्त करून कचरा अडवतात. आम्हांला यामध्ये पोलिसही सहकार्य करत नाही आणि काय, यामध्ये मार्ग काढावा म्हणून आम्ही ॲप्लीकेशन केले होते. त्या ॲप्लीकेशनमध्ये आतापर्यंत २४ तासाच्या आत पोलीस बंदोबस्त द्यावा आणि कचरा टाकून तो प्रकल्प करावा. त्यामध्ये पोलीस बंदोबस्त मिळाला.

**मिलन म्हात्रे :-**

कोणत्या तारखेला तो आदेश झाला?

**मा. आयुक्त :-**

दि. २३/०९/२००९ ला उच्च न्यायालयाने आदेश दिला की, पोलिस बंदोबस्त घेउन कचरा टाकावा. त्याप्रमाणे कचरा टाकण्यासाठी आमच्या गाड्या गेल्या तरीदेखिल पोलिस बंदोबस्त पुर्णपणे व्यवस्थित न मिळाल्याने कचरा घेउ शकले नाही. कारण त्यांनी वेलंकनी देवीची मध्यभागी रस्त्यामध्ये पुजा करून लहान मुल आणि बाया माणसांना बसवले होते. विधानसभेची निवडणूक होती त्यामुळे गोंधळ उद्‌भवू नये म्हणून शासनाने सांगितले की, आता काय ह्याप्रकारे करू नका. तुर्त थांबवा आम्ही कमिटी नेमून करू. त्याप्रमाणे हायकोर्टामध्ये दुस-या दिवशी ११.०० वा. हजर राहून कचरा प्लांटवर पोहचला की नाही हे सांगायचे होते. त्यावेळेला गर्व्हनमेंटने पण सांगितले की, आम्ही कमिटी नेमू आणि महानगरपालिकेने पण सांगितले कमिटी नेमून ह्यात काही त्रुटी आहे ते बघू. त्याप्रमाणे डिव्हीजनल कमिशनरची नेमणूक झाली. डिव्हीजनल कमिशनरने प्रदुषण बोर्ड संबंधित प्लँट ओनर आणि आंदोलनकर्ते ह्यांची मिटींग घेतली त्या मिटींगमध्ये आणि दुस-या दिवशी जे सांगायचे होते त्यादिवशी आंदोलनकर्त्यांना सांगितले, आंदोलनकर्त्यांच्या वकीलांनी की, आम्ही यामध्ये कॉम्प्रोमाईज करायला तयार आहोत. मिटींग घेवून द्या. आम्ही कॉम्प्रोमाईज करू त्यानंतर दुस-या दिवशी पत्र दिलेले आहे ते पत्र आम्ही डिव्हीजनल कमिशनरांना दाखवले की, हे हायकोर्टात म्हणतात आम्ही कॉम्प्रोमाईज करू पण प्रत्यक्षात फिल्डवर नाही. तर त्यानंतर डिव्हीजनल कमिशनरची मिटींग घेतली त्यांना समजावून सांगितले हा काय प्लांट बंद होणार नाही. परंतु, तुमचा हा मार्ग जो आहे त्यामध्ये दुरूस्त्या होउ शकतात. वास येउ नये ह्यासाठी करेक्शन करा. पंरतु, प्लँट बंद होणार नाही. कारण हा प्लँट दुसरी कुठेच नाही आणि त्यामुळे हा प्लँट नियमाप्रमाणे बंद करता येणार नाही आणि गर्व्हरमेंटने परवानगी देवून त्याप्रमाणे चालवलेले आहे. त्यात ज्या त्रुटी असतील त्या दुर करता येतील. म्हणून डिव्हीजनल कमिशनरने सांगितल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी त्यावेळीही म्हटले आहे की, आम्हांला दोन तीन दिवसाची मुदत द्या आम्ही

निर्णय घेवू. हा रिपोर्ट डिव्हीजनल कमिशनर साहेबांचा रिपोर्ट नगर विकास सचिवांकडे गेला. नगरविकास सचिवांनी ह्यांचा रिपोर्टवर मिटींग बोलवली. त्यानंतर त्या मिटींगमध्ये प्रदुषण बोर्ड, डिव्हीजनल कमिशनर पोलिस, एस.पी., ह्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. त्या आंदोलनकर्त्यांचे काय दोष आहे ते ह्यांनी सविस्तर सांगितले. त्या समितीच्या म्हणण्याप्रमाणे म्हणजे जे आंदोलनकर्ते होते त्यांनी ज्या त्रुटी खरोखरच आहे का, हे पाहणी करण्यासाठी एक समिती स्थापन केली डेप्युटी सेक्रेटरीच्या अंडर आणि प्रदुषण बोर्ड, बोर्डाचे अधिकारी आणि निरी या संस्थेचे अधिकारी, निरी हे ऑल इंडीया सेंट्रल गर्व्हरमेंटला मार्गदर्शन देतात आणि सल्ला देतात. त्यांना सुद्धा या कमिटीमध्ये इनक्ल्युड करून तीन जणांची कमिटी करून त्या कमिटीला पाठवले. त्यांनी काही त्रुट्या सुचवल्या. हे हे करणे आवश्यक आहे. त्रुट्या आहेत म्हणजे कारखाना तातडीने सुरू कराव्यात मात्र या त्रुटीपण सायमलटेनियसली दुर करावे. त्यासाठी महापालिकेचा अहवाल मागितला. महापालिकेने प्रदुषण बोर्ड आणि त्या समितीने जो अहवाल दिला होता त्या अहवालाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. म्हणून महासभेपुढे विषय दिला होता. पण महापौर साहेबांनी तो विषय घेतला नाही आणि हा जो त्रुटींचा अहवाल सचिवांकडे गेला त्यावेळेला सचिवांनी या अहवालावर कार्यवाही करण्यासाठी आंदोलनकर्त्यांना आणि पुर्वीच्या ज्या सदस्यांना बोलावले होते त्या सदस्यांचे मिटींगला उपस्थित राहण्याविषयी पत्र दिले आणि मिटींग लावली. परंतु, सर्व अधिकारी उपस्थित राहिले पण आंदोलनकर्ते त्यादिवशी उपस्थित राहिले नाहीत. आम्हाला येता येणार नाही. आम्हाला वेळ नाही म्हणून त्यांनी पत्र दिले आणि दुसऱ्या दिवशी एक एफ.आय.आर दाखल केला. म्हणजे सचिवांच्या मिटींगला उपस्थित न राहता त्यांनी एक पी.आय.एल. दाखल केले आणि तो पी.आय.एल. कालच बोर्डावर आला होता. ६ नंबरला होता. चीफ जस्टीस पुढचे १२.०० वाजेपर्यंत बोर्ड चालू राहिला. त्यानंतर बोर्ड बंद झाला आणि आता जो २६ तारखेला येणार आहे. सचिव साहेबांनी आज जी मिटींग बोलावली होती दुपारी ३.०० वा. ती मिटींग उद्या दुपारी ४.०० वा. ठेवलेली आहे. म्हणजे या अहवालावर महापालिका काय कारवाई करणार आहे व काय कार्यवाही केली ह्यासंबंधी पोलिस अधिकारी डिव्हीजनल कमिश्नर, प्रदूषण बोर्डाची जी कमिटी आणि सचिव आणि आंदोलनकर्त्यांना ही पत्र दिलेले आहे. आणि उद्या ४.०० वा ती मिटींग होणार आहे. ह्यागोष्टी ज्या आहेत त्यामध्ये बंद झाल्यानंतर निवडणूकीचा कालावधी असल्यामुळे गटनेत्यांची मिटींग बोलावून आंदोलनकर्त्यांना बोलावून चर्चा करूया असे मी सर्व गटनेत्यांना बोलावले होते. त्यावेळेला गटनेत्यांची यावेळेला या विषयापुरते आता आम्ही चर्चा करून निर्णय घेणार नाही तो तुमचा तुम्हीच घ्यावा असे सांगितले गेले आणि त्यावेळेला सर्व गटनेते उपस्थित होते आणि प्रशासन, प्रशासन म्हणजे काय प्लँट सुद्धा सुरू झालेला आहे. प्लँटवर आपण कचरा पाठवतो त्यावेळेला ही परिस्थिती कधी उद्‌भवली नाही आणि आंदोलन झाल्यामुळे कशामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे हे सर्व जनतेला, सभागृहाला, पदाधिकाऱ्यांना माहिती आहे. आणि त्या आंदोलनाच्या तारखेपासुन आपण जर कचरा उचलला नसता. शेतकऱ्यांच्या किंवा आमच्या नगरसेवकांकडे चर्चा करून विनंती करून आम्ही जागा मिळून टाकली नसती तर ह्यापेक्षा भयानक परिस्थिती उद्‌भवली असती. प्रत्येक गल्लीमध्ये १०-१० ट्रक उभे राहिले असते. तरी आम्ही गावातील सगळ्या नागरिकांची मदत घेउन आमच्या पदाधिकाऱ्यांची, नगरसेवकांची मदत घेउन आम्ही इकडचा तिकडे कचरा ॲडजेस्ट केला. ॲक्च्युअली पावसाळ्यामध्ये सकाळी एक तासभर आणि संध्याकाळी एक तासभर डोंगरीला वास येतो. तो बंद करण्यासाठी त्या समितीने जे सुचवलेले आहे त्याप्रमाणे आम्ही कार्यवाही आठ महिन्यात करू असे सचिवांना लेखी दिलेले आहे. आंदोलनकर्ते सचिवांसमोर, डिव्हीजनल कमिश्नर समोर हायकोर्टामध्ये आम्ही कॉम्प्रोमाईज करायला तयार आहोत असे म्हणतात. परंतु, प्रत्यक्षात बाहेर आल्यानंतर ती कृती होत नाही आणि हे प्रशासन, प्रशासन म्हणून त्यांची जबाबदारी आहे असे नाही. घनकचरा व्यवस्थापन २००० साली जो सुप्रिम कोर्टाने मार्गदर्शक तत्व ठरवून दिलेले आहे त्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेमधल्या अधिकारी, पदाधिकारी आणि नगरसेवक ही सामुहीक जबाबदारी आहे. आता ठाणे कल्याणचा कचरा हा ओपनवरच पडतो. परंतु, आपल्या मिरा भाईंदन महानगरपालिकेच्या महासभेने निर्णय घेउन जो प्लँट उभा केला हा प्लँट बघून ठाणे महानगरपालिकेने हाच प्लँट उभा करण्याचे काम सुरू केले आहे. म्हणजे हा प्लँट बंद पाडावा किंवा हा प्लँट चालत नाही. त्यामधल्या त्रुटी दुर करावे असे समितीने दिलेले आहे. त्यामुळे प्लँट व्यवस्थित चालू आहे आणि डॉक्टर साहेबांनी जे नागरिकांना सांगायचे आणि त्या तीन डब्ब्यातील कचरा गाड्या उचलण्याचे टप्पे वेगवेगळे करायचे ही पुढची प्रक्रीया आहे. आपला हा जो कचरा गावात गोळा होतो तो गोळा झालेला कचरा हा प्लँटवर विभक्त होतो. दगड वेगळे, ओला कचरा, सुका कचरा वेगवेगळा होतो आणि स्थानिक पातळीवर प्रत्येकाच्या घरात वेगळे करण्याची प्रक्रिया अजून नागरिकांना ते मार्गदर्शन करून सूरूवात करायला पाहिजे. इव्हन डॉक्टरने स्वतःच्या दवाखान्यात तीन डब्बे ठेवलेले नाही.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आप गलत आरोप लगा रहे है। महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड से हमारा नर्सीग होम कव्हर्स होते है। हमारे पास पिले, निले थैली के कव्हर होते है। आप महासभा के अंदर गलत मत बोलिए। आपके शेड्युल ५ के अंदर......

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक नागरिकाला, प्रत्येक घरमालकाला तीन डब्बे ठेवून त्यामध्ये कचरा टाका.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आपके शेड्युल ५ के अंदर हॉस्पीटल नर्सिंग होम महाराष्ट्र बोर्ड के गवंड है। आपने गलत बोला की, तीन डब्बे नही है। हमारे पास तीन डब्बे है। आयुक्त साहब ने गलत सुचना दी है।

**मा. आयुक्त :-**

गलत सुचना नही दी है। मिलन पाटील साहब ने भी खुद के घरमे तीन डब्बे नही रखे है। यह आपको क्यो लग रहा है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

गॅझेट मे क्या लिखा हुआ है, की कमिटी एज्युकेशन होना चाहिए। आप इनिशिएटीव लेंगे तो होना ऐसे नही होनेवाला है।

**मा. आयुक्त :-**

यामध्ये संपुर्ण भारतामध्ये कुठेच असे तीन डब्बे ठेवून कचरा उचलण्याची प्रक्रीया चालू नाही आणि यामध्ये सर्व नागरिकांना मार्गदर्शन करून तीन तीन डब्बे ठेवायचे ही प्रक्रिया मार्गदर्शनाची आणि अभ्यासाची आहे.

**मिलन पाटील :-**

मला तुम्ही सांगता मी मान्य करतो. माझ्याकडे नाही पण तुमच्यासुद्धा ट्रकला तीन कप्पे आहेत का? तीन डब्बे ठेवून तुम्ही एकत्रच करणार ना.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक नगरसेवकाने त्यांच्या त्यांच्या वॉर्डात तीन डब्बे ठेवण्याबाबत त्या नागरिकांना मार्गदर्शन करा. त्याप्रमाणे तीन डब्बे ठेवण्यात यावे.

**मिलन पाटील :-**

पहिले आपले घर सुधारा मग दुसऱ्यांना सांगा.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आप रूल देखो। २०१० का शेड्युल देखो।

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेब, पहिले आपले घर सुधारा. पहिल गाड्यांचे तीन कप्पे करा.

(सभागृहात गोंधळ)

**जयंत पाटील (पिठासिन अधिकारी) :-**

जनहित याचीकेबद्दल माहिती देत आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

जनहित याचिका कोणत्या मुद्दयांवर आहे आणि कोणी कोणी केलेली आहे? पुर्वी जी हरितक्रांतीची याचिका दाखल केलेली होती खाडीमध्ये कचरा टाकतात. त्याच्यामध्ये आम्ही इंटरवेन्शन ॲप्लीकेशन केले होते. म्हणजे आम्हाला त्या याचिकेमध्ये समाविष्ट करून घ्या. आमचा एक वेगळा प्रॉब्लेम निर्माण झालेला आहे. ॲप्लीकेशन केल्यानंतर त्याच्यावर कोर्टाची ऑर्डर झाली होती की, २४ तासात ह्यांना पोलिस बंदोबस्त द्यावा. त्याच्यात आपण पार्टी नव्हतो पण इंटरवेन्टेशन करून आपण त्याच्यात पार्टी होण्याचा प्रयत्न केला. त्याच्यात कोर्टाने असा आदेश दिल्यानंतर अंतरिम आदेश दिल्यानंतर आपण प्रत्यक्ष जागेवर पोलिस बंदोबस्त घेउन कचरा टाकण्याचा प्रयत्न केला तो फोल गेला. मधल्या काळात शासनाकडून तीन कमिटी नेमून आंदोलनकर्त्यांशी चर्चा करणेबाबतची प्रोसिजर पुर्ण झाली. सेक्रेटरी कडे मिटींग बोलून आंदोलनकर्त्यांना तुम्ही पत्र दिले तरी ते आंदोलनकर्ते काही आले नाहीत. आता त्यांनी पी.आय.एल. दाखल केली ती दाखल कोणी केली? किती लोकांनी केली? त्याच्यातले पेअर क्लॉज काय आहे आणि त्यांचा आजचा स्टेटस काय आहे?

**मा. आयुक्त :-**

हाय कोर्टाची ऑर्डर झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी काय कार्यवाही केली महापालिकेने, बंदोबस्त घेउन कचरा पोहचवला का नाही हे ज्यावेळेला दुसऱ्या दिवशी ११.०० वा. रिपोर्टींग करायचे होते. त्यावेळेला त्यांनी कोर्टासमोर कबुल केले की, आम्ही कॉम्प्रोमाईज करू.

**प्रफुल्ल पाटील :-**

लेखी दिले का?

**मा. आयुक्त :-**

त्याप्रमाणे लेखी महापालिकेला दिले त्या पत्राची प्रत वाचून दाखवतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

ते तर महत्वाची आहे. आम्ही इथे उगाच भांडतोय. तिथे काय वेगळे चालले आहे.

**सई वडके :-**

मा. पिठासिन अधिकारी यांच्या मान्यतेने बोलते, मा. हायकोर्टामध्ये एक जनहीत याचिका दाखल झाली होती ती, २००७ मध्ये एकूण तीन याचिका आहेत १) ३५ आणि ३६/२००७ त्याच्यामध्ये सुरूवातीला ठाणे जिल्ह्यातील सगळ्या महानगरपालिकेला पार्टी केले गेले नव्हते साधारणतः २००८ मध्ये ठाणे जिल्ह्यातील

सगळ्या महानगरपालिका, नगरपालिका आणि सगळ्या ग्रामपंचायत या सगळ्यांना ह्यात पार्टी करून त्याच्यामध्ये चार विषयांच्या संदर्भात घनकचरा प्रकल्प, मलःनिसरण प्रकल्प, अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामाबांबत वेगवेगळे ॲफीडेव्हीट्स महापालिकेने आणि नगरपालिकेने दाखल केले. त्याच्यामध्ये ह्या घनकचरा प्रकल्पाचे आंदोलन झाल्यामुळे आम्ही सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केले. त्याच पिटीशनमध्ये ज्यात आपण पार्टी ऑलरेडी केलेले गेलेले आहे. ते आपल्याला प्रेयर की पोलिस प्रोटेक्शन मिळावे, सिव्हील ॲप्लीकेशन नंबर ९८/२००९. आपण हे दाखल केले आणि ते २३ तारखेला मा. जस्टील जे.एन.पटेल आणि मा. जस्टीस संधुरवडदोका यांच्याकडे सुनावणीला आली त्यावेळेस त्यांनी डिटेल ऑर्डर पास करून आपल्याला २४ तासाच्या आत पोलीस प्रोटेक्शन पुरवावे अशी ऑर्डर दिली आणि त्याच्यानंतर २४ तारखेला परत कोर्टाने ठेवलले की, मला रिपोर्ट द्या की, पोलिस प्रोटेक्शन पुरवला गेला आहे की, नाही आणि कचरा साईटवर पोहचला आहे किंवा नाही. २४ तारखेला कोर्टापुढे मॅटर उभे राहिले तर त्याच्यामध्ये स्टेट गर्व्हरमेंटने सांगितले की, पोलिस प्रोटेक्शन पुरवलेले आहे. मग त्याच्यामध्ये समोरचे जे श्री. के. के. सिंग आणि श्री. सुनिल दिघे म्हणून जे आंदोनलकर्ते होते त्याच्यांवतीने उभे राहिले होते. ॲक्च्युअली त्यांना सुद्धा आम्ही पार्टी केले होते. मा. श्री. कोळसे पाटील त्यांना पण आपण पक्षकार केले होते. त्यांच्यावतीने श्री. के.के. सिंग आणि श्री. सुनिल दिघे ॲडव्होकेट उभे राहिले होते. त्यांनी त्यावेळेस स्टेटमेंट केले की, आम्ही कॉम्प्रोमाईज करायला तयार आहोत आणि त्याच्या अनुषंगाने श्री. सुनिल दिघे ॲडव्होकेट आहेत. त्यांनी पत्र सुद्धा दिले. २६ सप्टेंबरला ते वाचून दाखवते. [illegible] २४ ः २५. १) [illegible] २३.०९.२००९ [illegible] १ [illegible] २) [illegible] .... [illegible] २५ [illegible] ६५ ३) [illegible] २४ ः २५, [illegible] २५ [illegible] ४) [illegible] २४ ः २५ [illegible] २३.०९.२००९. ५) [illegible] ६) [illegible] .... [illegible] ४०११०१ [illegible]

**मा. आयुक्त :-**

केसमध्ये त्यांनी जे [illegible] ने कॉम्प्रोमाईज करू असे ज्यावेळेला सांगितले त्यावेलेला हायकोर्टाने त्यांना प्रश्न विचारला की, तुमच्या आंदोलनकर्त्यांमधले कोणती लोक चर्चेला जाणार आहेत. त्यावेळेला त्यांनी ९ लोकांची नावे दिली होती. त्या ९ लोकांची नावं आम्ही त्या मध्ये ॲड करून डिवीजनल कमिशनरच्या मिटींगला, सचिवांच्या मिटींगला आणि पुढच्या मिटींगला प्रत्येक वेळा बोलावतो आणि त्यांच्या वकीलांनी आंदोलनकर्त्यांच्या वतीने आम्ही निगोसिएशन करू म्हणजे त्या त्रुटी दूर करून प्रॉब्लेम सॉल करू असे हायकोर्टाला सांगितलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

[illegible] २४ [illegible] २५.

**सई वडके :-**

एक्झस्टीड बी.जी.कोळसे पाटील २४ आणि २५ ऑफ [illegible] फादर जो. बोर्जीस.

**प्रफुल्ल पाटील :-**

कोकण कमिशनर आले होते तेव्हा ह्या दोघांपैकी एकजण उपस्थित होते का?

**सई वडके :-**

होय.

**मा. आयुक्त :-**

फादर जो. बोर्जीस होते. जेम्स कोलासो होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

५ ङ्ग्रु ड़दृदड़ड्ढद्धद ड्डदृद्वद्य द्धङ्घद्रदृदड्डड्ढदद्य ग़दृ. २४ ॉ २५ कारण २४ आणि २५ च्या वतीने त्यांनी ते ॲप्लीकेशन दिलेले आहे.

**सई वडके :-**

होय.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता ह्या केसचा स्टेट्स काय आहे?

**सई वडके :-**

हे सिव्हील ॲप्लीकेशन डिस्पोज ऑफ करून टाकले आहे. ते दि. ७ ऑक्टोबर २००९ रोजी.

**प्रफुल्ल पाटील :-**

केस पेन्डींग आहे.

**सई वडके :-**

होय, कारण..

**प्रफुल्ल पाटील :-**

कारण ओरिजनल पीआयएल वीथ.....

**सई वडके :-**

होय.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठिक आहे. आता नविन जनहित याचिका दाखल केली आहे त्यात को कोण पार्टी आहे? आणि त्यांचे प्रेयर क्लॉज सांगा.

**सई वडके :-**

हे जे पीआयएल दाखल केले आहे त्यात एकूण चौघेजण पिटीशन आहेत. १) श्री. विल्यम मालू २) श्री. पीटर मॅगलोर लून ३) नागरी हक्क संरक्षण समिती ४) पर्यावरण संरक्षण केंद्र ह्या चौघेजणांनी स्टेट ऑफ महाराष्ट्र, मिरा भाईंदर म्युनिसिपल कॉर्पोरेशन, डिस्ट्रीक्ट मॅजेस्टीट ॲन्ड कलेक्टर, महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड, रिजनल ऑफीसर, डायरेक्टर ऑप टाऊन प्लानिंग स्टेट ऑफ महाराष्ट्रा, मुंबई मेट्रोपोलिटल रिजनल डेव्हलपमेंट ॲथोरिटी हॅन्जर बायोटेक या आठ जणांविरूध्द रिट पिटीशन पीआयएल दाखल केले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

स्टॅम्प नंबर किंवा नंबर असेल ते बघा आणि फाईलिंगची डेट.

**प्रफुल्ल पाटील :-**

ॲडमिट झाली का?

**सई वडके :-**

ही काल होती.

**प्रफुल्ल पाटील :-**

बिफोर ॲडमिशन स्टेजला आहे?

**सई वडके :-**

दाखल झाले आहे ६ ऑक्टोबर, २००९ ला त्यांनी ते अफॉरमेशन केलेले आहे. त्याचा स्टॅम्प नंबर २४४२१/०९.

**प्रफुल्ल पाटील :-**

रिस्पान्डंट नं. २४ आमि २५ सिव्हील ॲप्लीकशनमध्ये आहे. हे ह्या लोकांनमध्ये आहेत का?

**सई वडके :-**

नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यांच्याशी संबंधित कोणी आहेत का?

**सई वडके :-**

या पिटीशनमध्ये सिदीक ॲन्ड पॉलिटिकल सेल आणि बी.जी. कोळसे ते पाटील ह्यांचे नाव नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे प्रश्न तोच आहे. चेहरे दुसरे उभे करून त्यांनी त्यांची जनहित याचिका दाखल केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

संस्था तरी इकडच्या आहेत का? कारण ती नावं आम्हांला नविन वाटत आहेत संस्थेचे काय रजिस्ट्रेशन आहे? किती वर्षाचा इतिहास आहे?

**सई वडके :-**

३ नंबरला नागरी हक्क संरक्षण समिती आहे. थ्रुल्स प्रेसिडेंट जेम्स कोलासो हॅवींग ॲडरेस ॲट उत्तन, करईपाडा, पोस्ट उत्तन, ता.जि. ठाणे.

**मिलन म्हात्रे :-**

मग मागच्या वेळेला डे इंटरवन झाले होते. ज्याच्यामध्ये ही ऑर्डर झाली तेव्हा हिच संस्था होती. त्या दिवशी जेम्स कोलासो कोर्टामध्ये होते. हिच व्यक्ती कोळी होती त्यांनी इंटरवन ॲप्लीकेशन केले. त्यामध्ये कोर्टाने २४ तासामध्ये कचरा टाकायला द्या. त्यांना की पण लिबर्टी दिली. दुसरी जागा तुम्ही सुचवा त्यानंतर जेम्स कोलासो साहेब स्वतः मला भेटले. कोर्टाने मला सांगितले आपण दुसरी जागा सुचवा असे आम्हांला सांगितले तर आम्ही कुठून सुचवणार? हे जेम्स कोलासो साहेबांचे शब्द आहे आणि त्यावेळाला त्या ह्याच्यामध्ये जर जेम्स कोलासो साहेब त्या पिटीशनमध्ये, त्या ऑर्डरमध्ये होते. तर मग ही पिटीशन फाईल करण्याचा प्रश्न कुठे उद्‌भवतो. ऑलरेडी ब्रायडोन्ट ते त्यांना बंधन आहे. आयुक्त साहेब, त्यांना त्या केसचे बंधन आहे की, नाही?

**प्रफुल्ल पाटील :-**

तसे नाही. माझा प्रश्न वेरी प्रॅक्टीकल. म्हणजे तुम्ही ..

**मिलन म्हात्रे :-**

पाटील साहेब, हा नंतरचा भाग आहे. मी काय म्हणतो हा पुढचा भाग आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

माझा मुद्दा पण तेच. सिव्हील ॲप्लीकेशन डिस्पोज ऑन झाले आणि आता ते मी नव्हे. ते व-हाडी आमचे नव्हते. आमचे व-हाडी आता दुसरे आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

जेम्स कोलासो साहेबांचे नाव घेतले म्हणून मी सांगतो, त्या अगोदरच्या केसमध्ये जेम्स कोलासो होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

जेम्स कोलासो साहेब रिस्पॉन्डेंट नं. २४ किंवा २५ पैकी कोणी नाही त्याच्यामध्ये तुम्ही सिव्हील ॲप्लीकेशन फाईल केले. वैयक्तिक ते गेले असतील. त्यांचा चेहरा गेला. ते रेकॉर्डवर नव्हते. पण सेकेंन्ड रिट-पिटीशनला जनहित याचिकेमध्ये..

**मिलन म्हात्रे :-**

पहिला हा खुलासा करा की, त्यावेलेला तुमचे जे २४ वा आदेश झाला.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुमचे त्या तिथे गाठीभेटी वैयक्तिक झाले. ते कसे काय रेकॉर्डवर घेणार.

**मिलन म्हात्रे :-**

पाटील साहेब, त्यांनी वकील दिला होता. त्याच्यात ती संस्था होती का? हे मला सांगा.

**प्रफुल्ल पाटील :-**

जेम्स कोलासो हे स्वतः त्या कोर्टात आले.

**सई वडके :-**

सर, हे ॲप्लीकेशन आपण केले होते. त्या ॲप्लीकेशनमध्ये आपण सिरीयल नं. २४ आणि २५ ला पार्टी केलेले आहे. इतर बाकी कोणाचेही इंटरवन ॲप्लीकेशन नव्हते. सिवीक ॲन्ड पॉलिटिकल सेलला आपण पार्टी अशासाठी केले होते की, त्यांनी पॅम्पलेट्स वाटले होते. १३/९ ला आम्ही आंदोलन करू सिवीक ॲन्ड पॉलिटिकल सेल तर त्याच्यामध्ये ब-याच मागे काहीतरी बारा एक संस्थेची नावं होती. पण आमच्याकडे त्यांचे पत्ते नव्हते म्हणून आम्ही त्यांना पार्टी केले नव्हते.

**प्रफुल्ल पाटील :-**

सिवील ॲन्ड पालिटिकल सेल हे ह्या २४ आणि २५ मध्ये आहे का?

**सई वडके :-**

होय. सिवील ॲप्लीकेशन ९८/२००९ आपण केलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्याच्या व्यतिरिक्त हे वेगळे लोक गेले. दुस-या याचिकेमध्ये. आता मला सांगा त्यांनी प्रेयर क्लॉज काय घेतले आणि त्यांचे डिमांड काय आहे? त्या जनहितयाचिकेमध्ये. वॉट दे वाण्ट?

**सई वडके :-**

पिटीशनर देअर फॉर प्रेयर च्न्त्म ण्दृददृद्धद्वडथ्ङ्ढ ड़दृद्वद्धद्य डङ्ढ द्वम्ङ्ढ द्यदृ म्थ्ङ्ढद्य म्त्डुङ्ढ द्रङ्ढद्धश्र्त्मम्त्दृद ढ़द्वद्धद्वडदद्यङ्ढड्ड ........ द्यण्ङ्ढ द्धङ्ढम्द्रदृदड्ड ददृ. २.क्ष्ह्वद्धडङ्ढ> ङ्ढन्ङ्ढड़द्यङ्ढड्ड म्ड्डध्ङ्ढ ददृ. ६५ ः २५

**प्रफुल्ल पाटी ल :-**

ह्याच्यातला त्यांचा मुख्य पहिला क्लॉज आहे की, तो प्लांट बंद करावा. शेवटी शेवटी ते काय येतात. की त्यांनी एक बॉडी अपॉईंट करावी मॉनिटर करणारी ऑलरेडी बॉडी अपॉईंट करायची नाव दिलेली आहेत. म्हणजे पहिली पायरी न चढता शेवटची पायरी पहिले चढलो आता ते पहिल्या पायरीवर यायला बघतात. माझे आपल्याला एकच विचारणा आहे की, ह्याच्यामध्ये तुम्ही कायय स्टॅण्ड घेतला आहे? आता ते ॲडमिशन स्टेजला असताना तुम्ही कशापध्दतीने त्यांना अप्रोच करणार आहे. काय तयार केले आहे का? सभागृहाला सांगा.

**सई वडके :-**

काल ॲडमिशनच्या हिअरिंगला सिवील नं. ६ ॲप्लेट साईडला पण चीफ जस्टीत १२.०० वाजताच उठले त्यामुळे तो बोर्ड डिसचार्ज झाला.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही आता चीफ जस्टीस ह्यांना काय सांगणार. आम्हांला टाईम द्या. फाईल करायला.

**सई वडके :-**

नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही ऑलरेडी ऑरग्युमेंटची तयारी केली आहे का?

**सई वडके :-**

होय.

**प्रफुल्ल पाटील :-**

वॉट आर दि पॉईंट?

**सई वडके :-**

ह्याच्यामध्ये सिनियर कौन्सील श्री. आपटे साहेबांना केलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पण तुमचे प्वॉईंट्स काय? श्री. आपटे साहेबांना तुम्ही ब्रीफ केले असेल.

**सई वडके :-**

होय.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग, आपण ते सांगा. ते सभागृहाला सांगा.

**जयंत पाटील :-**

कोर्टाचे त्याच्यामुळे..

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण कुठे कोर्टाच्या वेगळ्या निर्णयात बाहेर जातोय. श्री. आपटे साहेब किंवा श्री. शिवमूर्ती नाईक साहेब ही काय व्यक्ती नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

आपले म्हणणे काय? आपण काय मांडणार आहोत? तेवढा त्याचा खुलासा करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण जे आपले विचार मांडणार आहोत की, ही याचिका दाखल करून घेऊ नका. किंवा ती चुकीच्या पद्धतीची आहे जे काय मुद्दे उरले आहे ते घ्या.

**सई वडके :-**

सुरूवातीपासून २००२ पासून कलेक्टर ऑफ ठाणे ह्यांनी कशाप्रकारे परवानगी दिली आणि वेळोवेळी आपल्याला एमपीसीपी बोर्डाने ॲथोरायझेशन दिलेले आहे. ह्या ज्या टेकनिकल रूल्सप्रमाणे आपण कशाप्रकारे पुर्तता केलेली आहे हे सगळं आपण कोर्टापुढे मांडणार आहोत.

**प्रफुल्ल पाटील :-**

आता तुम्ही मला सांगा, तुम्ही सिवील ॲप्लीकेशनमध्ये कोर्टाने ज्या डायरेक्शन दिल्या होत्या त्याचा ह्याच्यात रेफरन्स घेतला?

**सई वडके :-**

होय.

**प्रफुल्ल पाटील :-**

सेकंड, त्यांनी जे आम्ही कॉम्प्रोमाईज करायला तयार आहोत हा अर्ज दाखल केला होता. रिसपॉन्डेंट नं. २४ आणि २५ च्या फेवर ने म्हणजे बाजुने तो तुम्ही दाखल करणार आहात का?

**सई वडके :-**

होय.

**प्रफुल्ल पाटील :-**

हो, अस्सं नका म्हणू. मला सांगा नाहीतर मी त्याची कॉपी होतो. म्हणजे शेवटी कोर्ट कुठल्या डिसीजनला येणार? ऋद्य द्यण्ड्ढ ड्डड्ढथ्र्त्न्नन्नत्दृद न्नद्यड्डढ़ड्ढ त्ढ ड़दृद्वद्धद्य द्रद्धत्थ्ड्डद्यड्ढन्नथ् ढत्थ् ड़त्द्यत्र दड्ढड़ड्ढन्नन्नड्डद्धत्र द्यदृ न्नद्यदृद्र द्यण्ड्ढ द्रद्धदृत्र्ड्ढड़द्य. कोर्ट तुम्हाला तसे स्ट्रेट ऑर्डर देईल. तुम्हांला जर ॲडमिशन स्टेजला तुम्हांला उडवायचे असेल तर हा प्लांट ऑलरेडी चालू झालेला होता. लॉग टाईम हॅज बिन पास आणि मधल्या काळामध्ये दुर्गंधी चालू झालेली आहे. आणि ही दुर्गंधी कशामुळे सुरू झाली त्याच्या ज्या त्रुटी काढल्या त्या त्रुटी आम्ही पूर्ण करणार आहोत आणि त्या त्रुटी पुर्ण करण्याचा आम्हांला थोडा कालावधी लागणार आहे. अशापद्धतीचा तुम्ही स्टॅण्ड घेणार आहात.

**लक्ष्मण जंगम :-**

ती दुर्गंधी येत असताना त्याचे जे एक्सपर्ट आहेत. त्यांचे जे त्यापध्दतीचे म्हणणे आले आहे ते दाखवायला पाहिजे. पोल्युशन बोर्डाच्या लोकांचे जे म्हणणे आहे ते त्यांच्यासमोर मांडणे महत्त्वाचे असेल.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, जैसे नासिक महानगरपालिकेका जो प्लांट है उसमे दुर्गंधी नही आती है। जो फवारणी करता है उस दवाईकी बराबर तपासणी किजिए।

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही ह्या ठिकाणी खुप प्रॅक्टीकल होण्याची गरज आहे. महानगरपालिका ह्याच्यामध्ये पार्टी झालेली आहे. जनहित याचिकेला महानगरपालिकेला पार्टी केले आहे. पोल्युशन बोर्डाला केले आहे?

**सई वडके :-**

होय. केले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुमचा स्टॅण्ड काय आहे? तुम्ही एकटेच भांडणार आहात की, तुम्ही ह्या सगळ्यांना घेऊन भांडणार आहात या जनहित याचिकेच्या विरोधात.

**सई वडके :-**

सगळ्यांना घेऊन.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्या सगळ्यांशी तुमचे काय कम्युनिकेशन झाले आहे? एनी रिपोर्टींग. मी लगेच एक तासाने तुमच्याकडे रिपोर्ट मागणार आहे. म्हणजे असे होणार आहे की, त्यांनी १४ लोकांना पार्टी केले तर १४ मधून १३ ची तोंड दुसरीकडे उत्तरेला आणि तुमचे दक्षिणेला. हाउ इट इज गोईंग टू वर्क आउट. कोर्टामध्ये ह्या अशाच गोष्टी होतात. म्हणजे अजून जर झाले नसेल तर पुढच्या गुरूवारी जनहित याचिका बोर्डावर पुन्हा ॲडमिशनसाठी येईल. हॅव यु कम्युनिकेटेड युअर डिसिजन.

**सई वडके :-**

आपण हे मॅटर सोमवारी मेन्शन करणार आहोत. गुरूवारी बोर्डावर घेण्यासाठी.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे तुमच्या दृष्टीने ते असे आलेले नाही का?

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या याचिकेमध्ये ज्या ज्या डिपार्टमेंटने तुम्हाला परवानग्या दिल्या आहेत त्या पहिल्याच पॅरेग्राफमध्ये टाकायला लागेल म्हणजे त्या पार्ट्या पहिल्याच लॅप्स होतील. त्याचा प्रश्नच येत नाही. त्यांनी परवानगी दिली आहे तर ते नाही असे बोलणार नाही. तो तर येउन बोलणार हो आम्ही परवानगी दिली आहे. आमचा विषय संपला.

**प्रफुल्ल पाटील :-**

मला असे वाटते की, पुर्वीच्या याचिकेमध्ये आपण जो कॉम्प्रोमाईज करण्याचा अर्ज जो वाचून दाखवलात त्याच्यातच सगळे दडलेले आहे. त्यांचा विरोध डम्पींग साईडला आहे. ह्याठिकाणी नगरसेवकांच्या बाबतीत जर बोलायचे झाले तर एक नगरसेवक सांगतो की, डम्पींग साईड चालू करा. एक नगरसेवक सांगतो की, प्रोजेक्ट चालू करा, प्लांट चालू करा, देअर ॲप्लीकेशन दे मेन्शन दॅट दे आर अपोझींग डम्पींग साईड नॉट द प्लान्ट. पुन्हा असा फरक येणार आहे आणि एक लक्षात घ्या. पुन्हा डम्पींग साईडचा प्रश्न येईल म्हणजे लॅन्ड फिल साईड, डॉक्टरांनी जे शेड्युल वाचून दाखवले. लॅन्ड फिल साईड आमची आयडेन्टीफाय जरी झाली असेल तरी ती डेव्हलप झालेली नाही. लॅन्डफिल साईड जी करायची आहे. डम्पींग ग्राउंड ज्याला ते विरोध करत आहेत. समजा, आपण त्यांच्या प्लांटचा विरोध आहे असे ही समजू. तर त्या प्लांटचा विरोध आपल्याला कसा आणता येईल ह्याच्यामध्ये आपल्या कक्षेत तर तो आपण घेउ या. पहिली तर डम्पींग साईड अजुन आमची फायनली आयडेन्टीफाय झालेली नाही. आणि माझी महानगरपालिकेला प्रामाणिक विनंती आहे की, प्रोजेक्टच्या नावाखाली ज्याठिकाणी तुम्ही डम्पींग करणार आहात. लॅन्ड फिल साईड टोटली रॉंग आहे. उगाच जबरदस्ती कोणी लोक सहन करतात म्हणून त्यांच्या डोक्यावर टाकू नका. पिठासिन अधिकारी साहेब, तुम्ही ती लॅन्ड फिल साईड बघा म्हणजे डंपींग ग्राउंडवर काम काय आहे तेही सांगतो. प्लॅनमध्ये कचरा गेला तर ३० टक्के फक्त तो होतो किंवा ४० टक्के पण ते म्हणतात ६० टक्के होतो. ६० टक्के त्यांच्यावर प्रक्रिया होते. त्याच्यातुन खत, इंधनाच्या विटा आणि रेती निघते. ४० टक्के राहिल्यानंतर तो ४० टक्के कचरा आपण लॅन्ड फिल साईडला डंम्पींग ग्राउंडला टाकतो. त्याच्यावर नंतर कधीही प्रक्रिया होणार नाही तो तशाचा तसा राहणार. जी डंपींग साईड त्यांनी लॅन्डफिल साईड सुचविलेली आहे त्याला टोटली असा स्लोब आहे. आणि खाली सगळी शेतीची जमीन आहे. ह्यानंतर त्यांना मी का सपोर्ट करतो, कारण तुमची साईन्टीफिकली तुम्ही डेव्हलप केलेली नाही. त्याला लेवल केल्यानंतर त्यांच्यावर तुम्ही जाल म्हणजे कसे आहे की, डंम्पींग साईड तुम्ही ह्या छताच्यावर तर नाही ना करणार? पण ती जेव्हा लेवल करायला जाल तेव्हा असे होणार आहे की,

प्लांट खाली आणि डम्पींग साईड वर दुसरी गोष्ट अशी आहे की, त्या नियमानुसार लॅन्ड फिल साईड तुम्हाला तुमच्या पुढच्या अनेक वर्षासाठी आयडेन्टीफाय करायची आहे. कुठेतरी प्रशासन कुठेतरी आम्ही कमी पडतोय हे नक्की आहे. लॅन्ड फिल गाईड आयडेन्टीफाय अजून व्हायची आहे ती लॅन्ड फिल साईड आम्ही ठेवणार नाही. तिथे आम्ही डम्पींग ग्राउंड ठेवणार नाही अशी भुमिकाच आम्हाला घ्यावी लागेल. एकतर वासाने बेजार आहे असे त्यांचे म्हणणे आहे आपण आता त्याच्यावर येउ ते आहेत असे ही आपण म्हणू पण दुसरी गोष्ट काय आहे की, उरलेला कचरा पण तशा त्या स्लोपवर टाकून डम्पींग ग्राउंड करणार असू माझे तर वैयक्तिक सुद्धा विरोध आहे. टेकनिकली सुद्धा आणि लिगलीसुद्धा कारण ती साईट फिजीबल नाही. आपण दुसरी जागा करावी ती लेवलखाली करावी ह्याच्यासाठी तुम्हाला पैसा खुप येणार आहे. डम्पींग ग्राउंड डेव्हलप करण्यासाठी एमएमआरडीए ची लोक आपल्याकडे येउन गेले ही माहिती तुम्ही देत नाही. ही माहिती तुम्ही जर नगरसेवकांना दिली तर १००-२०० कोटी रू. एम.एम.आर.डी.ए कडून आपल्याला डंम्पींग ग्राउंडकडूनच मिळणार आहे किंवा जे.एन.यु.आर.ए.एम. च्या स्कीमखाली मिळणार आहे. तर आम्हाला पण कुठे लक्षात येईल की, ही लॅन्डफिल साईड किंवा डम्पींग ग्राउंड हे अजुन चांगले होईल का? आम्हाला इथे ही साईड देता येईल. पिठासिन अधिकारी साहेब, आपण एक गोष्ट नक्की लक्षात घेतली पाहिजे की, लॅन्डफिल साईड आपण आयडेन्टीफाय करून ती वेगळ्या ठिकाणीसुद्धा नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण जी जागा लॅन्ड फिल साईडला आता दिली आहे तिथे ५-१० वर्षात तुम्हाला जागा राहणार नाही. म्हणजे पहिले त्यांचे ते स्लोपवर आहे म्हणजे ती फिजिबल नाहीच. त्याठिकाणी ते शक्य होणार नाही. करायला गेलेतर डोंगराच्यावर आणखिन डोंगर होईल. ऑलरेडी तो डोंगर आहे. त्याहीपेक्षा ती जागा अॅव्हॉईड करून तुम्ही तुमच्या इतर ठिकाणी ती लॅन्ड फिल साईड शोधा. शिवाय अॅडीशनल लॅन्ड फिल साईड तुम्हाला नियमानुसार जे डॉक्टर साहेबांनी नियम वाचून दाखवले ते मी पुन्हा वाचणार नाही कारण ते तुम्हाला माहिती आहे. फक्त त्याच्यानुसार नविन लॅन्ड फिल साईड आपण शोधाव्यात. ह्या भांडणामधले अर्धा जो आहे भांडण म्हणजे डंम्पिंग ग्राउंडचा विषय तो संपतो. एकच विषय राहिला तो विषय म्हणजे वासाचा. असे मी कधीही म्हणणार नाही जसा कायदा काय म्हणतो की, १०० अपराधी सुटले तरी चालतील पण एका निरपराधाला सजा होता कामा नये. असा कायदा म्हणतो. आपण इथे काय म्हणतो, ८ लाख लोकवस्तीला त्रास होत आहे. १५ हजार लोकांमुळे तर ते बरोबर नाही. त्या १५ हजार लोकांसाठी ८ लाख लोकवस्तीला आपण वेठीस धरतो. आता आपण ८ लाखाचा विचार करतो जेव्हा आपण प्रॉब्लेम खुप मोठा आहे. शहरात एवढ्या अडचणी आहेत. जेव्हा १५ हजार लोकांचा विचार करतो तेव्हा मग कोर्टाचा कायदा आठवतो की, १०० अपराधी सुटले तरी चालतील पण निरपराध्याला सजा होता कामा नये.

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, आपण आता जे सांगितले कोर्टाचे तर कोर्टाचा हा विषय वेगळा आहे आणि हा विषय वेगळा आहे. ज्यावेळेला जनतेच्या हितामध्ये तुम्ही बघाल कोयना धरणापासुन ते बरेच महाराष्ट्रामध्ये आणि बऱ्याचशा ठिकाणी आंदोलन लोकांचे होतात पण त्याच्यामधून पर्याय काढला पाहिजे. त्या १५ हजार लोकांना त्रास व्हावा किंवा त्यांना जो होतोच तो त्रास त्यांनी सहन करत रहावा असा त्याचा अर्थ होत नाही पण त्याचा अर्थ असा ही होत नाही की १५ हजार लोकांनी एखाद्या विकासाच्या कामाच्या आड येउन त्याचा त्रास व्हावा असे ही होत नाही. अशा दोन्हीपण बाजु बघितल्या पाहिजेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

याठिकाणी तुम्ही उपाय सांगा १५ हजार लोकांना त्रासही झाला नाही पाहिजे आणि आपला प्लांट ही चालू राहिला पाहिजे.

**लक्ष्मण जंगम :-**

एक्सपर्ट सांगतात की, त्याठिकाणी त्रास होतो की नाही. त्यांचे एक्सपर्ट येउन जेव्हा पाहणी करतात, कमिटी नेमतात. ती कमिटी जावून ज्यावेळेला अहवाल येतो तो आपण जर मान्य करत नसू. मी म्हणतोय की, मला ताप आहे. डॉक्टर म्हणतात की ह्यांना ताप नाही. पण मी म्हणतोय की, माझा तापच उतरत नाही. म्हणजे झोपलेल्याला जागे करणे आणि एकाने झोपायचे सोंग केलेले त्याला जागे करणे ह्याच्यामधला फरक आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रश्न असा आहे की, कोर्टामध्ये जेव्हा असा व्ह्यु घेतला जातो की, १०० निरपराध सुटले तरी एका निरपराधाला सजा नाही झाली पाहिजे. त्याचा एकदम त्यांनी सिरियसली अर्थ घेतला. मी अजुन लाईटली त्याला नेतो की, एखाद्या ठिकाणी वास येतो. जो प्लांट सुरू झाला व मधल्या काळात बंद पडला तेव्हा त्याच्यावर त्यांनी रासायनिक प्रक्रिया करणारा द्रव्य फवारणी केली नाही. सुरूवातील वास सुटला. आजच्या तारखेमध्ये जी टेक्नॉलॉजी हा प्लांटवाला वापरतो तेव्हा जेव्हा ही टेक्नॉलॉजी आणली. पिठासिन अधिकारी साहेब, तेव्हा ऑलरेडी एका ५० च्या कचऱ्याच्या प्लांटला मंजुरी दिलेली. पण तो कचऱ्याचा प्लांट फक्त सेग्रीगेटेड कचरा एकत्रित जो मिक्स कचरा आहे तो वेगळा करून कुजणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचे खत बनवण्याचा ५० टनाचा प्रकल्प होता. तो चालू राहिलेला काम, त्याचे बंद करून या सभागृहाने मोठ्या मनाने निर्णय घेतला की, मिक्स कचऱ्यावर प्रक्रिया करणारा हा एक उत्तम प्रोजेक्ट आहे. त्याच सभागृहामध्ये

मी त्या बायोटेक हेन्जरवाल्यांना एक प्रश्न विचारला होता की, तुम्ही राजकोटच्या तुमच्या प्लान्टचे उदाहरण देता. राजकोटच्या प्लानचा जो कचरा आहे. शहरातील कचरा आहे तो आणि भाईंदर शहराचा कचरा हा एक आहे असे तुम्ही म्हणता का? असे कोणी सर्टीफाय करील का? आपल्या भाईंदरच्या शहरामध्ये दोन बिल्डींगच्या मागे एक इंडस्ट्रीयल इस्टेट आहे. इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये सगळा बर्फीगचा कचरा सर्व केमिकल आहे. तो सगळा कचरा त्याठिकाणी आपल्या नागरी कचऱ्यामध्ये मिक्स होतो. नियमानुसार इंडस्ट्रीचा कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची जबाबदारी आमची नाही. पण त्यांनी तो वेगळा करावा अशी ही व्यवस्था नाही. वर्षानुवर्षे आमच्या शहरातला बिल्डींगमधला कचरा एकत्र येतो. इंडस्ट्रीमधला कचरा एकत्र येतो. म्हणून त्यांना मी प्रश्न विचारला होता की, तुम्ही मिक्स कचऱ्यावर प्लानमध्ये प्रक्रिया करणार आहात मग तो मिक्स कचरा राजकोट सारखा आमच्या शहरातील नाही. म्हणून राजकोटचा जो प्लान्ट बघून आले त्या सगळ्या लोकांनी या सभागृहात मंजुरी दिली की, आणा तो प्रोजेक्ट. पण कचरा आमच्या शहरामध्ये कसा आहे. कचरा उचलण्याची पद्धत कशी आहे हे कधी कोणी पाहिले नाही आणि म्हणून त्यांनी काय सांगितले मला, सभागृहामध्ये हॅन्जर बायोटेकने की, माझ्याकडे रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट प्लान्ट आहे. मी म्हणेन त्याच्यावर अजुन रिसर्च करेन आणि तुमचा इंडस्ट्रीचा कचरासुद्धा त्याच्यामध्ये प्रक्रिया होउन बाहेर निघेल आणि अक्षरशः ही ईज डुईंग नथींग. हेंजर बायोटेक हा फक्त फर्निचरवाला आहे. त्याचे स्वतः काही टेक्नीकल नॉलेज नाही. दुबईमध्ये धंदा करतो आणि सांगतो खत दुबईला विकतो. तुमच्या खतावर तुम्ही राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझरच्या गोणी आम्हाला दाखवल्या आहेत. आयुक्त साहेब, तुम्ही आयुक्त नव्हता त्याच्या अगोदर पहिले आयुक्त होते. कचरा प्लांट बंद पडला आम्ही खोट्या गोष्टी कधीही करणार नाही. मी ह्यांच्या बाजुला बसला आहे म्हणून ह्यांच्या बाजुने बोलावे आणि त्याच्या बाजूला असलो आहे म्हणून त्यांच्या विरोधात बोलावे हा विषय नाही. कारण हा राजकिय विषय नाही. जोपर्यंत तुम्हाला स्वतःला टेक्नॉलॉजी काय आहे हे माहित नाही आणि हे टेक्नीकल आणण्याचा ढोंग करतो. अक्षरशः हे ढोंग आहे. मिक्स कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या मशिनरी बघितल्या तर श्री. शिंदे साहेबांनी सांगावे की, ५० टनाचा कचरा जो फक्त कुजणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करून खत निर्माण करणारा म्हणजे कचरा वेगळा करायचा आणि त्याच्यावर प्रक्रिया करायची ती जी टेक्नॉलॉजी आणि मिक्स कचऱ्याची टेक्नॉलॉजी, मशिनरी आपल्याला वेगळ्या दिसल्या का? मग तुम्ही काय पझेशन केले? दॅट्स कम द मॉनिटरींग म्हणजे आमच्या पालिकेने प्रशासनाने काय मॉनिटर केले की, त्यांची प्रोसेस चालू आहे ती बरोबर चालू आहे. साहेब, कचऱ्याचा प्लांट तिथे झाला आहे. शहरातील कचरा उचलला जातोय. आम्हाला शहरात स्वच्छता हवी आहे. पण कचऱ्याचा प्लांटवाला पैसे वाचवायला तो जर कलचर स्प्रे करत नाही. कलचर नावाचे केमिकल जे खुप महागडे आहे. पिठासिन अधिकारी साहेब, श्री जाधव साहेब आणि आम्ही जेव्हा तिथे विचारायला गेलो तेव्हा त्यांनी अक्षरशः टेक्निकली जाउ दे सिव्हिल सुद्धा एवढ्या चुका केलेल्या प्लांटमध्ये की, सगळे पावसाचे पाणी धो धो त्या कचऱ्यावर. त्या कचऱ्यातुन निघणारे कुजलेले पाणी सगळे खाली चालले होते. जे कुजलेले पाणी लिकेज. मी तेव्हा भुमिका महानगरपालिकेच्या बाजुने घेतली. कोकण आयुक्तांपुढे कोणी नगरसेवक बोलले नाही. काही नगरसेवक होते. प्रफुल्ल पाटलांनी ते निवेदन बनविले आहे म्हणून त्यांच्यावर सह्या करायच्या नाही अशी भुमिका तेव्हा त्यांनी घेतली. जसे काय प्रफुल्ल पाटील ह्याच्या एकाच्या बापाचा प्लांट आहे कचऱ्याचा. या नगरसेवकांनाही बोलू दे. त्यांनी सांगितले की, आमच्या पक्षाच्या लेटरपॅड वर असते तर आम्ही सही केली असती. पक्ष पक्षाचा लेटरपॅड ठीक आहे. पण आम्ही जेव्हा एकत्रित इथे बसतो आणि निर्णय घेतो ते शहरासाठी घेतो ना, की राजकारण करण्यासाठी करतो. त्याठिकाणी कोकण कमिशनरला मी ठामपणे सांगितले की, ह्या सगळ्या गोष्टी आहे ह्याच्यामध्ये काही तथ्य नाही. टेक्नॉलॉजी प्रमाणे काम चालू आहे. तर ह्याच्यामध्ये एकच उणीव होती की, ते कलचर स्प्रे करत नव्हता तो प्लांटवाला आणि जेव्हा आम्ही त्या जागेवर गेलो तर कलचर दाखवले स्प्रे करतो का तु. तर कलचर म्हणजे आउट ऑफ स्टॉक आहे आणि मी जसे बोललो होतो फर्नीचरवाला तो असा रंधा मारण्याचे काम करतो दुसरे काही करत नाही. फर्निचर विकत घेतो आणि ते विकतो त्याची स्वतःची काही टेक्नॉलॉजी नाही तुम्ही ह्या सभागृहात त्याला बोलवा आणि चार प्रश्न विचारा या टेक्नॉलॉजिबद्दल तो सांगेल का? तर राजकारण सोडून देईन कायमचे. कारण त्याने टेक्नॉलॉजी विकत घेतली डॉ. माळेची इकोसिस्टमची टेक्नॉलॉजी त्याने विकत घेतली. त्याने तंत्रज्ञान दिले. मग त्या डॉ. माळे ह्यांना बोलवा असे मीच तुम्हाला हात जोडून सांगितले. कारण प्रशासनाच्या वतीने कोणीही तांत्रिक माणूस नाही त्याचे उत्तर द्यायला. आंदोलनकर्ते त्यांचा प्रश्न मांडतात. त्यांचे म्हणणे बरोबर आहे की, वास येतो. कसा हटवायचे हे तुमचे काम आहे. पण मग त्यांना आम्ही तांत्रिकदृष्ट्या उत्तर द्यायला कोणीतरी माणूस पाहिजे. पिठासिन अधिकारी साहेब, डॉ. माळे ह्यांना मी स्वतः फोन लावले म्हटले डॉक्टर यु हॅव टू कम इमिडिएटली. त्यांनी म्हटले माझ्याकडे गाडी नाही. ट्रेनने तुम्ही या. तुम्हाला जायाला महानगरपालिकेची गाडी देईन. तुम्ही फुकटचे तंत्रज्ञानाचे पैसे घेता का? अहो, हिच लोक आज कलचर विकतात करोडो रूपयाचे त्या फर्निचरवाल्याला आणि तोच फर्निचरवाला कधी कलचर वापरतो तर कधी वापरत नाही आणि दुर्गंधी पसारली की, आम्हाला त्रास. ज्यावेळेला पहिल्यांदा प्रोजेक्ट बंद पडला त्यावेळी कचऱ्याला एवढी पसरली दुर्गंधी पसरत होती ते कलचर स्प्रे करत नव्हते हे श्री. शिंदे साहेब बरोबर आहे का नाही? हे कोणी बोलायचे? हे कोणी सांगायचे ठामपणे या नगरसेवकांनी आपसात भांडून एकमेकांचे जीव घेण्यापर्यंत जेव्हा आम्ही ठोस भुमिका घेत नाही, तेव्हाच ह्या लोकांना अशी हे पडते.

तर ह्या माणसाने राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझरला खत पुरवतो म्हणून एक ढोंग केला. आता आर.सी.एफ. वाले हे त्यांचे खत घेत नाही. आता सांगतात की, आम्ही एक्सपोर्ट करतो मग त्यांचा सत्कार करायला पाहिजे. जर एवढे देशामध्ये खत बनवून तो बाहेरच्या देशाला एक्सपोर्ट करतो इट मिन्स देअर आर मेनी मेनी टेक्नीकल डेप्रिसिएशनसी इन द प्लान. ते टेक्नीकल डेफिसिएन्सी ते तुमचे डॉ. माळे इकोसेव सिस्टम जे त्यांना ते तंत्रज्ञान दिलेले आहे. त्यांच्याकडे आजच्या तारखेला कुठलेही सोल्यशन नाही. जर आम्ही पाठीवर फुशारक्या मारत असू की, मिरा भाईंदर महानगरपालिका ही पहिली महानगरपालिका आहे की, एवढा मोठा चांगला प्रोजेक्ट बसवला आणि एवढे केले. मग मुंबई महानगरपालिकेमध्ये काय गाढव बसले आहेत का? मग ते मुंबई महानगरपालिकेचे कमिशनर आहेत ते कोण छक्के लोक आहेत. चीफ ऑफिसरच्या ग्रेडचे मग त्यांनी ह्यांची टेक्नॉलॉजी घेउन आजपर्यंत एक ही प्लांट मुंबई महानगरपालिकेमध्ये लागला नाही. म्हणून आपण जे काय केले आहे ते वाईट केले असे मी म्हणणार नाही. पण आपण काय करत आहोत. ते बरोबर करत आहोत हे बघण्याची जबाबदारी आपली आहे. कारण प्लांट आम्ही आणला. प्लांटला मंजुरी आम्ही दिली. पहिला प्लांट बंद केल फक्त तो जैविक कचऱ्याचा आणि ह्या मिक्स कचऱ्याचा प्लांट आम्ही घेतला तेव्हा आम्हाला हे बघणे गरजेचे आहे की, तो सांगतो १०० किलो कचरा आला तर ६० किलो त्याच्यावर प्रक्रिया होते ४० किलो आम्ही फक्त डंपिंग ग्राउंडवर फेकतो आणि आम्ही सांगतो ३० किलोवर फक्त प्रोसेस होते आणि ७० किलो बाहेर डंपिंग ग्राउंडवर फेकला जातो. आज ही ह्या टेक्नॉलॉजिमध्ये मी त्यांच्याकडे माहिती मागितली प्रोजेक्ट बघितला स्प्रे व्हायला लागले. म्हणजे आपण लग्नाच्या मोठ्या मंडपात जातो तेव्हा सुरूवातीलाच दोन मोठे फॅन लागलेले असतात आणि फवारा होतो. सेम फवारणी त्याला कलचर ही टेकनिकल मोठ नाव केमिकल देवून केमिकलला जास्त पैसे मिळतात हे श्री. मोदी साहेबांना माहिती आहे. त्या कलचरमध्ये सुद्धा इतक्या उणिवा होत्या आता ते सांगतात की आम्ही लेटेस्ट कलचर आणले आहे. मग पुर्वीचे काय होते? म्हणजे दुर्गंधी जेव्हा आली तेव्हा नक्कीच ह्याठिकाणी प्रॉब्लेम आहे. म्हणजे आम्ही आजच्या तारखेला असा स्टँड घेतला पाहिजे की, कचऱ्याचा प्लांट बंद करत नाही. पण त्याच्यातल्या प्रोसेस आम्ही करटेल केल्या पाहिजेत. साहेब, आपण हे एक लक्षात ठेवा की, शहरामध्ये कोणालाही आपण वेठीस धरायचे नाही आणि मग जेव्हा आम्ही इतका पैसा आणि इतकी जागा देतो तर आम्ही आमची टेक्नॉलॉजी सुधरवत का नाही? आणि पिठासिन अधिकारी साहेब, जर कायद्याने बघायला गेलो तर जागोजागी कचरा सेग्रीकेट झाला पाहिजे आणि तशाप्रकारे वाहतुक झाली पाहिजे. पण आपण काय करतो आता ही फिक्स रस्त्यावरची टेक्नॉलॉजी विच इज नॉट बीन सर्टीफाय. ती तशी टैक्नॉलॉजी कोणीही कायद्याने सर्टीफाय केलेली नाही. सुप्रिम कोर्टाच्या डायरेक्शनच्या हिशोबाने ज्या तरतुदी आहेत त्या लागूच आहेत. तुर्त आज कचऱ्यामध्ये बुडालोत ना इथपर्यंत मात्र काय करायला पाहिजे कोर्टामध्ये असे सबमिशन करा. आपण जे करत आहात त्याच्यावर तुम्ही एकटे करू नका. कारण तुमच्या बरोबरचे असलेले लो तुमच्याबरोबर नाही. आज कलेक्टरांनी, कोकण भुवन कमिशनरांनी किंवा ह्यांनी सेक्रेटरींनी जी मुव्हमेंट घ्यायला पाहिजे. पोल्युशन बोर्डाची लोक सुद्धा साहेब तुम्हाला माहिती आहे. त्यादिवशी मिटींगमध्ये गप्प होते म्हणून बरे झाले. मिटींग संपल्यानंतर ते कमिशनरला सांगण्याचा प्रयत्न करत होते. मी त्यांना थांबवले पिठासिन अधिकारी साहेब, तुम्हाला सांगतो की त्यांनी टोटली उलट रिपोर्ट तयार केला होता. प्रोजेक्टमध्ये निघणारा कचरा किंवा जे रिचर्ड आहे पाणी ज्याच्यामध्ये केमिकल्स आहेत खतरनाक असा पोल्युशन बोर्डाचा रिपोर्ट आणि बरे झाले ते आंदोलनकर्त्यांसमोर आज रेकॉर्ड होतय. व्हायला आता काय मरायच आहे. कचऱ्याचा प्लांट चालू झाला नाही तर मरणारच आहोत. एकतर तिकडचे मरणार किंवा इकडचे मरणार पण प्रश्न आम्ही कधी त्यांचा समजुन घेतला नाही तर आम्ही ह्याच्यावर उपाय काढणार कधी? त्यादिवशी पोल्युशन बोर्डाच्या लोकांनी दाखविले की, ह्याचे केमिकल कन्टेन्स आहेत हे इतके विषारी आहेत म्हणजे नॉर्म्स पेक्षा जास्त आहेत. म्हणजे मग त्यांनी तुमच्या त्रुटी दाखवल्या. ह्या त्रुटी दुर करण्याचे काम हँजर बायोटेक ह्यांचे आहे की, नाही किंवा मग त्याच्या आख्ख्या प्रोजेक्टची टेक्नॉलॉजी अशा त्रुटी आणणार आहे का? म्हणजे ह्याचा अर्थ इकोसेव सिस्टीम जी टेक्नीकल ॲथॉरिटी आहे. हँजर बायोटेकला मदत करणारी ते कुठल्याही प्रकारचे ते नुसते राजकिय बोलतात. हम तुमको पैसा लाकर देते है। अरे तुला पैसा आणायला नाही पाठवले आहे. तु काय दलाल आहे का, आमचा? दिल्ली वरून आम्ही पैसे आणणार आहोत. असे डॉ. माले बोलतो. हम तुमको डंम्पिंग ग्राउंड के लिए इतना पैसा लाकर देते है। आम्हाला सांगतो पैसे आणून देतो आणि जी हँजर बायोटेकला जी टेक्नॉलॉजी दिली आहे २० वर्षापुर्वीची आज पिठासिन अधिकारी साहेब, ही टेक्नॉलॉजी खरोखर इतकी ॲडव्हान्स आणि परफेक्ट जर असती तर ठाणे महानगरपालिका, पुणे महानगरपालिका किंवा मुंबई महानगरपालिका आपल्या बाजुला जेवढ्या महानगरपालिका आहेत ती लोक काय वेडी आहेत का? त्यांनी फटाफट असे प्लांट चालू केले असते. आता करत आहेत हे मला माहित आहे. पण एक लक्षात ठेवा सोन वरून कितीही चकाकल तरी ते आपल्याला ठोकून बघितले पाहिजे. त्याला मुलामा सुद्धा असू शकतो. आणि हा प्रॉब्लेम नेमका आहे की, आज त्या लोकांना वासाचा प्रॉब्लेम होवून त्यांनी ठीक आहे इतर काही कारण असतील तर मला त्यात जायच नाही. वास येतो ही गोष्ट खरी आहे. वास कशाप्रकारे मोजावा ह्याचे यंत्र आजपर्यंत निर्माण झालेले नाही. पण वास कसा दुर करावा ही मात्र आपल्याकडे यंत्रणा असतांना ती वापरली जात नाही. साहेब म्हणून आपण ह्याच्यात अशी भुमिका घ्या की, ॲडमिशन स्टेजला आम्हाला हे सांगू द्या की, आमची टेक्नॉलॉजी विकसित झालेली आहे. त्यांचा मुळ मुद्दा जो डम्पींग ग्राउंडचा

आहे की, लॅन्ड फिल साईड आम्हाला आयडेन्टीफाय करायची आहे. न्यायप्रविष्ट बाबी असल्यामुळे आपण काय ह्याच्यात असे म्हणत नाही. पण आपल्याला म्हणायला काय हरकत आहे. आम्ही पार्टी आहोत. पार्टी असल्यानंतर पार्टीच्या संमती जिथे नगरसेवकांनी चर्चा करावी आणि आपल्याला शेवटची एकच विनंती करतो की, आजच्या तारखेला कचऱ्याचा जो प्रश्न आहे की, जागोजागी ढिग झालेले आहे. साहेब, स्टेडीयमचे जे आरक्षण आहे त्या आरक्षणाच्या जागेमध्ये आपण तो कचरा टाकावा ते टाकत असतांना त्यांच्याशी असा करार करावा की, वाहतुकदारांची की आमचा प्लांट चालू झाल्यानंतर तिथे नेउन आम्ही त्याच्यावर प्रक्रिया करू म्हणजे तुम्हाला कायदेशिर अडचणी येणार नाही. ज्या जागेत तुम्ही टाकणार आहात ते मिठागरांच्या लोकांच्या जागा आहेत. त्यांच्याशी ऑलरेडी तुम्ही निगोशिएशन करत आहात की, त्यांना आपण त्यांच्या किंमतीचा मोबदला देतोय. एका हायकोर्टच्या केसच्या धर्तीवर ते सर्व मागे रेकॉर्डवर आलेले आहे. आलेत तर आले सॉल्ड डिपार्टमेंटची लोक तुम्हाला रोखु शकत नाही आणि असे ही ते क्रिडांगण, स्टेडीयमची जाग किती आरक्षणाखाली आहे हे आपण पटकन सांगा.

**दिपक खांबित :-**

१८ हेक्टर.

**प्रफुल्ल पाटील :-**

१८ हेक्टर जागा म्हणजे १८ दुणे ५४ आणि ९ उ ६३, ४५ एकरमध्ये आताशी कुठे १०-१२ एकरामध्ये झालात. ४५-८ उ ३७ एकरामध्ये आज ही तुम्हाला भरणी करून, आम्ही फक्त शासनाला कळवणार की, आम्ही तात्पुरता हा कचरा इथे ठेवतोय आमचा प्लांट तंत्रशुद्ध झाले की, त्या प्लांटवर आम्ही नेउ. किंवा कोर्टाने आम्हाला ऑर्डर दिली आहे त्या स्थितीत प्लांट चालू करा. म्हणजे शहरातला जो ढीगारा आहे कारण आंदोलन करणारे वेगळे असतात त्यांना सांगावे लागत नाही. ते अति सहनस्फुर्त असतात. बरोबर त्यांनी सांगितले की १९९९ ला लोकांनी शहर जाळले. मग तेव्हा त्यांना कोणी पुढारी चढवायला गेला नव्हता. उलट सर्व पुढारी गप्प बसले होते आतमध्ये लपून. लोकांनी येउन पुढाऱ्यांनाच मारले. पाण्याच्या प्रश्नावर आंदोलन झाले होते. आंदोलनाकरिता आपण किती इन्स्टीकेट करतो, लोकांना चेतावणी दिली तरी होत नाही आणि ती सस्केस होत नाही. मला वाटते तुर्त आपण त्या स्टेडीयमच्या जागेमध्ये हा सगळा कचरा टाकावा आणि फर्दर लॅन्डफिल साईड म्हणून नव्हे तर तात्पुरता कचरा प्रक्रियेपुर्वी आणि प्रक्रियेकडे जाण्यासाठी हा कचरा घ्यावा कृपया.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

पिठासिन अधिकारी साहब, यह ॲग्रीमेंट बना है ३० साल के लिए और हमारे रिपोर्ट के अंदर इस हॅन्जर बायोटेक को एकबार भी फंड नही दिया गया है। याने की इतनी डिफेक्ट्स है मॉनीटरी रिपोर्ट के अंदर लेकीन महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड से हमको रिपोर्ट भेजते और क्लीनचीट देते है। मतलब की, अगर कोर्ट का या आंदोलनकारक से यह प्रोजेक्ट बंद करना पडा तो वह अधिकारी होगा इस चीज का की, वह म्युनिसिपल से ३३ करोड रू. वसुल करे। उसने ३३ करोड रूपया लगाया है इसलिए मै आग्रह करता हू की, मॉनिटरींग रिपोर्ट के अंदर हमारे अधिकारी उसकी निगेटीव्ह रिपोर्ट भी साथ साथ दे ताकी वो हरजाने का हकदार ना हो। नही तो आपको उसको ३३ करोड रू. देना होगा। हर साल मॉनिटरींग रिपोर्ट आना चाहिए।

**जयंत पाटील :-**

सन्मा. सर्व नगरसेवकांच्या भावना याबाबतीत अतिशय तीव्र आहेत. १५ लोकांचा प्रश्न आहे की, १५ हजार लोकांचा प्रश्न आहे की ८ लाख लोकांचा प्रश्न आहे हा विषय नाही. या शहरातील प्रत्येक माणसाला आरोग्य सेवा मिळाली पाहिजे. प्रत्येकाच्या आरोग्याची जबाबदारी या महापालिकेवर आहे. आपल्यावर आहे. मग ते उत्तनचे लोक असोत किंवा चेन्याचे लोक असोत. सर्वांचा प्रश्न सुटला पाहिजे. सर्व नगरसेवकांची भावना तीव्र आहे. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी अतिशय सुंदर माहिती दिलेली आहे. आयुक्त साहेब, सुभाषचंद्र बोस मैदानामध्ये जी ४५ एकर जागा आहे. तिथे इतर कोणालाही व्यत्यय येणार आहे. शिलोत्र्यांचा सुद्धा प्रश्न आहे तर सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी सांगितले की, त्याना जर काय मोबदला दिला तर तोही सुटू शकेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्याच्यामध्ये उरणच्या सॉल्टवर असा निर्णय झालेला आहे की, तिथे सॉल्ट डिपार्टमेंट सांगतात की, आमच्या मालकीची जागा आणि तिथे मिठागर करणारी जी लोक आहेत, आगर पिकवणारे जोक ते सांगतात की आमची जागा, मग कोर्टाने काय सांगितले की, ह्या दोघांनाही तुम्ही कॉम्पेंसेशन वाटून द्या आणि ते मान्य झालेले आहे. आपण पुर्वी पण एक ठराव केलेला आहे. तेव्हा मिठखात्याला आपण हमीपत्र लिहून देणार होतो. त्याच्यामध्ये आपण असे दिले की, मिठखात्याला आपण हमीपत्र लिहून देवू नका तर ह्या आगर पिकवणाऱ्या लोकांनाही हमीपत्र द्या, शिलोत्र्यांना द्या की, तुम्हाला आणि ह्यांना तुमची मालकी ठरवून आम्ही तुम्हाला देवू. तसा मालकी ठरविण्या बाबतीचा जो निर्णय आहे. मालकीच्या संदर्भातुन त्यांना जे मिळणारे कॉम्पेसेशन ते कोर्टाने ठरवून दिलेले आहे. त्या बेसवर तुम्ही जर उद्या तिथे कोणी लढायला आले तर सॉल्ट डिपार्टमेंट तुमच्याशी लढायला येउ शकत नाही. कारण त्याठिकाणी त्यांचे काहीच चालत नाही. जरी आले तरी त्यांना आपण अशापद्धतीने घ्यावे आणि तिथले जरी मीठ पिकणारे आले तरी त्यांना अशापद्धतीने घ्यावे. त्याठिकाणी

आपण अशाप्रकारचे ॲडर्व्हटाईजमेंट करा की, कचऱ्याच्या पुढील प्रक्रियेसाठी तात्पुरत्या स्वरूपासाठी ही जागा ठेवतोय.

**जयंत पाटील :-**

हॅन्जर बायोटेकवाल्यांना आपण बोलवून घ्या. त्यातल्या त्रुटी कशा दुर करता येतील.

**अनंत पाटील :-**

शिलोत्र्यांच्या जागेवर जेव्हा तुम्ही डंम्पींग चालू करणार तेव्हा त्यांना विश्वासात घ्या.

**जयंत पाटील :-**

सर्वांना विश्वासात घेउन ते होईल. विश्वासात घेतले नाही तर होणारच नाही. विश्वासात घेउन करू त्रुटी दुर करा आणि डॉ. जैन ह्यांनी जी काही माहिती दिली त्याचा ही आपण विचार करा. त्यांच्यासुद्धा मताचा फायदा घेउन त्याच्यातुन कसे करता येईल हे बघा.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

पिठासिन अधिकारी साहब, मैने जो बोला था, उसका मुझे जवाब नही मिला की शेड्युल १ मे काम होना चाहिए वह प्रोव्हीजन ऑफ फर्दर लॅन्डसाईड या इन केस ऑफ ब्रेक डाउन अनदर फॅसिलिटी वह २००० मे पास हुआ है। २००३ के पहले पहले करना चाहिए था। २००६ मे हुआ है। अब तक वह काम क्यो नही हुआ उसका मुझे अबतक जवाब नही मिला है।

**लक्ष्मण जंगम :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी अतिशय उत्कृष्ट मार्गदर्शन केले. चांगले मार्गदर्शन केले. सर्वांनी शांतचित्ताने ऐकले खरोखर चांगला अभ्यास आहे. मला एक गोष्ट याठिकाणी निश्चितपणे तुम्ही सांगितले तरी चालेल, आयुक्त साहेबांनी सांगितले तरी चालेल, पण ह्याचा अर्थ असा होतो, त्यांच्या बोलण्याचा बाकीचा ते निर्णयापर्यंत आले, काम व्यवस्थित होते हे सर्व बरोबर आहे पण त्याचा अर्थ असा होतो की, आपल्या अधिकाऱ्यांना त्या प्रोजेक्टच्या बाबतीत पुरेसा अभ्यास नाही असे म्हणायचे.

**जयंत पाटील :-**

तुमच्या मताशी सहमत आहे. त्यांना अभ्यासच नाही हे खरे आहे. त्यांनी त्या गोष्टीत अभ्यास करून घ्यावा.

**लक्ष्मण जंगम :-**

मला असे वाटते ह्याच्यानंतर आपल्याकडे एवढे अभ्यासू गृहस्थ असतांना सन्मा. पाटील साहेबांना प्रत्येक प्रक्रियेमध्ये सहभागी करून घ्यावे त्यांचे मार्गदर्शन घ्यावे ते समाजाला, शहराला आणि महानगरपालिकेला हिताचे ठरेल.

**लंच टाईम :- दु. २.३० वा.**

**नगरसचिव :-**

जेवणाच्या सुट्टीनंतर कामकाजाला सुरूवात होत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सध्या निर्णय पिठासिन अधिकारी साहेबांनी दिला होता तर आपण त्याच्याशी सहमत आहोत का?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, यामध्ये हायकोर्टामध्ये आम्ही कॉम्प्रोमाईज करून निगोसिएशन करू म्हणून मान्यता दिलेली आहे. गर्व्हरमेंटने कमिटी नेमून त्यामध्ये काय काय दूरूस्त्या करता येतील. किरकोळ दुरूस्त्या करायला पाहिजे, सुधारणा त्या सुधारणांवर चर्चा करण्यासाठी उद्या मिटींग बोलावलेली आहे. त्यामुळे हायकोर्टात त्यांनी अंडरटेकींग दिलेले आहे की, आम्ही कॉम्प्रोमाईज करू. म्हणजे त्यांना प्लांटमध्ये वास बंद केला की, झाले. त्यांचे प्लांटबद्दल ऑब्जेक्शन नाही. कॉम्प्रोमाईज करू म्हणजे काय? हायकोर्टात त्यांनी सांगितलेले आहे आणि गर्व्हरमेंटने कमिटी नेमून ज्या त्रुटी आहेत त्या दुर करण्यासठी उद्या मिटींग बोलावलेली आहे त्यामध्ये गर्व्हरमेंट निर्णय देईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आयुक्त साहेब, त्यामध्ये विषय असा आहे की, सन्मा. पाटील साहेब बोलले की, आपल्याला सुभाषचंद्रबोस मैदान आहे. एवढी हेक्टर जागा बाकी आहे त्याच्यामध्ये आपण तो कचरा टाकू. तात्पुरत्या स्वरूपाचा.

**मा. आयुक्त :-**

तात्पुरत्या स्वरूपात स्टॉक करा असे म्हटले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

स्टॉक करताना प्रत्येक गाडीवर त्याला सांगा तु कलचर स्प्रे कर. म्हणजे लोंकांना वास येणार नाही. नाहीतर तिकडे जे झाले ते इकडे होणार आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, म्हणजे आपण ते एक्सेप्ट करता ना? तुम्ही उद्यापासुन सुरूवात करता?

**प्रेमनाथ पाटील :-**

उद्यापासुन सुरूवात करणार की, कसे करणार?

**मा. आयुक्त :-**

त्या खेळाडूंशी आपल्याला चर्चा करायची आहे आणि साहेबांनी सांगितले की, सॉल्टवाल्यांचा काही संबंध नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण आता एवढी चर्चा केली या विषयावर पण उद्या, आपण तो कचरा टाकायचा कुठे?

**मा. आयुक्त :-**

आतापर्यंत आपण दोन अडीज महिने कचराच उचलला नसता तर प्रत्येक गल्लीला १०-१० ट्रक झाले असते. म्हणजे आम्ही केले नाही, आम्ही केले नाही हीच सभागृहात आम्ही चर्चा ऐकली. पण आम्ही लोकांना विनंत्या करून जमिनी घेऊन कचरा ॲडजेस्ट केला, हा कचरा आम्ही उचललाच  ना, आता साहेबांनी जे सुचवलेले आहे. ग्राऊंडच्या कोणाच्या तक्रारी आहेत. त्यांची समजून काढून टाकायला सुरू करू आणि ह्यात तडजोडीचा प्रश्नच येत नाही. गव्हर्नमेंट निर्णय देणार. हायकोर्टात त्यांनी निगोसिएशन करू म्हणू सांगितलेलेच आहे. त्यामुळे प्लांटमध्ये ज्या किरकोळ दुरूस्त्या आहेत त्याकरिता आम्ही आठ महिन्याचा कालावधी मागितलेला आहे. सगळं हे करायला. तोपर्यंत कचरा टाकायचे चालूच राहणार पण गर्व्हमेंट निर्णय देईल त्यावेळेला.

**प्रभात पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. मगाशी मी म्हटले होते की, डावीकडची बाजू स्वच्छ आणि उजवीकडची बाजू अस्वच्छ.

**जयंत पाटील :-**

साहेब, हा प्रश्न माझ्या सुद्धा वॉर्डामध्ये आहे. म्हणजे खाडी किनारी ठिक आहे. आपण ऑफिशियली तो काही टाकत नाही. लोकांची सोय होण्यासाठी आपण तो टाकतो. त्यावेळेस तिथला स्थानिक नगरसेवक ह्या एरियातल्या गाड्या गेल्या की अडवायचे. माझ्या वॉर्डातलाच कचरा तिथे जाईल. तर हे असे काय चालले आहे? ही सर्व जनता आपलीच आहे.

**प्रभात पाटील :-**

हे चुकीचे आहे असे आपल्या निर्दशनास आणून दिले होते. त्याच्यानंतर ही आजपर्यंत तीच बाजू आहे. त्याच्यावर तुमची काय कार्यवाही आहे.

**मधुसूदन पुरोहित :-**

साहेब, तसे होत असेल तर पहिला आमच्या बाजूचा म्हणजे वॉर्ड कॅ. १५, १६, १७, ४३, ४४ तो कचरा आजच्या आज उचला.

**प्रभात पाटील :-**

तो कचरा आजच्या आज उचला. नाहीतर, आम्ही नेणार आणि त्याबाजूला टाकणार.

**मधुसूदन पुरोहित :-**

कचरा टाकायची जागा आहे तर करत का नाही? आणि तो जो ठेकेदार आहे तो कोणाचा ऐकतच नाही. मी तर बघितलाच नाही तो ठेकेदार कोण आहे?

**प्रभात पाटील :-**

अशी काय मक्तेदारी आहे का, नगरसेवकांची? आता लॉबिं करायला लागेल.

**विजया वैती :-**

आणि जे कामगार काम करतात ते सरळ सांगतात की, मॅडम आम्हांला हा कचरा उचलायलाच नाही म्हणून सांगितले.

**मधुसूदन पुरोहित :-**

साहेब, त्या ठेकेदारांना पैसेच द्यायला नको ते करतात काय? कचरा उचलत नाही मग आपण पगार कसला द्यायचा?

**विजया वैती :-**

तिथे आम्ही लोकांना काय उत्तरं देणार?

**मा. आयुक्त :-**

दुपारपर्यंत तिथला कचरा निल होईल.

**प्रभात पाटील :-**

ह्याच्यापुढे ही परिस्थिती होता कामा नये. कचरा असेल तर संपुर्ण शहरात सगळ्या बाजुला असेल आणि नसेल तर सगळ्या बाजु स्वच्छ असतील.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यापुढे उद्‌भवले तर तिथले एसआय आणि मुकादम ससपेन्ड होतील.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मी आता आयुक्त साहेबांना सांगितलेले की त्या अधिकाऱ्यांच्या वर दुसरा कोणीतरी एक अधिकारी बसवा. तरच ते सुधारतील त्याच्याशिवाय हे कामधंद्याला लागणार नाही. त्याचे उत्तर द्या.

**विजया वैती :-**

आयुक्त साहेब, मी पण श्री. कांबळे साहेबांना कम्प्लेंट दिली होती की, माझ्या वॉर्डामध्ये जे सफाई कामगार आहेत ते माझे नाव सांगून सांगतात की, मॅडम हे नाही करायला सांगितले आहे. त्याच्याविषयी ही त्यांनी ॲक्शन घेतलेली नाही. श्री. रमेश काळे म्हणून आहेत.

**मा. आयुक्त :-**

त्यांच्यावर ॲक्शन घेऊ.

**स्नेहा पांडे :-**

डेंग्यू की जो फाईल पेन्डींग है उसपर निर्णय क्या हुआ है?

**मा. आयुक्त :-**

उपायुक्तांना त्यांच्यावर नेमलेले आहे. आरोग्य अधिकाऱ्याच्यांवर नियंत्रण करायला उपायुक्तांकडे विभाग दिलेले आहेत.

**नयना म्हात्रे :-**

कोण उपायुक्त?

**मा. आयुक्त :-**

श्री. राऊत साहेब.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, २६ तारखेला न्यायालयासमोर त्या जनहित याचिकेची सुनावणी होणार आहे म्हणजे प्रशासन आपली जी काही बाजू मांडायची आहे ती मांडेलच. पण न्यायालयासमोर जनतेचे आम्ही प्रतीनिधी आहोत. नगरसेवक म्हणून तर तो जो प्रकल्प आहे. त्याच्यातल्या त्रुटी दुर करून तो लवकरात लवकर सुरू व्हावा अशा प्रकारचा एक ठराव केला तर प्रशासनाच्या म्हणण्याला आणखिन बळकटी मिळेल ना?

**मा. आयुक्त :-**

प्लांट सुरू करा म्हणून ठराव करायला आमची काही अडचण नाही. म्हणजे आमच्याबरोबर तुम्ही आहात. या निवडणूकीच्या काळात आमच्याबरोबर नव्हता पण आता ठराव केला तर होता असे होईल.

**प्रशांत पालांडे :-**

आयुक्त साहेब, त्या त्रुटी दुर करून तो प्रकल्प लवकरात लवकर सुरू करावा अशी लोकांची भावना आहे. जनतेची भावना आहे आणि प्रतिनिधींची ही भावना आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण ठराव करा. आमचे काय. तुम्ही ठरवा केला तर आम्हांला आधारच होईल.

**स्नेहा पांडे :-**

फाईल जो पेन्डींग है उसका क्या?

**मा. आयुक्त :-**

डेंग्यु की जितनी रिपोटींग जितने हॉस्पीटल मे होते है, उससे ज्यादा पैसे मांगनेके लिए ॲप्लीकेशन ज्यादा है। इसका मतलब यह हुआ है की, हम जो गर्व्हरमेंट को रिपोर्ट भेजते है। उसमे कम और पैसा लेने के लिए डेंग्यू के पेशंट ज्यादा यह गलत है। इसलिए मैंने सॅक्शन नही किया है।

**स्नेहा पांडे :-**

जो सही है उनका निर्णय कौन लेगा?

**सिसिलिया बावीघर :-**

जे डेंग्यूचे पेशंट आहे त्यांचे काय करायचे?

**मा. आयुक्त :-**

लोक सर्टीफिकेट आणायला लागले डेंग्यू झाले आहे. पैसे घेण्यासाठी. ते मी बंद केलेले आहे आणि आता ते मी सुरू करणार नाही.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २३, दि. १९/११/२००८ व दि. २९/११/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**शरद पाटील :-**

पान क्र. ६ मध्ये सगळे आहे तिथे सगळी ॲडमिशन झाली असे करा.

**भगवती शर्मा :-**

७२ मे जो सुचना मे नाम दिया था। वह नाम दुसरा है। वह नाम सही किया जाए।

**मा. उपमहापौर सो., :-**

ती दुरूस्ती करून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. २४ वर सिरियल क्र. ४४ ला आपण महानगरपालिकेच्या नियोजित हॉस्पीटलला नामकरण केले आहे ते मा. भारतरत्न पंडित भीमसेन जोशी असे नाव केले आहे. नाट्यक्षेत्रातील, गायनक्षेत्रातील आदरणीय व्यक्ती आहे. त्याच्यात काही वाद नाही. आपले भविष्यातील जे नाट्यगृह होईल त्याठिकाणी हे नाव प्रपोझ केलेले बरे वाटेल. त्यांच्या क्षेत्रानुसार आणि ह्या हॉस्पीटलला आपण डॉ. बाबासाहेब आमटे ह्यांचे नाव दिलेले बरे. माझी सभागृहाला विनंती आहे. कारण त्यांना भारतरत्न किताब बहाल केला गेला. महाष्ट्रात त्याची ख्याती किर्ती आहे. बाबा आमटे ह्यांचे नाव जर दिले. तर ते हॉस्पीटल क्षेत्राशी निगडीत असे नाव असेल. अशी माझी सभागृहाला सुचना आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेवक अजून आपले हॉस्पीटल बनत आहे. ते बनू द्या त्याच्यानंतर नामकरणचा विषय आणता येईल.

**मिलन म्हात्रे :-**

आज हे जे इतिवृत्तांत आहे ते मंजुरीला आले आहे. आज ह्याला मंजुरी मिळाली म्हणजे माझी सुचना आहे.

**मा. उपमहापौर सो., :-**

सदरच्या सुचनांची नोंद घ्या.

**धुव्रकिशोर पाटील :-**

पान क्र. ४९ वर जे समाजमंदिर आहे ते विनायकनगर समाज मंदिर म्हणूनच राहू द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, मालचंद लालचंद अग्रवाल हे माजी ग्रामपंचायत सदरच होते. आता ठरावामध्ये फक्त दुरूस्ती सुचविता येते. ज्याला असे वाटत असेल ते चुकीचे आहे. त्यांनी पुन्हा स्थायी समितीमध्ये विषय आणून बदली केले तर हरकत नाही. जिवंत लोकांचे इथे नाव दिलेले आहे आणि हे मेलेले आहेत आण ह्या शहरासाठी त्यांनी बोध दिलेला आहे. ६४ नंबर मध्ये डॉ. केशव बळीराम हेडगेवार होणार आहे अशी दुरूस्ती करा. पान क्र. २५ वर माझी सुचना होती ती आलेली नाही ते आपण टेपींग मध्ये बघा आणि समाविष्ट करून घ्या.

**धुव्रकिशोर पाटील :-**

४९ नंबरचे जे आहे ते दुरूस्ती करून घ्या.

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

दुरूस्ती करून घ्या म्हणून सांगितले आहे.

**धुव्रकिशोर पाटील :-**

विनायकनगर समाजमंदिर हॉल.

**स्टिवन मेन्डोंसा (पिठासीन अधिकारी) :-**

ठिक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठरावामध्ये स्पेलिंग दुरूस्ती करता येते. आता कोणालाही कोणाचेही नाव बदली करता येत नाही. हा सभागृहाच्या प्रोसिडींगचा नियम आहे.

**धुव्रकिशोर पाटील :-**

साहेब, मागच्यावेळी पण हेच ठरले होते हे चुकून इथे आलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान क्र. ६१ वर बारावी ओळ आहे. ग्रामपंचायतच्या एनए रिसीटवर तर एनए, एनओसी वर असे पाहिजे. आणि पान क्र. ६८ वर स्टेनलेस स्टीलची भांडी आणि युरेनसील दिले आहे. तर युरेनसील युटेनसील पाहिजे. पान क्र. ७० वर करून २४ ओळ आहे तिथे शाही पलिकडे झाले आहे तिथे याही पलिकडे पाहिजे पान क्र. ७१ वर पिक्चर पाहिजे. पान क्र. ८० वर सर लिहिले तर तिथे सरसकट काही गोष्टी होतात.

**चंद्रकांत मोदी :-**

पिठासीन अधिकारी साहेब, २९ नोव्हेंबर को जो मैंने औषधी मारनेकी दवा पिया था। वहापर मोदी की जगह वैती ऐसा आया हुआ है। और मैंने स्टेटमेंट भी ज्यादा दिया था लेकिन सिर्फ चार लाईन ही आयी है।

**जयंत पाटील :-**

प्रकरण क्र. २३, दि. १९/११/२००८ व दि. २९/११/२००८ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**एस. ए. खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

या ठिकाणी राहिलेली जी थकबाकी आहे ती निर्लेखित करण्यात यावी असे ठरावात ५५ नंबरला आलेले नाही दुसऱ्या प्रोसिडींगमध्ये प्रकरण क्र. ८३. संबंधित मार्केट मधील विक्रेत्यांनी भरावी व थकबाकी निर्लेखित करण्यात यावी. कारण सुरूवातीपासुन बिल आपण २० रू. प्रमाणे काढतोय.

**प्रकाश दुबोल :-**

पिठासीन अधिकारी साहेब, १ वर्षाने इतिवृत्तांत आले कारण का?

**नगरसचिव :-**

प्रत्येक महिन्याला इतिवृत्तांत दिलेले आहे आणि दर महिन्याला दोन दोन मिटींग झाल्या होत्या.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर साहब, सचिव साहब को धन्यवाद देता हू बहुत अच्छी छोटीसी भुल किया है और मैंने जो स्टेटमेंट दिया था उसमे से २-३ लाईन लिखा है। बाकी नही लिखा है। हेमंत करकरे साहब का अग्निसंस्कार था वह मैंने बताया था।

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण असा खुलासा केला की, बस ही २५० कि.मी. न चालता कमी चालविले जाते तरी त्यांना २५० कि.मी. चे पैसे दिले जात होते पर डे, त्याचा मी त्यांना डिफरन्स पण दिला होता की, किती लाख आपण लॉसमध्ये गेलेलो आहे. त्याच्यानंतर श्री. खतगावकर साहेबांनी असे सांगितले होते की, २५० कि.मी. न जाता २२५ कि.मी. चे आपण त्यांना देवू या. त्याच्यानंतर सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील व श्री. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी ठराव मांडला होता की, परिवहन सेवेला मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे कधीही अनुदान देवू नये अशी सुचना ठरावात मोडली होती आणि तो सर्वानुमते मंजूर झाला होता. तरीही आपण परिवहन सेवेला आयुक्त साहेब २.२५ करोड रु. आपण अनुदान दिलेले आहे. त्या ठरावाचे काय झाले? आणि २२५ कि.मी. चे आपण पैसे देतो की, काय देतो?

**प्रकरण क्र. २३ :-**

दि. १९/११/२००८ व दि. २९/११/२००८ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ३० :-**

दि. १९/११/२००८ व दि. २९/११/२००८ रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर महोदय, मैने पहिले सुचना की थी, प्रकरण क्र.२ नियम १ के अंदर विषय लेने के लिए मेरी आपसे प्रार्थना है की उस विषय को पहले लिजीए।

**नगरसचिव :-**

मगाशी सुरुवातीला दिले होते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम १ उपनियुक्त के अन्वये प्रस्ताव दिला होता. त्याच्यावर आहे.

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेब, ४९ पानावर मी मागच्यावेळी सुचना केली होती की, शिवाजींचा पुतळा आहे त्याच्या डाव्या बाजूला इतके ट्राफीक जाम आहे की ते संबंध दुकानवाले त्यांचे २०० फुटाचे दुकान आहे आणि १५० फुट ते आणखीन आपली जागा वापरुन पुढंपर्यंत येतात. त्याच्या गाड्या उभ्या असतात. मागच्यावेळेला मी सुचना पण केली होती तेव्हा आपण बोलला होता की, ताबडतोब त्याचा अंमल देता पण आजदिनपर्यंत त्याच्यावर काही कार्यवाही झाली नाही किंवा काही नाही. अर्धा, पाउण तास फक्त तिथे लाईनमध्ये उभे रहावे लागते. तुम्ही स्वतः पण त्याचा अनुभव घेतला असेल ते हटविण्यासाठी मागच्यावेळी मी सुचना केली होती तिथे तुम्ही ताबडतोब अंमल द्या. ती सुचना घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

आयुक्त साहेब, मी आता जो विषय मांडला तर परिवहन सेवेमध्ये भाडेवाढीसाठी आपल्याकडे विषय होता.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

हायवेवर चारही बाजूला गाड्या लागतात. ट्रक उभे राहतात ते सगळे काढा. ट्राफीकवाल्यांना टू इन वन व्हॅन दिली आहे तरी जी लोक काही कार्यवाही करत नाही. त्याच्यावर आपला कोण अधिकारी आहे का?

**मा. आयुक्त :-**

आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मग त्यांना सांगा संपूर्ण काढा. गेल्या मिटींगमध्ये बोलले आणि आता परत ह्या मिटींगमध्ये बोलतोय आणि परत पुढच्या मिटींगमध्ये बोलायचे हेच करत रहायचे का?

**संजय तायशेटे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सन्मा. नगरसेवक प्रेमनाथ पाटील ह्यांनी विचारल्याप्रमाणे अगोदर ही दर भाडेवाढीचा प्रस्ताव आपण शासनाकडे प्रस्तावित केलेला तो ही मंजूर नाही. मी चार्ज घेतल्या नंतर स्वतः श्री. कपूर साहेबांशी बैठक घेउन त्यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे. पण त्याला अजून काही मंजूरी मिळालेली नाही. मंजूरी मिळताच त्याची अंमलबजावणी होईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझा विषय तो नाही. माझा विषय हा आहे की, आपण २५० कि.मी. चे पैसे त्याला देतो आणि २५० कि.मी. चे सुध्दा बसेस जात नव्हत्या. तो डिफरंट आपण त्यांना ९७ लाख ७० हजार १९९ रु. ने ठेकेदाराला ज्यादा अदा केलेले आहे. त्याचे आपण काय करणार? त्यामुळे सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल व श्री. शरद पाटील ह्यांनी ठराव ही मांडला होता की, महानगरपालिकेतर्फे ह्यांना ह्या परिवहन समितीला अनुदान देउ नये असा ठराव झाला असताना सुध्दा आपण सव्वा दोन करोड रु. परिवहन समितीला दिलेले आहे.

**संजय तायशेटे :-**

महापालिका आणि परिवहन सेवा हे तुम्ही वेगळे समजू नका.

**प्रेमनाथ पाटील :-**

तसा ठराव झालेला आहे.

**संजय तायशेटे :-**

महापालिका मोठा भाउ असेल तर परिवहन सेवा हा लहान भाउ आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

असे आहे का आणि ठेकेदार? ठेकेदार कोण आहेत? माझा विषय तो नाही, श्री. खतगावकर साहेब उपायुक्त असताना त्यांनी ठरवले होते की, २५० चे पैसे न देता २२५ कि.मी. चे पैसे द्यायचे पर डे. ते तुम्ही चालू केले आहे का?

**संजय तायशेटे :-**

सध्या तशी बाब उद्‌भवली जात नाही?

**प्रेमनाथ पाटील :-**

का उद्‌भवली जात नाही? महासभेत तसे वक्तव्य झालेले आहे वाटल्यास मी तुम्हांला त्यांचे वाक्य वाचून दाखवतो त्या करारामध्ये दुरुस्ती करण्यात येत आहे. जो ठराव आहे तो परिवहन समितीपुढे मान्य करुन घेतलेला आहे. २५० च्या ठिकाणी आम्ही २२५ कि.मी. पर डे अंतिम केलेले आहे. त्या करारामध्ये दुरुस्ती करण्याचा जो ठराव आहे तो परिवहन समितीकडे मान्य करुन घेतलेला आहे आणि २५० च्या ठिकाणी २२५ कि.मी. पर डे अंतिम केलेला आहे तरी तुम्ही त्यांना अजून २५० चे पैसे देता.

**संजय तायशेटे :-**

तशी बाब उद्‌भवत नाही आपण परिवहन कार्यालयात या आपल्याला सगळे डॉक्युमेंट दाखविले जातील.

**शरद पाटील :-**

पण त्याचा इथे ठराव झालेला आहे आणि तुम्ही काय म्हणता की, तिथे येउन बघायचे.

**संजय तायशेटे :-**

आपण २२५ प्रमाणेच करतोय.

**प्रेमनाथ पाटील :-**

२२५ प्रमाणेच करता तर मला त्याचे उद्या सर्व डिटेल द्या.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे आता प्रस्ताव दिलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम प्रकरण २ नियम १ उपनियम (के) अन्वये प्रस्ताव आणणेबाबत. विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महानगरपालिका निधीतून नियमबाह्य निधीचा वापर केल्याबाबत. खरं म्हणजे ही आपली महापालिका सुरस आणि चमत्कारीक कथासाठी प्रसिध्द आहे. त्या विषयावर मला बोलायचे आहे. मिरा भाईंदर महानगरपलिकेची महापौरांची निवडणूक २८ ऑगस्टला झाली. २९ ऑगस्टला महापौरांनी पत्र पाठवले महापालिकेला, त्यांनी २९ तारखेला ताबडतोब त्यांचे स्विय्य सहाय्यक म्हणजे पी.ए. त्याच्यावर महापालिकेच्या पी.ए. चे नाव ही नाही. २८ ला इलेक्शन होते २९ ला पत्र पाठवले की, मला वेगवेगळ्या ठिकाणी फिरायचे आहे, मुंबईला जायचे आहे, अमुक ठिकाणी जायचे आहे तमुक ठिकाणी जायचे आहे. मला माहित नाही कुठे-कुठे हद्दीबाहेर जायचे वाचून दाखवतो. नरेंद्र मेहता ह्यांचे दि. २८/०८/२००७ चे पत्र उपरोक्त विषयान्वये आपणांस कळवू इच्छीतो की, मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक दि. २८/०८/२००७ रोजी महापौर, उपमहापौर निवडणूक प्रक्रिया झाली. श्री. नरेंद्र मेहता ह्यांची महापौर पदासाठी निवड झालेली आहे. महापौर ह्यांना महानगरपालिका हद्दीमध्ये व हद्दीबाहेर शासकीय कामासाठी जावे लागते. महापौर साहेब ह्यांना भ्रमणध्वनी संपर्क साधल्याने त्यांच्या कामकाजासाठी पोलिस सुध्दा हत्याराचे सरंक्षण मागणी केलेली आहे. कमिशनर साहेब, ह्या महापालिकेमध्ये ह्याच्या अगोदर दोन महिला महापौर होत्या. एक श्रीम. मायराजी मेन्डोन्सा आणि दुस-या आता आपल्याकडे नगरसेविका म्हणून आहेत. त्यांनी कधी मागणी केलेली नाही. श्रीम. सावळे मॅडम ह्यांना शासनाने दिले. श्रीम. मायरा मेन्डोन्सा मॅडमनी मागणी केलेली नाही. त्यांना कसलीही भिती वाटत नव्हती. जनप्रतिनिधींना कसली भिती? तुम्ही जर लोकांची सेवा करता तर प्रामाणिकपणे करता तर तुम्हांला भिती असण्याचे कारण नाही. तुम्ही जर हफ्ता वसुली करायला जाल तर कोण तरी कानफडात देईलच. ते आमचे मनसेवाले योग्य प्रकारे काम करतात. फक्त त्यांनी ह्यावेळेस का केले नाही हे मला कळले नाही. त्याच्यामध्ये महत्वाचा भाग असा आहे की, एका सेवकाला या शहराच्या प्रथम नागरीकाला निवडणूक झाल्याबरोबर दुस-या दिवशी बंदोबस्त मागायला लागतो. हा मोठा विनोदाचा भाग आहे. दोन सन्मा महिलांनी बंदोबस्त मागण्याची भिती वाटली नाही. त्यांनी आपला कालावधी पूर्ण केला. परंतु, ह्यांना भिती वाटायला लागली. ठिक आहे, त्यांनी बंदोबस्त मागितला. मागितल्यानंतर दुस-या दिवशी का सेम डे आपण पोलिस स्टेशनला पत्र पाठवले म्हणजे महापालिकेत कच-याचा प्रश्न एवढा मोठा असताना दोन महिन्यामध्ये कोणीच त्याचा विचार करत नाही. तीन महिने झाले. महापौर आज निवडून येतो. दुस-या दिवशी पोलिस बंदोबस्त मागतो आणि त्याच दिवशी तात्कालीन आयुक्त पोलिस डिपार्टमेंटला पत्र पाठवतात. तारीख २९/०८/२००७ आहे. वेळ लिहलेली नाही. म्हणजे त्यांनी किती वाजता मागितली आणि ह्यांनी किती वाजता दिली ते जर वेळ असती तर आपल्याला कळले असते. ५.०० वा. म्हणजे अगदी ऑफीस सुटता सुटता त्यांनी पत्र पाठवून दिले. पोलिस सुरक्षा हत्यारासह व संरक्षण मिळणेबाबत संदर्भ - श्री. नरेंद्र मेहता ह्यांचे दि. २९/०८/२००७ चे पत्र. संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यांत येत की, मिरा भाईंदर महानगरपालिका महापौर पदी श्री. नरेंद्र मेहता यांची निवड झाली आहे. संदर्भिय पत्रान्वये त्यांनी संरक्षणाची मागणी केली आहे. त्याप्रमाणे मा. महापौरांना पोलिस हत्यारासह उपलब्ध करुन द्यायची विनंती आहे. ठिक आहे, पोलिस बंदोबस्त मागितला त्यांच्या काही भानगडी असतील. पण पोलिस बंदोबस्त देताना, मागताना त्याचे बिल कोण अदा करणार त्याच ह्याच्यात काही उल्लेख नाही. हे लक्षात घ्या. त्याच्यानंतर त्या महाशयांना पोलिसांनी पत्र पाठवले. पोलिसांनी त्यांना पुरवलेल्या पोलिस सुरक्षेची मागणी केली. त्या पत्राचे त्यांनी श्री. नरेंद्र मेहता यांना पत्र लिहले, कमिशनरांना नाही, महापालिकेला नाही. त्यांनी महापौरांना लिहले आहे की, उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यांत येते की, आपणांस दि. ०६/०९/२००७ ते दि. २४/१२/२००८ पर्यंत भरपाई तत्वावर पोलिस संरक्षण पुरविण्यात आलेले होते. सदरहू पोलिस संरक्षाणीच आगाउ फी प्रत्येक महिन्याला पोलिस ठाण्यात जमा करणेबाबत आपणांस वेळोवेळी लिखित पत्राने कळवून सुध्दा आपण पोलिस संरक्षणाची फी भरलेली नाही असे त्यांना कळवले आहे. दि. ०६/०९/२००७ ते दि. २४/१२/२००८ ह्या कालावधीत पोलिस संरक्षणाची थकीत रक्कम रु. ४,३७,६३६/- इतकी झाली असून त्याचे व्याज ५० हजार रु झालेले आहे. त्याचे व्याज रु. ५०,६५०/- इतके आहे. त्यामुळे आपल्या कडील पोलिस संरक्षणाची थकीत एकूण रक्कम रु. ४,८८,२८६/- येणे बाकी आहे. हे पत्र त्याचे दि. १९/०९/२००८ चे आहे. २१ तारखेला पोलिसांचे पत्र आले आणि २२ तारखेला त्याची शिफारस सचिवांची आहे का? वरील संदर्भिय पत्रानुसार मा. महापौरांना पोलिस संरक्षण, पोलिस निरीक्षक, मिरारोड पोलिस स्टेशन ह्यांच्याकडून पोलिस सरंक्षण पुरविण्यात आलेले होते. पुरवण्यात आलेल्या पोलिस संरक्षणाची फी रक्कम रु. ४,८८,२८६/- देय प्रदानासाठी प्राप्त झली आहे तरी देय प्रदानास शिफारस आहे. साहेबांची सही आहे. आपली सही आहे. एवढी घाईगर्दी, आपला काही संबंध नसताना जनतेच्या पैशाचा अशात-ऱ्हेचा अपव्यय आपण कसा काय करु शकतो? करादात्यांच्या पैशातून महापौरांनी २२ कोटी रु. खर्च केले अशी बातमी या शहरामध्ये आहे. निवडणूकीला २२ करोड रु. जो वाटू शकतो तो ५ लाख रु. देवू शकत नाही आणि त्याचा निवडणूकीचा फॉर्म इलिजिबल होण्यासाठी त्यांनी घाई केली आणि साहेब आपण दुर्देवाने त्यांना सहकार्य केले.

**मा. आयुक्त :-**

कसे?

**जयंत पाटील :-**

केले ना, आपण चेक दिले आणि विशेष महत्वाचे म्हणजे चेक २२ तारखेला दिला आणि त्याची मंजूरी २३ तारखेची आहे. कागदपत्र आहेत. एक तर ह्यावर चेक देतोय युनियन बँक, चेक क्र. २१०७३४, दि. २२/०९/२००९ ह्या रोजी चेक दिला गेला आणि चेक देण्यासाठी शिफारस केली आहे ते दि. २३/०९/२००९ ला केलेले आहे. म्हणजे २३/९ ला चेक द्याचे म्हणून शिफारस केली आहे. पण चेक त्याचा एक दिवस अगोदरच गेलेला आहे. साहेब, ह्या गोष्टी काही बरोबर नाही.

**अरुण कदम :-**

साहेब, आपण त्यांना सुरक्षा ही पोलिसांनी वैयक्तिक कारणासाठी दिली होती. पण आपल्या महापालिकेने त्याचे बिल अदा करण्याचे कारण काय? असा कुठेही स्थायी समितीमध्ये ठराव झाला नाही. कुठे महासभेसमोर चर्चा नाही आणि असे कुठेही आपल्या बजेटमध्ये तरतुद केलेली नाही असे असताना आपण या पैशांचा अपव्यय करण्याचे काही कारण नव्हते. असे आमचे ठाम मत आहे.

**जयंत पाटील :-**

दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, महापौर आपल्या स्वतःच्या घरामध्ये राहतात. महापौर बंगल्यामध्ये राहत नाहीत. आज पण माझ्या माहितीप्रमाणे त्यांच्याकडे तीन कर्मचारी महापालिकेचे काम करतात त्यांना हत्यारी बंदोबस्त घरीसुध्दा पुरवलेले आहे. २४ तास गनमॅन त्यांचा पगार आहे. ८,५००/- रु. पर मन्थ आणि दुसरी सिक्युरिटी दोन आहेत. त्यांचा पगार रु. ६,०००/- आहे. हे काय चालले आहे. ते बंगल्यात राहिले असते तर मला मान्य आहे. बंगल्यात त्यांना सिक्युरिटी दिली पण स्वतःच्या घरी राहतो तर कशासाठी बंदोबस्त? कोणासाठी दिले आहे? कोणापासून भिती आहे?

**मा. आयुक्त :-**

सिक्युरिटी पहिल्यापासूनच आहे ना.

**जयंत पाटील :-**

नाही. पहिल्यापासून आहे ती चुक परत चालु ठेवायची.

**भगवती शर्मा :-**

साहेब, तुम्ही २२ व २३ तारखेला आज पेमेन्ट दिलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

बरोबर, महापौर झाल्यापासूनच हा सगळा बंदोबस्त आहे. त्यांना सिक्युरिटी बंगल्याला किंवा त्यांच्या राहत्या घरी हे सगळेच बंदोबस्त महापौर झाल्यापासूनच आहे.

**जयंत पाटील :-**

ठिक आहे. महापौर आहे म्हणून आहे. पण ते पैसे आपण द्यायचे असे कुठे आहे? तुम्ही सभेची परवानगी घेतली नाही? स्थायी समितीची नाही, महासभेची नाही.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

किस नियम के अंदर दिए गए वह नियम के धारा बताईए। किस नियम के अंतर्गत दिए गए है?

**दादासाहेब पाटील :-**

सन्मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय की, महापौर साहेबांचे पोलिस संरक्षणाचे जे पैसे दिलेले आहेत तर त्या अगोदर महापालिकेने दि. १६/१/२००८ ला पत्र दिले होते. असे पोलिस संरक्षणाचे पत्र आलेले होते. त्यावेळेस हे पत्र दिले होते ते वाचून दाखवित आहे. मा. श्री नरेंद्र मेहता साहेब, महापौर मिरा भाईंदर महानगरपालिका..

**जयंत पाटील :-**

२९ तारखेलाच पत्र पाठविले होते. १६ तर तुम्ही खुप लांबच सांगता.

**अरूण कदम :-**

त्या पत्रामध्ये असे आहे की, हे पैसे त्याने परस्पर भरावे असा उपायुक्तांनी शेरा मारलेला आहे.

**दादासाहेब पाटील :-**

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, मा. आयुक्त सो., ह्यांच्या आदेशानुसार आपणास महापालिका खर्चाने पोलिस बंदोबस्त देता येणार नाही. यापुर्वी पोलिस संरक्षण खर्चापोटी रक्कम ३६,११२/- रू एवढी रक्कम महापालिका फंडात भरणा केलेली आहे तर सदरची रक्कम महापालिका फंडात भरणा केलेली आहे तर सदरची रक्कम महापालिका फंडांत भरणा करावी व पोलिस बंदोबस्ताचा खर्च स्वतःहून करण्यांत यावा ही विनंती. दि. १६/१/२००८ चे आमचे एक पत्र होते. पण आता हे जे पेमेन्ट दिलेले आहे त्याच्यामध्ये असे झाले की, ज्यावेळेस आमच्याकडे सचिव साहेबांकडून प्रस्तावना आली की, हे पैसे देण्याची शिफारस आहे.

**जयंत पाटील :-**

पाटील साहेब, तुमचे कर्तव्य नव्हते की, प्रस्ताव फेटाळणे? तुम्ही लेखापरिक्षक आहात.

**अरूण कदम :-**

माझ्या माहितीप्रमाणे, पाटील साहेबांनी प्रस्ताव फेटाळला होता. पण कोणाच्या दबावाखाली पुन्हा ते प्रकरणाचा चेक काढलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

कोणाच्या दबावाखाली ?

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्या स्नेहा पांडे बोलत होते की, डेंग्यू झालेल्यांना पैसे द्या. तर आयुक्त साहेब इकडे सांगतात की, आम्ही देवू शकणार नाही. त्याच्यामध्ये बंडलगिरी असू शकेल. त्यांना गरिबांना पैसे देवू शकत नाही आणि २२ करोड रू. खर्च करणाऱ्या महापौरांना आम्ही ५ लाख रू. भरतोय हे काय आहे? आणि तुम्ही सगळे पास करता, डोळे झाकून सह्या करता. ह्याच्यावर आता आमचा ठराव येणार आहे तो ठराव ऐकून घ्या.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, आता तुम्ही वसुल कराल हे सर्व खरं आहे. पण आमदारकीच्या निवडणूकीला जे ॲफीडेव्हीट भरायचे असते. टेकनिकली तो प्रॉब्लेममध्ये होता त्यासाठी तुम्ही अधिकारी वर्गाने त्यांना चुकीच्या पद्धतीने सहकार्य केले.

(सभागृहात गोंधळ )

**दादासाहेब पाटील :-**

प्रशासनाची आमची अशी धारणा झाली की, आता इलेक्शन आहे आणि ते उमेदवार आहेत आणि जर हे पैसे भरले नाही व पोलिस संरक्षण काढले तर आम्हांला बरेच अडचणी येऊ शकतील.

**जयंत पाटील :-**

या शहरामध्ये १३ जण उभे होते. त्या १३ जणांना तुम्ही पोलिस बंदोबस्त द्यायला पाहिजे होता.

**अरूण कदम :-**

हा शासनाचा विषय आहे. गृहखात्याचा विषय आहे पालिकेचा विषय नाही. कोणाला संरक्षण देणे, काढणं, ठेवणे.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्य महापालिका निधीतून नियमबाह्य निधीच्या वापराबाबत मी ठराव करतोय. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे महापौर श्री. नरेंद्र मेहता यांच्या वैयक्तीक संरक्षणासाठी महापालिकेच्या निधीतून दि. २२/०९/२००९ रोजी रु. ४,८८,२८६/- चे देयक पोलीस निरीक्षक, मिरारोड पोलीस ठाणे यांना अदा करण्यात आले. सदरहू प्रकरणात मा. महासभा तसेच मा. स्थायी समिती यांची कोणतीही मान्यता नसताना सदरची देयके अदा करण्यात आलेली आहेत. याबाबतची कोणतीही तरतूद मागील अर्थसंकल्पात निर्देशित नसताना मा. आयुक्त यांनी असे देयक अदा करणे हे नियमबाह्य आहे. त्याचप्रमाणे सदरचे देयक आचारसंहिता काळात देण्यात आल्याने मा. आयुक्त यांनी आचारसंहिता भंग केली आहे. या ठरावानुसार नियमबाह्य दिलेले देयक मा. महापौर यांच्याकडून ताबडतोब वसूल करण्यात यावे व महापालिकेच्या निधीचा गैरवापर करुन नुकसान केल्याबद्दल त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावे. असा मी ठराव मांडीत आहे.

**सुधा व्यास :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, ठराव या सभेमध्ये वैध्य आहे, अवैध्य आहे. सचिवांनी सांगावे की, असा ठराव मांडता येतो काय? ह्याचा खुलासा करावा.

**नगरसचिव :-**

२ (के) विषय दिला होता. त्याप्रमाणे सभागृहाची मंजुरी घेऊन त्यांनी तो विषय मांडलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आता महापौर जी गाडी वापरत आहे त्या गाडीचा खर्च कोण देतोय? त्याचे डिझेल, पेट्रोल? ऑडीटर साहेब, सांगा.

**दादासाहेब पाटील :-**

आता सध्या महापौरजी जी गाडी वापरत आहे. त्याचा इंधन भत्ता द्या म्हणून त्यांनी महापालिकेला पत्र दिलेले आहे आणि १७ हजार रू. प्रमाणे त्यांना जे महापालिकेने मंजूर केले आहे ते देता येणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दिले का?

**दादासाहेब पाटील :-**

मंजुर केल्याप्रमाणे देणार आहोत.

**भगवती शर्मा :-**

त्यांनी मागणी केली आहे का?

**दादासाहेब पाटील :-**

होय.

**भगवती शर्मा :-**

कधी?

**दादासाहेब पाटील :-**

ते बघतो आणि तुम्हांला देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण तो पण विषय आणा. यह महापालिकाका पैसा है। महापालिका का पैसा आना चाहिए। कोई भी आदमी ने अगर गैरवर्तन से पैसा लिया है इस महापालिका से आज नही इसके पहले भी अनके पैसे इस तरीके से गया है। इसी महासभा मे कोई भी विषय नही आते हुए भी लाखो रूपया यहा से दिया गया। हमारे पास भी इसका पुरावा है। मुझे कोई महापौर का पक्ष नही लेने का है। २ साल तक जिस विषय को आपने लिया नही। आज इस शहर मे अलग तरह का विषय बनानेका प्रयास इस सभागृह मे होता है वह उचित नही है। हमे यह बोलने का है। आमचा कुठलाही विरोध नाही. महापालिकाचे पैसे वसुल झाले पाहिजे. जर चुकीने गेले आहे. ऑडीटर साहेब, ज्यापध्दतीने हे पैसे त्यापद्धतीने या महासभेमध्ये १५ वर्षामध्ये अनेक पैसे गेले. आमच्याकडे सर्व रेकॉर्ड आहे पण आज तुमच्याकडे मेजॉरिटी असताना कुठलाही विषय नियमाप्रमाणे आणतात. हा विषय नियमाप्रमाणे आयुक्तांवर प्रेशर आणून करणे हे चुकीचे आहे. आयुक्तांकडून वसुल करायचे, तुमची हिंमत पाहिजे. सभागृहाची तुम्हाला बाजु घेण्याची गरज नाही. आज मॅजोरीटी घेउन तुम्ही सभागृहात विषय आणत जर आयुक्तांनी, ऑडीटरांनी पैसा दिलेला आहे तर यापूर्वी ही मी बोललो जेव्हा विषय निघाला होता. एका ऑडीटरने आक्षेप घेतला टेंडरमध्ये. तो रद्द करावा तरी आयुक्तांनी ते टेंडर दिलेले आहे. माझे असे म्हणणे आहे की, साहेब आयुक्त कोणीही असो. महापौर हे असो, आधीचे असो पहिलेच असो जर गैर चुकीने पैसे सभागृहातून गेले तर पैसे गेलेल्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करा. जे जे अधिकारी त्याला जबाबदार आहे त्यांच्यावर पाहिले कार्यवाही करा. एकदा एका अधिकाऱ्यावर कार्यवाही झाली तर ही वेळ पुन्हा येणार नाही आणि दुसऱ्यांदा असा विषय आयुक्तांच्या अधिकारामध्ये आहे. अगर आपले पैसे चुकीने गेलेले आहेत किंवा आपल्या त्या अधिकाऱ्याने चुक केलेली आहे व त्यांच्याकडून वसुल करण्याचे नियम आहे. मग आम्ही पण ठराव मांडतोय की, ज्या अधिकाऱ्याने चुक केली आहे आणि हा धनादेश काढला आहे, प्रथम त्याच्यावर कार्यवाही करा नंतर ते महापालिकेने त्या महापौरांच्या बद्दल पैसे वसुल करावे.

**लक्ष्मण जंगम :-**

आता तुम्ही ठराव केला व ह्याठिकाणी सांगतले की ५ लाखाच्या आसपास चुकीच्या मार्गाने पैसे महानगरपालिकेचे गेले. मला असे वाटते की, हे ५ लाख रु. वसुल झाले तर आपण फायद्यात येणार आहोत. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी सांगितले की, आणि किती तरी प्रकरण अशी आहेत तर आपण बरेच फायद्यात येउ. ती प्रकरणं व्यवस्थित मागवून घेतली पाहिजे व त्याच्यावर ही कार्यवाही झाली पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या सभागृहामध्ये खेळाडूंना २-२ लाख रु. दिले, कोणताही ठराव नसताना. महापौरांना अधिकार नाही की २ लाख रु. देण्याचा, १ लाख रु. देण्याचा अधिकार नाही. या सभागृहामध्ये ठराव मांडलेला आहे आणि या सभागृहाने पैसे दिलेले आहे. २ लाख रु. देण्याचा अधिकारी नाही मग ते पैसे कोण लावणार? तुम्ही त्यावेळी ठराव मांडला. ते पैसे सभेतून कसे गेले? तेव्हा अधिकार का गप्प बसले की, महापौरांना १० हजार रु. पेक्षा जास्त अधिकार नाही आणि २-२ लाख रु. या सभागृहातून गेले. ते कोण वसुल करणार? सन्मा. विरोधी पक्षनेते जंगम साहेब, अशी प्रकरणे तुम्हाला सांगितलेली आहेत. अशी अनेक प्रकरणे आहेत आम्हांला विरोध नाही. महापालिकेचा कुठलाही पैसा जायला नको. हे महापौर असो किंवा कोणीही असो आम्ही कोणाची बाजू घेत नाही. पण आज चुक करतोय. चुक दोन वर्षापूर्वी केली. आज आपण त्याचे दुश्मन झालो म्हणून आपण हा विषय काढतोय हे उचित नाही.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. महापोर साहब, यहॉ पर महासभा के अंदर मैने महापौर साहब से पुछा था की, यह जो आप से कार लेकर घूम रहे हो, मिटींग ले रहे हो। यह महानगरपालिका के तरफ से है या व्यक्तिगत है? उसमे चर्चा हुई थी और महापौर साहबने उस प्रोसेडींग मे बोला था, रेकॉर्ड होगा। यह मेरा व्यक्तिगत है। उसका उस पर चर्चा हुई थी और महापौर साहबने बोला था वह रेकॉर्ड पर होगा की, यह मेरा व्यक्तिगत है। उसका मतलग उसका सारा खर्च व्यक्तिगत था तो उस वक्त मैने बोला था की, महानगरपालिकाने उनको कुछ भी खर्च नही देना चाहिए। तो गाडी का खर्चा, सुरक्षा का खर्चा यह सारा व्यक्तिगत है ऐसा उसने मुझसे मुँह से बोला तो वह महानगरपालिकासे पैसा कैसे ले सकते है? आप कैसे पास कर सकते है? यह प्रोसेडींगमे आया था। मैने उनको बोला था, आप किस तरह कर रहे हो, आप जनरल मिटींग ले रहे हो और नगरसेवक नही है। मतलब आप यह पर्सनल ले रहे हो, तो उन्होने स्विकार किया था की, हॉ मै पर्सनल खर्चेसे जा रहा हू। जब पर्सनल

गए और डिक्लर भी किया था आगे से मै गाडी का उपयोग नही करुंगा। यह प्रोसिडींग मे है। जब वह अपने मुँह से बोला था की, यह मेरा व्यक्तिगत खर्चा है तो महानगरपालिका उसका खर्चा कैसे ले सकते है?

**जयंत पाटील :-**

महाराष्ट्र टाईम्सची एक बातमी वाचून दाखवतोय. त्यांनी पत्रकरांना दिलेली एक मुलाखत आहे. त्याने चार ओळीमध्ये दिलेले आहे. महापौर म्हणून, प्रथम नागरीक म्हणून मला पोलिस संरक्षण दिले होते, पालिकेने दिलेलेच नाही. पण त्यांची मागणी आहे. महापौरांना दिवसरात्र लोकांमध्ये फिरुन काम करावे लागते म्हणून हे संरक्षण देण्यात येते. मी स्वतः महापालिकेची गाडी किंवा बंगला वापरला नाही व पालिकेच्या पैशाची बचत केलेली आहे. म्हणजे त्यांना हे सांगायचे आहे की, मी पालिकेची गाडी वापरत नाही आणि त्याच्यामुळे मला पैशांची गरज नाही किंवा मला पालिकेकडून पैसे नको आहे. पण त्याच्या दुसऱ्या पत्रामध्ये वाहनभत्ता मिळणेबाबतचा अर्ज. एका ठिकाणी महाराष्ट्र टाईम्सला सांगतात तुम्ही पालिकेची गाडी वापरत नाही आणि दुसरीकडे वाहनभत्ता मिळणेबाबत वरील विषयानुसार कळविण्यात येत आहे की, महापौरांसाठी महानगरपालिकेने वाहन दिलेले आहे. आता ते वाहनभत्ता का मागत नाही. हा ही महत्वाचा विषय आहे? त्यांच्या गाडीचा अपघात, निवडणूकीच्या काळात निवडणूक आयोगाला जेव्हा आपण गाडी दिली त्या कर्मचाऱ्यांना, तेव्हा त्यांच्या गाडीला अपघात झाला. पूर्वी तर गाडी त्यांच्याकडे होती. म्हणजे माझ्याकडे नाही म्हणून मी स्वतः माझी गाडी वापरतोय हे सांगणे म्हणजे तो बनेलपणा आहे. त्याला बनेलपणा म्हणतात. माझ्या अगदी चांगल्या भाषेमध्ये आणि असा बनेलपणा फक्त नरेंद्र मेहता उर्फ नरु मेहता उर्फ नारु मेहता हेच करु शकतात. त्यांची बाजू मागच्यांना घ्यायची काही आवश्यकता नाही. महत्वाचा भाग असा आहे की, ज्या ज्या वेळेस आपण निवडणूक आयोगाकडे गाड्या देतो, ते आपल्या कडे मागतात त्यांचा नियम तसा आहे की, आपण दिलीच पाहिजे गाडी की, नाही हे मला माहिती नाही. कदाचित आपल्याला माहिती असेल. परंतु, गाडीचा जेव्हा अपघात होतो तेव्हा ती गाडी दुरूस्त आपल्याला करून द्यावी लागते. त्यांचे म्हणणे असेल की, तुमचा ड्रायव्हर होता. आपण काय त्यांना भाड्याने गाडी देत नाही. आपण त्यांना त्यांच्या विनंतीनुसार गाडी पुरवतो. परंतु, अपघात झाल्यानंतर आपघात होणे हे ड्रायव्हरची चुक आहे असे सांगता येणार नाही. दुसऱ्या गाडीची असू शकते. काहीही कारण असू शकते. पण गाडीची दुरूस्ती आपण करायची.

**मा. आयुक्त :-**

आपण पैसे मागितले आहेत.

**जयंत पाटील :-**

तुम्ही मागितले पण त्यांनी आजपर्यंत कधी दिलेत? मागे एक गाडी कलेक्टरकडे नगरपरिषद असतांना राहिती ती शेवटपर्यंत आली नाही. आम्ही त्या गाडीचे तोंडच पाहिले नाही. आम्हाला निदान त्यांचे भंगार तरी दाखवा. ते पण दाखवत नाही. तरी हा वाहनभत्ता मिळणेबाबत वरील विषयानुसार कळविण्यात येत आहे की, महापौरांसाठी नगरपालिकेने वाहन दिलेले आहे. सदरचे वाहन महापालिकेने लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू झाली त्यावेळी माझ्याकडून काढून घेतले होते. आचारसंहिता लागू असतांना महापालिकेची वाहन राज्य निवडणूक विभाग जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवडणूक कामासाठी स्वतःसाठी ताब्यात घेउन वाहनाचा गैरवापर करतात त्या कारणावरून मी माझ्याकडे असलेल्या पालिकेचे वाहन देण्यास नकार दिला होता. म्हणजे ते मान्य करतात की, पालिकेचे वाहन माझ्याकडे होते. आचारसंहिता काळामध्ये मला घरून कार्यालयात नेण्यासाठी तसेच शासकिय कामासाठी वाहन वापरणेस मुभा होती. मी वाहनाचा वापर राजकिय कारणासाठी करणार नव्हतो. तथापि, आपल्या निवेदनास मान ठेवून महापौरांचे वाहन कोणालाही देणार नाही ह्या आश्वासनानंतर सदरचे वाहन मी आपल्या ताब्यात दिले होते. सदर वाहनाचा अतिशय अयोग्यप्रकारे वापर संबंधित अधिकाऱ्याने केला व शेवटी त्या वाहनाचा अपघात होउन आज ही सदरचे वाहन ना दुरूस्त अवस्थेमध्ये गॅरेजमध्ये आहे. लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता साधारणपणे ४ मे २००९ पासून शिथिल करण्यात आली. नगरपालिकेने मला आचारसंहिता शिथिल झाल्यापासुन आजपर्यंत कोणतेही वाहन दिलेले नाही. मी स्वतः खाजगी वाहनाचा वापर कार्यालयात येण्या जाण्यासाठी तसेच, शासकिय कामानिमित्त मुंबई येथे जाण्यासाठी करतो. असे पत्र आहे आणि दुसरीकडे वाहनभत्ता मिळावा म्हणूनही करत आहोत. त्यांना वाहन भत्ता नियमाप्रमाणे देता येईल. द्यावा लागेल. कारण स्वतःची गाडी जर वापरत असाल तर वाहनभत्ता देण्याचा नियम आहे. पण एकाठिकाणी अशी बातमी सोडायची की, मी किती मोठे उपकार या महापालिकेवर करतोय की, मी एक रूपया घेत नाही मी माझ्या वाहनातुन येतोय. ही सगळी दिशाभुल आहे.

**भगवती शर्मा :-**

एक चीज और है वह जो खाजगी गाडी वापर रहे है उसके अंदर पालिका का ड्रायव्हर ही ड्युटी कर रहा है। यह सबसे महत्वपुर्ण भाग है। जो कह रहे है की, मै कोई सुख सुविधा नही ले रहा हु। वह ड्रायव्हर की सुविधा आज तक महापालिका की ही ली है। तो कही भी ऐसा नही दिख रहा है की, वह जो कहते है वह करते है। इसलिये इस सदन के अंदर मे जो ठराव हो चुका है और मेरा महापौर साहब से एक निवेदन है की, ठराव को मंजुर करके आगे की कार्यवाही के लिये आदेश दे।

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, ठराव मतदानाला घ्या आम्ही मागणी करतोय मतदानाची. सर्वानुमते मंजुर कसे काय घेता?

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

आपण कार्यवाही करून घ्या. पुढचा विषय घ्या.

**शरद पाटील :-**

पुढचा विषय घ्यायच्या अगोदर इतिवृत्तांतावर मला बोलायचे आहे.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

ठराव वाचून घ्या.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, एक ठराव वाचतोय, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण क्र. १ (के) अन्वये ठराव मांडतोय. उत्तन धावगी येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प गेले अनेक महिने बंद आहेत. त्यामुळे मिरा भाईंदर शहरामध्ये कचऱ्याचे ढीगारे साचले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्याबाबत नागरिकांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. सदर विषय मा. महासभा दि. २०/११/२००९ च्या विषपत्रिकेवर नसला तरी संपुर्ण शहराच्या भावना लक्षात घेता सदर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प येणारी दुर्गंधी दुर करून व इतर त्रुटी दुर करून त्वरीत सुरू करावा असा मी ठराव मांडत आहे.

**अनंत पाटील :-**

अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, यह बिना विषय के अंदर ऐसे ठराव हो सकते है क्या? यह विषय विषय पत्रिका मे है ही नही।

**प्रशांत पालांडे :-**

मैने बताया की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका के.....

**भगवती शर्मा :-**

उससे पहले आपको सुचना देनी पडती है।

**प्रशांत पालांडे :-**

हायकोर्टाचा काही संबंध नाही.

**भगवती शर्मा :-**

प्रोसेस है उसका लेकीन प्रोसेस ही नही हुआ है।

**प्रशांत पालांडे :-**

आपण त्यांच्या निर्णयामध्ये कुठे आहोत? आपण आपल्या भावना ठरावाच्याद्वारे कळवू शकतो ना.

**सिसिलिया बावीधर :-**

या ठरावाला माझा विरोध आहे.

**भगवती शर्मा :-**

२(A) (के) के तहेत आपने अभी तक सुचना दि है। इसके लिए ऐसा कोई ठराव हो ही नही सकता।

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

आपल्या ठरावाला सभागृहाची मान्यता नाही.

**प्रशांत पालांडे :-**

सभागृहाला वाचून दाखवले.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

सभागृह नाही म्हणून बोलले.

**नगरसचिव :-**

सभागृहाची ३/४ मान्यता पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

सभागृह मान्यता देत नाही का? आपण सभागृहाला विचारा.

**हेलन गोविंद :-**

विषय नाही आणि विषय नसताना तुम्ही कसा काय ठराव मांडता.

**प्रशांत पालांडे :-**

लक्षवेधीवर त्याच्यावर चर्चा झालेली आहे. सभागृहाला अधिकार आहे, निर्णय घ्यायचा. तो विषय असाच पेंडींग ठेवायचा का?

**जयंत पाटील :-**

राज्य निवडणूक आयोगाचे आपल्याकडे १६ नोव्हेंबर, २००९ चे पत्र आहे आणि आत्ताशी निवडणूका लागलेल्या आहेत. त्यांनी खाली एक टिप दिलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, मा. उपमहापौर साहेब, आपण त्याबद्दल सभागृहाला विचारा.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

सर्वांना विचारले. नाही म्हणून सांगत आहे.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे तो विषयच द्यायचा नाही असे.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

आपणच सभागृहाला विचारा.

**जयंत पाटील :-**

आपण काही विषय येथे आणलेले आहेत. तर या पत्रामध्ये असे लिहिलेले आहे की, या कालावधीत मतदानावर प्रभाव पडेल असा कोणताही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असल्यास राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घेण्यात यावी. आपल्याकडे धोरणात्मक निर्णयासाठी दोन तिन विषय आहेत. तसा त्याच्यामध्ये उल्लेख आहे तर आपण निवडणूक आयोगाची तशी परवानगी घेतली आहे का?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, हे पत्र निर्गमित होण्याच्या तारखेपासुन मिरा भाईंदर, पिंपरी – चिंचवड, नाशिक महापालिकेतील संबंधित प्रभागामध्ये निवडणूक आचारसंहिता लागू होईल. आचार संहिता लागू त्या वॉर्डपुरते आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. उपमहापौर साहेब, सभागृहाला विचारा.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

मी सभागृहाला विचारले सभागृह मंजुरी देत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, लक्षवेधीवर चर्चा करतांना सर्व सभागृहाचे एक मत होते की, तो प्रकल्प सुरू झाला पाहिजे.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

तुमच्या समोरच मी सभागृहाला विचारले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

हातवर करून मतदान घ्या.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

तुम्ही विचारा.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, ते अधिकार तुम्हाला आहेत ना?

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

मी विचारले, सदस्य नाही म्हणून बोलतात.

**प्रशांत पालांडे :-**

तो दुर्गंधी काढून म्हणतोय त्याला तुमची पण संमती आहे ना. दुर्गंधी दूर करा आणि मग चालू करा. ह्याला कोणाचा विरोध असण्याचे कारण नाही.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रशांत पालांडे :-**

नाही. फेटाळला म्हणून तरी सांगा.

**प्रविण पाटील :-**

ज्या विषयावर चर्चा झाली.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

मी फेटाळण्यास कोण आहे? मी विचारले.

**प्रशांत पाटील :-**

तुम्ही पिठासिन अधिकारी आहात. तुम्हाला विचारण्याचे अधिकार आहेत.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब, त्यांनी नियमानुसार तुम्हाला सुचना दिली का?

**नगरसचिव :-**

नाही.

**भगवती शर्मा :-**

मग कसे काय?

**प्रशांत पालांडे :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (२)(१) आणि (के) च्या वर होत असेल तर आम्ही तो ठराव आणू शकतो. सचिवजी ३/४ असेल तर तो ठराव आणू शकतो. मग तुम्ही मतदानाला ठराव टाका.

**नगरसचिव :-**

विषय आणण्यापुर्वीची ती मान्यता असते.

**प्रशांत पालांडे :-**

ह्याच्याप्रमाणे मी ठराव मांडलेला आहे.

**प्रविण पाटील :-**

सचिव साहेब, ज्या विषयावर अख्खा दिवस चर्चा झाली त्याच्यावर तुमचा निर्णय काय ते तरी आम्हाला सांगा का, तुम्ही सांगा आम्हाला प्रकल्प चालू ठेवायचा आहे आणि शहराची हीच परिस्थिती ठेवायची आहे. निर्णय काय?

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

सभागृहाची मान्यता नाही.

**प्रशांत पालांड :-**

मग फेटाळला असे बोला.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

फेटाळला असा बोलणारा मी कोण? सभागृहाला मी विचारले आहे सभागृह मान्यता देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपले ह्याच्यावर काय म्हणणे आहे?

**प्रशांत पालांडे :-**

प्रकल्प सूरू नसेल करायचा तर तसे सांगा. करायचे असेल तर तसे सांगा.

**प्रविण पाटील :-**

नुसता निर्णय तरी द्या. या विषयावर सभागृहाचा निर्णय काय?

**प्रशांत पालांडे :-**

विरोधी पक्षनेते जंगम साहेब, आपण आपली भुमिका मांडा.

**प्रविण पाटील :-**

सभागृहाची भावना कोर्टाला सांगा.

**लक्ष्मण जंगम :-**

सचिव साहेब, आपण खुलासा करायचा आहे की, त्यानी अशापद्धतीने ठरावामध्ये घेउ शकतात का? नियमाला धरून असेल तर घेउन टाका.

**नगरसचिव :-**

सुचना दिल्यानंतर, ३/४ सभागृहाने मान्यता दिल्यानंतर.

**लक्ष्मण जंगम :-**

सभागृहाची मान्यता असे तुम्ही म्हणता तर मग कशापद्धतीने मान्यता घ्यायची? हात वर करून घ्यायची, कशी घ्यायची?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौरांनी आता आदेश द्यावा, ज्यांना ह्या ठरावाच्या बाजुने मतदान करायचे आहे त्यांनी हात वर करून मतदान करावे.

(सभागृहात गोंधळ)

**लक्ष्मण जंगम :-**

सचिव साहेब, प्रकरण न्यायप्रविष्ट असताना न्यायालयामध्ये ह्याची सुनावणी चालू आहे असे असतांना ठराव आणता येतो का ह्याची माहिती घ्या.

**नगरसचिव :-**

याबाबत विधी विभाग सांगू शकतील.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, आपण न्यायालयाच्या निर्णयावर कुठे कॉमेन्ट करत नाही. न्यायालयाचा तसा काही संबंध इथे येत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विधी सल्लागारांनी हे क्लिअर करावे की, ह्यांचा हा जो ठराव आहे तो न्यायप्रविष्ट असल्याने काही प्रॉब्लेम होतो का?

**प्रकरण क्र. २३अ :-**

<u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम १ (के) अन्वये प्रस्ताव</u> मिराभाईंदर महानगरपालिकेचे महापालिका निधीतून नियमबाह्य निधीच्या वापराबाबत.

**ठराव क्र. ३१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे महापौर श्री. नरेंद्र मेहता यांच्या वैयक्तीक संरक्षणासाठी महापालिकेच्या निधीतून दि. २२/०९/२००९ रोजी रु. ४,८८,२८६/- चे देयक पोलीस निरीक्षक, मिरारोड पोलीस ठाणे यांना अदा करण्यात आले. सदरहू प्रकरणात मा. महासभा तसेच मा. स्थायी समिती यांची कोणतीही मान्यता नसताना सदरची देयके अदा करण्यात आलेली आहेत. याबाबतची कोणतीही तरतूद मागील अर्थसंकल्पात निर्देशित नसताना मा. आयुक्त यांनी असे देयक अदा करणे हे नियमबाह्य आहे. त्याचप्रमाणे सदरचे देयक आचारसंहिता काळात देण्यात आल्याने मा. आयुक्त यांनी आचारसंहिता भंग केली आहे. या ठरावानुसार नियमबाह्य दिलेले देयक मा. महापौर यांच्याकडून ताबडतोब वसूल करण्यात यावे व महापालिकेच्या निधीचा गैरवापर करुन नुकसान केल्याबद्दल त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावे. असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्रीम. सुधा व्यास**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २४, लघुलेखक व संगणक चालक यांचेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**शानु गोहिल :-**

प्रकरण क्र. २४, लघुलेखक व संगणक चालक यांचेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. ठराव, मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृतांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकामार्फत त्यांना वेळोवळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र. मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, दि. २९/०९/२००६ च्या पत्रान्वये संगणक चालकाचे काम मंजुर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहयमार्गाने (ग्ह्वद्यद्मदृद्धद्धड़त्दढ़) करुन घेणे अपेक्षित आहे असे नमुद केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दि. ०९/०१/२००८ रोजीच्या मा. महासभेत लघुलेखक व संगणक चालक यांचेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे असा विषय चर्चेस आला असता सर्व संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व कामाची क्षमता याची माहिती घेणेसाठी मा.महापौर साो. यांचे अध्यक्षाखाली एक समिती गठित करण्यात येवून समितीत संगणक विषयी तज्ञ व्यक्तीद्वारे संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व संगणक विषयीचे ज्ञान तपासुन गठीत समितीद्वारे मा.महासभेपुढे अहवाल सादर करण्यात आला होता. या अहवालानुसार संगणक चालक व लघुलेखक यांना ११ महिन्यांची दि. ०३/०७/२००८ पासुन मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदत दि. ३१/०५/२००९ रोजी संपलेली आहे. म्हणुन मा. महासभा दि. १८/०६/२००९ मध्ये विषय घेवुन ठराव क्र. ५ नुसार संगणक चालक यांना रु. ५०००/- (२६ दिवसांसाठी) व लघुलेखक रु. ६०००/- (२६ दिवसांसाठी) याप्रमाणे मानधनावर नेमणुक करणेस मंजुरी दिली आहे. या ठरावाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी व शासनाकडे पुन्हा प्रस्ताव पाठविण्यांत यावा. प्रस्तावावर शासनाकडुन मंजुरी येईपर्यंत मानधनावर काम करणाऱ्या संगणक चालक व लघुलेखकांना सेवेत कार्यरत ठेवावे. जे.एन.एन.यु.आर.एम. मधील नविन योजना कार्यान्वित करण्यासाठी जादा संगणक प्रशिक्षित कर्मचारी लागणार असुन त्यासाठी स्थायी लिपीक वर्गातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब, माझे प्रोसिडींगवर तीन विषय आहे.

**प्रविण पाटील :-**

मा. उप महापौर साहेब, आपण सभागृहाला विचारा. सभागृहाचे मत समजु दे, का आमच्याच वॉर्डामध्ये कचरा नाही. सगळ्यांच्या वॉर्डामध्ये कचरा आहे.

**स्नेहा पांडे :-**

सभी लोगो के विचार तो पुछीए की, क्या है?

**प्रशांत पालांडे :-**

तो ठराव वाचा आणि सभागृहाला मान्य नसेल तर तो ठराव फेटाळा.

**शरद पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब, इतिवृत्तांतामध्ये माझे तीन विषय आहेत. त्यावेळेला चर्चा झालेली आहे आणि आज इतिवृत्तांत होउन एक वर्षे झालेला आहे. आणि एका वर्षात त्याच्यावर काय कार्यवाही झाली त्याचे ठोस उत्तर मला मिळाले पाहिजे नाहीतर आम्ही सभा संपेपर्यंत खाली बसणार आहोत. एकतर पहिला विषय, आयुक्त साहेब यांचा अभिनंदनाचा ठराव पहिल्यांदा झाला. आम्ही सुद्धा त्यांचे अभिनंदन करतोय. रस्ते खाली केलेले आहेत पण मी, त्यावेळेला दि. १९/११/२००८ यादिवशी प्रोसिडींगमध्ये छत्रपती शिवाजी मार्गावर चायनिजच्या टपऱ्या, हातगाड्या फ्लाय ओव्हरच्या खाली आईस्क्रीमच्या गाड्या ह्यापद्धतीने इथे ठराव आला व त्याच्यावर चर्चा झाली होती. तद्‌नंतर ज्या रस्त्याला आपण बोलतोय, या मिरा भाईंदरचे नात आहे. त्या रस्त्यावरचे फेरीवाले आपण अजून हटवू शकत नाही. तेथून आपले अधिकारी रोज गाड्या घेउन येत असतात त्यांना दिसत नाही आपण त्यांना पत्र दिले, काही सांगितले की, पहिले आपल्या अगोदर त्या फेरीवाल्यांना कळल जातय, फल्याने फलान्या नगरसेवकाने पत्र दिलेले आहे की, तुमच्या गाड्या हटविण्यात यावे हा कुठचा कायदा आहे? अधिकाऱ्यांना कसला पगार मिळतोय. हे शहर सांभाळण्यासाठी मिळतोय की, नगरसेवकांनी दिलेल्या पत्राची माहिती देण्याकरिता मिळतोय. हा एक विषय झाला. दुसरा विषय, मच्छर फवारणी होत असूनही त्या औषधामध्ये कुठचेही तथ्य नाही. त्या औषधामध्ये कुठचाही दम नाही. मच्छर त्याच्याने मरत नाही. त्याचे प्रात्यक्षिक आमच्या या सभागृहातील नगरसेवकांनी करून दाखवलेले आहे. त्यांनी ते औषध पिउन दाखवलेले आहे. त्याच्याने खरच मच्छर तर नाहीच व माणूसही मरत नाही व मच्छरांना ही काही होत नाही ते त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवलेले आहे. दि. १९/११/२००८ ला ही चर्चा झालेली होती तद्‌नंतर आज एक वर्ष झाले त्याच्यावर कुठचीही चर्चा होत नाही आणि तिसरा विषय, असा आहे की, ज्या रिझर्व्हेशनमध्ये आपण शाळा बांधण्यासाठी दिलेले आहे. त्या शाळांमध्ये आपल्या महापालिकेकडे १० टक्के रिझर्व्हेशन आहे त्या रिझर्व्हेशनची आणि त्या शाळांची माहितीची पाटी या बोर्डावर लावयची म्हणून बोर्डावर लावण्यासाठी सांगितलेले आहे आणि तो बोर्ड अजूनपर्यंत आपल्या महापालिकेत कुठेही लागला गेलेला नाही की, कुठच्या शाळेला रिझर्व्हेशन दिलेले आहे. आणि कुठच्या शाळेमध्ये आपल्याला १०-१० टक्के ची सुट आहे आणि तिथे आपली महापालिकेची शिफारस गेल्यानंतर ॲडमिशन मिळेल. अशा कुठच्याही शाळेची नाव अजुन तिथे दिलेले नाही. कारण सर्व सदस्यांना माहिती पडावे म्हणून आम्ही त्यावेळेला सांगितले होते की, आपल्या इथे पाटी लावावी आणि त्याच्यात शाळेच्या सर्व रिझर्व्हेशनची माहिती द्यावी आणि आपल्याला कुठे कुठे ॲडमिशन मिळेल ह्याची माहिती द्यावी तर तिथे अजुनही बोर्ड लागलेले नाही. आज एक वर्ष झाले ही तीन कामे माझ्या चर्चेमध्ये आलेली आहेत ती सांगितली आहेत. त्याचे ठोस उत्तर मला द्यावे अन्यथा आम्ही खाली बसून घेतोय व सभा संपेपर्यंत आम्ही खाली बसतोय.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, ज्या ज्या शाळांना ॲकोमेडेशन खाली परवानगी दिलेली आहे त्या त्या शाळेची यादी सगळ्यांना कळवू आणि बोर्डावर पण लावू.

**स्नेहा पांडे :-**

कधी कळवणार?

**मा. आयुक्त :-**

ॲकोमोडेशनखाली परवानगी दिल्यानंतर बांधकाम पुर्ण व्हायला एक वर्ष जातो.

**शरद पाटील :-**

साहेब, हे पहिले झालेले आहे त्याच्यावर ही चर्चा झालेली आहे.

**मा. आयुक्त :-**

दोन दिवसांत कळवितो.

**शरद पाटील :-**

आणि मच्छरांचे काय?

**सुधीर राउत (मा. उपायुक्त (मु.)) सो. :-**

मा. महापौरांच्या संमतीने औषध फवारणी संदर्भात एक निवेदन करू इच्छितोय, मिरा भाईंदर महानगरपालिकेची जी औषधाची जी प्रोक्युअरमेंट आहे. ज्यापद्धतीने आपण औषध घेतो त्याच्यामध्ये वर्षानुवर्षे त्याच औषधाची फवारणी आपण वारंवार करित आहोत. त्यामुळे अर्थातच मच्छरांची त्याबाबतची इम्युनिटी वाढलेली आहे. आम्ही आता नविन मध्ये दोन जैविक म्हणजे वायोलॉजिकली डेव्हलप आणि दोन रासायनिक अशी ४ औषधांची प्रोक्युअरमेंट लवकरात लवकर आम्ही करत आहोत आणि आलटून पालटून मारली जाते

म्हणजे एक औषध कुठल्याही वॉर्डामध्ये ७ दिवसाच्या वर मारले जाणार नाही. आठव्या दिवशी ते औषध परत रिपीट केले जाणार नाही आणि दुसरे ओषध मारणार म्हणजे त्या मच्छरांची इम्युनिटी वाढण्याच्या आत ते औषध पटकन बदलले जाईल आणि हे सर्व महानगरपालिका क्षेत्रामध्ये जेवढे आपले प्रभाग आहेत त्या प्रभागामध्ये आलटून पालटून फवारणी केली जाईल.

**शरद पाटील :-**

उपायुक्त साहेब, आपण बरोबर बोललात. आपली योजना अतिशय चांगली आहे पण ती योजना राबवताना नक्की ती योजना राबविली जाईल का? त्यात लक्ष दिले जाईल का? आपण अधिकाऱ्यांना गाड्या दिलेल्या आहेत. अधिकारी गाडीत बसतच नाही. ऑफिसमध्ये बसलेले असतात. फुकटचा भत्ता चालू आहे. आपण त्यांचे पहिले गाड्या काढा सायकल द्या.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मै शाबासकी दुंगा। सुननेकी जरूरी बात है। मैने पुरे एक साल मे जब पुरा महासभा मच्छर मच्छर कर रहा था। तभी मेरे वॉर्ड के लोग बिल्कुल भी नही कर रहे थे। मै बोलता हु की, जब मच्छर की दवाई यहापर आती है तो, रोज कितना लगता है? क्योंकी दवाई लेते है। आप सामने मिलाकर देखते है ९० एम.एल. के ३ सेटल होते है सुबह और शाम। जो दवा आई थी वह सही थी। मेरे वॉर्ड मे मच्छर नही है। दवाई सही थी। कान देखके चलेंगे तो काम बराबर होता है। मच्छर का प्रॉब्लेम नही है। लेकीन आप मुकादम और ठेकेदार जो काम करते है उसपर अधिकारी लोग शायद छूट देते है और नगरसेवक ध्यान नही रखते है। इसके लिये ऐसा हो रहा है।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आता आपल्या आयुक्तांनी सांगितले की, औषध आलटून पालटून मारणार. एक औषध सात दिवसापेक्षा जास्त राहणार नाही असे आपल्या उपायुक्तांनी सांगितले पण ते औषध मारायचे कशाने? आमच्या वॉर्डामध्ये औषध फवारणीची मशिन सहा महिन्यापासुन बिघडली आहे ती मागता मागता आम्हाला दम लागला का बरे येत नाही आमच्या घरी नेतो का, ती मशिन? किती महिन्यापासुन आम्ही ती मशिन मागतोय. घेउन जा, घेउन जा, म्हणजे तिथे १०-१५ पडले आहेत का? तुम्ही आम्हाला ती मशिन देत का नाही? पावडर मागितली तर आम्हाला असे उत्तर देतात की, आता तुम्हाला एक गोण दिलेली ना? ते काय तांदळाचे पीठ आहे का? घरी नेउन त्याच्या भाकऱ्या बनवायला?

**शरद पाटील :-**

साहेब, उत्तर देताना अजुन एक उत्तर द्यायला सांगा, टेम्पो होते ते कुठे गेले तेही विचारा.

**नयना म्हात्रे :-**

मला उत्तर श्री. संदिप शिंदे ह्यांनी द्यावे ते माझ्याकडचे ऑफिसर आहेत.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आरोग्याच्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत वारंवार तक्रारी होत आहेत. तुम्ही ऐकता ह्याच्या पुर्वी प्रत्येक वेळा ऐकले. मला असे वाटते की, ह्या आरोग्याच्या अधिकाऱ्यांकडून ह्या कामाची नियमित माहिती घेण्याच्या बाबतीत तुम्ही सांगा. वारंवार लोकांच्या तक्रारी आहेत. हे अजिबात केबिन सोडत नाही ही सत्य परिस्थिती आहे. मला वाटते श्री. कांबळे साहेब, श्री. शिंदे साहेब, आपण हे व्यवस्थित ऐकून घ्या. वारंवार ऐकण्याची आदत करून घेउ नका. त्याच्यामध्ये काहीतरी फरक आला पाहिजे. लोकांनी रोजच्या रोज बोंबलायचे सभागृहामध्ये रोजच्या रोज त्याच्यावर चर्चा व्हायची आणि आपण काय आपला नेहमीचा नित्य कार्यक्रम सोडायचा नाही हे काही बरोबर नाही. ह्याच्यानंतर ह्याच्यामध्ये ह्यांना जमत नसेल तर व काय अडचण असेल तर ह्यांना बघा, नाहीतर दुसरे काही वेगळे जमते का ते बघा व जे कोणी एक्टीव्ह असेल त्यांना करा. वारंवार त्याच्या तक्रारी होत असतील तर त्यांची तेथून बदली करा. फॉगिंग मशीनच्या बाबतीत जेवढे मशीन आहेत त्याच्यातील एक ही मशीन चालू नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, स्थायी समितीच्या सभेमध्ये त्या विषयावर भरपूर चर्चा झाली.

**लक्ष्मण जंगम :-**

एका डब्यामध्ये बाटलीमध्ये औषध घेउन जातात ते किती एरियाला मारू शकतात? ह्या परिसरात मारत असतांना हा जो एक टेम्पो, पाठीमागे ड्रम लावून ठेवला आहे. माझ्या बिल्डींगच्या कम्पाउंडमध्ये किती दिवसापासुन उभा आहे. अजिबात त्याच्यामध्ये काही होत नाही. त्याच्यामध्ये कुठले तरी इम्प्लीमेंट व्हायला पाहिजे.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

ठिक आहे कार्यवाही करायला सांगतो.

**जयंत पाटील :-**

प्रकरण क्र. २५ च्या विषयाबद्दल मला विचारायचे आहे की, तुमचा हा विषय स्थायी समितीमध्ये मंजुर झालेला आहे मग इथे परत का आणला?

**प्रविण पाटील :-**

डंपींग ग्राउंड च्या बाबतीत जो ठराव मांडला आहे त्याचे काय?

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

सभागृहाला मी विचारले, सभागृह मंजुरी देत नाही तर मी काय करणार?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, महापौर निधीतुन सहाय्यक निधी मिळणेकरिता आम्ही दोघांनी अर्ज केला त्याच्यावर निर्णय द्या.

**स्टिवन मेन्डोन्सा (पिठासीन अधिकारी) :-**

आयुक्त साहेबांनी निर्णय दिला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

काय निर्णय दिला?

**प्रकरण क्र. २४ :-**

लघुलेखक व संगणक चालक यांचेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ३२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा प्रत्येक विभाग संगणकीकृत करण्यात आलेला असुन संगणक चालविणेसाठी प्रशिक्षित व अनुभवी संगणक चालकांची व इतिवृतांत तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने मा. महासभा दि. २०/०६/२००६, ठराव क्र. २९ नुसार संगणक चालक व लघुलेखकांची महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती. त्यांची मुदत संपलेनंतर महानगरपालिकामार्फत त्यांना वेळोवळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. लघुलेखक/संगणक चालक पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे दि. २६/०७/२००६ रोजी मंजुरीसाठी पाठविला असता नगरविकास विभागाने पत्र क्र. मिभामपा-११०६/१३९०/नवि-२८, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, दि. २९/०९/२००६ च्या पत्रान्वये संगणक चालकाचे काम मंजुर पदावर कार्यरत कर्मचारी किंवा बाहयमार्गाने (ग्द्वद्यद्मदृद्वद्धड़त्दढ़) करुन घेणे अपेक्षित आहे असे नमुद केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दि. ०९/०१/२००८ रोजीच्या मा. महासभेत लघुलेखक व संगणक चालक यांचेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे असा विषय चर्चेस आला असता सर्व संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व कामाची क्षमता याची माहिती घेणेसाठी मा.महापौर सो. यांचे अध्यक्षाखाली एक समिती गठित करण्यात येवून समितीत संगणक विषयी तज्ञ व्यक्तीद्वारे संगणक चालक व लघुलेखक यांची शैक्षणिक पात्रता व संगणक विषयीचे ज्ञान तपासुन गठीत समितीद्वारे मा.महासभेपुढे अहवाल सादर करण्यात आला होता. या अहवालानुसार संगणक चालक व लघुलेखक यांना ११ महिन्यांची दि. ०३/०७/२००८ पासुन मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदत दि. ३१/०५/२००९ रोजी संपलेली आहे. म्हणुन मा. महासभा दि. १८/०६/२००९ मध्ये विषय घेवुन ठराव क्र. ५ नुसार संगणक चालक यांना रु. ५०००/- (२६ दिवसांसाठी) व लघुलेखक रु. ६०००/- (२६ दिवसांसाठी) याप्रमाणे मानधनावर नेमणुक करणेस मंजुरी दिली आहे. या ठरावाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी व शासनाकडे पुन्हा प्रस्ताव पाठविण्यांत यावा. प्रस्तावावर शासनाकडुन मंजुरी येईपर्यंत मानधनावर काम करणाऱ्या संगणक चालक व लघुलेखकांना सेवेत कार्यरत ठेवावे. जे.एन.एन.यु.आर.एम. मधील नविन योजना कार्यान्वित करण्यासाठी जादा संगणक प्रशिक्षित कर्मचारी लागणार असुन त्यासाठी स्थायी लिपीक वर्गातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल** **अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रफुल्ल पाटील व अनुमोदक श्रीम. सुनिता भोईर यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सदर संगणकचालक व लघुलेखक यांना दर ११ महिन्यानंतर १ दिवसाचा खंड देउन पुन्हा सेवेत ठेवण्यात यावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २५, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील घरे, दुकाने व इतर मालमत्तांना नंबर प्लेट लावणेकामी खाजगी संस्थाकडून निवीदा मागविणेबाबत.

**जयंत पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवर मालमत्ता क्र. दर्शविणारे स्टेनलेस स्टीलचे नंबर प्लेट लावणेकामी खाजगी संस्थांनी प्रशासनाशी तयारी दर्शविली आहे.

महानगरपालिका हद्दीत सन २००८-०९ पर्यंत एकूण मालमत्तांची संख्या ३५,५११ व खातेदारांची संख्या २,५२,५३९ इतकी असून सन २००९-१० या आर्थिक वर्षात मालमत्ता ४० हजार व खातेदार ३ लाख इतकी संभाव्य वाढ होणार आहे. विविध मालमत्तांना नंबर प्लेट लावल्यास पत्रव्यवहाराच्याकामी, रेशनकार्ड कामी, जनगणनेकामी, असेसमेंटकामी, निवडणुककामी, महानगरपालिकेच्या कर वसूलीच्या सोईच्या दृष्टीने मोलाची मदत होणार आहे. सदर कामी प्रत्येक मालमत्ताधारकांकडुन मंजूर संस्थेने त्यांचे मनुष्यबळ वापरुन मालमत्तेवर दर्शनी भागावर ठरवून दिलेल्या आकाराची स्टेनलेस स्टील प्लेट लावावी असे ठरविणे इष्ट होईल. याकामी मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ४६ दि. ०७/०८/२००९ अन्वये निविदा मागविणेस मंजूरी दिली होती. त्या अनुषंगाने दि. ०२/०९/२००९ रोजीच्या दै. वृत्तमानस या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करण्यांत आली असून आलेल्या एकुण ५ निविदाधारकांपैकी मे. महाशक्ती महीला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्या. यांची निविदा सर्वात कमी (रु. ६०/- प्रती नग) दराची निविदा स्विकारुन त्याप्रमाणे रितसर मालमत्ता धारकांकडुन त्या संस्थेने शुल्क स्वतः वसूल करावे हि अट ठरवून सदर निविदा धारकास मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील घरे, दुकाने, झोपडपट्टया व इतर मालमत्तांना नंबर प्लेट लावणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**भगवती शर्मा :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण ठराव मतदानाला घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

या ठरावावर एक सुचना अशी होती की, स्थायी समितीमध्ये हा विषय आला होता. यापुर्वी पाणी पुरवठा विभागाने ॲल्युमिनियमचे बिल्ले आपल्या प्रत्येक घरावर लावलेले ते नित्कृष्ट दर्जाचे आहेत आणि आपल्या हवामानानुसार गळून पडतात आणि सडतात. त्यावेळेला आयुक्त साहेब, तुम्ही स्वतः ह्या मिटींगला होता. स्टीलच्या बिल्ल्यांची मी सुचना केली होती त्याचा उल्लेख इथे काही नाही स्टीलच्या प्लेटवर ॲम्बोसिंग करून ते लावायचे.

**नयना म्हात्रे :-**

मा. उप महापौर साहेब, आता जो ठराव वाचला गेला तर त्या गल्ल्यांना सुद्धा नंबर द्या. जेणेकरून त्या झोपड्या वाढणार नाहीत.

**प्रकरण क्र. २५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील घरे, दुकाने व इतर मालमत्तांना नंबर प्लेट लावणेकामी खाजगी संस्थाकडून निवीदा मागविणेबाबत.

**ठराव क्र. ३३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवर मालमत्ता क्र. दर्शविणारे स्टेनलेस स्टीलचे नंबर प्लेट लावणेकामी खाजगी संस्थांनी प्रशासनाशी तयारी दर्शविली आहे.

महानगरपालिका हद्दीत सन २००८-०९ पर्यंत एकूण मालमत्तांची संख्या ३५,५११ व खातेदारांची संख्या २,५२,५३९ इतकी असून सन २००९-१० या आर्थिक वर्षात मालमत्ता ४० हजार व खातेदार ३ लाख इतकी संभाव्य वाढ होणार आहे. विविध मालमत्तांना नंबर प्लेट लावल्यास पत्रव्यवहाराच्याकामी, रेशनकार्ड कामी, जनगणनेकामी, असेसमेंटकामी, निवडणुककामी, महानगरपालिकेच्या कर वसूलीच्या सोईच्या दृष्टीने मोलाची मदत होणार आहे. सदर कामी प्रत्येक मालमत्ताधारकांकडुन मंजूर संस्थेने त्यांचे मनुष्यबळ वापरुन मालमत्तेवर दर्शनी भागावर ठरवून दिलेल्या आकाराची स्टेनलेस स्टील प्लेट लावावी असे ठरविणे इष्ट होईल. याकामी मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ४६ दि. ०७/०८/२००९ अन्वये निविदा मागविणेस मंजूरी दिली होती. त्या अनुषंगाने दि. ०२/०९/२००९ रोजीच्या दै. वृत्तमानस या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करण्यांत आली असून आलेल्या एकुण ५ निविदाधारकांपैकी मे. महाशक्ती महीला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्या. यांची निविदा सर्वात कमी (रु. ६०/- प्रती नग) दराची निविदा स्विकारुन त्याप्रमाणे रितसर मालमत्ता धारकांकडुन त्या संस्थेने शुल्क स्वतः वसूल करावे हि अट ठरवून सदर निविदा धारकास मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील घरे, दुकाने, झोपडपट्टया व इतर मालमत्तांना नंबर प्लेट लावणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २६, महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

**प्रशांत पालांडे :-**

मा. उपमहापौर साहेब, आमचा ठराव वाचून तर दाखवा. एवढी आमची विनंती मान्य करा व सभागृह काय म्हणते ते विचारा. तुम्ही दिलेला ठराव वाचून ही दाखवल नाही. नसेल मान्य तर नाही म्हणून सांगा. कमीत कमी त्याचे वाचन तर करा. सभागृहाला मान्य नसेल तर ते फेटाळून लावतील.

**भगवती शर्मा :-**

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असुन राज्य शासनाकडुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्यात येत नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/ नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री.महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

**“महानगरपालिकेने कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचा-यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल.”**

वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. ३१/१०/२००२ रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकित ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईल – १०९७/ प्र.क्र.२६१/ नवि-२४, दि. २७/११/२००२ अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असुन गेल्यावर्षी मा. महासभा दि.१०/१०/२००८ ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग- २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना रु.५,८३०/- महापालिका शिक्षकांना रु. ५,८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कर्मचारी संगणक चालक यांना रु. ३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना रु. ११००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान वाटपास मंजुरी दिलेली आहे.

सन २००८-०९ या वर्षी कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनेने पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. ७५००/- |
| २) | मिरा भाईंदर कामगार सेना | रु. १००००/- |
| ३) | कास्ट्राईब कर्मचारी महासंघ | रु. ८०००/- |
| ४) | श्रमजीवी वाराई माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना (रजि.) | रु. ८०००/- |

सन २००९-१० च्या अदांजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरीता तरतुद लेखाशिर्ष “संकिर्ण” ‘फ’ (१६) मध्ये रु. ११०.०० लाख आहे. महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गाची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **कर्मचारी** | **कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २००८-०९** | **सन २००८-०९ या वर्षात कार्यरत कर्मचा-यांना देण्यात आलेले अनुदान (२००८-०९)** | |
|---|---|---|---|---|
| १) | महापालिका आस्थापनेवरील वर्ग- २ ते ४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १३९१ | रु. ५८३०/- | ८१,०४,६७२/- |
| २) | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | २०२ | रु. ५८३०/- | ११,४०,७३७/- |
| ३) | रोजंदारी कर्मचारी, सुवर्ण जयंती योजना, | २ अ २ अ १ उ ५ | रु. ३६३०/- | १८,१५०/- |
| ४) | संगणक चालक, लघुलेखक | ७९ | रु. ३६३०/- | २,८३,७४६/- |
| ५) | बालवाडी शिक्षिका | ९ | रु. ११००/- | ९,२५८/- |
| | | | **एकुण** | **९५,५६,५६३/-** |

परंतु यावर्षी दि. ३१/०८/२००९ रोजी पासुन राज्यात राज्य निवडणुक आयोगाने विधान सभेची आंचार संहिता लागु केलेली आहे. राज्यात आचारसंहिता लागु असल्यामुळे महानगरपालिकेची आमसभा सुध्दा घेता

येत नाही. परंतु आचांर संहिता कालावधीत दिवाळी आल्यामुळे दि. २७/११/२००२ च्या शासनाचे पत्रान्वये व कर्मचारी संघटनाच्या मागणीनुसार उक्त तपशिलाप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी दिलेल्या सानुग्रह अनुदानानुसार यावर्षी मा. महासभेने गतवर्षी मान्यता दिल्याप्रमाणेच  सन २००८-०९ या वर्षात नियमित कार्यरत कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान दिल्याने एकुण रक्कम रु.९५.५७ लाख खर्च झालेला आहे.

तरी महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांस सन २००८-०९ चे सानुग्रह अनुदान वाटप करणेस झालेल्या रु. ९५.५७ लाख या खर्चास ही सभा कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंग :-**

मा. उप महापौर साहब, यह जो महानगरपालिका अधिनियम मे यह कार्योत्तर मंजुरी का नियम है क्या?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, या विषयाची सानुग्रह अनुदान देण्याबाबत आमचा कोणताही विरोध नाही पण कार्योत्तर मंजुरी १० लाखाच्या वर देता येत नाही आणि तसा काय नियम असेल तर तो नियम आम्हाला ऑडीटर साहेबांनी सांगावा.

**दादासाहेब पाटील :-**

सन्मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतोय, ह्या काळात निवडणूक आचारसंहिता असल्यामुळे त्याची आम्हाला मान्यता घेता आली नाही म्हणून ते कार्योत्तर मंजुरीसाठी आपल्यापुढे सादर केलेले आहे.

**शरद पाटील :-**

त्याची कार्योत्तर मंजुरी आता आपण महासभेसमोर मांगत आहात हे आपल्या नियमानुसार आम्ही देवू शकतो का?

**दादासाहेब पाटील :-**

होय.

**शरद पाटील :-**

१० लाखाच्या वर, आम्हाला ह्याचे फक्त उत्तर द्या. आम्हाला दुसरे काही विचारायचे नाही. तुमचे सानुग्रह अनुदान तुम्ही दिलेले आहे. कार्योत्तर मंजुरी महापालिकेची, सभागृह आता तुम्हाला देवू शकते का?

**दादासाहेब पाटील :-**

होय देवू शकतो.

**शरद पाटील :-**

आणि ह्याचा कधी टेक्नीकली प्रॉब्लेम आला तर त्याची सर्वस्व जबाबदारी प्रशासनाची आहे. त्याला आम्ही जबाबदार राहणार नाही. भारतीय जनता पार्टी, शिवसेनेचे सदस्य त्याला जबाबदार राहणार नाही.

**अरूण कदम :-**

साहेब, २४ नंबरचा ठराव आपण घाईगर्दीमध्ये वाचला पण त्याच्यामध्ये शेवटची लाईन आहे की, ह्या प्रमाणे मानधनावर नेमणूक करणेस मंजुरी दिली आहे. या ठरावाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी व शासनाकडे पुन्हा प्रस्ताव पाठविण्यात यावा. या प्रस्तावावर शासनाकडून मंजुरी येईपर्यंत मानधनावर काम करणाऱ्या संगणकचालक व लघुलेखकांना सेवेत कार्यरत ठेवावे. जे.एन.एन.यु.आर.एम. मधील नवीन योजना कार्यन्वित करण्यासाठली ज्यादा संगणक, प्रशिक्षीत कर्मचारी लागणार असून त्यासाठी स्थायी लिपिक वर्गातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे आपण शासनाकडे ह्यांचा प्रस्ताव पाठविला होता अगोदर, त्याचे काय झाले? त्यांची काय माहिती आहे का?

**सुधीर राउत (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने सांगू इच्छितो, यापुर्वी २६/०७/२००६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेने पाठवलेला जो प्रस्ताव आहे, संगणक चालक व लघुलेखक नेमण्यासंदर्भात हा २९/०९/२००६ च्या पत्रामध्ये नगरविकास विभागाने नामंजुर केलेला होता. प्रस्ताव मान्य करता येत नाही आणि संगणक चालकांच्या मंजुर पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमार्फत किंवा बाह्यमार्गाने (आउट सोर्सींग) करून घेणे अपेक्षित आहे. तरी याबाबत महानगरपालिकेने आवश्यकतेप्रमाणे निर्णय घ्यावा अशा पद्धतीचा प्रस्ताव अमान्य केलेला आहे.

**अरूण कदम :-**

साहेब, पण ह्या प्रस्तावात तुम्ही पुढे म्हटले आजहे की, या प्रस्तावावर शासनाकडून मंजुरी येईपर्यंत मानधनावर कामकाज करावे. तुमचा अगोदरचा प्रस्ताव चार वर्षे झाली अजुन आला नाही. तुम्ही पुढचा प्रस्ताव मंजुर होईपर्यंत यांना कामावर ठेवणार आहात का?

**सुधीर राउत (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महापौरांच्या संमतीने बोलू इच्छितो आमची जी प्रशासनाची टीपणी आहे ही महानगरपालिकेचे जे कर्मचारी आहेत जे एम.एस.सी.आय.टी पास झालेले आहेत, त्याचप्रमाणे त्यांना संगणकचालकाचे ज्ञान आहे

किंवा नाही. तर ते त्यांचे ट्रेनिंग पुर्ण करून घ्यायचे आहे आणि एकदा ते ट्रेन झाले की, त्याच्यानंतर त्यांना त्या कामाला करायचे आहे.

**अरूण कदम :-**

मग आपल्या लिपिकांना तुम्ही अशा नोटीस दिल्या का? त्यांचे प्रशिक्षण पुर्ण झाले आहे का? ते काम आपल्या लिपिकांकडून का होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही आत्ता जे पत्र वाचून दाखवले हा प्रशासनातर्फे आलेला प्रस्ताव आहे. तुम्हाला जे आवश्यक कर्मचारी आहेत, ते ठेवणे गरजेचे आहे. पण कम से कम या अगोदरचा प्रस्ताव फेटाळलेला आहे. आत्ता यांनी हा ठराव जो केला आहे. त्याच्यामध्ये त्यांनी प्रस्ताव मान्य होईपर्यंत म्हणजे घाईघाईने तुम्ही काही ठराव कराल आणि एकमताने ठराव मंजुर. स्वतःही गोत्यात येतील, आम्हालाही आणतील.

**अरूण कदम :-**

याच्यामुळे सर्व सभागृह अडचणीत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा एक प्रस्ताव अमान्य केला हे तुम्ही टिपणीत दिले पाहिजे. तुमच्याकडे टिपणी आहे ती तुम्ही आता ठराव मंजुर झाल्यानंतर वाचून दाखवता.

**अरूण कदम :-**

आपण सहा महिन्यापेक्षा जास्त ठेवू शकत नाही. तुम्ही त्यांना सहा सहा महिन्यांनी कंटीन्यु करून ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला तुमच्या गोषवाऱ्यामध्ये पारदर्शकता ठेवायला काय होते की, असे असे पत्र आले आहे. पत्र अमुक आणि त्याचे असे एक असे तुम्हाला पॅरेग्राफमध्ये आले पाहिजे.

**सुधीर राउत (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

१८/०६/२००९ मध्ये अशासकिय विषय असा एक मा. महापौर महोदयांकडून आला होता.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मान्य आहे. त्यावेळेला आम्ही सभागृहात घेतो. आता परिस्थिती निराळी आहे. तुमचा प्रस्ताव त्यावेळेससुद्धा मंत्रालयात पेंडींग होता. तो आत्ता त्यांनी फेटाळलेला आहे. असे असतांना तुम्ही या गोषवाऱ्यामध्ये दोन ओळी तर लिहा. अगोदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आलेला आहे. तरीसुद्धा आपल्याला हे असे असे करायचे आहे. आत्ता यांनी जो ठराव पास केला त्याच्यामध्ये परत तुम्ही लिहिले आहे की, शासनाकडे प्रस्ताव पाठवायचा आहे. आत्ता तुम्ही परत दुबार जेव्हा प्रस्ताव पाठवणार तर तो पहिला निर्णय बदलला जाणार आहे का?

**सुधीर राउत (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्हाला त्याला ठरावामध्ये बंधन घातले पाहिजे. परत ४५१ पासुन सुरूवात होणार. म्हणजे जे संगणक चालक आहेत ते त्रासामध्ये येतील की नाही? त्यांच्या एका लाईनमुळे त्यांना अजुन अमेंडमेंट करायला सांगा. त्या खोडून त्याच्यावर बाकीचे मंजुरीचे घ्या. प्रस्तावाचे त्याच्यामध्ये कशाला ठेवता? जी वस्तु फेटाळली गेली ती ठरावात परत कशाला टाकायची?

**अरूण कदम :-**

साहेब, मला काय म्हणायचे आहे की, शासनाची मंजुरी जर चार पाच वर्षे आली नाही तर यांना पाच वर्षे कंटीन्यु कामावर ठेवणार का? याचे उत्तर द्या. तुम्ही ठरावच तसा मांडलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यात कार्यकाल नक्की केलेला नाही. त्यांनी जो ठराव मांडण्याचा विषय केला आहे तो त्या नियमानुसार नाही.

**प्रभात पाटील :-**

प्रत्येक अकरा महिन्यांनी.

**मिलन म्हात्रे :-**

जे काही असेल कालावधी टाका.

**प्रभात पाटील :-**

गेल्या सहा वर्षामध्ये प्रत्येक अकरा महिन्यांनी किंवा प्रत्येक सहा महिन्यांनी हा विषय येतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्या ठरावामध्ये कालावधी टाका.

**प्रभात पाटील :-**

ते संगणकचालक प्रत्येक नगरसेवकांकडे धावतात की, आमचा हा ठराव पारित करा. त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न आहे, रोजंदारीचा प्रश्न आहे. म्हणून ते दहा लोकांकडे जातात. त्यांचा पाच महिन्यांचा ठराव झाला, सहा महिन्यांचा झाला, किंवा अकरा महिन्यांचा झाला. ते दहा महिने स्वस्थ असतात की, दहा महिन्यांसाठी आमचे काहितरी झाले. अकराव्या महिन्यात पुन्हा धावायला लागतात. पुन्हा तो विषय आणि माझ्या माहितीनुसार तुम्हाला सांगते की, विषय पटलावर येण्यासाठी सुद्धा त्यांना इथला मुख्य पुढाऱ्यांचे उंबरठे झिजवावे लागतात. आणि त्यांच्यानंतर सन्मा. सभागृहाची मान्यता आहे. हे असे कित्येक महिने चालणार. तुम्ही एकीकडे म्हणता की, आम्ही आमच्या लिपिकांना ट्रेन करतो. त्याचा तुमचा अहवाल आमच्यापर्यंत नाही. तुम्ही त्याच्यात फक्त दोन ओळी म्हटलेल्या आहेत. तुमचे लिपिक किती वर्षे ट्रेन होत आहेत? त्यांना कोण ट्रेनिंग देते याची महिती तुमच्या टीपणीमध्ये आहे? किती दिवसांनी ती ट्रेन होणार आहेत? किती दिवसापासुन त्यांना ट्रेन करायला घेतले आहे. किती लोक ट्रेन होणार आहेत? एवढ्या संगणकचालकांचे काम ते करणार आहेत का? मला हे काही कळत नाही. या लोकांना आपण किती वर्षे आशेवर ठेवणार तुमची टीपणी क्लिअर असू द्या. म्हणजे त्यांचा तो ठराव तसा होईल. बिचारे कुठेतरी शोधायला तरी लागतील आणि काम करतात हे तर निश्चित आहे. ठिक आहे, काही वेळेला आवाज उठतो की, त्यांना शिस्त नाही. ते वेळेवर येत नाहीत. ते उशिराने येतात. ते लवकर पळतात. त्यांच्यावर नियोजन कोणी, नगरसेवकांनी ठेवायचे? मग तुम्ही काय करता सगळ्या गोष्टी नगरसेवकांनी करायच्या. औषध फवारणी होते की नाही? ते औषध चांगले आहे की नाही? त्याच्याने मच्छर मरतात की नाहीत? कचरा कुठे साचतो? हे सगळे नगरसेवकांनी एक दिवस सगळ्या नगरसेवकांनी उठायचे आणि त्या सगळ्या केबिन तोडून टाकायच्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर महोदय, २९/०६/२००६ रोजी जेव्हा आपण प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता की, आम्हाला त्यांना रितसर सेवेत घ्यायचे आहे. जेव्हा महापालिका एखादा प्रस्ताव एखादी पदे भरण्यासाठी पाठविते तेव्हा महापालिकेला हे माहिती असायला पाहिजे की, त्याच्या अगोदर पदनिर्मिती झालेली आहे का? तुम्ही पाठवलाच चुकीच्या वेळी. त्याच्या अगोदर तुम्ही पदनिर्मितीचा प्रस्ताव पाठवायला पाहिजे होता. पदनिर्मितीचा प्रस्ताव पाठवत असतांना सेवाप्रवेश नियम करायला पाहिजे होते. त्याचे क्वालिफिकेशन फायनल करून घ्यायला पाहिजे होते. त्याच्यामुळे तुम्ही चुकीच्या पद्धतीने पाठविला. म्हणून शासनाने असे म्हटले की, आउटसोर्सिंगने घ्या. आत्ता शिक्षकांच्या बाबतीत पण असेच झालेले आहे. तुम्हाला शिक्षक भरायचे आहेत, शिक्षक मिळत नाही म्हणून तुम्ही आउटसोर्सिंगने शिक्षक घेताना नेमके काय झाले तुम्हाला माहिती आहे, अठरा वर्षाखालील काही शिक्षक काम करतात. अज्ञान शिक्षक इथे मुलांना सज्ञान करायला आलेले आहेत. हे तुमच्या पालिकेचे काम आहे. म्हणजे एखादा कर्मचारी सहा सहा वर्षे, दहा दहा वर्षे त्यांनी इथे प्रामाणिकपणे काम करायचे आणि मग त्यांना डावलून दुसऱ्या पद्धतीने घ्यायचे. मग परत तसेच असेल, पुर्वीच्या सत्तावीस शिक्षकांना पाठवायचे होते. त्याच्यामध्ये अठरा घेतले. नउ घरी बसवले. जे नउ आले त्याच्यामध्ये तुमच्या अधिकाऱ्यांचे नातलग आहेत. ते नउ अजुन उंबरठे झिजवतात. त्यांना आपण अजून शिक्षीका म्हणून घेतलेले नाही. शिक्षकांच्या जागा खाली आहेत. गंमतीची गोष्ट अशी आहे की, शिक्षकांच्या जागा खाली आहेत. शिक्षक अधिकारी सांगतात की, आम्हाला अजुन डेप्युटी डायरेक्टरने किंवा डायरेक्टर ऑफ एज्युकेशनने मान्यता दिली नाही की, त्या जागा भराव्या असे असतांना तुम्ही खाजगी शाळेचे शिक्षक डायरेक्ट महानगरपालिकेच्या सेवेत घेता. केवढी सेटींग. मा. महासभेला माहितीपण नाही. ज्या हिंदी शाळा चालतात तिथले काही शिक्षक त्या हिंदी शाळेच्या व्यवस्थापनाला नको आहेत. ते मा. महासभेला न विचारता, मा. स्थायी समितीला न विचारता तुमच्या शिक्षण अधिकाऱ्यांनी डायरेक्ट तुमच्या महानगरपालिकेच्या सेवेत घेतले. ते परमनंट झाले. म्हणजे काय चालले आहे? बघितले की, ही मुल काम करतात. आत्ता यांना कसेतरी करून बाहेर काढा. म्हणजे मग आपले दुसरे यायला मोकळे झाले. अधिकाऱ्यांची काम करायची वृत्ती काय आहे? २००६ ला. जर तुमचा आउटसोर्सिंगचा निर्णय आला. मग २००९ पर्यंत या लोकांना का ठेवले आहे? आशेवर ठेवले आहे? म्हणून मा. महासभेने वेळोवेळी त्यांना मुदतवाढ दिली. कोणी सांगत असेल की, ते काम करत नसतील तर मला असे विचारायचे आहे की, याठिकाणी आत्ताच लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणूका झाल्या. तुमच्या किती कर्मचाऱ्यांनी संगणकावर निवडणूकीचे काम केले? श्री. शितोळे साहेब, रिटर्निंग ऑफिसरना त्या मुलांचा रिपोर्ट विचारा की, जर ते लोक नसते तर या निवडणूकासुद्धा नीट पार पडल्या नसत्या कारण संगणक चालाकंचे सगळे काम आहे? दाखवतात की, त्यांना काढण्यासाठी तुम्ही लिपिकांना ट्रेनिंग देणार आणि तुमच्या गोषवाऱ्यामध्ये तुम्ही पुढे काय लिहिले आहे की, जे लिपिक कर्मचारी प्रशिक्षण पुर्ण करणार नाहीत त्यांना पदावनत करणार. आत्ता तुम्ही मला सांगा, तुम्ही पदावनत करू शकता का? कारण तुम्ही लिपिक घेतले आहेत तेव्हा त्यांच्या क्वालिफिकेशन फिक्स आहेत. त्यांच्या क्वालिफिकेशन त्यांची शेक्षणिक आर्हता पुर्ण करतात म्हणून त्यांना तुम्ही लिपिक घेतले. आत्ता तुम्ही त्यांना सांगितले की, तुम्ही कम्प्युटर शिकले नसणार तर घरी जा. म्हणजे एखादा जीप गाडी चालवणार असेल त्याला तुम्ही ड्रायव्हर म्हणून घेतलात आणि त्याला सांगितले की, आत्ता तुला विमान चालवावे लागेल आणि विमान चालव नाहीतर घरी जा. त्या लिपिकांना तुम्ही एक सांगा की, तुमच्या नेमणूकपत्रामध्ये अशी अट टाकलेली आहे का? सेवा प्रवेश नियमामध्ये अशी अट नाही.

एक गोष्ट अशी आहे की, तुम्ही एक व्यवस्था करायला बघता की, आपले संगणक कोणीतरी हाताळले पाहिजेत. आणि ते हाताळत असताना आपल्या लिपिकांना आपण ट्रेन करूया. तुमच्या लिपिकांकडे एवढे काम आहे की, तुमची टॅक्सची बिले किती वर्षांनी जातात? पाउण वर्षाने टॅक्सची बिल जातात. पाण्याची बारा महिन्याने जातात. संगणकाचे आधुनिकीकरण करायला निघाले आहेत. कुठे गेल्या त्या सिस्टम मॅनेजर. त्यांना जरा बोलवा. त्याच सांगतात की, ही मुले काम करत नाहीत. यांना काढून टाका आणि या लिपिकांना प्रशिक्षण करा. मला त्यांची क्वालिफिकेशन विचारायची आहे. सिस्टीम मॅनेजर म्हणून तुम्ही त्यांना घेतले. त्यांची क्वालिफिकेशन काय आहे? करोडो रूपयांचा डी.पी.आर. तुम्ही आम्हाला मागच्या सभेला मान्यता द्यायला सांगितली की, आत्ता निवडणूका लागतील. तुम्ही डी.पी.आर. ला लवकर मान्यता द्या. म्हणजे सगळे नगरसेवक बुद्धु समजता काय? बारा करोड ह्या डी.पी.आर. मध्ये ई-गर्व्हनन्स.

**अनिल सावंत :-**

हे सहा करोडचे पण काम नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

सहा करोडचेपण काम नाही आणि हा डी.पी.आर. कोणी बनवला कुठे आहेत? त्यांना बोलवा. निवेदन करायला सांगा. म्हणजे असे आहे ना की, कोणाला नगरसेवकांना कम्प्युटर कळत नाही म्हणून कम्प्युटर संबंधित काही ही आपण लिहून द्यायचे. पहिले ह्यांना विचारा की, तुमचे क्वालिफिकेशन काय आहे? तुम्ही सिस्टीम मॅनेजर म्हणून काम करता. व्हाट इज युअर क्वालिफिकेशन?

**सुधीर राउत (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या बी.ई. कॉम्प्युटर आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

हा डी.पी.आर. कोणी बनवला ते सांगा.

**सिमा मिश्रा :-**

के.पी.एम.जी. ॲडव्हायझरी सर्व्हीसेस.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग त्यांचे पत्र का नाही? या डी.पी.आर वर त्यांची सही शिक्का कुठे आहे? ते कोण आहेत? मग या डी.पी.आर. चा आम्ही पोस्टमार्टम करणारच आहे. पहिले कळू द्या की, हा डी.पी.आर. कोणी बनवला? आणि तुम्ही हा डी.पी.आर. आम्हाला न देता आमच्याकडून त्या दिवशी मा. आयुक्त साहेबांनी विनंती केली की, साहेब हा विषयही नव्हता. विषयपटलावर २ (के) नियमानुसार घेतला. ते मगाशी बोलत होते त्यांना मी हे सांगतो की, २ (क) नियमानुसार जर तुम्हाला विषय आणायचा असेल तर पहिली सुचना आणावी लागते. सुचना आणल्यानंतर तीन चतुर्थांश मताधिक्य असेल तर ते मंजुरी देतात. तरच मा. महापौर साहेब तुमची ती सुचना विचारात घेतील. मग सुचना विचारात घेतल्यानंतर तो विषय मांडायचा. विषयानुसार ठराव मांडायचा मग ठरावाला मंजुरी द्यायची. असे असताना आम्ही तो विषय तुम्हाला घ्यायला दिला. कारण मा. आयुक्त साहेबांनी अशी विनंती केली की, जर आपण याला मान्यता दिली नाही तर जे.एन.एन.यु.आर.एम. खाली आपल्याला जे पैसे मिळणार आहेत त्याची मुदत संपेल हे कारण पुढे ठेवून हा अव्वाच्या सव्वा डी.पी.आर. आम्हाला दिला. हा डी.पी.आर कुठल्या कंपनीने बनवला? आणि ह्या कंपनीला बनविण्याचे काम कोणी दिले होते?

**सिमा मिश्रा :-**

संगणक विभागातुन निविदा काढून देण्यात आलेले.

**प्रफुल्ल पाटील :-**

कुठल्या याच्यात मंजुरी झाल्या आहेत? आणि याच्यावर त्यांचे नाव का नाही? मग तुम्ही जेव्हा डी.पी.आर. ची कॉपी देता तेव्हा तुम्ही आम्हाला कम्पेरेटीव्ह का दिले नाही? इतक्या लोकांनी टेंडर भरलेले, इतक्या लोकांनी डी.पी.आर. बनविण्यासाठी, तुम्ही याला किती खर्च केला? डी.पी.आर. बनविण्यासाठी किती खर्च झाला?

**सिमा मिश्रा :-**

वन लॅक थर्टी ऐट टू.....

**प्रफुल्ल पाटील :-**

याच्यामध्ये आम्ही जास्त खोलात जाऊ आणि जास्त विचारतील. एकतर आम्हाला याचे जास्त नॉलेज नाही. आम्ही आय.टी. क्षेत्रातील लोक नाही. पण हा जो डीपीआर आहे हा मोठ मोठ्या कंपन्या, ज्यांचे ऑल ओव्हर इंडिया नेटवर्क आहे. अशा मोठ्या कंपन्या हे वापरतात. तुम्ही हे जे सॉफ्टवेअर, हार्डवेअर दिलेले आहेत. तुमचा सिस्टम मॅनेजर म्हणून काय अभ्यास आहे? सांगा. या डीपीआर वर तुमचा स्वतःचा गोषवारा काय आहे? हाव जस्टीफाय दिझ कॉस्ट इझ प्रॉपर मला सांगा. आणि तुमच्या माहितीसाठी सांगतो, आत्ता तुम्ही मा. आयुक्त साहेबांच्या जागेवर बसले आहात, हा डीपीआर हा एव्हीएम कंपनीचा आहे. या एव्हीएम कंपनीच्या वेबसाईडवरून काढलेला आहे. आणि तुम्ही सिस्टम मॅनेजर ना? मग तुमची वेबसाईड चालू आहे का? चला आत्ता वेबसाईड दाखवा.

**मिलन पाटील :-**

कोर्टामध्ये रिट पिटीशन केले तेव्हा त्यांनी कोर्टाला नाही म्हणून सांगितलेले आहे. कोर्टात तुम्हाला ताशेरे ओढले आहे की नाही? आमि याच्यापुढे तुम्हाला तयार करायला सांगितली आहे की नाही? याच्यापुढचे सर्व टेंडर वेबसाईटवर द्यायला सांगितले आहेत की नाहीत? तुमच्याकडे आदेश आले की नाहीत?

**प्रभात पाटील :-**

श्री. राऊत साहेब, तुमची आवश्यकता असेल तेव्हा तुम्ही मध्ये बोला. आम्ही तुमचा रिस्पेक्ट करतो. काही प्रश्नांची उत्तरे त्यांनाच देऊ द्या.

**मिलन पाटील :-**

मॅडम तुमच्याकडे हायकोर्टचा आदेश आला आहे की नाही?

**सिमा मिश्रा :-**

मा. महापौर साहेबांच्या मान्यतेने बोलते, माझ्याकडे ऑर्डर...

**प्रफुल्ल पाटील :-**

आणि हे पण सांगा की, आजच्या तारखेला वेबसाईड चालू आहे का? असेल तर दाखवा.

**सिमा मिश्रा :-**

लोकल होस्टवर चालू आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आहे, मग दाखवा, ड्ढदृद्व ड्ढण्दृ थ्ड्ढ द्यण्ड्ढ द्यड्ढदड्डड्ढद्वड्ढ ढथ्दृड्डद्यड्ढड्ड ड्ढ ड़दृद्धद्रदृद्धड्डद्यत्दृद. एड्ढड़ड्डद्वड्ढड्ढ द्यण्ड्ढ ड़दृद्वद्धद्य ण्ड्डड्ड थ्ड्डड्डड्ढ द्यण्ड्ढ दृद्धड्डड्ढद्ध ः ड़दृथ्श्त्ड्ढड्ढत्दृदड्ढद्ध ण्ड्ड ढ़त्ध्ड्ढद ध्त्द्यण द्यण्ड्ढ त्दड्ढद्यद्धद्वड़द्यत्दृद.

**सिमा मिश्रा :-**

सर, व्हि आर वर्किंग वॅान दॅट.

**प्रफुल्ल पाटील :-**

ड्ढदृद्व ड्डद्धड्ढ ददृद्य ढदृथ्थ्दृध्ड्ढड्ड द्यण्ड्ढ त्दड्ढद्यद्धद्वड़द्यत्दृद. ॠद्धड्ढ न्दृद्व ड्ढड्डन्त्दढ़ द्यण्त्ड्ढ थ्ड्ढड्ढ. खोटे बोलता. मला दाखवा, या विभागाचा कोणीही कर्मचारी बोलवा. त्यांना विचारा की, वेबसाईड चालू आहे का?

**सिमा मिश्रा :-**

साहेब, लोकली आपल्या संगणक विभागाच्या पी.सी. वर चालू आहे. त्यामध्ये इन्टरनेट सर्विस प्रोव्हायडरची एमटीएनएल ची सेवा आम्ही घेतलेली होती.

**प्रफुल्ल पाटील :-**

यु से मी टूडे युवर वेबसाईड इझ वर्किंग नॅाट? शॉर्टमध्ये सांगा. तुम्ही येस बालतात तर मला प्रक्टीकल दाखवा. एव्हीएम कंपनीच्या इ-गर्व्हरनेस सर्विस चा हा डीपीआर आहे. जस्ट कॉपी आऊट केलेले आहे. ते दुसऱ्याच कंपनीचा सांगतात. आत्ता तुम्हाला हे सांगतो की, हा जो डीपीआर आहे ते एवढ्या मोठ्या पब्लीक लिमीटेड कंपन्या आहेत. ज्यांचे पूर्ण देशात इंटरनेट आहे. त्यांच्यासाठी हा डीपीआर आहे. याच्यात तुम्ही वेब डिझाईन साठी पैसे दिले आहेत. तुम्ही आत्ता बोलतात की, वेबसाईड चालू आहे. तुम्ही येस बोललात. मग तुम्ही वेब डिझाईनींगचे पैसे डीपीआर मध्ये कसे लावले?

**सिमा मिश्रा :-**

वेबसाईट, ओनली फेस-१ हॅझ बीन कम्प्लीटेड.

**प्रफुल्ल पाटील :-**

आत्ता तुम्ही फेस-१ वर आलात. ती तरी चालू आहे का? तीपण चालू नाही.

**जुबेर इनामदार :-**

वॅाट डु यु मीन बाय फेस-१? स्पेसीफाय इट.

**प्रफुल्ल पाटील :-**

सगळे सॉफ्टवेअर इम्पीलमेंन्टेशन जे आहे ते फक्त दिड करोडला येते. यांनी सहा करोड रूपये किंमत लावली. वेबसाईट डिझाईन जी आपल्याकडे ऑलरेडी आहे. जरी ती आपण अपडेट केली तरी त्याला साधारण साडेतीन लाख रूपये खर्च येईन. यांनी इकडे पंधरा लाख रूपये खर्च लावला. मला तुम्ही जरा डिपीआर ची माहिती द्या. ई-सर्वर डाटा बेसला किती खर्च येतो? तुम्ही पाच लाख सदतीस हजार लिहिले आहेत. याच्यामध्ये जीवन चा नवीन सर्वर येतो. तर तुम्ही सर्वर मेन्टेनन्सला पाच लाख सदतीस हजार रूपये, ज्याच्यामध्ये न्यु ब्रॅड जीवनचा सर्वर येतो. टेप लायब्ररी तीन लाखाला येते. तुम्ही आठ लाख लावले. विका स्विच एक लाख वीस हजारला येतो. दोन लाख चाळीस हजार लावले आहेत. कोर राऊचर काय आहे? जरा आम्हाला सांगा. मी अजूनपर्यंत कधी ऐकले नाही. दोन लाख रूपये खर्च आहे, सहा लाख चाळीस हजार रूपये लावला आहे. फायरवॉल दोन लाख रूपये खर्च येतो, चार लाख रूपये लावला. डेस्टॉप अगदी चांगल्यात चांगली कॉलेटी घेतली तरी चोवीस हजार मध्ये येतात. तुम्ही अठ्ठावीस हजार पाचशे रूपये. ॲपलीकेशन सॉफ्टवेयर ॲण्ड वेबसाईट, बघा आत्ता तुम्ही सांगता की, वेबसाईट फेज-वन चालू आहे. परत हे वेबसाईट नवीनचे पण पैसे लावतात. आणि वेबसाईट मेन्टेनन्सचे सुध्दा त्यांनी चाळीस लाख लावले आहेत. म्हणजे वेबसाईड आहे असे सांगतात. आत्ता सांगतात ती चालू आहे, ती बंद आहे. चालू असेल तर त्याच्यावर

लेटेस्ट टेंडर कुठली फ्लोट केली ते मला दाखवा. कोर्टाचा आदेश आहे. तुम्ही त्यांना नोटीस दिलेली आहे की, सगळे टेंडर आत्ता वेबसाईटवरून फ्लोट करायचे. किती टेंडर फ्लोट केले आहेत, त्याच्या कॉपी काढून दाखवा, तरीसुध्दा इथे नवीन वेबसाईटचे पैसे लावले आहेत. मग नवीन वेबसाईट करून परत मेन्टेनन्सचे चाळीस लाख रूपये? म्हणजे इथे कोणी विचारणार नाही म्हणून काही चालेल का? एक्स्टरनल स्टोरेज तुम्ही कसे करणार ते जरा आम्हाला सांगा.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, प्रत्येक महापालिकेने ई-गव्हर्नन्स म्हणजे सीएफसी सुरू करण्यासाठी सेंट्रल गव्हर्नमेंटकडे स्किम पाठवावी असे मंत्रालयात मिटींग घेऊन सांगितले. त्याप्रमाणे सगळ्यांचे डीपीआर सेंट्रल गव्हर्नमेंटकडे पाठवायचे होते म्हणून टेंडर काढले. टेंडर काढल्यानंतर एकाचे टेंडर सात लाखाचे आले आणि दुसऱ्याचे टेंडर दिड लाखाचे आले. ज्यांचे टेंडर मंजुर झाले त्यांना डीपीआर बनवायला सांगितला. त्यांनी जे डीपीआर बनवून दिलेले आहेत, ते इतर महापालिका आणि ते तेच इतर महापालिकेत सुध्दा आहेत. ते इ-गर्व्हरनेस फुलफील चालावे यासाठी आत्ता वेबसाईड, फक्त महापालिकेचे तेवढेच नाव येते. बाकी टेंडर वगेरे याच्यामध्ये पब्लीश करायचे नाही. म्हणजे टोटल इ-गव्हर्नन्स चालविण्यासठी डीपीआर सबमिट करून सेंट्रल गव्हर्नमेंटला शिफारस करण्यासाठी पाठवायचे होते. स्टेट ग्व्हर्नमेंटने शिफारस करून सेंट्रलला पाठवले आहे. सगळ्यांचे पंधरा कोटीचे नवी मुंबईचे मंजुर झाले. तर महापालिकेचे सगळे सॉफ्टवेअर खरेदी करावे लागणार आहेत. आणि त्याच्यासह ई-गव्हर्नन्स चालविण्यासाठी सेंट्रल गव्हर्नमेंटकडे पाठवायचे आहे. त्याच्यामध्ये ३५ टक्के सेंट्रल गव्हर्नमेंटचे, १५ टक्के स्टेट ग्व्हर्नमेंटचे...

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, तो विषय झाला. तुम्ही हे सांगितले म्हणून आम्ही तुम्हाला मंजुरी दिली. पण या डिपीआर बाबत ह्या मॅडमचा स्वतःचा काय अभ्यास आहे ? या डीपीआर मध्ये जे हार्डवेअर ॲण्ड सॉफ्टवेअर दिलेले आहे. या इंटरनॅशनल कंपन्या हे वापरतात. ज्यांचे ऑफीस ऑल ओव्हर इंडिया, ऑल ओव्हर वर्ल्ड आहेत. आपल्या कॉर्पोरेशनचे अख्ख्या देशात ऑफीसेस उघडणार आहात काय? आपली कॉर्पोरेशन तेवढ्या शाखा उघडणार का? मी आता त्यांच्याबरोबर ती चर्चा करत होतो की, तुमच्या डीपीआर मध्ये इतके जे तुम्ही सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर दिलेले आहेत, प्लस त्याच्यावर मेन्टेनन्स दिले आहे. आत्ता आपली बेवसाईड चलू आहे असे त्या म्हणतात. आजच्या तारखेला वेबसाईड बंद आहे. म्हणजे असलेल्या गोष्टी तुम्ही चालवू शकत नाहीत. त्याच्यावर अजून ती वेबसाईड तशीच स्क्रॅप करून तुम्ही नवीन वेबसाईडसाठी याच्यामध्ये प्रस्तावित खर्च केलेला आहे. परत त्याच्यावर चाळीस लाखाचा मेन्टेनन्स सुध्दा. म्हणजे येईल ती बिघडलेलीच येईल का? म्हणजे बिघडलेली तीन चाक असलेली गाडी आणणार आणि एक चाक इकडे बसवणार. माझा म्हणण्याचा अर्थ असा आहे की, डीपीआर चे तुमच्या सिस्टम मॅनेजरना कुठल्य़ाही प्रकारचे नॉलेज नाही, असे माझे म्हणणे आहे. आणि हे तर जाऊ द्या. ह्यापुढे या सिस्टम लावायच्या आहेत. आम्हाला ज्याची इतक्या वरच्या लेव्हलला जायची गरज नाही. उदाहरणार्थ तुम्हाला सांगतो, एक्स्टर्नल स्टोरेज जे आहे, त्याची साईज २१९० टेराबाईट आहे. आत्ता खरे म्हणजे गिगा बाईटमध्ये जातो. आता यांनी टेराबाईटचे घेतलेले आहे. टेराबाईटचे एक्स्टर्नल २१९० टेराबाईटची व्हॅल्यु जी आहे, ती बावीस हजार डॉलर आहे. म्हणजे ११ लाख. आणि डीपीआर मध्ये किती आहे, बत्तीस लाख. डबलपेक्षा जास्त. आणि ही तुमची नोंदवलेली वेबसाईट, जी चालतच नाही. म्हणजे विषय कसा आहे की, झाडूवाल्याला प्रवास करायला विमान आणि अधिकाऱ्याला प्रवास करायला सायकल. म्हणजे ह्या नागरी सुविधा केंद्रामध्ये बसणाऱ्या लोकांनी असलेल्या सिस्टम हा निट चालवल्या नाहीत. सिस्टम कशा चालवतात ते सांगायला नको. त्यांना किती नोटीसा दिलेल्या आहेत, नावात कशाप्रकारे बदल करतात त्या. कोणीतरी सांगितले याच्या नावात बदल केला, त्यांनी केला. आपण त्यांना नोटीसा दिलेल्या आहेत. एवढे यांचे काम चांगल्या पध्दतीचे आहे. आणि ते आम्हाला डीपीआर च्या हिशोबाने पुढे यंत्रणा राबवायला सांगतात. म्हणजे आज जे आम्ही म्हणतो की, आमच्याकडे सिस्टम मॅनेजर आला म्हणजे आमची सगळी सिस्टम ओके आहे. ओके आहे का? आणि हा जो डीपीआर बनवला आहे, त्या कंपनीचा हा स्वतःचा डीपीआर नाही. हा एव्हीएम कंपनीचा मी इंटरनेटवरून काढलेला आहे. एव्हीएम कंपनीची कॉपी आऊट करून हा डीपीआर दिलेला आहे. ही एव्हीएम कंपनी काय आहे? ऑल ओव्हर दि वर्ल्ड त्यांचे नेटवर्क आहे. एवढी मोठी कंपनी आहे की, त्याची आम्हाला काही गरज नाही. म्हणून या गोष्टी फार सिरिअसली घ्या. मी याच्यावर अजून डिटेल बोलू शकतो. पण हा आजचा विषय नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, ज्या एजन्सीने डीपीआर बनवले, त्या एजन्सीला आम्ही पुढच्या मिटींगला बोलवून या डीपीआर चे जस्टीफिकेशन द्यायला त्यांना सांगू. कारण ते ऑलरेडी स्टेट गव्हर्नमेंटने मंजूर करून सेंट्रलला गेलेले आहे. जर चुकीचे झाले असले तर विड्रॉ करू.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रश्न असा आहे की, जस्टीफिकेशन, आम्हाला नगरसेवकांना ती सिस्टम चालवायची नाही. एक लक्ष घ्या, जेव्हा सिस्टम मॅनेजर आमच्याकडे हा डीपीआर प्रोसेस करतो. त्यांना याच्यातील एकाही मुद्दाचे उत्तर

देता आले नाही. मग त्यांनी स्वतः स्टडी करून सांगायला पाहिजे. आम्ही कशाला त्याचे तोंड बघायला इकडे येऊ.

**अरूण कदम :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, माझा विषय असा होता की, संगणक चालकांना सेवेत पुढे मंजुरी द्यायची आहे. साहेब, पुढील प्रस्तावास शासनाकडून मंजुरी येईपर्यंत त्यांना मानधनावर काम करण्याचा संगणक चालक व लघुलेखक सेवेत कार्यरत ठेवावे. तर आपला प्रस्ताव जर शासनाने २-५ वर्षे मंजुर केला नाही. तर तोपर्यंत तुम्ही त्यांना कायम ठेवणार का?

**मा. आयुक्त :-**

मागच्या मा. महासभेत झाला होता त्यावेळेला शासनाकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवला होता. त्यावेळेला शासनाचे उत्तर आले की, स्टाफ मंजुर होणार नाही. आऊटसोर्सींगने करावे म्हणून त्यांनी पत्र पाठवले आहे. कारण आपला जो आस्थापना खर्च आहे तो ३५ टक्के पेक्षा जास्त गेला तर नवीन पद मंजुर होत नाही. तर आपला आत्ता सगळ्या सॅनिटेशन, गार्डन, सर्व डिपार्टमेंटच्या स्टाफवर जर खर्च पाहिला तर तो कमीत कमी ४५ पर्यंत जातो. त्यामुळे नवीन स्टाफ मंजुर होणार नाही म्हणून आऊटसोर्सींगने करावे म्हणून पत्र पाठवले.

**अरूण कदम :-**

आऊटसोर्सींगला असावे. मला काय म्हणायचे आहे की, या ठरावामध्ये शासनाची मंजुरी येईपर्यंत यांना कामावर ठेवावे.

**मा. आयुक्त :-**

शासनाने एकदा कळवले आहे. पुन्हा कळवून बघू.

**अरूण कदम :-**

पण साहेब, शब्द असा वापरता आहे की, शासनाची मंजुरी येईपर्यंत, म्हणजे पाच वर्ष मंजुरी आली नाही तर ते पाच वर्ष कायम राहतील का? म्हणजे ठरावामध्ये शब्दप्रयोग बदल करावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

पाच वर्ष आपण त्यांना मानधनावर शासनाची मंजुरी येईपर्यंत असे म्हटले आहे. पण हा ठराव जेव्हा मागच्या वेळेस झाला तेव्हाच असे ठरले होते की, शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. पण तो पाठवण्यात आलेला नाही. आपण जर शासनाकडे प्रस्ताव पाठवला तर त्याचे लगेच उत्तर येईल. त्यांना जर म्हणायचे आहे की, आऊटसोर्सींग करा तर करू द्या.

**मा. आयुक्त :-**

त्या प्रस्तावालाच उत्तर आलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

एखाद्या मरणाऱ्या माणसाला थोडे दिवस औषध पाजून त्याला तिष्ठत ठेवण्यापेक्षा त्याला मुक्ती तरी देऊ या. किंवा त्याला कायमचे जीवनातून तरी वाचवू. काही तरी करा.

**मा. आयुक्त :-**

साहेब, प्रस्ताव पाठवला होता.

**प्रफुल्ल पाटील :-**

तो २००६ ला पाठवला. तेव्हाची परिस्थिती काय होती, तुमच्याकडे पदनिर्मिती नव्हती...

**मा. आयुक्त :-**

आत्ता परत पाठवू.

**प्रफुल्ल पाटील :-**

पदनिर्मिती नव्हती, सेवाप्रवेश नियम नव्हते. आत्ता सेवाप्रवेश नियमही आहेत, पदनिर्मितीचे प्रस्तावही आहेत. तर तुम्ही ते पाठवा आणि तुम्हाला तर लागणार आहेत.

**मा. आयुक्त :-**

शासनाने जी.आर. दिलेला आहे की, ३५ टक्के पेक्षा जास्त खर्च होणाऱ्या महापालिकेला पद मंजुर करणार नाहीत.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग आता परत द्या, जस्टीफाय करू द्या की, ३५ टक्के पेक्षा जास्त वर येते. आम्हाला करता येत नाही. कुठल्यातरी व्यक्तिला तुला कामावर ठेवायचे नाही असे जेव्हा मला सांगायचे असेल तेव्हा तुझ्यापेक्षा चांगले काम करणारा माणूस माझ्याकडे आहे किंव तुझा खर्च मला परवडत नाही. दोन गोष्टींवर मी त्यांना घरी बसायला सांगणार. इतके दिवस तर आम्ही त्यांची सेवा घेतो आहे. आमचे इथे कोणीही नातलग नाहीत. इतरांचे बऱ्याच लोकांचे नातलग आहेत. श्री. प्रफुल्ल पाटील, श्री. जयंत पाटील, श्रीम. प्रभात पाटील यांचे एकही नातलग त्यांच्यामध्ये नाहीत. उलट तुमच्या अधिकाऱ्यांचे बरेच लोक आहेत. त्यांच्यासाठी आम्ही लढायचे हे बरोबर नाही. उलट इतर लोकांचे प्रस्ताव मान्य होतात. आणि मंत्र्यालयातून प्रस्ताव मान्य करण्यात्या

प्रक्रियेबाबत मी काही बोलणार नाही. पण आपल्या दृष्टीकोनातून आपण तरी प्रामाणिकपणे आम्हाला त्यांना करता येते की, नाही याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणून प्रस्ताव मान्य होऊन येईपर्यंत मानधनावर असे म्हटले आहे. आणि मध्ये अकरा महिन्याचा ब्रेक देऊन करा.

**अरूण कदम :-**

त्याला कालखंड किती असावा?

**प्रफुल्ल पाटील :-**

मध्ये अकरा महिन्याचा ब्रेक द्या.

**अरूण कदम :-**

मग त्याच्यामध्ये असे नमुद करा. मी एवढेच सांगतो.

**मिलन म्हात्रे :-**

एकदम सिम्पल-साधे आहे. तो ठराव केला. घाई-घाईमध्ये वाचला आणि सर्वानुमते मंजुर हा शब्द जेव्हा आला तेव्हा आम्ही सांगितले की, त्याचा कालावधी घाला. विषय संपला. आम्ही कुठे बोलतो की, कामावरून काढा. आणि त्या सिस्टीम मॅनेजर संदर्भात काय निर्णय घेतला?

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, कर्मचाऱ्यांसाठी मा. महासभेने वॉकी-टॉकीची मागणी केलेली. आणि तो ठराव मंजुर झालेला आहे. सात लाखाचा डी.डी.महानगरपालिकेने सदर कंपनीला दिलेला आहे. चार-पाच महिने झाले, अजून ते वॉकी-टॉकी आलेले नाहीत. त्या प्रकरणाचे काय झाले? त्याचे कारण काय? आपात्कालीन सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी आपण ती मागणी केलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

वॉकी टॉकी आली तर ते वॉकींग करत राहतील. साईटवर आहेत म्हणून मस्त बहाना मिळेल. सगळ्या साईट सुरू होतील. बस करा तो वॉकीटॉकीचा विषय.

**दिनेश नलावडे :-**

पण मा. महासभेने मंजुरी दिली आहे. पैसे गेले आहेत, सात लाखाचा डी.डी.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी चार आठवड्याची मुदत मागितली आहे. चार आठवड्यात येतील. सुरू होईल.

**दिनेश नलावडे :-**

म्हणजे एक महिन्यामध्ये वॉकीटॉकी येणार आहेत?

**चंद्रकांत मोदी :-**

अधिकारी मोबाईल उठाते नही है। तो वॉकीटॉकी क्या करने का है?

**लक्ष्मण जंगम :-**

मगाशी हे बोलले. त्यांचे असे म्हणणे आहे की, ठराव मंजुर होउन येईपर्यंत. तसे नाही, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पुर्ण होईपर्यंत असे याच्यामध्ये म्हटले आहे. आत्ता मगासपासून चर्चा लावली आहे. श्री. अरूण कदम साहेब बोलले, श्री. पाटील साहेब बोलले.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. जंगम साहेब, हे प्रशिक्षण झालेले आहे.

**धुव्रकिशोर पाटील :-**

सचिव साहेब माझी एक सुचना आहे. सुचना अशी आहे की, प्रस्तावाला शासनाकडून मंजुरी येईपर्यंत याच्या ऐवजी ११ महिन्यापर्यंत मुदतवाढ द्यावी अशी मी सुचना मांडत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

अकरा महिन्यांनी एक दिवसाचा ब्रेक देऊन.

**अनिल सावंत :-**

चार दिवस करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २६, महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

**प्रकरण क्र. २६ :-**

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ३४ :-**

महानगरपालिकेच्या कर्मचारी संघटना यांनी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान मिळणेची मागणी केलेली असुन राज्य शासनाकडुन शासकिय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्यात येत नाही. मात्र यापूर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.-२६१/ नवि-२४, दि.२७/११/२००२ अन्वये

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री.महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.३१/१०/२००२ रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

**"महानगरपालिकेने कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचा-यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."**

वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि. ३१/१०/२००२ रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकित ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईल – १०९७/ प्र.क्र.२६१/ नवि-२४, दि. २७/११/२००२ अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित असुन गेल्यावर्षी मा. महासभा दि.१०/१०/२००८ ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या वर्ग- २ ते ४ संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना रु.५,८३०/- महापालिका शिक्षकांना रु. ५,८३०/- व रोजंदारी कर्मचारी व सुवर्ण जयंती मध्ये ठोक वेतनावर काम करणारे व मानधनावरील कर्मचारी संगणक चालक यांना रु. ३६३०/-, अस्थायी बालवाडी शिक्षकांना रु. ११००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान वाटपास मंजुरी दिलेली आहे.

सन २००८-०९ या वर्षी कर्मचा-यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्याविषयी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनेने पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | म्युनिसिपल लेबर युनियन | रु. ७५००/- |
| २) | मिरा भाईंदर कामगार सेना | रु. १००००/- |
| ३) | कास्ट्राईब कर्मचारी महासंघ | रु. ८०००/- |
| ४) | श्रमजीवी वाराई माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना (रजि.) | रु. ८०००/- |

सन २००९-१० च्या अदांजपत्रकात सानुग्रह अनुदान वाटपाकरीता तरतुद लेखाशिर्ष "संकिर्ण" 'फ' (१६) मध्ये रु. ११०.०० लाख आहे. महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गाची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **कर्मचारी** | **कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २००८-०९** | **सन २००८-०९ या वर्षात कार्यरत कर्मचा-यांना देण्यात आलेले अनुदान (२००८-०९)** | |
|---|---|---|---|---|
| १) | महापालिका आस्थापनेवरील वर्ग- २ ते ४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १३९१ | रु. ५८३०/- | ८१,०४,६७२/- |
| २) | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | २०२ | रु. ५८३०/- | ११,४०,७३७/- |
| ३) | रोजंदारी कर्मचारी, सुवर्ण जयंती योजना, | २ अ २ अ १ उ ५ | रु. ३६३०/- | १८,१५०/- |
| ४) | संगणक चालक, लघुलेखक | ७९ | रु. ३६३०/- | २,८३,७४६/- |
| ५) | बालवाडी शिक्षिका | ९ | रु. ११००/- | ९,२५८/- |
| | | | **एकुण** | **९५,५६,५६३/-** |

परंतु यावर्षी दि. ३१/०८/२००९ रोजी पासुन राज्यात राज्य निवडणुक आयोगाने विधान सभेची आंचार संहिता लागु केलेली आहे. राज्यात आचारसंहिता लागु असल्यामुळे महानगरपालिकेची आमसभा सुध्दा घेता येत नाही. परंतु आचांर संहिता कालावधीत दिवाळी आल्यामुळे दि. २७/११/२००२ च्या शासनाचे पत्रान्वये व कर्मचारी संघटनाच्या मागणीनुसार उक्त तपशिलाप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी दिलेल्या सानुग्रह अनुदानानुसार यावर्षी मा. महासभेने गतवर्षी मान्यता दिल्याप्रमाणेच सन २००८-०९ या वर्षात नियमित कार्यरत कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान दिल्याने एकुण रक्कम रु.९५.५७ लाख खर्च झालेला आहे.
तरी महानगरपालिका अधिकारी/कर्मचा-यांस सन २००८-०९ चे सानुग्रह अनुदान वाटप करणेस झालेल्या रु. ९५.५७ लाख या खर्चास ही सभा कार्योत्तर मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव** :-

प्रकरण क्र. २७ भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) यांना जोडणारा रेल्वे सबवे बांधणे कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**प्रकाश दुबोले :-**

श्री. हरेश पाटील साहेब, मला २६ नंबर प्रकरणावर बोलायचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**शानु गोहिल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पुर्व) व (पश्चिम) यांना जोडणरा रेल्वे खालील सबवे बांधणे कामी सर्वप्रथम तत्कालिन नगरपरिषद असताना सर्वसाधारण सभा दि. २५/०६/२००१ ठराव क्र. ३६४ अन्वये व तद्नंतर मा. महासभा दि. ०३/०८/२००४ ठराव क्र. २३ अन्वये मा. महासभा दि. १०/१०/२००८ ठराव क्र. ४३ अन्वये मंजुऱ्या प्राप्त आहेत. सदर कामी रू. ९.५९ कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त असून रेल्वे प्रशासनाने सदरचे काम स्वतः हाती न घेता महानगरपालिकेस स्वतः निविदा मागवून करण्यास मान्यता दिली आहे. तथापी सदरचे काम रेल्वेच्या अंगीकृत असलेल्या सल्लागारांमार्फत पार पाडण्याबाबतच कळविलेले आहे. त्यानुसार सदर कामी आतापर्यंत पाच वेळा निविदा मागवून ठेकेदारांनी एकदाही निविदा सादर केलेली नाही. सदर काम हे एदृ घ्द्यञ्ण्त्दढ़ पद्धतीने करणे बाबत रेल्वेने मंजुरी दिली आहे. तथापी प्रत्यक्षात जागेवरील मातीचा दर्जा अतिशय कमी असल्याने व खाडीचे पाणी जमिनीखाली असल्याने एदृ घ्द्यञ्ण्त्दढ़ च्न्ञ्द्यञ्ङ्क्ष् ने सबवे त्र्थ्द्य होण्याची शक्यता आहे.

सदर सबवेच्या ठिकाणची माती कमी दर्जाची असल्याने सदर मातीचे नमूना तपासण्याकरिता क्ष्.क्ष्.च्. ग्द्वध्ड्डद्युत यांना कळविल्यानुसार त्यांनी च्ड्ढञ्द्य ड्ढद्रदृद्धद्य सादर केलेला असून त्यानुसार एदृ घ्द्यञ्ण्त्दढ़ ने च्द्वड्ढद्युत्र करणे शक्य नाही. त्याऐवजी ऋद्य्यञ्ड्ढद्धदद्दुद्यत्ध्ड्ढ च्ड्ढड़ण्ददृथ्दृढ़त्र वापरून ग्त्ड़द्धदृ च्द्धददञ्ड्ढथ्त्दढ़ च्न्ञ्द्यञ्ङ्क्ष् ने सबवे बांधणे कामी रू. ४०.०० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेने फेर निविदा मागवितांना एदृ घ्द्यञ्ण्त्दढ़ व च्द्वञ्ड्ढदड़ण थ्ड्ढञ्द्यञ्ञ ग्त्ड़द्धदृ च्द्धददञ्ड्ढथ्त्दढ़ च्न्ञ्द्यञ्ङ्क्ष् ने दर भरणेबाबत निविदा फॉर्म मध्ये नमूद केले आहे. सदर निविदाची प्रक्रिया सूरू असून ही सभा रू. ४०.०० कोटीच्या सुधारीत खर्चास प्रशसकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर निविदा बाबत पुढील प्रक्रिया करून मा. स्थायी समिती सभेत निविदा ठेवण्यात याव्यात. सदर कामी चालू वर्षाकरिता सन २००९-१० या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद असून ३१ मार्च २०१० पर्यंत लागणारी वाढीव तरतुद पुर्नविनियोजनाद्वारे करण्यात यावी. सदर कामाकरिता रेल्वे प्रशासनाची मान्यता घेउन काम करण्यात यावे.

**जयंत पाटील :-**

काय चालले आहे? दोघांचा विषय एकच आहे आणि एक विषय लक्षात घ्या की, हा कुठल्या वॉर्डचा विषय नाही. तुम्ही दोघेही जेसल पार्कच्या एरियात राहता. परंतु हा भाईंदर (वेस्ट) आणि भाईंदर (इस्ट) .....

**वंदना चक्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्हाला ठराव दिलेला आहे तो वाचा.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, ठराव दिलेला आहे तो कमीत कमी वाचन तर करा.

**जयंत पाटील :-**

श्री. पालांडे साहेब, तुम्ही अभ्यासू नगरसेवक अहात. तुम्ही नियम वाचून बघा. नियमामध्ये असे आहे की, तुम्ही इकडे रितसर प्रस्ताव पाठवल्यानंतर तुम्हाला तीन चतुर्थांश सभागृहाची मान्यता पाहिजे. त्याप्रमाणे तो ठराव आहे का? ठराव जर योग्य रितीने आला नाही तर तो इथे वाचनच होउ शकणार नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मग तुम्ही आत्ता बघा आणि ठेवा...

**जयंत पाटील :-**

नियमाप्रमाणे नाही तर आग्रह कसा करणार?

**प्रशांत पालांडे :-**

तो विषय अतिशय महत्वाचा आहे. करायला काही हरकत नाही.

**जयंत पाटील :-**

एकदम महत्वाचा विषय आहे. त्या विषयावर आपली अर्धा दिवस चर्चा झाली. सकाळी चर्चा झाली. श्री. प्रफुल्ल पाटील यांनी त्या विषयावर जागा दाखवली.

**प्रशांत पालांडे :-**

वाचून बघा. चुकीचा असेल तर सभागृह फेटाळून लावेल.

**जयंत पाटील :-**

आणि ते प्रकरण कोर्टामध्ये आहे. उद्या मा. मुख्यमंत्र्यांकडे त्या विषयावर चर्चा आहे. तुम्ही चर्चा करायला सोबत जा.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, तुम्ही ठरावावर नजर तर टाका. तो मस्करीचा विषय नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला त्या विषयावर जेवढी गंभीरता आहे. आम्हाला पण तेवढीच आहे.

**प्रशांत पालांडे :-**

आम्ही मा. आयुक्त साहेबांबरोबर जाऊ. पण तुम्हाला पण वाचायला काय अडचण आहे?

**जयंत पाटील :-**

तुम्ही जर नियमाच्या बाहेर ठराव आणला.....

**प्रशांत पालांडे :-**

तो नियमाच्या बाहेर कुठे आहे?

**जयंत पाटील :-**

नियमाच्या बाहेरच आहे.

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा. सभागृह ते ठरवेल. सभागृहाला अधिकार आहे की, नाही?

**अरूण कदम :-**

मा. महापौर साहेब, मला या विषयावर बोलायचे आहे. याच्या अगोदर सब-वे साठी निविदा काढल्या होत्या. त्या निविदांची किंमत काय होती? अभियंता साहेब, याच्या अगोदर ही निवीदा आपण मागवली होती आणि ती मंजुरही झाली होती. त्याची अंदाजित किंमत किती होती?

**दिपक खांबीत :-**

प्रशासकीय व आर्थिक मंजुरी ९.५९ कोटीची.

**अरूण कदम :-**

आणि आत्ता किती आहे?

**दिपक खांबीत :-**

आत्ता ४०.

**अरूण कदम :-**

मग त्याच्यामध्ये सबवे करणे उचित होईल की, फ्लाय ओव्हर करणे उचित होईल?

**दिपक खांबीत :-**

फ्लायओव्हरला त्यांनी मंजुरी दिलीच नाही. त्यांनी सबवेलाच बॉक्स पुशिंगने मंजुरी दिली होती.

**अरूण कदम :-**

मग तुम्ही आत्ता मागा ना.

**दिपक खांबीत :-**

सात वेळा काढले.

**अरूण कदम :-**

बॉक्स पुशिंग कामासाठी तिथे किती वेळ जाईल. इतकी वर्षे तिथे किती वेळ जाईल. इतकी वर्षे त्या जेसल पार्क आणि भाईंदर (पश्चिम) दोन्ही ठिकाणी मला वाटते २-३ वर्षे तो विषय अडचणीचा होणार आहे. तिथे जागा शिल्लक नाही. बॉक्स पुशिंग आज एका दिवसाला जास्तीत जास्त एक, दिड फुट, पंधरा इंच तो पुढे जातो.

**दिपक खांबीत :-**

म्हणून आत्ता अल्टरनेट जे मायक्रोड्रीलींग जे आहे. त्याने हे काम करायचे आहे. बॉक्स पुशिंगने सॉइल कंडीशन नुसार पॉसिबल होत नाही.

**अरूण कदम :-**

तुम्ही याचे टेंडर काढले आहे का?

**दिपक खांबीत :-**

साहेब, आफण सहा वेळा टेंडर काढलेले. कोणीच टेंडर भरले नाही.

**धुव्रकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही ही चुकीची माहिती देता. टेंडर आले होते. एका कंपनीने दोन वेळा टेंडर भरले होते. त्याची अमाऊन्ट काय होती?

**दिपक खांबीत :-**

त्याला आपण दोन मेजर दिल्या होत्या. सबवेचे बॉक्स पुशिंग दिले होते.,,,

**धुव्रकिशोर पाटील :-**

साहेब, त्याने मायक्रोटॅनलिंग बॉक्स पुशिंगनेच टेंडर टाकले होते...

**दिपक खांबीत :-**

३९ कोटी. ते आपण रिकॉल केले.

**धुव्रकिशोर पाटील :-**

त्याची अमाऊन्ट किती आली होती?

**दिपक खांबीत :-**

३९ कोटी.

**धुव्रकिशोर पाटील :-**

३६ करोड रूपये आली होती.

**दिपक खांबीत :-**

आपल्याकडे टेंडर आहे.

**धुव्रकिशोर पाटील :-**

मग, तुम्ही इथे एक करोड कसे काय वाढवले? तुम्ही याच्यामध्ये ४० करोड म्हटले आहेत.

**दिपक खांबीत :-**

आपण अंदाजे म्हटले आहे.

**अरूण कदम :-**

साहेब, आपल्याला तिथे टॅनेल करणे उचित राहिल की, फ्लाओव्हर करणे उचित राहिल?

**दिपक खांबीत :-**

साहेब, फ्लायओव्हर फिजीबल नाही.

**जयंत पाटील :-**

तिकडे फ्लाय ओव्हरला जागा कुठे आहे?

**दिपक खांबीत :-**

कारण, छत्रपती शिवाजी मार्गापासून तो फ्लायओव्हर येणार आणि पुढे जेसलपार्कच्या जैन मंदिरपर्यंत जाणार. तर तिथे दोन्ही ठिकाणी रस्ता अरूंद असल्याने ते फिजीबल नाही. याची चाचपणी तीन वर्षापूर्वीच झाली होती. आणि आपण पण बोललो होतो की, फ्लायओव्हर करा. पण ते शक्य नसल्याने त्यांनी बॉक्सपुशिंग अंडरपाथच दिला होता.

**अरूण कदम :-**

मग याची तुम्ही पुन्हा फेरनिविदा मागवणार आहात?

**दिपक खांबीत :-**

आपण सातव्यांदा मागविलेली आहे आणि आपली टेंडर प्रोसेस हे पॉसीबल नाही म्हणून थांबलेली आहे.

**मिलन पाटील :-**

मिलन सबवे होतो तशी गत तर घेणार नाही ना?

**अरूण कदम :-**

तशीच होणार आहे.

**मिलन पाटील :-**

मिलन सबवेची जशी गत आहे. तशी गत होणार आहे. पुन्हा तेच पाणी काढा. मशिन बंद झाली. परत यायचे-जायचे बंद. पुन्हा लोक आपल्या नावाने ठो-ठो बोंब मारणार आहेत.

**अरूण कदम :-**

पालिकेचे ४० कोटी रूपये पाण्यामध्ये जाणार आहेत.

**मिलन पाटील :-**

४० कोटी रूपये खर्च करून याच्यामधून मार्ग निघणार आहे का?

**अरूण कदम :-**

तिथे पाण्याचा फोर्स एवढा जास्त आहे की, फिजीबली तुम्हाला तिथे शक्यच होणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

फाटकावर जे सबवेचे काम चालले आहे. ते गेल्या तीन वर्षापासून पेन्डींग आहे. फाटकाच्या सबवेमध्येपण पाणी भरते.

**मिलन पाटील :-**

आज जेसलपार्कमध्ये किती पाऊस पडतो आणि वेस्टला सुध्दा किती पाऊस पडतो, तेव्हा त्या जेसलपार्कमध्ये किती पाणी साचते. आपण जे करणार ते रेल्वेच्या वर नाही. रेल्वेच्या खालीच जाणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, माझी अशी एक सुचना आहे की, रेल्वेवरून एखादा लाईट ब्रीज जर आपण घेऊ शको, जसे मुंबईमध्ये बऱ्याच ठिकाणी, चर्नी रोडला वगैरे त्यांनी केले आहे.ती एक प्रोसीजर झाली तर कामही लवकर होईल, कमी खर्च येईल आणि लोकांना त्याचा फायदा पण होईल. म्हमजे थ्रु आऊट रेल्वे क्रॉसींग. असा आपण जर हलक्यामध्ये एखादा ब्रीज, त्यांनी चर्नी रोडला वगैरे केले आहेत बघा. त्या टाईपचे आपण रेल्वेशी समन्वय साधून करू शकतो का? कारण तुमचा अंडरग्राऊन्ड सबवे आहे याची लेव्हल आणि वरची लेव्हल मॅच होत नाही.

**दिपक खांबीत :-**

साहेब, ही जी टेक्नीक आहे याला रेल्वेची मंजुरी घेऊनच करायचे आहे.

**अरूण कदम :-**

साहेब, ती साईट आहे त्याची लेव्हल खाडीच्या लेव्हलपेक्षी किती आहे?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, दहिसरला जशी रेल्वेलाईनची हाइट आहे तशी भाईंदरला नाही.

**अरूण कदम :-**

त्याची खाडीची लेव्हल जवळ जवळ सहा मीटर खाली जाणार आहे. मग ते फिजीबल होईल का?

**मिलन म्हात्रे :-**

फाटकावर आपण जे करतो ते होते का?

**दिपक खांबीत :-**

साहेब, रेल्वेने सगळे स्टडी केले आहे. आपण लेव्हल फायनल केलेल्या आहेत आणि त्याप्रमाणे त्यांनी ड्रेनेजची व्यवस्थासुद्धा ठेवलेली आहे. पम्पींग सिस्टम दोन्ही बजूला राहणार आहे.

**अरूण कदम :-**

तुम्हाला पंम्पींगच करावे लागणार आहे.

**दिपक खांबीत :-**

शिवसेना ऑफीसपासून जो मोठा नाला आहे. तो भरपूर डीप आहे. जवळ जवळ दहा ते पंधरा फुट डीप आहे. त्यामुळे त्याच्या मध्ये कुठे पाणी साचणार नाही अशी आपली ड्रेनेडची व्यवस्था ठेवलेली आहे.

**अरूण कदम :-**

कामाचा कालावधी किती आहे?

**दिपक खांबीत :-**

अठरा महिने.

**शरद पाटील :-**

याचा कालावधी अठरा महिने आहे. तर ही जी चाळीस करोडची तरतुद आहे ही आपण कुठून लोन घेऊन करणार आहोत की, कशा पध्दतीने करणार आहोत, याची आम्हाला माहिती द्या.

**दिपक खांबीत :-**

या वर्षाकरिता आपल्या बजेटमध्ये तरतुद आहे. त्याच्यामधूनच खर्च यंदा पडेल की नाही डाऊट आहे. यावर्षी खर्चपण पडणार नाही. कारण मंजुरी घेऊन काम सुरू करायला एक महिना लागेल.

**शरद पाटील :-**

याच्यासाठी आपल्याकडे किती तरतुद बाकी आहे?

**दिपक खांबीत :-**

सहा करोडची तरतुद केलेली आहे. पण ते यावर्षी खर्च होणार नाहीत. आपल्या नवीन बजेटमध्ये पुढच्या वर्षी जो खर्च लागेल, त्याची माहिती घेऊन तेवढी तरतुद पुढच्या बजेचमध्ये करावी लागेल.

**शरद पाटील :-**

नवीन तरतुद करताना आत्ता दहा करोडची ठेवली आणि पुढच्या वर्षी करताना आपण तीस करोड करू शकतो का?

**दिपक खांबीत :-**

बजेट कामांचे असते. दरवर्षी जेवढ खर्च होतो तेवढीच तरतुद करावी लागते.

**अरूण कदम :-**

पण तेवढी तीस करोडची प्रोव्हीजन बजेटमध्ये करणार का?

**शरद पाटील :-**

आत्ता ऑक्ट्रॉयपण रद्द होण्याची वेळ आलेली आहे. तर ती त्याची तरतुद आपण बजेटमध्ये करणार का?

**दिपक खांबीत :-**

काम करायचे की, नाही ते ठरवा.

**सिंह मदन उदितनारायण :-**

मा. आयुक्त साहब, यह पुरा पैसा एक साथ लगेगा नही। यह काम दो साल मे होनेवाला है। तो आधा-आधा दो साल मे हो जाएगा। यह काम पहले से इतना लेट हो गया इसे और लेट नही किया जाए। इसे जल्द शुरू कर दिजीए।

**शरद पाटील :-**

लेट करनेका नही इसलिए उनको पुछ रह है।

**अरूण कदम :-**

श्री. मदन सिंग जी, आपण फ्लायओव्हर करू या ना.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर साहेब, जर चाळीस कोटी फक्त त्यासाठी गेले तर नगरसेवकांच्या वॉर्डमधली कामे कशी करणार? त्याची तरतुद तुम्ही कुठून आणणार?

**अरूण कदम :-**

साहेब, मला एक विचारायचे आहे, भरतीचे बॅकवॉटरचे पाण्याची लेव्हल कुठपर्यंत येणार आहे?

**प्रभात पाटील :-**

श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे, हे सुध्दा नागरिकांचेच काम आहे. श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे बोलतात की, नागरिकांचे काम कसे होणार, तर इथे भाईंदर पूर्व आमि पश्चिमेला जायचे झाले तर लोकांचे काय हाल होतात ते नवघर रोडला राहणाऱ्या आणि भाईंदर वेस्टला राहणाऱ्या लोकांनाच माहिती आहे. बजेटमध्ये त्यांनी तरतुद केली आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

बजेटमधून जर तरतुद केली मग चाळीस कोटीची, आत्ता दहा कोटीची आपण तरतुद केली तरी नगरसेवकांची कामे झाली नाहीत आणि तुम्ही जर बजेटमधून चाळीस कोटी तरतुद केली तर नगरसेवकांच्या वॉर्डमधली कामे कशी होणार?

**प्रभात पाटील :-**

त्यांनी त्याच्यासाठी प्रोव्हीजन केलेले आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

यासाठी तुम्ही केंद्र शासनाकडून किंवा शासनाकडून लोन घ्या. तुम्ही ही कामे बजेटमधून कशाला करता?

**दिपक खांबीत :-**

मागच्या वेळेला आपणच वगळले ना? आपण जे.एन.एन.आर.यु.एम. मध्ये घेतले होते.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मग नगरसवेकांनी वॉर्डमध्ये कामे करायची नाहीत का? नगरसेवकांना बांधकाम फंड नको का?

**सिंह मदन उदितनारायण :-**

मा. आयुक्त साहब, यह काम पहले जे.एन.एन.आर.यु.एम मे था। उसमे से निकालकर हम लोगो ने महापालिका से किया। क्योंकी यह वॉर्ड का काम नही है। जैसे श्री. पाटील साहब ने बोला की, पुरे ईस्ट-वेस्ट का काम है। और इसके लिए पुरी जनता को तकलीफ है। इसलिए इस काम को जल्द से जल्द शुरू किया जाए। इसे और लेट नही किया जाए।

**प्रभात पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, जवाहरलाल नागरी योजनेकडून तुम्ही हे काम का वगळले?

**दिपक खांबीत :-**

जेएनएनआरयुएम मध्ये सबवलेला वगैरे प्रायोरीटी नाही. वॉटर सप्लाय, सिवरेज.

**प्रभात पाटील :-**

मग आता हा फंड तुम्ही कुठून वापरणार? याच्यासाठी आपल्याकडे प्रोव्हीजन नाही.

**दिपक खांबीत :-**

आपला फंड वापरणार,

**प्रभात पाटील :-**

पण त्याच्यासाठी तुम्ही अर्थसंकल्पामध्ये काही स्पेसिफीक...

**दिपक खांबीत :-**

हेड आहे.

**सिंह मदन उदितनारायण :-**

श्री. खांबित साहब, हम लोग पहले जेएनएनआरयुएम से निकालकर महापालिका मे लाया। वापस इसमे जायेंगे क्या? और उसमे अपना बजेट प्रोव्हीजन है।

**प्रभात पाटील :-**

फक्त एक सेकंद बोलायचे आहे. की, तुम्ही जी पण प्रोव्हीजन केलेली आहे. ठिक आहे, तुम्हाला एका वेळेला चाळीस करोड टाकायचे नाहीत. टप्प्याटप्प्याने पैसे भरणार आहे. आपण घर बांघायला घेतो. पहिला स्लॅब टाकतो, दुसरा स्लॅब टाकतो, मधली कामे होत राहतात. आपण पुढच्या वर्षी त्याचे नियोजन करू. पण मा. महापौर साहेब, मला एवढेच म्हणायचे आहे की, पूर्व आणि पश्चिम हा भाग जोडला गेला पाहिजे. कारण शाळेत जाणाऱ्या मुलांना, म्हाताऱ्या-कोताऱ्यांना, गरोदर महिलांना तो इतका मोठा ब्रीज चढणे हे इतके दुरापास्त होते की, दोन्ही भाग हे जोडले गेले पाहिजेत. काय करायचे आणि कसे करायचे हा निर्णय़ सभागृहाने घ्यावा. आपण एकहाती सगळा पैसा खर्च करू नये. टप्प्याटप्प्याने काम करा. पण सबवे होणे अतिशय आवश्यक आहे.

**सिंह मदन उदितनारायण :-**

मा. आयुक्त साहब, आज वहॉ सब वे नही होने के कारण चारसौ से पाचसौ लोग वहा कटकर मर गये है?

**जयंत पाटील :-**

होना जरूरी है और हो जाएगा ।

**प्रफुल्ल पाटील :-**

आत्ता या ठिकाणी मायक्रो टॅनेलिंगचा हा जो विषय आणलेला आहे. आपल्या ज्या रेल्वेखालच्या सीडी आहेत. आपण त्या मायक्रो टॅनेलिंगने करतो आहे ना?

**दिपक खांबीत :-**

होय. तीच सिस्टम.

**प्रफुल्ल पाटील :-**

या ठिकाणी जेव्हा आपण बॉक्सपुशिंगचा प्रस्ताव रेल्वेपुढे ठेवला, तेव्हा त्यांनी बॉक्स पुशिंगला मान्यता दिली की, त्यांनी मायक्रोटॅनेलिंगला मान्यता दिली की, त्यांनी फ्लाय ओव्हर ब्रिजला मान्यता दिली?

**दिपक खांबीत :-**

बॉक्स पुशिंगला.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग रेल्वेने बॉक्स पुशिंगला सबवेला परवानगी कशी दिली?

**दिपक खांबीत :-**

साहेब, तेव्हा जो सॉईल टेस्टींगचता रिपोर्ट होता तो आपली जी राईट म्हणून एजन्सी आहे त्यांच्याकडून आपण घेतला होता. आणि तोच रेल्वेला सबमीट केला होता. पण जेव्हा आपण सहा-सात वेळा टेंडर काढले. आणि जेव्हा विविध लोक आले की, तुमच्याकडे सॉइल कंडीशन ही आहे आणि ते शक्य नाही. त्यावेळेला आपले ठरले की, आपण आयआयटी कडून पुन्हा एकदा चेक करून घेऊ.

**प्रफुल्ल पाटील :-**

आत्ता आयआयटी कडून तुम्ही जो सॉइल रिपोर्ट आणला. तो सॉइल रिपोर्ट बघितल्यानंतर असे आहे की, तिथे बॉक्स पुशिंग पॉसबिल होत नाही असे म्हटले. आत्ता मायक्रो टॅनेलिंग पॉसिबल आहे का हे तरी त्यानी सांगितले आहे का? त्याच्यासाठी तुम्हाला आयबीपी ती संस्था सांगितली, तुमच्याशी त्यांना चर्चा करायला. तुम्ही त्यांच्याशी चर्चा करायला पाहिजे किंवा त्यांना सभागृहामध्ये बोलवायला पाहिजे होते की, त्यांनी सांगायला पाहिजे की, मायक्रो टॅनेलिंगपण सक्सेसफुल होईल. बॉक्स पुशिंगला जी प्रोसीजर आहे. तशीच प्रोसीजर मायक्रोटॅनलिंगला आहे. एवढेच आहे की, बॉक्स पुशिंग स्ट्रेट माती काढते. हे आतमध्ये जाऊन माती बाहेर काढणार आहे. म्हणजे सॉईल तीच आहे. बॉक्स पुशिंगची पध्दत आणि मायक्रो टॅनेलिंगची पध्दत, पुढून आत जाणे आणि आत जाऊन माती काढणे हा जरी फरक असला तरी सॉइलमध्ये काही फरक नाही? म्हणजे मायक्रो टॅनेलिंग ४० कोटी रूपयांचा खर्च करत असताना या ठिकाणी तेसुध्दा व्हाएबल आहे की नाही हे तरी कोणीतरी सर्टीफाय केले पाहिजे. आत्ता तुम्ही काय म्हणता, आम्ही आत्ता असा ठराव करतो आणि रेल्वेला पाठवतो. आणि मग रेल्वेने त्याच्यावर ठरवल्यानंतर आम्ही मान्यता देतो.

**दिपक खांबीत :-**

रेल्वेच्या चिफ इंजिनिअरशी चर्चा केली. त्यांनीच ती सिस्टम सॉइल टेस्टींग करून घ्या. त्यानंतर आम्ही रिपोर्ट घेऊन त्यांच्याकडे गेलो. त्यांनीच आपल्याला हे सजेशन दिले.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणून जी संस्था हे बॉक्स पुशिंग करते, त्यांना तुम्ही बोलावले होते. मागच्या सभेत ठरल्याप्रमाणे तुम्ही त्यांना बोलवायचे ठरवले. चर्चा केली. मग सॉल रिपोर्ट आल्यानंतर त्यांना आपण बोलावले का? हा विषय कसा होतो, प्रत्येक वेळी आम्ही काही निर्णय घेतो. त्याच्यावर पुढे काही झाले नाही. म्हणजे

बॉक्सपुशिंगमध्ये मागची पाच वर्षे गेली. आत्ता दोन वर्षे सुरू झाली, मायक्रो टॅनेलिंगमध्ये जातील. पुन्हा तीन वर्षे जातील आणि नंतर ठरवाल की, मायक्रो टॅनेलिंगपण फेल झाले.कारण कल्वर्ट आणि सबवे याच्यात फरक आहे. कल्वर्टची साईज केवढी आहे आणि सबवे किती मीटरचा आहे?

**दिपक खांबीत :-**

लेन्थ ९५ आहे आणि पाच-पाच मीटरचे दोन बॉक्स आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग, ९५ च्या लेन्थची मायक्रो टॅनेलिंग करायची आणि एखाद्या गटाराची विड्थ किती आहे? तुम्ही जे कल्वर्ट करता त्याची विड्थ किती आहे?

**दिपक खांबीत :-**

१५ फुटापर्यंत असेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

१५ फुट कुठे गेले आणि ९५ मीटर कुठे गेले. म्हणजे ते मायक्रो टॅनेलिंगसुध्दा व्हायेबल होणार आहे की, नाही हे कुठल्यातरी संस्थेने आम्हाला येऊन सांगितले पाहिजे. त्या संस्थेला तुम्ही बोलवा. आत्ता परत असेच होणार आहे. तुम्हाला ठराव करून देतो. आत्तापर्यंत किती ठराव केले, पण काही झाले का? म्हणजे जी टेक्नॉलॉजी आपल्याला माहिती आहे, चाळीस कोटी रूपये मायक्रो टॅनेलिंगचा जो चार्ज आहे. साहेब, मायक्रो टॅनेलिंगची मशिनच चाळीस कोटीची आहे. आज मी चाळीस कोटी रूपये कॉस दाखवली आहे, इंडियामध्ये, मुंबईमध्ये एकच असा माणूस आहे. ज्याच्याकडे मायक्रो टॅनेलिंगची इंम्पोर्टेड मशीन आहे. आणि आज त्याच्याकडे बरीचशी कामे आहेत. म्हणजे आपण आज ठराव केल्यानंतर सुध्दा तो दोन ते अडीज वर्षापर्यंत ती मशिन अव्हेलेबल करू शकणार नाही. आणि हायर साईडला त्याचे चार्जेस का आहेत, तर त्याची एकट्याचीच मशिन आहे. जे आहे. ते सत्य मी आपल्याला सांगितले.

**जयंत पाटील :-**

आत्ता आपण नक्की काय करायचे तेवढे सांगा.

**प्रफुल्ल पाटील :-**

माझे असे म्हणणे आहे की, आपण त्या संस्थेला बोलवा. की, याच्यामध्ये जे मास्टर लोक आहे. सगळ्या लोकांना ऐकू द्या की, बॉक्स पुशिंग व्हाएबल नाही तर मायक्रो टॅनेलिंग तरी व्हाएबल आहे का?

**दिपक खांबीत :-**

मी त्यांच्याशी चर्चा करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

आयआरटी चा रिपोर्ट काय सांगणार की, सॉइल व्हाएबल आहे की नाही. सॉइल काय म्हणते की, बॉक्स पुशिंग व्हाएबल नाही.

**जयंत पाटील :-**

श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, आत्ता आपण हा विषय मंजुर करून घेऊ. पुढच्या सभेमध्ये त्यांना बोलवू. जर आपल्याला ते फिजीबल वाटले नाही तर कॅन्सल करून टाकू.

**प्रफुल्ल पाटील :-**

तेच म्हणतो. विषय मंजुरीला द्यायला काही प्रॉब्लेम नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

आत्ता तुम्ही म्हणलात की, हा विषय आपण मंजुरीला देऊ जे काम होणार आहे, त्याची पध्दतच फायनल होत नाही. तर मंजुरीला देऊन काय करणार?

**दिपक खांबीत :-**

पध्दत फायनल आहे. पण आपण एकदा त्यांना बोलवून चर्चा करू. साहेब, ते काम करणे गरजेचे आहे. आपण २००१ पासून मंजुरी मागतो असे चालले आहे.

**सिंह मदन उदितनारायण :-**

मा. महापौर साहेब, मा. स्थायी समितीका क्या हो रहा है, कुछ समझ मे नही आ रहा है। कल्वर्ट का काम पेन्डींग पडा हुआ है। छह महिना बारिश को बचे है। पुरा इस्ट डुबेगा क्योंकी पिछले टाईम सबवे से पानी निकाला गया था। सबवे चालू होने के बाद कल्वर्ट का कुछ नही। कल्वर्ट का भी काम चालू किया जाए।

**जयंत पाटील :-**

कल्वर्ट का स्टॅंडींग मे मंजुरी, निविदा के लिए है।

**सिंह मदन उदितनारायण :-**

मा. महापौर साहब, स्टॅंडींग मे पास नही हुआ है। कहा पास हुआ है।

**मा. आयुक्त :-**

स्टॅंडींग मे मंजुरी के लिए रखा है।

**सिंह मदन उदितनारायण :-**

साहब, स्टॅंडींग चेअरमन साहब के चुनाव को दो महिना लगेगा तो काम कब चालू होगा। उसको मा. महासभा मे पास किया जाए। छह महिने मे काम होगा क्या?

**दिपक खांबीत :-**

स्टॅंडींग कमिटी को पावर है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महासभा मे लिजिए।

**प्रफुल्ल पाटील :-**

स्टॅंडींगपेक्षा मा. महासभा सुपर आहे. त्याच्यामुळे मा. महासभा घेऊ शकते.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्याकरिता विशेष महासभा लावावी लागेल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहेब, अब कल्वर्ट का भी ठराव ले लिजिए। दोनो साथ मे ले लिजिए।

**स्नेहा पांडे :-**

कल्वर्ट तो सब वे से भी जरूरी है । सबवे और कल्वर्ट साथ मे लिजिए।

**जयंत पाटील :-**

वो गोषवारा अलग रहेगा। यह गोषवारा अलग है।

**दिपक खांबीत :-**

उसका गोषवारा देना पडेगा। टेंडर कितना है, बिलो कितना है और किसे देना है।

**जुबेर इनामदार :-**

त्याच्याकरिता विशेष सभा लावावी लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, एक सुचना अशी होती. भाईंदर वेस्टला एलपीजी गॅसच्या पाईपलाईनला रेल्वेची मंजुरी मिळालेली नाही. त्याच्यानंतर आपल्याला जी मोठी पाईपलाईन भाईंदर वेसटला घ्यायची आहे. त्याकरिता रेल्वेखालून जे बॉक्स पुशिंगचे दिलेले आहे. त्याची सुध्दा रेल्वेची परमिशन मिळालेली नाही. त्यामुळे भाईंदर वेस्टला कमी प्रमाणात पाणी येते. हे जे तीन-चार विषय आहेत हे तुम्ही एकत्र घ्या असे मला वाटते. कारण आमच्याकडे भरपूर अन्याय होतो. वेस्टला गॅसच मिळत नाही. पाईपलाईनद्वारे मिळणारा गॅस वेस्टला मिळत नाही. आपल्या महापालिकेची एलपीजी गॅसवर स्मशानभूमीची दाहीनीपण सुरू झालेली आहे. त्याकरिता हे दोन-तीन विषय तुम्ही एकत्रच घ्या, जसे हे सांगतात. त्यामध्ये माझीपण ही सुचना घ्या. पाण्याच्या पाईपलाईनचे बॉक्स पुशिंगचे काम, एलपीजी गॅसचे रेल्वेखालून जेवढे येणार आहे त्याचे मी बोलतो. रेल्वेची संयुक्तपणे मंजुरी घ्या. रेल्वेच्या खालून येणारी आपली पाईपलाईन पण लहान आहे. हा विषय स्टॅंडींगला दोन-तीन वेळा येऊन गेला आहे. चार वर्षात दोन-तीन वेळा येऊन गेला आहे. अजून काम झालेले नाही. त्याचे स्टेटस काय आहे? कारण पाईपलाईन लहान असल्याकारणाने भाईंदर वेस्टला पाणी पुरवठा होत नाही. रेल्वेखालून नवीन बॉक्स पुशिंग करून त्याच्यातून तीन फुटाची पाईपलाईन वेस्टला घ्यायची आहे. हा प्रस्ताव आपला बऱ्याच वर्षापासून पेन्डींग आहे, यांना विचारा.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. याबाबत रेल्वे कडून परवानगी मागण्यात आली होती. रेल्वेने पहिल्यांदा अंडरग्राऊन्ड परवानगी प्रपोझल सांगितले होते. एमजीपी ने ते प्रपोझल दिले. परत रेल्वेने परमिशन दिली. परंतु, रेल्वे कमिशनर श्री. शेट्टी ते इन्डीपेंन्डेन्ट ऑथोरिटी आहेत. त्यांनी सांगितले की, आम्ही लवकरात लवकर परवानगी देतो. ते प्रकरण त्यांच्याकडे सबमिट केलेले आहे. आठ-पंधरा परवानगी देतो. ते प्रकरण त्यांच्याकडे सबमिट केलेले आहे. आठ-पंधरा दिवस त्यांची परवानगी मिळेल.

**मिलन म्हात्रे :-**

ठाण्याला जो अपघात झाला तो याच्यामुळेच झाला. म्हणून आपण आपला हेका का सोडायचा? सगळ्यात सेप्टी अंडरग्राऊन्ड प्रकरण आहे. आत्ता या नवीन घडलेल्या घटनेवर तुम्ही जर व्यवस्थित पत्रव्यवहार परत केला तर तुम्हाला तशी परमिशन मिळेल. आपण टीव्ही वर आपण बघितले की, पाईपलाईन फुटून त्या ट्रेनवर पडलेल्या आहेत. आणि भाईंदर वेस्टच्या लोकांनी किती वर्षापासून वंचित राहायचे? आपण सगळे वेस्टला आहोत. ही मंजुरी घेताना तुम्ही सगळे एकत्रच घ्या. गॅसपासून वंचित, पाण्यापासून वंचित, वाढीव पाण्यापासून आम्ही लोक वंचित आहोत कारण रेल्वेलाईन आडवी येते.

**जयंत पाटील :-**

सगळ्या मंजुरी आपण एकत्र घेऊ.

**प्रकरण क्र. २७ :-**

भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) यांना जोडणारा रेल्वे सबवे बांधणे कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ३५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पुर्व) व (पश्चिम) यांना जोडणरा रेल्वे खालील सबवे बांधणे कामी सर्वप्रथम तत्कालिन नगरपरिषद असताना सर्वसाधारण सभा दि. २५/०६/२००१ ठराव क्र. ३६४ अन्वये व तद्नंतर मा. महासभा दि. ०३/०८/२००४ ठराव क्र. २३ अन्वये मा. महासभा दि. १०/१०/२००८ ठराव क्र. ४३ अन्वये मंजुऱ्या प्राप्त आहेत. सदर कामी रू. ९.५९ कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त असून रेल्वे प्रशासनाने सदरचे काम स्वतः हाती न घेता महानगरपालिकेस स्वतः निविदा मागवून करण्यास मान्यता दिली आहे. तथापी सदरचे काम रेल्वेच्या अंगीकृत असलेल्या सल्लागारांमार्फत पार पाडण्याबाबतच कळविलेले आहे. त्यानुसार सदर कामी आतापर्यंत पाच वेळा निविदा मागवून ठेकेदारांनी एकदाही निविदा सादर केलेली नाही. सदर काम हे एदृ्न घ्ंद्मण्त्दढ़ पद्धतीने करणे बाबत रेल्वेने मंजुरी दिली आहे. तथापी प्रत्यक्षात जागेवरील मातीचा दर्जा अतिशय कमी असल्याने व खाडीचे पाणी जमिनीखाली असल्याने एदृ्न घ्ंद्मण्त्दढ़ च्न्ग्नद्यङ्घ्ऱ ने सबवे ढ्ढ्रथ्द्य होण्याची शक्यता आहे.

सदर सबवेच्या ठिकाणची माती कमी दर्जाची असल्याने सदर मातीचे नमूना तपासण्याकरिता क़्क़्.च्र्. ग्ड्डश्र्ड्डञ्ज यांना कळविल्यानुसार त्यांनी च्ङ्ढ्ढग्नद्य ङङ्ढद्रदृद्धद्य सादर केलेला असून त्यानुसार एदृ्न घ्ंद्मण्त्दढ़ ने च्ढ्ढड्ढड्ढञ्च्र करणे शक्य नाही. त्याऐवजी ऋ्रड्ढद्यङ्घ्दत्तद्यत्ध्ङ्ढ च्ङ्ढड़ण्ददृथ्दृढ़्र वापरून ग्त्ड़द्धदृ च्द्धददङ्घथ्त्दढ़ च्न्ग्नद्यङ्घ्ऱ ने सबवे बांधणे कामी रू. ४०.०० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेने फेर निविदा मागवितांना एदृ्न घ्ंद्मण्त्दढ़ व च्द्धङ्घदड़ण थ्ङ्घ्ग्नद्म ग्त्ड़द्धदृ च्द्धददङ्घथ्त्दढ़ च्न्ग्नद्यङ्घ्ऱ ने दर भरणेबाबत निविदा फॉर्म मध्ये नमूद केले आहे. सदर निविदाची प्रक्रिया सूरू असून ही सभा रू. ४०.०० कोटीच्या सुधारीत खर्चास प्रशसकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर निविदा बाबत पुढील प्रक्रिया करून मा. स्थायी समिती सभेत निविदा ठेवण्यात याव्यात. सदर कामी चालू वर्षाकरिता सन २००९-१० या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद असून ३१ मार्च २०१० पर्यंत लागणारी वाढीव तरतुद पुर्नविनियोजनाद्वारे करण्यात यावी. सदर कामाकरिता रेल्वे प्रशासनाची मान्यता घेउन काम करण्यात यावे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल** **अनुमोदक :- श्री. मदन उदितनारायण सिंह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २८, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्नःनिर्माण अभियान (ख्ग़्छङ्ग) बी.एस.यु.पी. प्रकल्पास प्रशासकिय मान्यता देणे बाबत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू नागरी पुर्नःनिर्माण अभियनांतर्गत शहरी भागातील झोपडपट्टीवासी यांचे जीवनमान उंचावण्याकरिता शहरी गरिबांकरिता मुलभूत सुविधा पुरविणे (एच्छ्य) हा उप कार्यक्रम राबविण्यात येतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बी.एस.यु.पी. फेज - १ मध्ये काशी गावातील जनतानगर व मिरा गावातील काशी चर्च येथिल झोपडपट्टी वासीयांकरिता एच्छ्य प्रकल्पाचा आराखडा तयार केला आहे. सदर योजनेमध्ये ४१३६ घरे प्रस्तावित केले आहेत. एच्छ्य योजना अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीचा आकृतीबंध खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | केंद्र शासन हिस्सा | राज्य शासन हिस्सा | मनपा हिस्सा | झोपडपट्टी धारक हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १. | घराची किंमत त्त्दृद्धग्नत्दढ़ क्दृग्नद्य | ५० ऽ | ३० ऽ | ९ ऽ | ११ ऽ |
| २. | मुलभूत सुविधा क्ष्दढद्धड्ढग्नद्यद्धद्वड़द्यद्वद्धङ्घ ड्ढदड्ड ड़दृथ्थ्दृद ड्ढथ्ङ्घदत्द्य्र | ५० ऽ | २५ ऽ | २५ ऽ | |

मिरा भाईंदर मनपा बी.एस.यु.पी. प्रकल्प टप्पा - १ च्या रू. ३००.०० कोटी रक्कमेच्या प्रकल्पास ही सभा प्रशासकिय व आर्थिक मान्यता देत आहे. एच्छ्य या उपक्रमाची अंमलबजावणी नियोजनाच्या दृष्टीने प्रभावी व सुरळितप्रमाणे करता यावी म्हणून सदर योजनेसाठी २.५ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत तरतुद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करणेबाबत उक्त अधिनियमांचा कलम ३७ अन्वये फेर कार्यवाही पुर्ण करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हिस्सा अंदाजे ७२.३५ कोटी एवढा अपेक्षित आहे. सदर प्रकल्पा अंतर्गत तोडल्या जाणाऱ्या दुकानाच्या मोबल्यात दुकाने महानगरपालिकेच्या नियमावलीनुसार देण्यात येतील. सदर खर्च महानगरपालिकेने सदर जागेत योग्य ठिकाणी

एच्छध क्द्वदृग्नग्न ग्नद्वडग्नत्ड्ढन्ॅ क्दृश्र्ङ्खद्वड़त्ड्ढश्र घ्द्वदृञ्ङ्खड़द्य उभारून भागवावा. त्याकामी निविदा मागवून पुढील कार्यवाही करावी. सदर कामी आवश्यक मान्यता प्राप्त करून घेउन त्वरीत निविदा मागविण्यात याव्यात. तसेच सदर भागातील रहिवाश्यांची राहण्याची आवश्यक ती व्यवस्था आवश्यक त्या आरक्षणाच्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात इमारत बांधून करण्यास अथवा त्यांना दरमहा भाडे देण्यास व खर्चास देखिल ही सभा मंजुरी देत आहे. तथापी सदर ठरावाची पुढील अंमलबजावणी वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर करावी. अस्तित्वात असलेल्या सर्व झोपडीधारकांना घरे / दुकाने देण्यात यावीत. मा. आयुक्त यांनी सदर प्रकल्पाच्या नकाशांना तातडीने मंजूरी द्यावी.

**प्रफुल्ल पाटील** :-

अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

सचिव पुढचा विषय घ्या.

**अरूण कदम :-**

बीएसयुपी या प्रकल्पाचा प्रकल्प अधिकारी कोण आहे?

**मिरादेवी यादव :-**

पब्लीक को काहो शिफ्ट करेंगे तो उसका भाडा कौन देगा? महानगरपालिका देगा या कौन देगा।

**मा. आयुक्त :-**

एक-एक स्किम इम्प्लीमेंट करते वक्त उन लोगो को शिफ्ट करके दुसरी जगह पर बिठाने का, वही जगह खाली रहेगा। कन्स्ट्रक्शन कम्प्लीट होने के बाद शिफ्ट करने का।

**मिरादेवी यादव :-**

फीर भी, १०० लोगों को अगर कही करेंगे तभी तो शुरू करेंगे?

**मा. आयुक्त :-**

वो इन्तजाम करके ही शुरू करेंगे।

**मिरादेवी यादव :-**

उसका भाडा कौन देगा?

**मा. आयुक्त :-**

महानगरपालिका।

**मिरादेवी यादव :-**

बिल्डींग कितने दिनों मे तयार होगी?

**नयना म्हात्रे :-**

साहेब, आमच्या इकडच्या झोपड्या त्यात घेणार नाही का?

**मा. आयुक्त :-**

सरकारी जागेवर ज्या झोपड्या वसलेल्या आहेत, त्यांच्यासाठी ही स्किम आहे. खाजगी जागेवर, सॉल्टच्या जागेवर किंवा फॉरेस्टच्या जागेवर वसलेल्यांची स्किम मंजुर करत नाहीत. जिथे गव्हर्नमेंट लॅन्डवर आहेत, तिथली स्किम आम्ही पाठवली होती...

**अरूण कदम :-**

सरकारी जागा आपण ताब्यात घेतल्या आहेत का?

**मा. आयुक्त :-**

फायनल स्टेज आहे आणि सेंट्रल गव्हर्नमेंटने मंजुरी दिली की, आपोआप जागा पण फ्री-ऑफ कॉस्ट ताब्यात मिळाली.

**अरूण कदम :-**

आपण मनपाचा अहवाल तयार केला का?

**मा. आयुक्त :-**

डीपीआर तयार होऊन सेंट्रल गव्हर्नमेंटकडे स्टे गव्हर्नमेंटने शिफारस करून पाठवली.

**अरूण कदम :-**

याच्यावर आपले मनपाचे बीएसयुपी प्रकल्प अधिकारी कोण आहेत?

**मा. आयुक्त :-**

बीएसयुपी चे प्रकल्प अधिकारी शहर अभियंता, दोन कार्यकारी अभियंता, श्री. वाकोडे आणि अजून दोघेजण आहेत. रेग्युलर सुपरव्हिजनसाठी म्हाडा डिपार्टमेंट आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, सेंट्रल गव्हर्नमेंट आपल्याला देतील, स्टेट गव्हर्नमेंट देतील. आपलेपण याच्यावर शंभर करोड रूपये जातील.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही त्या झोपडपट्टयांना हे करणार आहेत ते कोणत्या वर्षापर्यंतच्या करणार आहात? शासनाच्या नियमाप्रमाणे करणार आहात, कसे काय?

**जयंत पाटील :-**

शासनाने मान्यता दिलेले वर्ष.

**लक्ष्मण जंगम :-**

त्याच्यानंतरचे त्या ठिकाणी काही असतील...

**जयंत पाटील :-**

नवीन झोपडपट्टी नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, त्यांचा काय पुरावा मागणार?

**अरूण कदम :-**

बीएसयुपी प्रोजेक्टची सद्यपरिस्थिती काय आहे?

**दिपक खांबीत :-**

सेंट्रल गव्हर्नमेंटने या प्रकल्पाला मंजुरी दिलेली आहे. आणि आत्ता ते फंन्ड रिलीज करतील.

**अरूण कदम :-**

ही योजना कोणामार्फत राबवली जाणार?

**दिपक खांबीत :-**

महानगरपालिकेमार्फत.

**अरूण कदम :-**

म्हणजे बांधकाम वगैरे महानगरपालिका करणार?

**दिपक खांबीत :-**

निविदा मागवून.

**मिलन पाटील :-**

आपल्या हद्दीतल जी बंदरवाडीची झोपडपट्टी होती. त्या लोकांना पण याच्यात मिळेल ना?

**अरूण कदम :-**

विकासक कोण असणार?

**दिपक खांबीत :-**

ते आपण टेंडर काढणार.

**अनंत पाटील :-**

गुरूचरणाच्या जागा यात अंतर्भुत आहेत का?

**मिरादेवी यादव :-**

मा. आयुक्त साहब कितने समय मे बिल्डींग तैयार होगी?

**जयंत पाटील :-**

आपण आत्ता प्रकल्प अहवालाला मान्यता देत आहोत.

**अनंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, ही घरे कोणत्या झोपडपट्टीधारकांना देणार आहोत? म्हणजे कधीपर्यंतच्या? २०००, १९९५? म्हणजे आम्ही उद्या झोपडी बांधली तरी देणार.

**जयंत पाटील :-**

शासनाच्या नियमानुसार. १/०१/९५ च्या अगोदरच्या.

**दिपक खांबीत :-**

साहेब, सर्व्हे केला आहे.

**अरूण कदम :-**

आम्हाला सर्व्हेचा रिपोर्ट मिळेल का?

**जयंत पाटील :-**

बघून घ्या. सगळे मिळेल.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही जो ठराव वाचला की, प्रत्येक झोपडीला नंबर देणार. तर ज्या अनधिकृत झोपड्या आहेत. त्यांना पण नंबर देणार का?

**जयंत पाटील :-**

शहरातील फ्लॅट, दुकांनाचा तो ठराव होता.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, ज्या अंतर्गत झोपड्या आहेत. त्यामध्ये गुरूचरणाच्या जागा आहेत का?

**विजया वैती :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेबांच्या परनावगीने आपल्याशी पत्रव्यवहार करून आणि वारंवार भेटून वॉर्ड क्र. ६१ मध्ये एस.के. स्टोनच्या बाजूला डॉ. आंबेडकर नगर, डोंगरी झोपडपट्टी, नगरपालिकेच्या राखीव जागेवर रजिस्टर क्र. बीओएम-२००० ते २००१ सन २००० अशी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था तयार झालेली आहे. तरी तेथे राहणारे लोक अंध व अपंग आहेत. त्या लोकांना राहण्यासाठी जर आपण जागेची सोय केली तर देवाने आपल्याला जन्म दिला याचे सार्थक होईल. महोदय, महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार अंध व अपंगांना शासकिय जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय झालेला आहे. तरी मी आपणांस विनंती करते की, या अंध व अपंग लांकांना जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियान यात त्यांना राखीव जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मी विनंती करते.

**जयंत पाटील :-**

ते अंध आणि पांगळे कुठले आहेत?

**विजया वैती :-**

डोंगरी, एस.के. स्टोन जवळ.

**जयंत पाटील :-**

जागा शोधावी लागेल. जागा मिळाली की बघून त्यांचे ही करून घेऊ.

**मर्लिन डिसा :-**

तिकडे कलेक्टर लॅन्ड आहे.

**विजया वैती :-**

तिकडे जागा आहे.

**जयंत पाटील :-**

ती जागा कोणाची आहे.

**मर्लिन डिसा :-**

ती कलेक्टर लॅन्ड आहे.

**विजया वैती :-**

अगोदर ती राखीव जागा नव्हती.

**जयंत पाटील :-**

त्या जागेमध्ये आरक्षण आहे.

**विजया वैती :-**

पूर्वी आरक्षण नव्हते. नंतर आरक्षण केलेले आहे. तरी पण साहेब, ते करण्याचे आपल्या हातामध्ये आहे. आपण करू शकतो.

**जयंत पाटील :-**

मैदानाचे आरक्षण आहे. तुम्हाला मैदान हव की नको?

**विजया वैती :-**

मला माहिती आहे. मी म्हणत नाही की, त्या ठिकाणी पाहिजे. आत्ता हे आपले पुर्नवसन होत आहे. त्यात त्यांना मिळू शकते का? मी अशी विनंती करते की, करून द्यावे.

**जयंत पाटील :-**

आता जो आपला विषय आलेला आहे. तो होऊ द्या. मग बाकीच्या झोपड्या घेऊ.

**अरूण कदम :-**

मा. महापौर साहेब, बीएसयुपी योजनेमध्ये आर्थिक दुर्बल घटकांसाठी ही योजना आहे ना? मग सर्व झोपडपट्टीधारक आर्थिक दुर्बल घटकांमध्ये येतात का? या योजनेला काही निकष असतील ना? झोपडपट्टीत राहणारे काही लोक सुद्धा आर्थिक सक्षम आहेत ना.

**मिरादेवी यादव :-**

उन लोगों का प्रुफ ९५ का लगाया है की २००० का?

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेवकांना विनंती करतो, फक्त अर्धा तास राहिलेला आहे. बरेचसे विषय आहेत.

**प्रकरण क्र. २८ :-**

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्नःनिर्माण अभियान (खग़छङ्ग) बी.एस.यु.पी. प्रकल्पास प्रशासकिय मान्यता देणे बाबत.

**ठराव क्र. ३६ :-**

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू नागरी पुर्नःनिर्माण अभियनांतर्गत शहरी भागातील झोपडपट्टीवासी यांचे जीवनमान उंचावण्याकरिता शहरी गरिबांकरिता मुलभूत सुविधा पुरविणे (एच्छ्‌) हा उप कार्यक्रम राबविण्यात येतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बी.एस.यु.पी. फेज - १ मध्ये काशी गावातील जनतानगर व मिरा गावातील काशी चर्च येथिल झोपडपट्टी वासीयांकरिता एच्छ्‌ प्रकल्पाचा आराखडा तयार केला आहे. सदर योजनेमध्ये ४१३६ घरे प्रस्तावित केले आहेत. एच्छ्‌ योजना अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीचा आकृतीबंध खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | केंद्र शासन हिस्सा | राज्य शासन हिस्सा | मनपा हिस्सा | झोपडपट्टी धारक हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १. | घराची किंमत त्त्दृद्वम्तदढ़ क्दृम्द्य | ५० ऽ | ३० ऽ | ९ ऽ | ११ ऽ |
| २. | मुलभूत सुविधा क्ष्दढद्धड्ढम्द्यद्धद्वड़द्यद्वद्धड्ढ ड्ढदड्ड ड़दृथ्श्र्दृद ड्ढश्र्ड्ढदत्द्यन्र | ५० ऽ | २५ ऽ | २५ ऽ | |

मिरा भाईंदर मनपा बी.एस.यु.पी. प्रकल्प टप्पा - १ च्या रू. ३००.०० कोटी रक्कमेच्या प्रकल्पास ही सभा प्रशासकिय व आर्थिक मान्यता देत आहे. एच्छ्‌ या उपक्रमाची अंमलबजावणी नियोजनाच्या दृष्टीने प्रभावी व सुरळितप्रमाणे करता यावी म्हणून सदर योजनेसाठी २.५ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत तरतुद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करणेबाबत उक्त अधिनियमांचा कलम ३७ अन्वये फेर कार्यवाही पुर्ण करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हिस्सा अंदाजे ७२.३५ कोटी एवढा अपेक्षित आहे. सदर प्रकल्पा अंतर्गत तोडल्या जाणाऱ्या दुकानाच्या मोबल्यात दुकाने महानगरपालिकेच्या नियमावलीनुसार देण्यात येतील. सदर खर्च महानगरपालिकेने सदर जागेत योग्य ठिकाणी एच्छ्‌ क्द्धदृम्द्म म्द्वडम्त्ड्डन्र क्दृथ्श्र्ड्ढद्धड़त्ड्ढ्‌थ घ्द्धदृत्र्ड्ढड़द्य उभारून भागवावा. त्याकामी निविदा मागवून पुढील कार्यवाही करावी. सदर कामी आवश्यक मान्यता प्राप्त करून घेउन त्वरीत निविदा मागविण्यात याव्यात. तसेच सदर भागातील रहिवाश्यांची राहण्याची आवश्यक ती व्यवस्था आवश्यक त्या आरक्षणाच्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात इमारत बांधून करण्यास अथवा त्यांना दरमहा भाडे देण्यास व खर्चास देखिल ही सभा मंजुरी देत आहे. तथापी सदर ठरावाची पुढील अंमलबजावणी वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर करावी. अस्तित्वात असलेल्या सर्व झोपडीधारकांना घरे / दुकाने देण्यात यावीत. मा. आयुक्त यांनी सदर प्रकल्पाच्या नकाशांना तातडीने मंजूरी द्यावी.

**सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे          अनुमोदक :- श्री. प्रफुल्ल पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २९, काशिमिरा, भाईंदर गोराई मनोरी रस्त्याची सुधारणा करणे कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सचिव साहेब, जरा थांबा. मा. आयुक्त साहेब, ज्यांच्याकडे ९४ चा पुरावा नसेल त्या लोकांनी काय करायचे?

**मिलन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील काशिमिरा, भाईंदर, गोराई, मनोरी रस्त्याची सुधारणा करण्याचे काम एम.एम.आर.डी.ए. मार्फत हाती घेण्यात आलेले असून त्या अंतर्गत सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन व गोराई पर्यंतच्या रस्त्याचे मजबुती करणाचे काम पूर्ण झाले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि. १०/१०/२००८ ठराव क्र. ४६ अन्वये एम.एम.आर.डी.ए. ला मुर्धा, राई व मोर्वा येथील ब्रिजची पुर्नबांधणी करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यानुसार एम.एम.आर.डी.ए. ने मुर्धा, राई व मोर्वा येथील ब्रिज बांधणे कामी निविदा मागविलेली असून ठेकेदारास कार्यादेश देण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर काम लवकरच सुरु होईल.

सदर रस्त्याच्या कामा अंतर्गत महामार्ग क्र. ८ वरील शिवाजी महाराज पुतळा ते गोल्डन नेस्ट सर्कल पर्यंत सर्व्हीस रोड, रस्त्याच्या डिव्हायडरची पूर्नबांधणी, सिल्व्हर पार्क, एस.के. स्टोन, कनकिया सर्कल येथे पूल (ज्ड्डण्ड़द्वथ्ड्ढ च्द्धड्ढ्र) बांधणे तसेच सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत नाला बांधणे व रस्ता तयार करण्याचे काम हाती घेण्याबाबत एम.एम.आर.डी.ए. यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सदर कामाकरीता एम.एम.आर.डी.ए.

कडे निधी देण्याविषयी मागणी करण्यास सुचित केले. त्यानुसार सदर कामी रु. ४४,५१,२५,६००/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामी सर्व निधी एम.एम.आर.डी.ए. महानगरपालिकेस अनुदान रुपाने उपलब्ध करुन घ्यावे. सदर कामाच्या खर्चास व एम.एम.आर.डी.ए. कडून अनुदान प्राप्त झाल्यावर निविदा मागविण्यास मान्यता देणात येत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

याच्यावर माझी सुचना आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतल्यापासून ते गोल्डन नेस्ट सर्कलपर्यंत म्हणतो. पण आपण ते व्हॅक्युलर सर्व्हे फक्त तीन ठिकाणी दाखवले. एक सिल्वर पार्कला, एक हटकेश जवळ, पुढे आपण शिवार गार्डन जवळ दाखवले नाही. एक दिपक हॉस्पीटलच्या इकडे क्रॉसींग पाहिजे आणि एक गोल्डन नेस्ट सर्कल. हे तीन त्याच्यामध्ये ॲडीशनल करा.

**जयंत पाटील :-**

मा. विरोधी पक्षनेते, आपले प्रोसिडींग तुम्ही वाचले तर कळेल की, हे पैसे आपण एमएमआरडीए कडे मागतो आहे. त्याच्यानंतर प्रोसीजर. परत विषय येईल. कुठे करायचे, काय करायचे, कसे करायचे त्याला वेळ आहे.

**धुव्रकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही आत्ता याच्यामध्ये जे म्हटले आहे की, एमएमआरडीए यांच्याशी चर्चा केली असता...

**जयंत पाटील :-**

श्री. धुव्रकिशोर पाटील साहेब, आपल्या माहितीसाठी सांगतो. आपल्या मा. खासदार साहेबांनीच हा विषय आणायला लावलेला आहे.

**धुव्रकिशोर पाटील :-**

मग हे त्यांनी म्हटले पाहिजे.

**जयंत पाटील :-**

सगळ्यांच्या माहितीसाठी सांगतो की, मा. खासदार श्री. संजीव नाईक साहेब यांच्या मागणीनुसार हा प्रस्ताव आलेला आहे.

**मिलन पाटील :-**

आपल्या भाईंदरचे मा. खासदार श्री. संजीव नाईक साहेब, यांनी मा. मुख्यमंत्र्यांशी व एमएमआरडीए चे अध्यक्ष श्री गायकवाड यांच्या चर्चा करून यास मान्यता मिळवली आहे.

**प्रभात पाटील :-**

मला एक माहिती द्या की, हे अनुदान रिफन्डेबल आहे?

**जयंत पाटील :-**

आपले पैसे जाणार नाहीत.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, एमएमआरडीए चे कुठचेही काम किंवा कुठचीही मिटींग असेल तर एमएमआरडीए च्या सदस्यांना न्यायला काय हरकत आहे. आपल्या सभागृहात तीस सदस्य आहेत. याची नोंद घ्या. यापुढे आम्हाला कळवा.

**जयंत पाटील :-**

ही मिटींग एमएमआरडीए ने लावलेली नव्हती. मा. खासदारांनी....

**शरद पाटील :-**

मा. खासदारांनी सदस्यांना कळवायला पाहिजे, न्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

पुढच्या वेळेस आपल्याला जरूर कळवू.

**निर्मला सावळे :-**

मा. पिठासीन अधिका-यांच्या परवानगीने बोलते. प्रकरण क्र. २९ मध्ये आपण काशिमिरा ते मनोरपर्यंत जाणा-या रस्त्याची सुधारणा करणार आहोत. काशिमिरा ते मनोरपर्यंत जाणारा जो रस्ता रूंदीकरण होणार आहे, त्याच्यामध्ये बरीचशी घरे बाधित होणार आहेत.

**जयंत पाटील :-**

हा जो विषय आहे तो पैशांचे अनुदान मागण्यासाठी आहे. त्याच्यानंतर तो विषय पुन्हा सभेपुढे येईल.

**निर्मला सावळे :-**

जसा आपण सुभाषचंद्र मैदान हा रस्ता वाढवलेला आहे तिथे जी घरे बाधित झाली. २००९ जुलै महिन्याच्या मा. महासभेमध्ये आपण असा ठराव केला की, सुभाषचंद्र मैदानासमोर जी बाधित झालेली घरे

आहेत, ७३ घरांच्या पुराव्यासहीत छाननी करून पूर्ण नोंद जी घरांची यादी, कुटूंबाची यादी आपल्या मा. महासभेपुढे ठेवण्यात आलेली आहे. ७३ घरे आणि जी काही आपल्या कातकरी कुटूंबे होती, अशा प्रकारे यादी मंजुर करण्यात आली. परंतु अद्यापपर्यंत कुठल्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. सदनिका आपल्या ताब्यात कधीपर्यंत मिळणार आहेत आणि या कुटूंबांना कधीपर्यंत विस्थापित केले जाईल याची मला थोडक्यात माहिती देण्यात यावी.

**जयंत पाटील :-**

वीस लोकांना घरे दिलेली आहेत. छाननीनंतर २८ नावे होती छाननीनंतर ती २० राहिली.

**निर्मला सावळे :-**

एकूण ७३ जणांचा ठराव झाला आणि त्याच्यात प्लस कातकरी होते.

**दिपक खांबीत :-**

७३ अधिक २८ असे होते.

**निर्मला सावळे :-**

पण आत्ता १९ किंवा २० जणांची घरे दिली. ती कधी देण्यात आली? आणि कशा प्रकारे वाटण्यात आली? मग जे शिल्लक आहेत, त्यांना कधी देणार आहात?

**मा. आयुक्त :-**

ऑफीसखाली जे कातकरी होते, त्यांचा २८ जणांचा ठराव झाला होता. त्यामध्ये छाननी केल्यानंतर आपण २० कुटूंबांना दिली. या ज्या ७३ झोपड्या आहेत, त्यामध्ये अधिकृत कोणत्या आणि अनधिकृत कोणत्या ते ठरवण्याचे काम चालू आहे. आणि अवेळी पाऊस सुरू झाला. समजा आम्ही जितक्या जणांना देणार तितक्या जणांना देल्यानंतर बाकीचे जे नियमात बसत नाहीत, १/१०/९५ पूर्वीचे नाहीत त्यांना काढून टाकणे पावसाळ्यात नको म्हणून आपण ठेवलेले आहेत. छाननी चालू आहे. ४-५ दिवसामध्ये जे अधिकृत असतील त्यांना देऊ बाकीच्यांना तिकडून काढून टाकू.

**निर्मला सावळे :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महासभेमध्ये ७३ जणांची जी यादी आली ती पूर्ण छाननी करूनच. सर्व पुराव्यानिशी यादी आलेली. आणि मला वाटते चार-चार वेळा हे पुरावे महानगरपालिकेमध्ये अधिकाऱ्यांमार्फत, समाजकल्याण, सुवर्ण जयंती रोजगार योजनेअंतर्गत हे सादर केलेले आहेत. त्यांनी छाननी करूनच ही यादी मा. महासभेमध्ये ठेवलेली आहे. तीच नगरसेवकांनी सभागृहात मंजुरी दिलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यांचे जे रेशनिंग कार्ड आहे. त्या रेशनिंग कार्डवर ०१/०१/९४ असे हस्ताक्षरात लिहिलेले पाठीमागच्या बाजूची झेरॉक्स आहे. त्यामुळे ओरीजनल तपासून बघणे गरजेचे आहे. किंवा मतदार यादी तपासावी लागेल. नगरपालिकेच्या निवडणुकीची मतदार यादी बघावी लागेल.

**निर्मला सावळे :-**

त्यांचे पुरावे ग्राह्य धरूनच सभागृहापुढे यादी आलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

नगरपालिकेची मतदार यादी तपासून, ९६ ला निवडणुक झालेली आाहे. त्यापूर्वी मतदार यादी असेल त्याप्रमाणे छाननी करून जे अधिकृत असतील त्यांना देऊन टाकू. आठ विदसात देऊ.

**प्रकरण क्र. २९ :-**

काशिमिरा, भाईंदर गोराई मनोरी रस्त्याची सुधारणा करणे कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत.

**ठराव क्र. ३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील काशिमिरा, भाईंदर, गोराई, मनोरी रस्त्याची सुधारणा करण्याचे काम एम.एम.आर.डी.ए. मार्फत हाती घेण्यात आलेले असून त्या अंतर्गत सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन व गोराई पर्यंतच्या रस्त्याचे मजबुती करणाचे काम पूर्ण झाले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि. १०/१०/२००८ ठराव क्र. ४६ अन्वये एम.एम.आर.डी.ए. ला मुर्धा, राई व मोर्वा येथील ब्रिजची पुर्नबांधणी करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. त्यानुसार एम.एम.आर.डी.ए. ने मुर्धा, राई व मोर्वा येथील ब्रिज बांधणे कामी निविदा मागविलेली असून ठेकेदारास कार्यादेश देण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर काम लवकरच सुरु होईल.

सदर रस्त्याच्या कामा अंतर्गत महामार्ग क्र. ८ वरील शिवाजी महाराज पुतळा ते गोल्डन नेस्ट सर्कल पर्यंत सर्व्हीस रोड, रस्त्याच्या डिव्हायडरची पूर्नबांधणी, सिल्व्हर पार्क, एस.के. स्टोन, कनकिया सर्कल येथे पूल (ज्ञ्ण्ड्ढद्वथ्ड्ढ च्ढड्ढ्र) बांधणे तसेच सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत नाला बांधणे व रस्ता तयार करण्याचे काम हाती घेण्याबाबत एम.एम.आर.डी.ए. यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सदर कामाकरीता एम.एम.आर.डी.ए. कडे निधी देण्याविषयी मागणी करण्यास सुचित केले. त्यानुसार सदर कामी रु. ४४,५१,२५,६००/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामी सर्व निधी एम.एम.आर.डी.ए. महानगरपालिकेस

अनुदान रुपाने उपलब्ध करुन घ्यावे. सदर कामाच्या खर्चास व एम.एम.आर.डी.ए. कडून अनुदान प्राप्त झाल्यावर निविदा मागविण्यास मान्यता देणात येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. लक्ष्मण जंगम यांनी खालील सुचना मांडली**

१) शिवार उद्यान २) दिपक हॉस्पीटल ३) गोल्डन नेस्ट सर्कल येथे ज्ड्ढणत्ड़द्वथ्ड्ढद्ध च्द्वडध्ड्ढद्र बांधण्यात यावे.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३०, जैसल पार्क ते घोडबंदर कडे जाणारा खाडी समांतर डी.पी. रस्ता तयार करणेबाबत सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**सिंह मदन उदितनारायण :-**

भाईंदर (पूर्व) येथे जैसल पार्क ते घोडबंदरकडे जाणारा खाडी समांतर १८.०० मीटर व ३०.०० मीटर रुंदीचा डी.पी. रोड असून सदर रत्याच्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यात आला होता. तथापी मा. महासभा दि. ०१/०७/२००९ ठराव क्र. २३ अन्वये सदर रस्त्याचे काम ख़्ग़छड्ग अंतर्गत प्रस्तावित करण्याबाबत निर्णय करण्यात आला होता. सदर रस्त्याचे काम ख़्ग़छड्ग अंतर्गत तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ट करुन सदर प्रकल्प अहवाल ग्ग्ड़क्ऋ मार्फत राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता. सदर सविस्तर प्रकल्प अहवालास राज्य शासनाची मान्यता प्राप्त आहे. तथापी केंद्र शासनाने महाराष्ट्राकरीता असलेला निधी संपल्याने सद्यस्थितीत केंद्र शासनाकडे तूर्तास सविस्तर प्रकल्प अहवाल पाठवू नये असे कळविल्याने सदर सविस्तर प्रकल्प अहवाल ग्ग्ड़क्ऋ कडे प्रलंबित आहे.

ख़्ग़छड्ग अंतर्गत प्रस्तावित कामांपैकी केंद्र शासनामार्फत पाणीपुरवठा योजना, मलःनिसारण योजना, परिवहन व्यवस्था, संगणक प्रणाली इ. प्रकल्प अहवालांना प्राधान्य देण्याचे धोरण असल्याने महानगरपालिकेमार्फत तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता मिळण्यास बराच विलंब लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर काम रस्त्याच्या सविस्तर प्रकल्प अहवालातून वगळण्यात यावे व इतर रस्त्यांच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ट करावा.

याबाबत ग्ग्ड़क्ऋ च्या अधिकाऱ्याशी चर्चा केली असता जैसल पार्क ते घोडबंदर हा रस्ता छत्रपती शिवाजी महाराज मार्गास समांतर असा एकमेव ३०.०० मीटर रुंदीचा रस्ता असल्याने भाईंदर (पूर्व) येथील व छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करण्याकरीता सदर रस्ता होणे आवश्यक असल्याने मत प्रदर्शित करुन सदर रस्त्याच्या कामास ग्ग्ड़क्ऋ मार्फत कर्ज निधी देण्यात येईल असे सांगितले. सदर रस्त्यास एस. एन. कॉलेज समोरील रस्ता, गोल्डन नेस्ट, दिपक हॉस्पीटल जवळील रस्ता, रामदेव पार्क रस्ता, कनकिया, एस.के. स्टोन, हटकेश उद्योग नगर समोरील डी.पी. रस्ते जोडल्यास शहरातील सर्व वाहतुक सुरळीत होईल. सदर रस्ता हा क्ङ्ग ने बाधीत होत असून सदर प्राधिकरणाची मान्यता घेण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत मा. उच्च न्यायालयात अर्ज करुन सदर रस्त्याचे काम हाती घेण्याबाबत परवानगी घेण्याचे काम देखील सुरु आहे. सदर रस्त्याकरिता मे. आर्किझम यांनी रु. ४९,४०,१४,६८०/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. सदर काम क्ङ्ग प्राधिकरण व मा. उच्च न्यायलयाची परवानगी आल्यानंतर सुरु करण्यात यावे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी आवश्यक निधीची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी व तसेच शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्थेकडून कर्ज उपलब्ध करुन घेण्यास देखील मान्यता देण्यात येत आहे.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंग:-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्याला सुचना आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकात अस्तित्वात असलेल्या ज्या उघाडी आहेत, लघु पाटबंधारे विभागामार्फत बंधाऱ्यावर बसविण्यात येणाऱ्या झडपांच्या संकल्पचित्रानुरूप केल्यास पावसाळ्यात भरतीच्या वेळी खाडीतील पाणी शहरात येण्यापासून रोखणे व आहोटीच्या वेळी पाणी खाडीत सोडणे सोयीस्कर होईल. पाण्याचा निचरा जलद गतीने होण्याच्या दृष्टीकोनातून अस्तित्वात असलेल्या उघाडी व ज्यादा पूल बांधण्याच्या अंदाजीत खर्चासह या अंदाजपत्रकास मंजुरी देत आहे.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहेब, याच्यात आपण बोलले की, याच्यात आपण सुधारित अंदाजपत्रक तयार करणार आहोत. म्हणजे मागच्या वेळेला याचे अंदाजपत्रक तयार झाले होते. मग नेमक्या कुठल्या कारणामुळे हा रस्ता तयार झाला नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

प्रकरण क्र. ३० च्या ठरावाचा वाचन केले.

**चंद्रकांत मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**जयंत पाटील :-**

मा. विरोधी पक्षनेते श्री. जंगम साहेब, आपण जर गोषवारा वाचला तर खालचा एक पॅरेग्राफ आपण वाचून घ्या. जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रस्तावित कामांपैकी केंद्र शासनामार्फत पाणी पुरवठा योजना मलनिःसारण योजना, परिवहन व्यवस्था संगणक प्रणाली इत्यादी प्रकल्पांना प्राधान्य देण्यांत येईल. त्याला प्रायोरिटी आहे. त्याच्यामुळे होणार नाही, लेट होईल. आणि आपण हे एमएमआरडीए च्या माध्यामातून करतो. मग त्याच्यामुळे दुसरा ठराव मांडायचे काही कारण नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

आपण या ठिकाणी या विषयाला जर तसे बघितले तर तुम्ही सांगता की, एस.एन. कॉलेजच्या समोरचा रस्ता, त्याच्यानंतर पुढे जाऊन इंद्रलोकचा रस्ता, त्याच्यापुढे जाऊन आयडील पार्कचा, रामदेव पार्कचा रस्ता, पोलीस स्टेशनच्या पुढचा रस्ता, आणि हटकेशचा रस्ता, मला सांगा आपण या सगळ्या कॉर्नरचा ज्यावेळेला आपण जेसल पार्क ते घोडबंदरचा रस्ता तयार करतो, त्याच्या पाठिशी काय उद्देश आहे की, आपल्या वाहतुकीवर येणारा ताण कमी होणे. मला सांगा, याच्यातील एकतरी रस्ता खाडीपर्यंत जोडला आहे का? आपण या रस्त्याच्या कामासाठी म्हणण्याचे किंवा लेट करण्याचे किंवा थांबविण्याचे कारण हे आहे की, एकतरी रस्ता खाडीच्या किना-यापर्यंत गेला आहे का?

**जयंत पाटील :-**

एस.एन.कॉलेजचा जो रस्ता आहे तो खाडीपर्यंत आहे,

**लक्ष्मण जंगम :-**

एक एस.एन.कॉलेजचा रस्ता असेल, बाकीच्या कुठलाच रस्ता खाडीपर्यंत नाही. आणि मग आपण कशा पध्दतीने वाहतुकीवरचा ताण कमी करणार आहे? गाड्यामधून उडून कॉर्नरच्या रोडला जातील? ज्या ठिकाणी लोक राहतात, मग ती आयडीयल पार्कची असू द्या, रामदेव पार्कची असू द्या, पुढे बिवर्ली पार्कची असू द्या, हटकेशची असू द्या, त्यांच्या घरापर्यंत जाण्यासाठी चांगला रस्ता नाही. त्या ठिकाणापर्यंत गटारे झालेली नाहीत. त्याच्या अगोदर आपण खाडीच्या किना-याला चौपाटी बनवतो. मला सांगा चौपाटी बनवताना किंवा तो रस्ता बनवताना तिथपर्यंत जाण्यासाठी तरी लोकांना रस्ता पाहिजे.

**जयंत पाटील :-**

डी.पी. रोड मध्ये हे रस्ते आहेत. हा सुध्दा प्रस्तावित रस्ता आहे. हा झाल्यानंतर त्याला रस्ते जोडतील.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक पाच जे कनेक्ट आहेत, ते खाडीला मिळणार नाही. कारण सीआरझेड मध्ये काम करू देत नाहीत. आत्ता जो हा रस्ता जाणार आहे तो पाचही रस्त्यांना क्रॉस करून जाणार आहे. त्यामुळे खाडीपर्यंत कुठलेच रोड जाणार नाहीत. सीआरझेड असल्यामुळे आणि कांदळ झाडे तोडता येणार नाहीत. त्यामुळे आपण जो सरळ चौपाटी ते घोडबंदर करणार आहोत, त्या रस्त्याला ते पाचही रस्ते कनेक्ट होणार आहेत. आत्ता प्रत्येक रोडवर येताना आपण काशिमिरा रोडवरूनच यायला पाहिजे. दुसरी जागा नाही. त्यामुळे लोड कमी होणार असेल तर हा रस्ता झाला पाहिजे. आणि त्याला कनेक्टेड ते पाचही रस्ते जोडले पाहिजेत.

**लक्ष्मण जंगम :-**

ठिक आहे. आत्ता मांडलेला ठराव मी मागे घेतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी सांगितलेली सुचना ठरावात समाविष्ट करून घ्यावी.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, हे आपले सुधारित अंदाजपत्रक आहे. म्हणजे मागच्या वेळेला अंदाजपत्रक तयार झालेले होते. मग मागच्या वेळेला रस्ता का तयार झालेला नाही?

**दिपक खांबीत :-**

आपण २००४ ला केले होते.

**प्रविण पाटील :-**

मग हा रस्ता त्यावेळेला कशाला तयार केला नाही?

**दिपक खांबीत :-**

सीआरझेड च्या परमिशनकरिता पाठवले होते.

**प्रविण पाटील :-**

मग आत्ता आपल्याला सीआरझेड चे परमिशन मिळाले आहे का?

**दिपक खांबीत :-**

आपल्य़ाला आत्ता कोर्टामध्ये जायचे आहे.

**प्रविण पाटील :-**

पण ते मिळेल का? आज बरीच प्रकरणे अशी आहेत की, आपल्याला सीआरझेड परवानगीमुळे थांबवलेली आहेत.

**जयंत पाटील :-**

परवानगी मिळाली तरच होईल. नाहीतर होणार नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, आत्ता ज्या संबंधित रस्त्याचे सांगितले आहेत. ते रस्ते बनवण्यासंदर्भात क्रमाक्रमाने ती सुचना सामील करून घ्या.

**प्रकरण क्र. ३० :-**

जैसल पार्क ते घोडबंदर कडे जाणारा खाडी समांतर डी.पी. रस्ता तयार करणेबाबत सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. ३८ :-**

भाईंदर (पूर्व) येथे जैसल पार्क ते घोडबंदरकडे जाणारा खाडी समांतर १८.०० मीटर व ३०.०० मीटर रुंदीचा डी.पी. रोड असून सदर रत्याच्या सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यात आला होता. तथापी मा. महासभा दि. ०१/०७/२००९ ठराव क्र. २३ अन्वये सदर रस्त्याचे काम ख़ग़छङ अंतर्गत प्रस्तावित करण्याबाबत निर्णय करण्यात आला होता. सदर रस्त्याचे काम ख़ग़छङ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ट करुन सदर प्रकल्प अहवाल गङक़्ऋ मार्फत राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता. सदर सविस्तर प्रकल्प अहवालास राज्य शासनाची मान्यता प्राप्त आहे. तथापी केंद्र शासनाने महाराष्ट्राकरीता असलेला निधी संपल्याने सद्यस्थितीत केंद्र शासनाकडे तूर्तास सविस्तर प्रकल्प अहवाल पाठवू नये असे कळविल्याने सदर सविस्तर प्रकल्प अहवाल गङक़्ऋ कडे प्रलंबित आहे.

ख़ग़छङ अंतर्गत प्रस्तावित कामांपैकी केंद्र शासनामार्फत पाणीपुरवठा योजना, मलःनिसारण योजना, परिवहन व्यवस्था, संगणक प्रणाली इ. प्रकल्प अहवालांना प्राधान्य देण्याचे धोरण असल्याने महानगरपालिकेमार्फत तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता मिळण्यास बराच विलंब लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर काम रस्त्याच्या सविस्तर प्रकल्प अहवालातून वगळण्यात यावे व इतर रस्त्यांच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवालात समाविष्ट करावा.

याबाबत गङक़्ऋ च्या अधिकाऱ्याशी चर्चा केली असता जैसल पार्क ते घोडबंदर हा रस्ता छत्रपती शिवाजी महाराज मार्गास समांतर असा एकमेव ३०.०० मीटर रुंदीचा रस्ता असल्याने भाईंदर (पूर्व) येथील व छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करण्याकरीता सदर रस्ता होणे आवश्यक असल्याने मत प्रदर्शित करुन सदर रस्त्याच्या कामास गङक़्ऋ मार्फत कर्ज निधी देण्यात येईल असे सांगितले. सदर रस्त्यास एस. एन. कॉलेज समोरील रस्ता, गोल्डन नेस्ट, दिपक हॉस्पीटल जवळील रस्ता, रामदेव पार्क रस्ता, कनकिया, एस.के. स्टोन, हटकेश उद्योग नगर समोरील डी.पी. रस्ते जोडल्यास शहरातील सर्व वाहतुक सुरळीत होईल. सदर रस्ता हा क्ङ्ङ ने बाधीत होत असून सदर प्राधिकरणाची मान्यता घेण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत मा. उच्च न्यायालयात अर्ज करुन सदर रस्त्याचे काम हाती घेण्याबाबत परवानगी घेण्याचे काम देखील सुरु आहे. सदर रस्त्याकरिता मे. आर्किझम यांनी रु. ४९,४०,१४,६८०/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. सदर काम क्ङ्ङ प्राधिकरण व मा. उच्च न्यायलयाची परवानगी आल्यानंतर सुरु करण्यात यावे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी आवश्यक निधीची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी व तसेच शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्थेकडून कर्ज उपलब्ध करुन घेण्यास देखील मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह** **अनुमोदक :- श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३१ मिरारोड येथील वाहनतळ आरक्षण क्र. १८४ विकसीत करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**एस. ए. खान :-**

मिरा रोड परिसरात शांती नगर, गोकूळ व्हिलेज, सृष्टी, गोल्डन नेस्ट, कनकिया पुनमसागर हे परिसर येतात. तसेच घोडबंदर व दहिसर चेकनाका परिसरातील नागरिक रेल्वे प्रवासासाठी मिरा रोड स्टेशन येथून प्रवास करतात.

मिरा रोड परिसरातील तसेच घोडबंदर व दहिसर चेकनाका परिसरातील नागरिक साधारणतः अडीच ते तीन लाख असून त्यातील साधारणतः एक लाख प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. त्यातील साधारणतः पाच हजार प्रवासी स्वतःच्या मोटर सायकल व सायकल मिरारोड स्टेशन येथे पार्क करतात. ते करताना कोणतेही नियोजन नसल्यामुळे वाहतुकीची कोंडी होते व नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.

महानगरपालिके मार्फत पार्किंग चा ठेका देण्यात आलेला असून सदरचा ठेकेदार हा रस्त्यावरच वाहने पार्क करतो. त्यामुळे महानगरपालिकेस १५,५६,०००.०० एवढ्या वार्षिक उत्पन्नाशिवाय बाकी कुठलाही फायदा होत नाही. तसेच वाहतुकीची कोंडी दुर होत नाही. सदरचा ठेकेदाराकडे केवळ ५०० मोटर सायकल व ५० सायकल पार्क करण्याची क्षमता आहे.

मिरा रोड येथिल आरक्षण क्रमांक १८४ येथे बहूमजली वाहनतळ उभारल्यास अनेक वाहने तेथे राहू शकतील व महानगरपालिकेस जास्त प्रमाणात उत्पन्न मिळेल. महानगरपालिकेस जर स्वखर्चाने अत्याधुनिक वाहन तळ उभारावयाचा असेल तर साधारणतः अंदाजे ५.०० करोड खर्च अपेक्षित आहे व तो चालविण्यासाठी पुन्हा ठेका द्यावा लागेल.

सदर प्रकल्पाचा एग्र तत्वावर प्रस्ताव मागितल्यास महानगरपालिकेचा खर्च वाचू शकेल व उत्पन्नात वाढ होईल. सदर प्रकल्प एग्र तत्वावर देण्यात महानगरपालिकेचे आर्थिक हित जोपासले जाईल, नागरिकांच्या वाहनांची सुरक्षितता आबादीत राहून वाहतुक कोंडी होणार नाही. सदर आरक्षणाच्या जागेवर मोठ्या प्रमाणावर दुचाकी व चार चाकी वाहने उभी राहण्याच्या दृष्टीने अनुभवी खाजगी संस्था / विकासक, एजन्सी कडून प्रस्ताव मागविण्यास ही सभा मान्यता देत आहे. आयुक्त यांनी याबाबत सविस्तर अभ्यास करून आवश्यक अटीशर्तीचा महानगरपालिकेच्या हिताचा विचार करून निविदा फॉर्म तयार करावा.

**निर्मला सावळे :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

हे फक्त मिरारोडसाठीचे होते का? मला फक्त शंका विचारायची आहे. पण शहरामध्ये मोठमोठ्या रस्त्यांना मोठे मोठे ट्रक उभे असतात, त्यांच्याकडून आपण काही घेत नाही का?

**जयंत पाटील :-**

तिकडे आत्ता वाहनतळ आहे. तेच वाढवतो आहे कारण तिकडे जागा कमी आहे.

**प्रभात पाटील :-**

मला एक म्हणायचे आहे की, श्री. नाईक साहेब नेहमी महापालिकेचे उत्पन्न कसे वाढेल याच्याकडे नेहमी त्यांचा कल असतो. मला असे म्हणायचे आहे की, शहरात मुख्य रस्त्यावर वेगवेगळ्या ठिकाणी मोठे-मोठे ट्रक उभे असतात, कुठेही पार्किंग असते. तर त्याच्यासाठी पार्किंग वसुलीचे आपण काही प्रोव्हीजन केले नाही का? तो पैसा आला तर पालिकेलाच जास्त, इन्कम होईल. तो तसा विचार करा. आणि पुढच्या वेळेला विषय घ्या.

**मा. आयुक्त :-**

ट्रक टर्मिनलचे ४० टक्के जागा मिळालेली आहे. ६० टक्के मिळायची राहिलेली आहे. कंम्पाऊंन्ड वॉल बांधायचे सुरू केलेले आहे. त्यामध्ये संध्याकाठी जे ट्रक उभे राहतात ते सगळे त्या ट्रक टर्मिनलवरच पाठवायचे आहेत.

**प्रभात पाटील :-**

मला हेच म्हणायचे होते.

**प्रकरण क्र. ३१ :-**

मिरारोड येथील वाहनतळ आरक्षण क्र. १८४ विकसीत करणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ३९ :-**

मिरा रोड परिसरात शांती नगर, गोकूळ व्हिलेज, सृष्टी, गोल्डन नेस्ट, कनकिया पुनमसागर हे परिसर येतात. तसेच घोडबंदर व दहिसर चेकनाका परिसरातील नागरिक रेल्वे प्रवासासाठी मिरा रोड स्टेशन येथून प्रवास करतात.

मिरा रोड परिसरातील तसेच घोडबंदर व दहिसर चेकनाका परिसरातील नागरिक साधारणतः अडीच ते तीन लाख असून त्यातील साधारणतः एक लाख प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. त्यातील साधारणतः पाच

हजार प्रवासी स्वतःच्या मोटर सायकल व सायकल मिरारोड स्टेशन येथे पार्क करतात. ते करताना कोणतेही नियोजन नसल्यामुळे वाहतुकीची कोंडी होते व नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.

महानगरपालिके मार्फत पार्किंग चा ठेका देण्यात आलेला असून सदरचा ठेकेदार हा रस्त्यावरच वाहने पार्क करतो. त्यामुळे महानगरपालिकेस १५,५६,०००.०० एवढ्या वार्षिक उत्पन्नाशिवाय बाकी कुठलाही फायदा होत नाही. तसेच वाहतुकीची कोंडी दुर होत नाही. सदरचा ठेकेदाराकडे केवळ ५०० मोटर सायकल व ५० सायकल पार्क करण्याची क्षमता आहे.

मिरा रोड येथिल आरक्षण क्रमांक १८४ येथे बहूमजली वाहनतळ उभारल्यास अनेक वाहने तेथे राहू शकतील व महानगरपालिकेस जास्त प्रमाणात उत्पन्न मिळेल. महानगरपालिकेस जर स्वखर्चाने अत्याधुनिक वाहन तळ उभारावयाचा असेल तर साधारणतः अंदाजे ५.०० करोड खर्च अपेक्षित आहे व तो चालविण्यासाठी पुन्हा ठेका द्यावा लागेल.

सदर प्रकल्पाचा एग्र्ब्र तत्वावर प्रस्ताव मागितल्यास महानगरपालिकेचा खर्च वाचू शकेल व उत्पन्नात वाढ होईल. सदर प्रकल्प एग्र्ब्र तत्वावर देण्यात महानगरपालिकेचे आर्थिक हित जोपासले जाईल, नागरिकांच्या वाहनांची सुरक्षितता आबादीत राहून वाहतुक कोंडी होणार नाही. सदर आरक्षणाच्या जागेवर मोठ्या प्रमाणावर दुचाकी व चार चाकी वाहने उभी राहण्याच्या दृष्टीने अनुभवी खाजगी संस्था / विकासक, एजन्सी कडून प्रस्ताव मागविण्यास ही सभा मान्यता देत आहे. आयुक्त यांनी याबाबत सविस्तर अभ्यास करून आवश्यक अटीशर्तीचा महानगरपालिकेच्या हिताचा विचार करून निविदा फॉर्म तयार करावा.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्रीम. निर्मला सावळे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**पिठासीन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३२, मुबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत संपुर्ण अनुदानातुन बांधलेलया वस्ती स्वच्छतागृहावर जाहिरातीचा हक्क देणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणमार्फत (ग्ग्ड़क्त्रॄ) एम.एम.आर. हद्दीत १००ऽ अनुदानातुन वस्ती स्वच्छतागृह बांधण्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सदर योजनेतुन ५६ ठिकाणी वस्ती स्वच्छता गृहाची कामे फेज - १ मध्ये पुर्ण झालेली असून फेज - २ मध्ये ९८ कामे सुरू असून लवकरच पुर्ण करण्यात येणार आहेत. सदर वस्ती स्वच्छता गृहावर जाहिरातीचा हक्क मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणला देण्याकरिता महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव करून पाठविण्याबाबत मा. महानगर आयुक्त यांनी दि. २६ मे २००९ रोजीच्या सोबत जोडलेल्या पत्रान्वये विनंती केली आहे. तरी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सदर वस्ती स्वच्छता गृहावर जाहिरातींचा हक्क देण्याकरिता ही सभा मान्यता देत आहे.

**टेरी परेरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

मा. पिठासीन अधिकारी साहेब, आत्ता हे जे केलेले आहे ते एमएमआरडीए ने स्वच्छतागृह बांधलेले आहेत. आत्ता आपण करोडो रूपये देऊन ॲडव्हर्टाइजमेंटसाठी टेंडर काढतील. परंतु जी स्वच्छतागृह कस्टमच्या जागेवर बांधलेली आहेत, आज उद्या जर कस्टमरने ते तोडले तर उद्या जर आपण त्याचे टेंडर काढले आणि त्याला ॲडव्हर्टाइजमेंटचे अधिकार दिले तर त्याचे नुकसान झाले त्याला जबाबदार कोण? एमएमआरडीए ने २५० कोटीचे बांधले आणि एमएमआरडीए अजूनही या बाबतीत अंधारात आहे. कारण आपल्याकडे जे स्वच्छतागृह बांधलेले आहेत त्याची अजूनही आपल्याकडे कस्टमची मान्यता झालेली नाही. कस्टम त्यांच्या जागेवर बांधलेले जे स्वच्छतागृह आहे ते कधीही तोडू शकते. आणि ते तोडल्यानंतर जे आर्थिक नुकसान होणार आहे, त्याला जबाबदार कोण राहणार आहे?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, सॉल्ट डिपार्टमेंटने जे जुने पूर्वी २५-३० वर्षापूर्वी संडास होते, ते तोडून त्याच ठिकाणी बांधले. आणि चार ठिकाणी नविन ठिकाणी बांधले. या आठ ठिकाणी बांधण्यासाठी काल चर्चा झाली आणि त्यांनी बांधा म्हणून सांगितले.

**मिलन पाटील :-**

साहेब, २५-३० वर्षाच्या झोपड्याच नाहीत. आम्ही तिकडचे स्थायिक आहोत. तुम्ही आम्हाला सांगून पटेल का? सगळे कस्टमच्या जागेवर आहेत. जनता नगरला तुम्ही जे बांदलेले आहेत ते तीस वर्षापूर्वी? आत्ता नवीन झोपडपट्टी झाली. फक्त आंबेडकर नगरचे जुने आहे.

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला एवढेच सांगितले की, दोन ठिकाणी जुने आणि चार ठिकाणी नवीन.

**मिलन पाटील :-**

दोन नाही फक्त एकच. आंबेडकर नगरचा आहे तो जुना आहे.

**मा. आयुक्त :-**

आणि राईचा जुना पाडून बांधला नाही?

**मिलन पाटील :-**

आम्ही सुचना केलेली आहे. या ठरावामध्ये आमची सुचना घ्यायची.

**मा. आयुक्त :-**

विषय यासाठी आला आहे की, ज्यांच्या फंडातून आपण निर्मल अभियान राबवले, सुलभ शौचालय राबवले त्या इमारतीवर जाहिरातीचा हक्क एमएमआरडीए चा आहे.

**प्रकरण क्र. ३२ :-**

मुबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत संपुर्ण अनुदानातुन बांधलेलया वस्ती स्वच्छतागृहावर जाहिरातीचा हक्क देणेबाबत.

**ठराव क्र. ४० :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणमार्फत (ग्गङ्क्त्रृ) एम.एम.आर. हद्दीत १००s अनुदानातुन वस्ती स्वच्छतागृह बांधण्याची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सदर योजनेतुन ५६ ठिकाणी वस्ती स्वच्छता गृहाची कामे फेज - १ मध्ये पुर्ण झालेली असून फेज - २ मध्ये ९८ कामे सुरू असून लवकरच पुर्ण करण्यात येणार आहेत. सदर वस्ती स्वच्छता गृहावर जाहिरातीचा हक्क मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणला देण्याकरिता महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव करून पाठविण्याबाबत मा. महानगर आयुक्त यांनी दि. २६ मे २००९ रोजीच्या सोबत जोडलेल्या पत्रान्वये विनंती केली आहे. तरी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सदर वस्ती स्वच्छता गृहावर जाहिरातींचा हक्क देण्याकरिता ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा    अनुमोदक :- श्री. टेरी परेरा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**पिठासीन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३३, केंद्र शासनाच्या खरछङ योजनेअंतर्गत बस खरेदी वरील जकात व ज्त्रृ च्या रक्कमेत माफी देणे.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या खरछङ योजनेअंतर्गत ५० बस खरेदी करण्याचे प्रयोजन केले आहे व त्याकामी १) ५० बस चेसीज खरेदी करणे व २) ५० बस चेसीजवर बॉडी बिल्डींग करणे या स्वतंत्र कामांची निविदा प्रसिध्द करुन पुढील कार्यवाही केली आहे. सदर ५० बसच्या खरेदीवर जकात व वॅट कराच्या रक्कमेत केंद्रशासन अनुदान देणार नसल्याने त्याचा भार महानगरपालिकेच्या तिजोरीवर पडणार आहे.

केंद्र शासनाच्या खरछङ योजनेअंतर्गत करावयाच्या बस खरेदीवरील जकात व वॅट कराच्या नियमानुसारच्या रक्कमेत माफी दिल्यास महानगरपालिकेस आर्थिक सुसहाय्यता होईल. सबब सदर ५० बस खरेदीवरील जकात व वॅटच्या नियमानुसारच्या रक्कमेत माफी देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

खारीगाव स्मशानाच्या बाजूला रस्त्यामध्येच शौचालय आहे त्याचे काय?

**जयंत पाटील :-**

प्रकरण क्र. ३३ मंजूर झालेले आहे.

**प्रकरण क्र. ३३ :-**

केंद्र शासनाच्या खरछङ योजनेअंतर्गत बस खरेदी वरील जकात व ज्त्रृ च्या रक्कमेत माफी देणे.

**ठराव क्र. ४१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या खग़छङ्ग योजनेअंतर्गत ५० बस खरेदी करण्याचे प्रयोजन केले आहे व त्याकामी १) ५० बस चेसीज खरेदी करणे व २) ५० बस चेसीजवर बॉडी बिल्डींग करणे या स्वतंत्र कामांची निविदा प्रसिध्द करुन पुढील कार्यवाही केली आहे. सदर ५० बसच्या खरेदीवर जकात व वॅट कराच्या रक्कमेत केंद्रशासन अनुदान देणार नसल्याने त्याचा भार महानगरपालिकेच्या तिजोरीवर पडणार आहे.

केंद्र शासनाच्या खग़छङ्ग योजनेअंतर्गत करावयाच्या बस खरेदीवरील जकात व वॅट कराच्या नियमानुसारच्या रक्कमेत माफी दिल्यास महानगरपालिकेस आर्थिक सुसहाय्यता होईल. सबब सदर ५० बस खरेदीवरील जकात व वॅटच्या नियमानुसारच्या रक्कमेत माफी देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**पिठासीन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३४, प्राथमिक आरोग्य केंद्र (टेंबा) भाईंदर (प.) येथिल प्रस्तावित २०० खाटांच्या रूग्णालयाकरिता शासन निर्णयानुसार आवश्यक कर्मचारी आकृतीबंधाबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**मिलन म्हात्रे :-**

गोषवा-यानुसार ठराव मंजुर करण्याकरिता मी हा प्रस्ताव ठेवत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ३४ :-**

प्राथमिक आरोग्य केंद्र (टेंबा) भाईंदर (प.) येथिल प्रस्तावित २०० खाटांच्या रूग्णालयाकरिता शासन निर्णयानुसार आवश्यक कर्मचारी आकृतीबंधाबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. ४२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील टेंबा भाईंदर (प.) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत मोकळी जागा यांचा ताबा पत्र जा. क्र./ठाजिप/नियोजन/वशी/२४१/०७ आरोग्य विभाग जिल्हा परिषद, ठाणे दि. १०.०८.२००७ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे देण्यात आला आहे.

तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यामध्ये दाखल जनहित याचिका क्र. ३८/२००६ निकाल दि. २५.०४.२००६ श्री. मिलन वसंत म्हात्रे विरूध्द महाराष्ट्र राज्य व अन्य या निर्णयास ठरवून दिलेल्या कालमर्यादेस अधिन राहून सदर ठिकाणी २०० खाटांचे रूग्णालय उभारण्याचे प्रस्तावित आहे. तसेच मा. महासभेने टेंबा, भाईंदर (प.) येथे रूग्णालयाच्या इमारतीचे बांधकामास मंजूरी दिलेली आहे. त्यासाठी रूग्णालयाचे काम काही कालावधीतच सुरू होणार आहे. संबंधित रूग्णालयामध्ये विविध वैद्यकीय विभाग शासन नियमांनुसार सुरू करणे आवश्यक आहे. सदर विभागांसाठी विविध संवर्गातील कर्मचारी वर्गाची गरजेनुसार नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच सदर पदांच्या आकृतीबंधास मा. महासभेची मंजूरी घेवून पदनिर्मितीचा प्रस्ताव (आकृतीबंध) शासनाकडे पाठविणे गरजेचे आहे, जेणेकरून पुढील काही कालावधीत या पदांना शासनाची मंजूरी प्राप्त होईल व पर्यायाने सर्व पदे नियमित होतील व कर्मचारी भरतीच्या वेळेस ही पदे कायमस्वरूपी असल्याने संपूर्ण पदे भरली जातील.

याप्रकारे उपरोक्त रूग्णालयाचे प्रशासकीय, दैनंदिन वैद्यकीय कामे प्रभावशाली पध्दतीने करणे शक्य होईल. पर्यायाने रूग्णालयात दाखल होणा-या रूग्णांना प्रभावी वैद्यकीय सेवा देता येईल. तरी उपरोक्त रूग्णालयाकरिता आवश्यक कर्मचारी वर्गाच्या नेमणूकीचा प्रस्ताव तयार करणे, मा. महासभेची मंजूरी घेणे व शासनास मंजूरीसाठी पाठविणे आवश्यक आहे.

तसेच शासन निर्णय क्र.जिरूप /२००४ / प्र.क्र.२४ / आरोग्य ३, मंत्रालय मुंबई - ४०००३२., दि. २६ मे २००४ नुसार उपरोक्त २०० खाटांच्या रूग्णालयास आवश्यक असणा-या कर्मचारी वर्गाचा आरोग्य विभागाकडुन प्राप्त आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | प्रमाणित कर्मचारी वर्ग | आवश्यक पदे | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वर्ग – १** | | | | |
| १ | जिल्हा शल्यचिकित्सक | १ | - | १००००-३२५-१५२०० |
| २ | निवासी वैद्यकीय अधिकारी (चिकित्सा) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | निवासी वैद्यकीय अधिकारी | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ४ | वैद्यकीय अधिकारी (भिषक) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ५ | वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ६ | वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ७ | बालरोग तज्ञ | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ८ | अस्थिव्यंग शल्यचिकित्सक | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ९ | बधिरीकरण शास्त्रज्ञ | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १० | क्ष-किरण शास्त्रज्ञ | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| ११ | शरीरविकृती चिकित्सक | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १२ | मनोविकृती चिकित्सक | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १३ | वैद्यकीय अधिकारी (चर्मरोग) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १४ | वैद्यकीय अधिकारी (क्षयरोग चिकित्सक) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १५ | नेत्रशल्यचिकित्सक | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| १६ | वैद्यकीय अधिकारी (कान, नाक, घसा तज्ञ) | १ | १ | १००००-३२५-१५२०० |
| | **एकूण** | **१६** | **१५** | |
| **सामान्य राज्य सेवा, वर्ग - २** | | | | |
| १ | दत्तशल्यचिकित्सक | १ | १ | ८०००-२७५-१३५०० |
| | **एकूण** | **१** | **१** | |
| **महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वर्ग - २** | | | | |
| १ | वैद्यकीय अधिकारी (रक्तसंक्रमण अधिकारी धरून) | १५ | १५ | ८०००-२७५-१३५०० |
| २ | अधिसेविका, वर्ग – २ | -- | -- | ६५००-२००-१०२०० |
| | **एकूण** | **१५** | **१५** | |
| **वर्ग -३ शुश्रृषा विभाग** | | | | |
| १ | अधिसेविका | १ | १ | ६५००-२००-१०२०० |
| २ | सहाय्यक अधिसेविका | १ | १ | ६५००-२००-१०२०० |
| ३ | परिसेविका | १४ | १४ | ५५००-१७५-९००० |
| ४ | बालरोग परिचारीका | २ | २ | ५५००-१७५-९००० |
| ५ | आरोग्य परिचारीका | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| ६ | मनोविकृती परिचारिका | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| ७ | अधिपरिचारीका (प्रत्येक ४ खाटांमागे १) | ६० | ६० | ५०००-१५०-८००० |
| **एकूण** | | **८०** | **८०** | |
| **अवैद्यकीय कर्मचारी, वर्ग – ३** | | | | |
| ८ | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| ९ | मनोविकृती सामाजिक कार्यकर्ता | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| १० | आहारतज्ञ | १ | - | ५०००-१५०-८००० |
| ११ | रक्तपेढी तंत्रज्ञ | ३ | ३ | ५०००-१५०-८००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | क्ष-किरण तंत्रज्ञ | ३ | ३ | ५०००-१५०-८००० |
| १३ | इ. सी. जी. तंत्रज्ञ | १ | १ | ५०००-१५०-८००० |
| १४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ३ | ३ | ५०००-१५०-८००० |
| १५ | भौतिकोपचार तज्ञ | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| १६ | औषध निर्माता / मिश्रक | ५ | ५ | ४५००-१२५-७००० |
| १७ | दंत आरोग्यक | १ | १ | ४०००-१००-६००० |
| १८ | दंत यांत्रिक | १ | १ | ३२००-४९०० |
| १९ | वाहनचालक | १ | १ | ३०५०-४५९० |
| २० | रूग्णवाहीका चालक | २ | २ | ३०५०-४५९० |
| २१ | भांडार तथा वस्त्रपाल | १ | -- | ३०५०-४५९० |
| २२ | अभिलेखापाल | १ | १ | ४५००-७००० |
| २३ | वैद्यकीय अभिलेखापाल | -- | -- | |
| २४ | वीजतंत्री | १ | -- | ३०५०-४५९० |
| २५ | स्वच्छता निरिक्षक | १ | १ | ४०००-६००० |
| २६ | दूरध्वनी चालक | २ | २ | ३२००-४९०० |
| २७ | शिंपी | १ | -- | ३०५०-४५९० |
| २८ | नळ कारागीर | १ | -- | ३०५०-४५९० |
| २९ | सुतार | १ | -- | ३०५०-४५९० |
| | **एकूण** | **३३** | **२७** | |
| **वर्ग – ४ कर्मचारी** | | | | |
| १ | मुकादम | २ | -- | २६१०-४००० |
| २ | बाह्यरूग्ण सेवक | ५ | ५ | २५५०-३२०० |
| ३ | अपघात विभाग सेवक | ६ | ६ | २५५०-३२०० |
| ४ | रक्तपेढी परिचर | २ | २ | २६१०-४००० |
| ५ | प्रयोगशाळा परिचर | २ | २ | २५५०-३२०० |
| ६ | क्ष-किरण परिचर | २ | २ | २५५०-३२०० |
| ७ | शस्त्रक्रियागृह परिचय | ३ | ३ | २७५०-४४०० |
| ८ | व्रणोपचारक | २ | २ | २७५०-४४०० |
| ९ | कक्षसेवक | २० | २० | २५५०-३२०० |
| १० | सफाईकामगार | २६ | - | २५५०-३२०० |
| ११ | शिपाई | ६ | ४ | २५५०-३२०० |
| १२ | धोबी | ३ | -- | २६१०-४००० |
| १३ | न्हावी | २ | -- | २६१०-४००० |
| १४ | मुख्य स्वयंपाकी | -- | -- | २७५०-४४०० |
| १५ | स्वयंपाकी | -- | -- | २६१०-४००० |
| १६ | सहाय्यक स्वयंपाकी | २ | -- | २५१०-३२०० |
| १७ | उदवाहन चालक | (३) | - | २६१०-४००० |
| १८ | पहारेकरी | (४) | - | २५५०-३२०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | माळी | (२) | - | २५५०-३२०० |
| | **एकूण** | **८३** | **४६** | |
| **प्रशासनिक विभाग** | | | | |
| १ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, वर्ग – १ | -- | -- | ८०००-२७५-१३५०० |
| २ | प्रशासकीय अधिकारी, वर्ग – २ | १ | १ | ६५००-२००-१०५०० |
| ३ | कार्यालयीन अधिक्षक, वर्ग – ३ | १ | १ | ५५००-१७५-९००० |
| ४ | लघुटंकलेखक (मराठी) | १ | १ | ४०००-६००० |
| ५ | वरिष्ठ लिपीक | ३ | ३ | ४०००-६००० |
| ६ | कनिष्ठ लिपिक तथा टंकलेखक | ५ | ५ | ३०५०-४५९० |
| ७ | टंकलेखक | १ | १ | ३०५०-४५९० |
| ८ | लेखापाल / सहाय्यक अधिक्षक | १ | १ | ५०००-१५०-८००० |
| | **एकूण** | **१३** | **१३** | |
| | **एकूण** | **२४१** | **१९७** | |

**<u>मासिक व वार्षिक एकूण वेतन खर्च</u>**

| अ. क्र. | पदनाम | वेतन श्रेणी | मासिक वेतन | एकूण मासिक वेतन | वार्षिक वेतन |
|---|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वर्ग – १** | | | | | |
| १ | जिल्हा शल्यचिकित्सक | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| २ | निवासी वैद्यकीय अधिकारी (चिकित्सा) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ३ | निवासी वैद्यकीय अधिकारी | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ४ | वैद्यकीय अधिकारी (भिषक) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ५ | वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ६ | वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ७ | बालरोग तज्ञ | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ८ | अस्थिव्यंग शल्यचिकित्सक | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ९ | बधिरीकरण शास्त्रज्ञ | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १० | क्ष-किरण शास्त्रज्ञ | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| ११ | शरीरविकृती चिकित्सक | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १२ | मनोविकृती चिकित्सक | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १३ | वैद्यकीय अधिकारी (चर्मरोग) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १४ | वैद्यकीय अधिकारी (क्षयरोग चिकित्सक) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १५ | नेत्रशल्यचिकित्सक | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| १६ | वैद्यकीय अधिकारी (कान, नाक, घसा तज्ञ) | १००००-३२५-१५२०० | २७६५० | २७६५० | ३३१८०० |
| | | **एकूण** | **४४२४००** | **४४२४००** | **५३०८८००** |
| **सामान्य राज्य सेवा, वर्ग - २** | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | दत्तशल्यचिकित्सक | ८०००-२७५-१३५०० | २२३४० | २२३४० | २६८०८० |
| | | **एकूण** | **२२३४०** | **२२३४०** | **२६८०८०** |
| **महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वर्ग - २** | | | | | |
| १ | वैद्यकीय अधिकारी (रक्तसंक्रमण अधिकारी धरून) | ८०००-२७५-१३५०० | २२३४० | ३३५१०० | ४०२१२०० |
| २ | अधिसेविका, वर्ग – २ | ६५००-२००-१०२०० | - | - | - |
| | | **एकूण** | **२२३४०** | **३३५१००** | **४०२१२००** |
| **वर्ग -३ शुश्रृषा विभाग** | | | | | |
| १ | अधिसेविका | ६५००-२००-१०२०० | १७६५८ | १७६५८ | २११८९६ |
| २ | सहाय्यक अधिसेविका | ६५००-२००-१०२०० | १७६५८ | १७६५८ | २११८९६ |
| ३ | परिसेविका | ५५००-१७५-९००० | १५००३ | २१००४२ | २५२०५०४ |
| ४ | बालरोग परिचारीका | ५५००-१७५-९००० | १५००३ | ३०००६ | ३६००७२ |
| ५ | आरोग्य परिचारीका | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| ६ | मनोविकृती परिचारिका | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| ७ | अधिपरिचारीका (प्रत्येक ४ खाटांमागे १) | ५०००-१५०-८००० | १३७०२ | ८२२१२० | ९८६५४४० |
| | | **एकूण** | **१०९०३०** | **११२७४९०** | **१३५२९८८०** |
| **अवैद्यकीय कर्मचारी, वर्ग – ३** | | | | | |
| ८ | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| ९ | मनोविकृती सामाजिक कार्यकर्ता | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| १० | आहारतज्ञ | ५०००-१५०-८००० | १३७०२ | १३७०२ | १६४४२४ |
| ११ | रक्तपेढी तंत्रज्ञ | ५०००-१५०-८००० | १३७०२ | ४११००६ | ४९३२७२ |
| १२ | क्ष-किरण तंत्रज्ञ | ५०००-१५०-८००० | १३७०२ | ४११००६ | ४९३२७२ |
| १३ | इ. सी. जी. तंत्रज्ञ | ५०००-१५०-८००० | १३७०२ | १३७०२ | १६४४२४ |
| १४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ५०००-१५०-८००० | १३७०२ | ४११००६ | ४९३२७२ |
| १५ | भौतिकोपचार तज्ञ | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| १६ | औषध निर्माता / मिश्रक | ४५००-१२५-७००० | १२३४८ | ६१७४० | ७४०८८० |
| १७ | दंत आरोग्यक | ४०००-१००-६००० | ९६४० | ९६४० | ११५६८० |
| १८ | दंत यांत्रिक | ३२००-४९०० | ७७९२ | ७७९२ | ९३५०४ |
| १९ | वाहनचालक | ३०५०-४५९० | ७४४१ | ७४४१ | ८९२९२ |
| २० | रूग्णवाहीका चालक | ३०५०-४५९० | ७४४१ | १४८८२ | १७८५८४ |
| २१ | भांडार तथा वस्त्रपाल | ३०५०-४५९० | - | - | - |
| २२ | अभिलेखापाल | ४५००-७००० | १२३४८ | १२३४८ | १४८१७६ |
| २३ | वैद्यकीय अभिलेखापाल | - | - | - | - |
| २४ | वीजतंत्री | ३०५०-४५९० | - | - | - |
| २५ | स्वच्छता निरिक्षक | ४०००-६००० | ९६४० | ९६४० | ११५६८० |
| २६ | दूरध्वनी चालक | ३२००-४९०० | ७७९२ | १५५८४ | १८७००० |
| २७ | शिंपी | ३०५०-४५९० | - | - | - |
| २८ | नळ कारागीर | ३०५०-४५९० | - | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९ | सुतार | ३०५०-४५९० | - | - | - |
| | | **एकूण** | **१८७९६१** | **१४४४४९८** | **४०१७५६८** |
| **वर्ग – ४ कर्मचारी** | | | | | |
| १ | मुकादम | २६१०-४००० | - | - | - |
| २ | बाह्यरूग्ण सेवक | २५५०-३२०० | ७२९६ | ३६४८० | ४३७७६० |
| ३ | अपघात विभाग सेवक | २५५०-३२०० | ७२९६ | ४३७७६ | ५२५३१२ |
| ४ | रक्तपेढी परिचर | २६१०-४००० | ६२५० | १२५०० | १५०००० |
| ५ | प्रयोगशाळा परिचर | २५५०-३२०० | ७२९६ | १४५९२ | १७५१०४ |
| ६ | क्ष-किरण परिचर | २५५०-३२०० | ७२९६ | १४५९२ | १७५१०४ |
| ७ | शस्त्रक्रियागृह परिचर | २७५०-४४०० | ७५२७ | २२५८१ | २७०९७२ |
| ८ | व्रणोपचारक | २७५०-४४०० | ७५२७ | १५०५४ | १८०६४८ |
| ९ | कक्षसेवक | २५५०-३२०० | ७२९६ | १४५९२० | १७५१०४० |
| १० | सफाईकामगार | २५५०-३२०० | - | - | - |
| ११ | शिपाई | २५५०-३२०० | ७२९६ | २९१८४ | ३५०२०८ |
| १२ | धोबी | २६१०-४००० | - | - | - |
| १३ | न्हावी | २६१०-४००० | - | - | - |
| १४ | मुख्य स्वयंपाकी | २७५०-४४०० | - | - | - |
| १५ | स्वयंपाकी | २६१०-४००० | - | - | - |
| १६ | सहाय्यक स्वयंपाकी | २५१०-३२०० | - | - | - |
| १७ | उदवाहन चालक | २६१०-४००० | - | - | - |
| १८ | पहारेकरी | २५५०-३२०० | - | - | - |
| १९ | माळी | २५५०-३२०० | - | - | - |
| | | **एकूण** | **६५०८०** | **३३४६७९** | **४०१६१४८** |
| **प्रशासनिक विभाग** | | | | | |
| १ | मुख्य प्रशासकीय अधिकारी, वर्ग – १ | ८०००-२७५-१३५०० | - | - | - |
| २ | प्रशासकीय अधिकारी, वर्ग – २ | ६५००-२००-१०५०० | १७६५८ | १७६५८ | २११८९६ |
| ३ | कार्यालयीन अधिक्षक, वर्ग – ३ | ५५००-१७५-९००० | १५००३ | १५००३ | १८००३६ |
| ४ | लघुटंकलेखक (मराठी) | ४०००-६००० | ९६४० | ९६४० | ११५६८० |
| ५ | वरिष्ठ लिपीक | ४०००-६००० | ९६४० | २८९२० | ३४७०४० |
| ६ | कनिष्ठ लिपिक तथा टंकलेखक | ३०५०-४५९० | ७४४१ | ३७२०५ | ४४६४६० |
| ७ | टंकलेखक | ३०५०-४५९० | ७४४१ | ७४४१ | ८९२९२ |
| ८ | लेखापाल / सहाय्यक अधिक्षक | ५०००-१५०-८००० | १३७०२ | १३७०२ | १६४४२४ |
| | | **एकूण** | **८०५२५** | **१२९५६९** | **१५५४८२८** |
| | | **एकूण** | **९२९६७६** | **३८३६०७६** | **३२७१६५०४** |

वरीलप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र (टेंबा) भाईंदर (प.) येथील प्रस्तावित २०० खाटांच्या रूग्णालयाला आवश्यक कर्मचारी आकृतीबंध प्रस्ताव पदनिर्मितीसाठी शासनाकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जयंत पाटील :-**

'ज' चा प्रस्ताव ज्यांनी आणलेला आहे, ते गैरहजर आहेत. त्यामुळे तो प्रस्ताव फेटाळण्यात आलेला आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, माझा मुदतवाढीचा एक ठराव आहे.

**जयंत पाटील :-**

श्री. मिलन पाटील यांचा ठराव घ्या.

**मिलन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नगररचना विभागातील सहाय्यक नगररचनाकार श्री. राजेंद्र बी. मार्कंड यांची प्रतिनियुक्तीवर सेवा वाढविण्याबाबत.

**जयंत पाटील :-**

प्रस्ताव कुठल्या नियमानुसार आणला आहे? असा ठराव घेणार नाही. एक विषय राहिलेला आहे.

**नगरसचिव :-**

मा. विरोधीपक्षनेता श्री. लक्ष्मण जंगम यांना मा. पिठासीन अधिकारी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत आहेत

**एस. ए. खान :-**

श्री. लक्ष्मण गणपत जंगम यांची विरोधी पक्षनेता पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करित आहे.

**जयंत पाटील :-**

सात वाजलेले आहेत. वेळ झालेली आहे. मा. विरोधी पक्षनेता दोन शब्द बोलत आहेत.

**लक्ष्मण जंगम :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेता म्हणून आमचे लाडके आमदार सन्मा. श्री. मुझफ्फर हुसेन साहेब, यांच्या आर्शिर्वादाने, कॉंग्रेस पक्षाच्या सर्व नगरसेवकांच्या सहकार्याने, सन्मा. जिल्हाध्यक्ष श्री. तुळशीदास म्हात्रे साहेबांच्या सहकार्याने माझी निवड झाली. सर्व प्रथम मी आपणा सर्वांचे या ठिकाणी माझ्या निवडीबद्दल स्वागत करतो, हार्दिक अभिनंदन करतो. या सभगृहाचे कामकाज चालत असताना आपण मी विरोधी पक्षनेता असेन तरीसुध्दा मी सर्व सन्मा. सदस्यांशी मिळून मिसळून व सर्वांच्या सहकार्याने मी विरोधी पक्षनेता म्हणून काम करीन.

**जयंत पाटील (पिठासीन अधिकारी) :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ७.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**